| 2 | I.V. Stand with Castor (Heavy) 22 Nos | | | | 1575.00 | | | | **1563.00** | | 2142.82 |
| 3 | Cardiac Stretchur (Fowler Stretchur with O2 + IV Stand inbulf) Overall approx size 1905 mmLx 710 mmW strectcher size 1830mmLx 555mmW Height adjustable from 680 to 830 mm by crank four imported, swivel, non rusting custors, 125mm dia, two with brake synthetic rubber covered handles Two section removable strecher top with backrest on ratchet Two provisions for IV rod, fitted with collapsible railings pretreated & powder coated optional accessaries telescopic IV rod, mattress, oxygen cylinder cage 1 Nos | | | | 23878.00 | | | | **23667.00** | | 52729.84 |
| 4 | Personnel Locker Unit 6 Door With Lock (Base) Size:380Wx457Dx1830H (mm) 9 Nos | | 17679.37 | | 9338.00 | Shree Hospital<br>Sanjivani | 15993.00<br>**8334.00** | | 1209.00 | | |
| 5 | Iron Stool 2 Steps Height - 230/450 mm. step size approx 510mmLX300mmw ; MS. Tubular frame fitted with aluminum tread flats, legs fitted with rubber feet pretreated & powder coated 1 Nos | | | | 2093.00 | | | | **1254.00** | | 2246.50 |
| 6 | Bed Side Locker Executive P/C with SS top Size :- 14" x 15.5"x30" 71 Nos | | 13500.00 | | 2813.00 | Shree<br>Sangivani | 4887.00<br>3402.00 | | **1828.00** | | 4202.02 |
| 7 | Stool Wooden 2 feet height 3 Nos | | | | | Shree<br>Sangivani | **1179.00**<br>1449.00 | | | | |
| 8 | Plastic Stool 123 Nos | | | | | | | | **386.00** | | |
| 9 | ECG Trolly over all approx size 760 mm L x 510 mmW x 900mmH (shelf size; 750mmLx500mmW) SS tubular frame mounted on four custers, 200mm dia two ss shelves with protective railings on all four side 1 Nos | | | | 11025.00 | Shree<br>Sangivani | 15993.00<br>**8838.00** | | 11331.00 | | 11376.34 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील विविध वॉर्ड/ विभागाकरीता हॉस्पिटल फर्नीचर खरेदीकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१० **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील महिला कर्मचा-यांकरीता गणवेश (साडी) खरेदीबाबत प्राप्त बंद कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील कर्मचा-यांकरीता गणवेशाचे कापड खरेदीकामी मा.व्यवस्थापन सभा दि.१८/१०/२०१३ नि.क्र.८१३ अन्वये गणवेश खरेदीकामी रु.१३,७२,०३९/- व शिलाईकामी रु.४,३१,४४०/- अशाप्रकारे एकुण रु.१८,०३,४७९/- चे खर्चास मान्यता देऊन याकामी फेरनिविदा मागविण्यात याव्यात तसेच याकामी

संस्थान वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेऊन कार्यवाही करणेत यावी असे ठरले. त्यानुसार दि.२६/०२/२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेतली व गणवेशाचे कापड खरेदीकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.१७/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ अखेर ई-कमर्शियल निविदा मागविण्यात आल्या होत्या सदर ई-कमर्शियल निविदेस अनुसरुन एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर ई-कमर्शियल निविदा मा.त्रिसदस्य समिती सभा दि.११/०९/२०१४ रोजी उघडण्यात आल्या व निम्नत्तम दर असलेले मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर,राहुरी यांना इकडील पत्र क्र.२९४८ दि.२७/११/२०१४ अन्वये पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

गणवेश शिलाईकामी मा.त्रिसदस्य समिती सभा दि.१८/१०/२०१३ रोजीचे सभेत गणवेश शिलाईसाठी कोटेशन मागविणेत येऊन कर्मचा-यांची मापे घेऊन गणवेश तयार करणेत यावे असे ठरले. त्यामुळे शिलाईकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०९/०१/२०१५ ते २२/०१/२०१५ पर्यंत व २४/०१/२०१५अखेर निविदा स्विकारणेची मुदत होती. सदर निविदा मा.त्रिसदस्य समिती दि.१८/०३/२०१५ रोजी उघडण्यात आल्या असुन निम्नत्तम दर असलेले मे.साईसागर गारमेंट,नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

गणवेशाचे कापड प्राप्त झालेले आहे व गणवेश शिलाईचा पुरवठा आदेश देण्यात आला आहे. परंतु श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाने परिसेविका व परिचारीका व इतर पॅरामेडीकल कर्मचा-यांकरीता साडी गणवेशाची मागणी केलेली आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | पदनाम | साईबाबा कर्मचारी संख्या | साईनाथ कर्मचारी संख्या | एकुण कर्मचारी संख्या | प्रत्येकी २ नग गणवेश संख्या | एकुण नग | आवश्यक रंग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परिसेविका( इन्चार्ज) | २ | ७ | ९ | २ | १८ | बदामी |
| २ | परिचारीका | | ७ | ७ | २ | १४ | बदामी |
| ३ | रिसेप्शनिस्ट | १ | | १ | २ | ०२ | आकाशी |
| ४ | फार्मासिस्ट | १ | १ | २ | २ | ०४ | आकाशी |
| ५ | ज्यु.बायोमेडीकल इंजिनियर | १ | | १ | २ | ०२ | आकाशी |
| | | | | | | ४० | |

| अ.नं. | तपशील | आवश्यक नग | आवश्यक साईज | अंदाजे दर प्र. नग रु./पै. | अंदाजे एकुण खर्च रु./पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | साडी | ४० | सहावार | ६००.०० | २४०००.०० |
| २ | परकर | ४० | फुलसाईज | १५०.०० | ६०००.०० |
| ३ | ब्लाऊज पीस | ४० | १ मीटर | १००.०० | ४०००.०० |
| | | | | एकुण खर्च | ३४०००.०० |

दि.२५/०४/२०१५ चे मंजुर टिपणीअन्वये इकडील पत्र क्र.६९७ दि.१६/०६/२०१५ अन्वये एकुण १२ पुरवठाधारकांकडुन दि.२५/०६/२०१५ अखेर कोटेशन मागविणेत आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे चार कोटेशन प्राप्त झाले आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | प्राप्त स्थिती | प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मे.रंगोली,येवला | बंद स्थिती | ३०/०६/२०१५ |
| २ | मे.राजेंद्र क्लॉथ स्टोअर्स,राहुरी | बंद स्थिती | २७/०६/२०१५ |
| ३ | मे.तुलसी एम्पोरीयम,सोनई | बंद स्थिती | २७/०६/२०१५ |
| ४ | मे.दामिनी,राहुरी | बंद स्थिती | २७/०६/२०१५ |

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ.छाननी करुन अनुमान**- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र.१७-२(ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले ४ सिलबंद निविदा आजचे उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालील प्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं | तपशिल व आवश्यक नग | आवश्यक नग | रंग | मे.रंगोली, येवला | मे.राजेंद्र क्लॉथ, राहुरी | मे.तुलसी एम्पोरीयम , सोनई | मे.दामिनी, राहुरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दर प्रती नग रु. | | | |
| ०१ | प्लेन साडी ६ वार | ३२ | बदामी | ३२५.०० | ३११.०० | ३२०.०० | ३६५.०० |
| | | ८ | आकाशी | ३२५.०० | ३१५.०० | ३२५.०० | ३८१.०० |
| ०२ | परकर (कॉटन) | ३२ | बदामी | ९०.०० | १०५.०० | ११०.०० | ११८.०० |
| | | ८ | आकाशी | ९०.०० | १०५.०० | ११०.०० | ११८.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | ब्लाऊज पीस | ३२ | बदामी | ५०.०० | ८०.०० | ८५.०० | [illegible] |
| | | ८ | आकाशी | ५०.०० | ८०.०० | ८५.०० | ९८.०० |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील महिला कर्मचा-यांकरीता गणवेश (साडी) खरेदी करणेबाबत निविदाधारकांनी सादर केलेल्या साडयांचे नमुने पाहून वैद्यकिय संचालक यांनी अंतीम निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**११. सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ करीता आरोग्य विभागास आवश्यक स्वच्छता साहित्य खरेदीकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

आरोग्य विभागास सिंहस्थ कुंभमेळा– २०१५ करीता स्वच्छता साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.६,१४,१००/- (अक्षरी रु. सहा लाख चौदा हजार शंभर) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.३०.१.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ०६नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१३.०५.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसा ठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

आरोग्य विभागास सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता सदर स्वच्छता साहित्याची तातडीची आवश्यकता असल्याने सदरची खरेदी लवकरात लवकर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सदरचे खरेदीची प्रक्रिया जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर ई-निविदा पद्धतीने करण्यात आलेली आहे. तांत्रिक निविदेसोबत (Technical Bid) बयाणा रक्कम रु.६,०००/- (अक्षरी रु. सहा हजार) मात्र व निविदा किंमत रु.२००/- (अक्षरी रु. दोनशे) मात्र अशी होती. बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत /बहुराष्ट्रीय (National/ Multy National) बॅंकेच्या कोपरगाव /शिर्डी/ राहाता शाखेवरील (Executive Officer, Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi यांचे नांवे ) डिमांड ड्रॉफ्टद्वारे मागणी केलेली आहे. याव्दारे तसेच दुकान नोंदणी दाखला, व्हॅट/टिन नंबर, पॅनकार्ड, इ. कागदपत्रे ऑनलाईन स्कॅन करुन दि.२१.०५.२०१५ रोजी सायं.०५.०० वा पर्यत ऑनलाईन मागणी करण्यात आलेले आहेत.

ऑनलाईन निविदेसोबत सादर केलेले (Technical Bid) दि.२९.०६.२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी व मा.मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडून तांत्रिक कागदपत्रांची (Technical Bid) लेखाशाखेमार्फत पडताळणी केली असता, प्राप्त पाचही निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे पाचही निविदाधारकांच्या मूळ निविदा दि.०४.०७.२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे.

सदर तक्त्यातील न्यूनतम दरधारक अनुक्रमे अ) मे.हितू जितू एंटरप्रायझेस, मुंबई यांचे अ.न. १,२,४,७,८,११, करीता ब) मे.मगनलाल देवशंकर, नाशिक यांचे अ.न. ३,६,९,१०,१२ करीता क) मे.विरभद्र ट्रेडर्स, कोपरगाव यांचे अ.न. ५ करीता ड) मे.निलकमल लिमिटेड, नाशिक यांचे अ.न. १४ करीता न्युनत्तम दर असलेने यांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत.

तसेच अ.न. १३ चे साहित्यासाठी (गमबुट) दोनच निविदाधारकांनी दर नमुद केलेले होते. परंतू सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता सदरचे साहित्याची तातडीची गरज असल्याने दोन्ही दरधारकांचे दरात तुलना करुन न्युनत्तम दरधारक यांना अपवादात्मक विशेष बाब म्हणून दि.०४.०७.२०१५ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. सदरचे साहित्याचा पुरवठा पुर्ण झालेला आहे.

आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदीकामी खर्च झालेल्या रक्कम रुपये ४,११,५६०/- (अक्षरी रुपये चार लाख अकरा हजार पाचशे साठ) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये आरोग्य विभागासाठी आवश्यक असलेले स्वच्छता साहित्य खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या रु.४,११,५६०/- मात्रचे खर्चास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**१२. सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ साठी खरेदी केलेल्या सेफ्टी साहित्याच्या खर्चास मान्यता मिळणेबबाबत.**

सन २०१५ मध्ये नाशिक येथे संपन्न होणाऱ्या सिंहस्थ् कुंभमेळया निमीत्त् शिर्डीत श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची मोठया प्रमाणात गर्दि होण्याची शक्यता आहे.संभाव्य गर्दिचे व्यवस्थापन व त्याबाबत संस्थानने उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधांबाबत संबंधीत विभागांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय प्रस्तावास मा.उच्च् न्यायालयाचे आदेशान्वये खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार खालील परीशीष्टांप्रमाणे अग्निशमन वाहने ऑनकॉल बोलविणे साठी येणाऱ्या खर्चासाठी रु.२,००,०००/- फायर सिलेंडर,आपत्कालीन पथक साहीत्य खरेदी साठी रु. २,८५,०००/- व प्रासंगिक कामगारांसाठी रु. ३,००,३००/- मात्र खर्चास मान्यता मिळालेली आहे.

अ. परिसरातील अग्निशमन वाहन ऑनकॉल व पुर्णवेळ

| अ नं. | तपशिल | मंजूर खर्च |
|---|---|---|
| ०१ | **अग्निशमन वाहन ऑनकॉल पाचारण करणे**<br>परिस्थितीनुरूप राहाता न.पं. , कोपरगाव न.पं. संजिवनी साखर कारखाना,कोळपेवाडी सा.का. संगमनेर सा.का. श्रीरामपूर न.पं. यांनी पुर्णवेळ अग्निशमन वाहन देण्यास असमर्थता दर्शविलेली असून ऑन कॉल सेवा पुरविणेबाबत कळविलेले आहेत. सदरचे वाहन पाचारण केलेस प्रत्येक वेळी पहीले तिन तासाकरीता ४०००/- व पुढील प्रति तास १०००/- या प्रमाणे सेवा आकार दयावा लागेल. तसेच प्रवरानगर चे फोम टेंडर पुर्ण वेळ उपलब्ध असणार आहे त्यांना प्रतीतास २४०/- व फोमचा वापर झालेस प्रती लिटर ५०/- चार्ज संस्थानमार्फत अदा करावा लागेल. | २,००,०००/- |
| | **एकूण खर्च** | २,००,०००/- |

ब. देणगी स्वरुपात मिळालेले फायर साहीत्य

| अ.नं. | वस्तुंचे नांव | क्षमता | संख्या | प्रतिनग अंदाजे किंमत | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ABC टाईप फायर एक्स्टींग्वीशर | ६ कि.ग्रॅम | १०० नग | १,७००/- | १,७०,०००/- |
| ०२ | वाळुच्या बादल्या स्टँडसह | ९ लिटर | १५ स्टँड व ६० नग बादल्या | ३,०००/- | ४५,०००/- |
| ०३ | फायर एक्स | -- | ०३ | १,५००/- | ४,५००/- |
| ०४ | स्मोक मास्क गॉगलसह | -- | ०३ | १,०००/- | ३,०००/- |
| | | | | **देणगी साहीत्य एकूण किंमत रुपये** | २,२२,५००/- |

क. कोटेशन व्दारे खरेदी केलेले सेफ्टी साहीत्य –

| अ.नं. | वस्तुंचे नांव | क्षमता | संख्या | कोटेशन मधील असलेले प्रती नग न्युनतम दर | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | गमबुट (डक बॅक मेक) | -- | १५ | ७२०.४५/- | ७२०४.५०/- |
| ०२ | हेल्मेट (लेमन एलो कलर राऊंड ५८० एम.एम. IS – 2745) | -- | १० | ८५५.४५/- | ८,५५४.५०/- |
| ०३ | फायबर स्टिक मोठी | -- | १० | ४९५.००/- | ४,९५०.००/- |
| ०४ | सिलींग हुक | -- | ०३ | ६३०.४५/- | १,८९१.३५/- |
| ०५ | फलेम प्रुफ टॉर्च | -- | ०३ | १२६०.४५/- | ३,७८१.३५/- |
| | | | | **एकूण** | २६३८१.७०/- |
| | | | | व्हॅट १२.५ % | ३२९८.७१/- |
| | | | | **एकूण रुपये** | २९,६८०.००/- |

ड . नियोजित मंडप व वाहनतळासाठी आवश्यक कर्मचारी-

* शिफ्टवाईज कामाचे ठिकाण व संख्या

| अ.नं. | कामाचे ठिकाण | शिफ्ट ०४ ते १२ | शिफ्ट१२ ते २० | शिफ्ट २० ते ०४ | एकूण कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईनगर मैदान मंडप | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०२ | भक्तनिवासस्थान मंडप | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०३ | साईआश्रम भाग- ०१ मंडप | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०४ | साईआश्रम भाग- ०२ मंडप | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०५ | निमगांव कोऱ्हाळे पार्किंग नं.०१ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०६ | निमगांव कोऱ्हाळे पार्किंग नं०२ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०७ | सावळी विहीर बु. पार्किंग नं.०३ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०८ | निमगांव-कोऱ्हाळे पार्किंग नं.०४ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ०९ | साकुरी पार्किंग नं.०५ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| १० | साकुरी पार्किंग नं.०६ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| ११ | शिर्डी पार्किंग नं.०७ | ०१ | ०१ | ०१ | ०३ |
| | **एकूण कर्मचारी** | **११** | **११** | **११** | **३३** |

* खालील तारखांनुसार फायर विभागासाठी कामगार विभागाकडून दररोज ३३ कर्मचारी नावे प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं | पर्वणी | पर्वणीचे आगोदचा एक दिवस | मुख्यदिवस | पर्वणीचे नंतरचा एक दिवस |
|---|---|---|---|---|
| ०१ | पहिले शाही स्नान | २८.०८.२०१५ | २९.०८.२०१५ | ३० व ३१.०८.२०१५ |
| ०२ | दुसरे शाही स्नान | १२.०९.२०१५ | १३.०९.२०१५ | १४ व १५.०९.२०१५ |
| ०३ | तिसरे शाही स्नान | १७.०९.२०१५ | १८.०९.२०१५ | १९ व २०.०९.२०१५ |
| ०४ | त्रयंबक शाही स्नान | २४.०९.२०१५ | २५.०९.२०१५ | २६ व २७.०९.२०१५ |

परीशिष्ट " **अ** " बाबत संबंधीतांशी पत्रव्यवहार झालेला आहे आवश्यकतेनुसार गरज पडल्यास परीसरातील अग्निशमन वाहने ऑनकॉल पाचारण करणेस तसेच शासकिय दरानुसार येणारे बील अदा करणेस **तसेच** प्रवरानगर कारखाण्याचे अग्निशमन वाहनाचे पुर्णवेळ वापरानुसार शुल्क अदा करावे लागेल. परीशिष्ट " **ब** " मधील साहीत्य खरेदी बाबत पुणे येथील MFEPL SALES पुणे यांचेकडून देणगीस्वरुपात साहीत्य रु.२,२२,५००/-देणगी स्वरुपात प्राप्त झाले आहे. परीशिष्ट " **क** " मधील अ.नं. ०१ व ०५ सेफ्टी साहीत्यांची अंदाजे किंमत रु.५०,०००/- चे आत असलेने संबंधीत पुरवठाधारककांकडून कोटेशन मागविणेस फायर अॅण्ड सेफ्टी विभाग जा.नं./३६/२०१५ दि.२३.०५.२०१५ रोजीचे मंजूर टिपणीने मान्यता मिळाली होती. त्यानुसार सदर साहीत्यांचे कोटेशन मागवून त्यातील न्युनतम दरधारक फायर अॅण्ड सेफ्टी सर्व्हिसेस,पुणे यांना दि.२३.०६.२०१५ रोजी कार्यादेश देणेत आलेला होता. सदर साहीत्य दि.१४.०८.२०१५ रोजी प्राप्त झालेले आहे सदरचे साहीत्यांचे बील रु. २९,६८०.००/- (अक्षरी रुपये एकोणतीस हजार सहाशे मात्र) अदा करावयाचे आहे. तसेच परीशिष्ट "**ड** " बाबत मॉडर्ण सिक्युरीटी यांचे कडुन प्रासंगिक कर्मचारी नांवे प्राप्त झालेले आहेत.

तरी उपरोक्त "क" मधील प्राप्त सेफ्टी साहीत्यांचे बीलाची रक्कम रु. २९,६८०.००/-(अक्षरी रुपये एकोणतीस हजार सहाशे अंशी मात्र) फायर अॅण्ड सेफ्टी सर्व्हिसेस,पुणे यांना अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयाचा कालावधीमध्ये साईभक्तांचे सोयीसाठी आवश्यक असलेले सेफ्टी साहित्य खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेलया कार्यवाहीस व त्याकामी येणा-या रु.२९,६८०/- मात्रचे खर्चास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- फायर अॅन्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

विषय नं.०२ **दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

निर्णय क्र.३२१ दिनांक ०८.०९.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

विषय नं.०३ **बांधकाम प्रगती अहवाल ब तक्ता- (अंतीम बीले)**

बांधकाम प्रगती अहवाल ब तक्ता- (अंतीम बीले) च्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या.

निर्णय क्र.३२२ **बांधकाम प्रगती अहवाल ब तक्ता- (अंतीम बीले) चे अवलोकन करणेत येऊन, संबंधीत कामे दर्जात्मक झालेली आहेत का हे पाहून ठेकेदारांची अंतीम बीले अदा करणेत यावीत, असे ठरले.**

**तसेच यापुढे ठेकेदारास कार्यादेश देते वेळेस कामाचे कालावधीसह टप्पे करुन द्यावेत, त्यामुळे मुदतवाढ देण्याची गरज भासणार नाही व प्रत्येक काम सुरु करावयाच्या आधी, चालू असताना व पुर्ण झाल्यानंतर त्यांचे फोटो काढणेत येऊन, ते मोबाईल अॅप्लीकेशन सॉफ्टवेअरचा वापर करण्यात येऊन, अपलोड करण्यात यावेत, अशा सूचना करण्यात आल्या.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.०४ **सन- २०१५ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

प्रस्ताव- अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र नं.श्री.सा.सं.क.सं./१२/ २०१५ दि.१२/०९/२०१५ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापन मंडळाने तसेच आपण कर्मचा-यांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी करण्यात आलेल्या मागण्यांचा तातडीने विचार करुन कार्यवाही केलेली आहे. त्याबद्दल श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपले व श्री साईबाबा संस्थान त्रिसदस्य समितीचे मनःपुर्वक आभारी आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना दिपावली सानुग्रह अनुदान देण्यात येते. त्याबद्दल श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपले मनःपुर्वक आभारी आहोत. या वर्षी दिपावली दि.११/११/२०१५ रोजी असुन दरवर्षी ८.३३ टक्के इतका सानुग्रह अनुदान दिला जात आहे. परंतु दिवसेंदिवस महागाई मोठया प्रमाणात वाढलेली असल्याने ह्या दिपावली निमित्त कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानात वाढ करुन १६.६६ टक्के इतका (डबल) दिल्यास दिपावली आनंदाने साजरी करता येईल, ही विनंती.

सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांचे आदेशानुसार, संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. तद् नंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखालील तत्कालीन

मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असताना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये, महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम – २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारित केला. या अधिनियमांत संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत:

**कलम १५:** कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या कार्यकारी अधिका-याचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील **कलम १६:** नियत दिवसाच्या लगतपूर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

याशिवाय, **कलम १७:** समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात **कलम २२:** व्यवस्थापन निधी व त्याचा विनीयोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमांतील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीनेही सन २००४ ते सन २०११ पर्यंत दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

**तसेच,** उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार, सानुग्रह अनुदानाचा खर्च कलम २२ नुसार व्यवस्थापन निधीत खर्ची टाकणेत येतो व व्यवस्थापन निधीतून केलेल्या खर्चाच्या नोंदी वार्षिक अहवालाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या व विधी मंडळाच्या समोर मान्यतेसाठी सादर करणेत येतो.

**दरम्यानचे कालावधीत,** म्हणजेच दिनांक २९ मार्च, २०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व नियंत्रण करणेसाठी नियुक्त केलेल्या मा.त्रिसदस्यीय समितीने सन– २०१२ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८७३ अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १२६९४/२०१२ चे अनुषंगाने, दिनांक ०२ नोव्हेंबर, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थान सेवकांना रक्कम रुपये ४,८४,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस मान्यता दिलेली होती. या निर्णयानुसार सन २०१२ मध्ये संस्थान सेवकांना रुपये ४,६२,०५,१८४/- मात्र इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेत आलेली आहे.

तसेच, मा.त्रिसदस्यीय समितीने सन-२०१३ चे दिपावली उत्सवाकरीता संस्थान सेवकांना द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७७० अन्वये तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांनी जनहित याचिका क्र.१८/२०११ मधील दिवाणी अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ चे अनुषंगाने, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार, संस्थान कर्मचा-यांना रकक्म रुपये ५,६०,००,०००/- मात्र सानुग्रह अनुदान म्हणून वाटप करणेस सशर्त मान्यता दिलेली होती. या निर्णयानुसार, संस्थान सेवकांकडून विहित नमुन्यात हमीपत्र घेऊन, लेखाशाखेकडील दिनांक २३ ऑगस्ट, २०१४ रोजीचे अहवालानुसार सन २०१३ मध्ये संस्थान सेवकांना रुपये ५,१९,३५,५६०/- मात्र इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेत आलेली आहे.

सन २०१३ चे सानुग्रह अनुदानाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशात सशर्त मान्यता देतांना खालीलप्रमाणे नमुद केलेले होते.

.. 5. As the amounts have been disbursed in past, we permit the applicant Sanstha to provisionally disburse the amount as per prayer.

6. However, We direct Respondent No.1- Non Applicant No.1 State Government to file appropriate reply on the provisions of Section 21 and 22 of the said Act within a period of four weeks from today. After receipt of said reply further appropriate orders on this civil application shall be passesd. If the Court finds amount could not have been paid or less amount should have been paid, he direction to recover that amount or to adjust that amount from salaries being paid

can be issued. We permit the applicant to disburse the amount provisionally and grant prayer B as ad-interim order.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक २३ जानेवारी, २०१३ चे पत्रातील निर्देशानुसार आणि मा.उच्च न्यायालयाचे दिनांक २५ ऑक्टोबर, २०१३ रोजीचे आदेशानुसार, मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस संस्थान सेवकांना सन २०१३ चे दिपावलीकरीता सानुग्रह अनुदान अदा करणेस मान्यता मिळणेकामी अनुक्रमे दिनांक २२ ऑक्टोबर, २०१३, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ०८ जानेवारी, २०१४ रोजी प्रस्ताव-वजा-विनंती पत्र सादर करणेत आलेले आहे.

त्यास अनुसरुन, मा.कार्यासन अधिकारी, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील दिनांक ०४ एप्रिल, २०१४ रोजीचे पत्राने, प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रतिक्षा करणेत यावी, असे कळविलेले आहे.

त्यानंतर सन-२०१४ करीता अंदाजे रक्कम रुपये ६,५०,००,०००/- मात्र संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानास मंजुरी मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती दि.२८/०८/२०१४ रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.६९६ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"संस्थानमधील कायम कर्मचा-यांना सन-२०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजूरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल.१८/२०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/२०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५.१०.२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन-२०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.

त्यामुळे सन-२०१४ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी मागील वर्षीच्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्याविषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले."

सदर निर्णयावर कर्मचारी संघटनेने मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे संस्थान कर्मचा-यांना दिपावलीसाठी सानुग्रह अनुदान मिळणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन नं.९२१७/२०१४ व सिव्हील ॲप्लीकेशन ९४३७/२०१४ दाखल केलेले आहे.

त्यास अनुसरून मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१४ रोजीचे आदेशान्वये खालीलप्रमाणे सशर्त मान्यता दिलेली आहे.

4. In the light of that, we pass the following order.

5. The Sansthan is allowed to make ex-gratia payment to its employees as is made every year. However, the said payment shall be made provisional and would be subject to the further decision in Civil Application No.13284 of 2013.

6. The State Government shall file affidavit clearly spelling out its stand about the right of the sansthan to make ex-gratia payment.

वरील मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.१७ ऑक्टोबर, २०१४ चे आदेशानुसार संस्थान कर्मचा-यांचे संम्मती पत्र घेऊन सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे. लेखा विभागाचे दि.१८/०९/२०१५ रोजीचे पत्रानुसार सन २०१४ साठी रक्कम रुपये ५,८०,१३,१८०/- मात्र अदा करण्यात आलेले आहे.

तसेच मा.उच्च न्यायालयाचे दि.१३ ऑक्टोबर, २०१४ चे निर्णयातील अ.नं.६ चे निर्देशाबाबत शासन स्तरावरुन उचीत कार्यवाही होणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-०१/३५९०/२०१४ दि.२३/१०/२०१४ चे पत्रान्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

**थोडक्यात,** वर नमुद केलेप्रमाणे, तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सन १९७७ ते सन २०१० अखेर संस्थान आस्थापनेवरील स्थायी सेवकांना व सन २०११ पासून स्थायी व अस्थायी कंत्राटी कर्मचा-यांना प्रत्येक वर्षी सानुग्रह अनुदान आदा करणेत येत आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता कर्मचारी संघटनेचे मागणीनुसार सन-२०१५ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी (कंत्राटी) सेवकांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करण्यात येत आहे.

(०१) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत संस्थान आस्थापनेवर मासिक वेतन / नियत वेंतन/मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी, कंत्राटी सल्लागार/मोजणीदार, कार्यालय प्रमुख/कार्यालय सहाय्यक, डी.टी.पी.ऑपरेटर, ग्रंथपाल, निदेशक, सहाय्यक शिक्षक, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक व संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने असलेले शासकीय अधिकारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम आदा करता येईल.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत ज्या कर्मचा-यावर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यावर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे, अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ या कालावधीत संस्थानेला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या सर्व कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन/मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या एकूण वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधित कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत आदा करता येईल.

उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे सन २०१५ दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी संस्थानचे प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी व अस्थायी संस्थान सेवकांना दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ अखेरच्या वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून आदा करणेस आणि याकामी लेखाशाखेकडील दिनांक १८ सप्टेंबर, २०१५ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ६,७५,००,०००/- मात्रचे (अक्षरी रुपये सहा कोटी पंच्याहत्तर लाख मात्र) खर्चास मान्यता मिळणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३२३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील अ.नं.०२ वगळता अ.नं.०१ व ०३ मध्ये नमुद केलेल्या पात्र कर्मचा-यांना सन- २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान देण्यास मंजुरी मिळणेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल.१८/ २०११ सिव्हील अर्ज क्रमांक १३२८४/ २०१३ दाखल असून त्या अर्जावर अद्याप निर्णय झालेला नाही. मा.खंडपीठाने या सिव्हील अर्जावर दि.२५.१०.२०१३ रोजीचे आदेशान्वये, सन- २०१३ दिपावली निमित्त सानुग्रह अनुदान तुर्तास देण्याविषयी अंतरीम आदेश केलेला आहे व जर का शासन धोरणानुसार असे अनुदान देता येणार नाही, असे मा.खंडपीठाचे मत झाले तर दिले गेलेले अनुदान संबंधीत कर्मचा-यांच्या पगारामधून पुन्हा वसुल करुन घ्यावे, अशी अट घातली आहे.**

**त्यामुळे सन- २०१५ चे सानुग्रह अनुदान देण्यासाठी संस्थानला आर्थिक अडचण जरी नसली, तरी सन- २०१३ व २०१४ च्या सानुग्रह अनुदानाबाबत निर्णय अद्याप झालेला नाही व त्यावर मा.खंडपीठाचा अंतीम निर्णय होईपर्यंत चालु वर्षाचे सानुग्रह अनुदान देण्याविषयी समिती निर्णय घेऊ शकत नाही, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/ विधी अधिकारी)

---

विषय नं.०५ **श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे फेर वेतनश्चिती, वेतन कपात व वेतन वसुली संदर्भातील दि.०९/०६/२०१५ व दि.१२/०८/२०१५ रोजीच्या आदेशाबाबत.**

प्रस्ताव- श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांनी दि.०२/०९/२०१५ रोजीचे अर्जान्वये त्यांचे वेतन निश्चितीतील अनियमितते बाबतचा जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ९९४/२०१५ दि.०१/०६/२०१५ रोजीचा आदेश व जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/१७७३/२०१५ दि.१२/०८/२०१५ रोजीचा फेर वेतन निश्चितीचा आदेश रद्द होणेबाबत विनंती केली आहे.

तसेच त्यांनी त्यांचे विनंती अर्जात नमूद केले आहे की, मा.सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया सिव्हील अॅपीलेट ज्युरिसडीक्शन यांनी सिव्हील अपिल नं.११५२७/२०१४ (अरायझिंग आऊट ऑफ एसएलपी (सी) नं.११६८४ ऑफ २०१२) या कोर्ट केसमध्ये दि.१८ डिसेंबर २०१४ रोजी खालीलप्रमाणे जजमेंट / आदेश दिलेले आहे.

12 "It is not possible to postulate all situations of hardship, which would govern employees on the issue of recovery, where payments have mistakenly been made by the employer, in excess of their entitlement. Be that as it may, based on the decisions referred to herein above, we may, as a ready reference, summaries the following few situations, wherein recoveries by the employees, would be impermissible in low."

I. Recovery from employees belonging to class-3 and Class-4 service (or Group 'C' and Group 'D' Service).

II. Recovery from retired employees who are due to retire within one year, of the order of recovery.

III. Recovery from employees, when the excess payment has been made for a period in excess of five years, before the order of recovery is issued.

IV. Recovery in cases where an employee has wrongfully been required to discharge duties of a higher post, and has been paid accordingly, even though he should have rightfully been required to work against an inferior post.

V. In any other case, where the Court arrives at the conclusion, that recovery if made from the employee, would be iniquitous of harsh of arbitrary to such an extent, as would far outweigh the equitable balance of the employers right of recover.

13 We are informed by the learned counsel representing the appellant State of Punjab, that all the cases in this bunch of appeals, would undisputedly fall within the first four categories selineated hereinabove. In the appeals referred to above, therefore the impugned orders passed by the High Court of Punjab and Haryana (quashing the order of recovery), shall be deemed to have been upheld, for the reasons recorded above.

14 The appeals are disposed of in the above terms.

उपरोक्त संदर्भाप्रमाणे कर्मचा-यास देण्यात आलेले वेतन / वेतनवाढ ही परत वसुल करणे हे वैध नाही, असे निदर्शनास आणले आहे.

श्री.गमे यांची मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०६/०९/१९९८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१९७ नुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/९०४१/१९९८ दि.१२/०९/१९९८ अन्वये कामगार अधिकारी या पदावर वेतनश्रेणी १४००-४०-१८००-५०-२३०० मध्ये एक वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली. सदर पदावर ते दि.२६/१०/१९९८ पासून मुळ वेतन रु.१४००/- प्रमाणे हजर झाले. दरम्याने काळात त्यांना सहा जादा वेतनवाढी, सुधारीत वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे. तसेच त्यांची मा.त्रिसदस्य समितीचे निर्णयान्वये जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४२१६/२०१४ दि.२०/०३/२०१४ रोजीचे आदेशान्वये खुल्या प्रवर्गातून प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यात्मक पदोन्नती देणेत आली आहे.

श्री.सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी यांचे दि.०१/०६/२०१५ रोजीचे वेतन निश्चितीतील अनियमिततेबाबत व दि.१२/०८/२०१५ रोजीचे फेर वेतन निश्चिती आदेशाबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

१) प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०१/५४४/१९९९ दि.०८/०४/१९९९ च्या आदेशामध्ये नमुद केल्याप्रमाणे त्यांना एकाच वेळी सहा जादा वेतनवाढी देण्यात आलेल्या होत्या. सदर आदेशाला संस्थानच्या कामकाजाशी संबंधीत कोणत्याही प्रचलीत नियमाचा आधार नाही व आदेशामध्ये तसा स्पष्ट उल्लेख देखील नाही. हे आदेश कशाच्या आधारावर काढणेत आलेले आहेत. या संदर्भात कोणत्याही स्थायी सूचना अथवा कागदपत्रांचा यामध्ये उल्लेख नाही. सदर आदेशाला आजतागायत व्यवस्थापन मंडळ/ व्यवस्थापन समिती याची मान्यता घेण्यात आलेली नाही. या सर्व बाबी ध्यानात घेता सदरचा आदेश पूर्णपणे नियमबाह्य असल्याने सदरचा वेतनवाढीचा आदेश जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ९९४/२०१५ दि.०१/०६/२०१५ चे आदेशान्वये रद्द करणेत येऊन संबंधीत आस्थापना विभाग तसेच लेखा विभागाने या अनुषंगाने त्याची तात्काळ फेर वेतननिश्चिती करणेबाबत आदेश पारीत करणेत आलेला आहे.

२) सदर आदेश पारीत झाल्यानंतर श्री.सुर्यभान गमे यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दि.०१/०६/२०१५ रोजीचा वेतन निश्चितीतील अनियमिततेबाबतचा आदेश रद्द होणेकामी रिट पिटीशन क्र.६१०७/ २०१५ दाखल केले.

३) सदर रिट अर्जावर मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.२३/०६/२०१५ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

i) Heard

ii) Issue notice to the Respondents, returnable on 04-08-2015

iii) Mr.Kale, learned Asst. Govt. Pleader waives notice for Respondent No.1

iv) In the meantime, no further recovery be made pursuant to the impugned communication.

It is accordingly ordered that, the aforesaid Court's order be punctually observed and carried into execution by all concerned, Pending Admission of this Writ Petition.

वरीलप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांनी श्री गमे यांचे संदर्भ क्र.०१ चे आदेशानुसार वसुली न करणेचा आदेश दिलेला आहे.

४) दि.०१/०६/२०१५ रोजीचे आदेशाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे संस्थानकडून दि.२५/०६/२०१५ रोजी कॅव्हेट अर्ज दाखल करण्यात आला.

५) तसेच श्री.गमे यांचे रिट अर्ज क्र.६१०७/२०१५ मधील नमुद बाबींवर संस्थानचे मुंबई उच्च न्यायालयाचे ॲड.संजय चौकीदार यांचेमार्फत दि.३१/०७/२०१५ रोजी संस्थानचे म्हणणे रिप्लाय ॲफीडेव्हीट उच्च न्यायालयात दाखल केलेले आहे.

६) त्यानंतर जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/९९४/२०१५ दि.०१/०६/२०१५ च्या आदेशात नमूद केलेप्रमाणे लेखा विभागाने श्री.गमे यांची फेर वेतननिश्चिती करुन आस्थापना विभागास सादर केली. त्यानुसार श्री.गमे यांचे सदर वेतननिश्चिती नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१७७३२०१५ दि.१२/०८/२०१५ नुसार आदेश पारीत करण्यात आला. सदर आदेशानुसार श्री.गमे यांचे दि.०१/०७/२०१५ पासून मुळ वेतन रु.१६,२३०/- अधिक ग्रेड वेतन ५४००निश्चित करण्यात आले. सदर आदेश श्री.गमे यांना बजावल्यानंतर त्यांनी त्यांच्या मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोरील मुळ रिट अर्जामध्ये दि.१२/०८/२०१५ चा आदेश नमुद करुन सुधारणा केली आहे.

७) श्री.गमे यांच्या मुळ अर्जामध्ये त्यांनी केलेल्या सुधारणाविषयी संस्थानचे मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील संस्थानचे ॲड.संजय चौकीदार यांना याबाबत मत विचारले असता त्यांनी दि.२९/०८/२०१५ रोजी संस्थानला ई-मेल सादर केला आहे. त्यात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

With reference to above said petition have to opine that main issue raised in the petition is that before passing the order of withdrawal of increments and fixation of pay, opportunity of hearing is not given. In terms of judgments of supreme court and high court, if an order adverse/ affecting rights is to be passed, granting opportunity of hearing is a must on this count alone, high court would entertain the petition since in the present case no such opportunity is given.

In such a situation, it is advisable to withdraw order of cancellation of increments and fixation of pay with liberty to pass fresh order by affording opportunity of the hearing to the petitioner. Now the matter is scheduled for hearing on 31/08/2015. You are requested to convey your response as the earliest.

सदर ईमेलचे व मा.मुंबई उच्च न्यालयाय, खंडपीठ औरंगाबाद यांचे दि.२३/०६/२०१५ रोजीचे आदेशाचे अवलोकन केले असता सदरचा विषय हा न्याय प्रविष्ट असून श्री.गमे यांचे दि.०२/०९/२०१५ रोजीचे विनंती अर्जानुसार फेर वेतननिश्चिती, वेतन कपात तसेच वेतन वसुली संदर्भातील दि.०१/०६/२०१५ व दि.१२/०८/२०१५ रोजीचे आदेशावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३२४ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सदरहू बाब प्रशासकीय स्वरुपाची असल्यामुळे या विषयावर नियमानुसार यथायोग्य निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. परंतु असे करत असताना श्री.गमे यांना दिलेल्या ६ वेतनवाढी या नियमास अनुसरुन दिल्या गेल्या आहेत काय, त्यावेळचे व्यवस्थापन मंडळाचा तसा स्पष्ट आदेश आहे काय, या सर्व गोष्टींचा कायदेशीर अभ्यास प्रशासनाने करावा. सर्व बाबींची निपक्षपातीपणे कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी व त्याचा कार्यवाही अहवाल सादर करावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.०६ **श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी पध्दतीने ऑफिस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ व मानधनवाढ मिळणेबाबतचा अर्ज.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद येथे साईभक्तांना सोई व सुविधा उपलब्ध करुन देणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयात दि. १७/१०/२०१० रोजीचे आदेशाने श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा यांची ऑफिस असिस्टंट या पदावर दरमहा एकत्रित रु. ५,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरती नेमणूक करण्यात आलेली होती. व त्यानंतर त्यांना वेळोवेळी मुदतवाढ देणेत येवून, दि. २३/०९/२०१४ रोजीचे आदेशाने दि. २४/०८/२०१४ ते दि.२३/०८/२०१५ अखेर ०१ वर्ष मुदतवाढ व मानधनवाढ देणेत आलेली आहे. सध्या श्री सुराणा यांना प्रतिमहा एकत्रित रु.१२,०००/- (अक्षरी रु. बारा हजार मात्र) मानधन देणेत येत आहे.

श्री.सुराणा यांची मुदतवाढ दि.२३/०८/२०१५ रोजी संपत असून त्यांनी दि.२०/०६/२०१५ रोजीचे (इकडील कार्यालयास दि.०३/०८/२०१५ रोजी प्राप्त) अर्जाने सध्याचे अटी-शर्तीवर मुदतवाढ व उचित मानधनवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. सदर अर्जावर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी "श्री.चंद्रकांत सुराणा, यांना सध्या एकत्रित मानधन रु.१२,०००/- दरमहा देण्यात येत आहे. त्यांची मुदत दि.२/०८/२०१५ अखेर संपत आहे. (वार्षिक प्राप्ती/ खर्च सन -२०१४ -१५ खर्च रु.२,०६,४९४/- व प्राप्ती रु.३४,४२,४९४/-)" असा अभिप्राय नोंदविला आहे.

तरी श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफीस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे दि.२०/०६/२०१५ रोजीचे अर्जातील विनंती व प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांना लगतच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटीपध्दतीने मुदतवाढ व मानधनवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफीस असिस्टंट, सिकंदराबाद यांच्या दि.२०/०६/२०१५ रोजीच्या अर्जातील विनंती व प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांना लगतच्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने मुदतवाढ देण्यात यावी. परंतु त्यांच्या मानधनात तुर्त वाढ करणेत येऊ नये, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.०७ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राथमिक विभागाकडे ०५ सहाय्यक शिक्षक/ शिक्षिका यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

प्रस्ताव- **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद** – सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्रमांक – दि. २९.०७.२०१२ रोजीची सभा निर्णय क्र.६५४**

प्रास्ताविक– मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९.०७.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५४ नुसार अधिन राहून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागाकडे खालीलप्रमाणे ५ शिक्षणसेवक (प्राथमिक) म्हणून नेमणूक करण्यात आली होती.

| अ. नं | उमेदवारांचे नांव | पदनाम | जात- प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | कु.भांगरे रेश्मा दशरथ | सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) | महादेव कोळी (एस.टी.) | एच.एस.सी. डी.एड. | जा.नं.एसएसएस/इ.मि.स्कुल/ २०१४/२०१२ दि.०४.०८.२०१२ हजर दि.०६.०८.२०१२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२. | कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र | सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) | मराठा (खुला) | एच.एस.सी. डी.एड. | जा.नं.एसएसएस/इ.मि.स्कुल/२०१५/२०१२ दि.०४.०८.२०१२ हजर दि.०७.०८.२०१२ |
| ०३. | श्रीमती कुमावत कविता राजू | सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) | बेलदार (एन.टी.) | एच.एस.सी. डी.एड. | जा.नं.एसएसएस/इ.मि.स्कुल/२०१६/२०१२ दि.०४.०८.२०१२ हजर दि.०६.०८.२०१२ |
| ०४. | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ | सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) | मराठा (खुला) | एच.एस.सी. डी.एड. | जा.नं.एसएसएस/इ.मि.स्कुल/२०१७/२०१२ दि.०४.०८.२०१२ हजर दि.०७.०८.२०१२ |
| ०५. | कु.खरमाळे शुभांगी सुदाम | सहा. शिक्षक (परिविक्षाधीन) | मराठा (खुला) | बी.ए., डी.एड. | जा.नं.एसएसएस/इ.मि.स्कुल/२०१८/२०१२ दि.०४.०८.२०१२ हजर दि.०६.०८.२०१२ |

उपरोक्त नेमणूक आदेशान्वये उपरोक्त ५ उमेदवारांची शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून कामावर हजर झालेच्या तारखेपासून पुढे सलग 3 वर्षासाठी नवीन पदनामा नुसार सहाय्यक शिक्षक (परिविक्षाधीन) नेमणूक देण्यास मान्यता देण्यात आली.

**मागणी-** शाळा संहिता नियमानुसार उपरोक्त परिक्षावधीन सहा.शिक्षक/शिक्षिकांना एकत्रित मानधन रु.6000/- मात्र देण्यात आलेले आहे. सदर शिक्षकांचा तीन वर्षांचा परिविक्षाधीन कार्यकाल दि.०५.०८.२०१५ (अ.क्र.१,३,५) व दि.०६.०८.२०१५ (अ.क्र.२,४) संपुष्टात येत असल्याने सदरचे शिक्षकांना नियमानुसार वेतनश्रेणी देवून संस्थान सेवेत कायम करावे असे नम्र मत आहे. त्यांचा सर्वसाधारण तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं | कर्मचारी नांव व हुद्दा | शिक्षण | प्रत्यक्ष कामावर हजर झालेची तारीख | परिविक्षाधिन कालावधी संपुष्ठात येत असल्याची तारीख | वैद्यकीय अधिक्षक यांचे वैद्यकीय दृष्टयांपात्र पात्र असलेबाबत प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१. | कु.भांगरे रेश्मा दशरथ | एच.एस.सी. डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | दि.२९.०९.२०१२ |
| ०२. | कु.आभाळे सोनाली मच्छिंद्र | एच.एस.सी. डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | दि.०६.०८.२०१५ | दि.२९.०९.२०१२ |
| ०३. | श्रीमती कुमावत कविता राजू (बेलदार कविता प्रभू) | एच.एस.सी. डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | दि.२९.०९.२०१२ |
| ०४. | कु.गोर्डे स्नेहल शिवनाथ | एच.एस.सी. डी.एड. | दि.०७.०८.२०१२ | दि.०६.०८.२०१५ | दि.२९.०९.२०१२ |
| ०५. | कु.खरमाळे शुभांगी सुदाम | बी.ए., डी.एड. | दि.०६.०८.२०१२ | दि.०५.०८.२०१५ | दि.२९.०९.२०१२ |

दि महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल्स, कंडीशन ऑफ रेग्युलेशन अॅक्ट, 1977 व रुल्स 1981 मधील कलम नं. 5 मध्ये कायम करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

CERTAIN OBLIGATIONS OF MANAGEMENT OF PRIVATE SCHOOL.

2) Every person appointed to fill a permanent vacancy shall be on probation for a period of two years. Subject to the provisions of sub section on ( 3 ) & ( 4 ) he shall, on completion of this probation period of two years, be deemed to have been confirmed.

3) If in the opinion of the management, the work or behavior of any probationer during the period of his probation, is not satisfactory, the management may terminate his services at any time during the said period after giving him one month's notice ( or salary of one month in lieu of notice )

उपरोक्त नियमातील तरतूदीनुसार तसेच प्राचार्या, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल,शिर्डी यांचा अभिप्राय विचारात घेता उपरोक्त सहा. शिक्षक/ शिक्षिकां यांना त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या (कॉलम नं. 05) तारखेपासून सुधारित वेतनश्रेणी रु.5200-20200 अधिक ग्रेड वेतन रु. 2800 नुसार देऊन संस्थान सेवेत कायम करावे असे नम्र मत आहे.

अ.क्र.३ च्या शिक्षिका श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) या परिविक्षाधीन कालावधीत दि.०६.१२.२०१२ ते दि.०७.१२.२०१२ अखेर ०२ दिवस विनापरवानगी, रजा अर्जाशिवाय परस्पर कामावरुन गैरहजर राहिल्या होत्या. याबद्दल त्यांना जा.नं.एसएसएस/वशी-७बी/११७४/२०१३ दि.१७.०१.२०१३ अन्वये कारणे दाखवा नोटीस काढून त्यांचा लेखी खुलासा मागविण्यात आला होता.

त्यानुसार त्यांनी दि.१८.०१.२०१३ रोजी वैद्यकिय कारणास्तव गैरहजर राहिलेबाबत खुलासा सादर केलेला होता. तसेच खुलाशासोबत वैद्यकिय प्रमाणपत्रही सादर केलेले होते. सदरचा खुलासा व वैद्यकिय प्रमाणपत्र इकडील टपाल बुक क्र.२६५ दि.२८.०१.२०१३ अन्वये मा.कामगार विभाग प्रमुख यांचेकडे दिलेला होता.

मात्र श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) यांनी कारणे दाखवा नोटीसचा खुलासा सादर केला नाही, म्हणून कामगार विभागामार्फत (रुग्णालये व शैक्षणिक संस्था) दि.१३.०९.२०१३ रोजी टिपणी ठेवण्यात आलेली असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच त्यास अनुसरुन जा.नं.एसएसएस/वशी-७बी/७७९/२०१३ दि.२८.०९.२०१३ अन्वये श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे. तसेच कामगार विभाग (रुग्णालये व शैक्षणिक संस्था) यांचेकडील दि.१३.०९.२०१३ रोजीचे टिपणीवर तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करतेवेळी सदर गोष्टीची नोंद घ्यावी कारण वरिष्ठांचे आदेशाचे पालन दिसत नाही. असा शेरा लिहिलेला आहे.

प्रत्यक्ष घडलेले प्रकरण व कामगार विभागाकडील कार्यवाही यामध्ये तफावत आढळून येत आहे. श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) यांनी वैद्यकिय कारणास्तव रजा घेतली असल्याचे लेखी खुलाशामध्ये मान्य केलेले आहे. तसेच भविष्यात असे वर्तन होणार नाही याबद्दल हमी दिलेली आहे. तसेच सोबत वैद्यकिय प्रमाणपत्रही सादर केलेले होते.

तरी श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) यांनी वैद्यकिय कारणास्तव रजा घेतलेली असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्याबाबत त्यांनी कारणे दाखवा नोटीसचा खुलासा केल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे सदर कर्मचारी यांचे नुकसान होऊ नये याकरिता त्यांना उपरोक्त प्रकरणांत माफी देऊन त्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत सकारात्मक विचार होणेस विनंती.

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी/शासन निर्देश तांत्रिक कायदेशिर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**– आर्थिक खर्चाची बाब असल्याने सदरचा विषय मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ ठेवावा लागेल.

**विभागाचा स्पष्ट अभिप्रायः**- उपरोक्त सहा. शिक्षक यांचे काम व वर्तणूक चांगली असून ते प्रामाणिक आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून ते योग्य रीतीने कामे करतात. त्यांचे बाबतीत कोणतेही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. श्रीमती कविता राजू कुमावत (बेलदार कविता प्रभू) यांचे प्रकरणामध्ये योग्य तो सकारात्मक निर्णय घेऊन, सर्व सहा.शिक्षक/शिक्षिका यांना वेतनश्रेणी देऊन संस्थान सेवेत कायम करणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये प्राथमिक विभागाकडील प्रस्तावात नमुद केलेल्या ०५ सहाय्यक शिक्षक/ शिक्षिका यांना त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपलेचे तारखेपासून संस्थान सेवेत कायम करणेसाठी कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या गोपनीय अहवालाची प्रतवारी तपासून नियमास अनुसरुन निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.०८ **श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल प्राथमिक विभागासाठी पूर्ण वेळ मुख्याध्यापक रिक्त पद शाळा संहिता सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने भरणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल वाढती विद्यार्थी संख्या व वर्ग खोल्या अपु-या पडत असल्याने शालेय कामकाज दोन सत्रात विभाजन करण्यात आल्याने शाळा संहितानुसार प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणूक करणे गरजेचे होते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२१.०६.२०१३ रोजीचे सभेत प्राथमिक विभाग मुख्याध्यापक नेमणेबाबत प्रस्ताव ठेवण्यात असता निर्णय क्र.४९८ अन्वये यावर सविस्तर चर्चा होवून शाळा दोन सत्रात भरविण्यात येत असल्याने प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणेसाठी अगोदर मुख्याध्यापक (प्राथमिक विभाग) या पदास राज्य शासनाची मान्यता घेणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली व शासनाची मान्यता मिळालेनंतर सदर पद भरणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.

त्यानुसार प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वतंत्र पद आकृतीबंधामध्ये नव्याने सामाविष्ट करणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार शासन निर्णय क्र.सासंवि २०१४/८०/प्र.क्र.२५/का.१६, दि.२५ सप्टेंबर २०१४ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वतंत्र पद सामाविष्ट करण्यास मा.उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लिकेशन क्र.१२०५६/२०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार मा.उच्च न्यायालयाची रितसर पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर शासनाकडून मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त शासनाच्या मान्यतेच्या अटीनुसार संस्थानचे विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील अर्ज दाखल करण्यात आला होता. मा. उच्च न्यायालयाने दि.१३.०३.१५ रोजीचे आदेशाने श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापकाचे एक स्वतंत्र पद सामाविष्ट करण्यास मान्यता मिळालेली आहे.

**विभागाचा अभिप्राय**– शाळासंहितानुसार प्राथमिक विभागासाठी स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणूक करावी लागेल. शाळा संहितानुसार डी. एड. किंवा दोन वर्षे कालावधीची पूर्व प्राथमिक पदविका परीक्षा किंवा शासनाने त्या समतूल्य पदविका परीक्षा म्हणून मान्यता दिलेली परीक्षा उत्तीर्ण व्यक्ती व विद्यार्थी पटसंख्या २०० पेक्षा अधिक असल्यास प्राथमिक विभागाकडे मुख्याध्यापक नेमावा लागतो. आपल्या शाळेला इयत्ता १ ली ते ५ वी अशी प्राथमिक विभागासाठी मान्यता मिळालेली असल्याने इयत्ता १ ली ते ५ वी एकूण २४ वर्ग तुकडी विद्यार्थी पट संख्या १२३६ आहेत. त्यामुळे प्राथमिक विभागाकडे नेमावयाचे मुख्याध्यापकास वरील नमुद वर्ग सांभाळणेची जबाबदारी द्यावी

लागेल. तसेच प्राथमिक विभागाकडील त्यांचेवर सोपविलेली वर्गाची अध्यपनाची जबाबदारी सांभाळून त्यांची नेमणूक करावी लागेल.

प्राथमिक शाळा संहिता नुसार सहाय्यक शिक्षकांमधून सेवाजेष्ठता, शैक्षणिक पात्रता, अनुभव व समाधानकारक काम विचारात घेता सेवाजेष्ठतेनुसार श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची प्राथमिक विभाग मुख्याध्यापक पदी नेमणूक करता येईल. प्राथमिक विभागाकडील सेवाजेष्ठता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कर्मचारी नांव | जन्मतारीख | नेमणूक तारीख | शैक्षणिक पात्रता | अनुभव | काम समाधानकारक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्रीमती वैद्य शिल्पा सुरेश | दि.१०.०६.१९७६ | दि.१४.०६.१९९६ | एस.एस.सी.डी.एड, एम.ए., बी.एड | १९ वर्ष | होय |
| ०२. | श्रीमती वैशाली संजय थोरात | दि.१३.०८.१९७५ | दि.१३.०६.१९९७ | एच.एस.सी.डी.एड, | १८ वर्ष | होय |
| ०३. | श्रीमती अडसुळ संगिता गिरीधर | दि.२३.०५.१९७६ | दि.१३.०६.१९९८ | बी.ए., डी.एड. | १७ वर्ष | होय |
| ०४. | श्रीमती तिपायले चारुशिला शंकर | दि.१६.०१.१९७८ | दि.१३.०६.१९९८ | एच.एस.सी.डी.एड. बी.ए. (२००२) | १७ वर्ष | होय |
| ०५. | श्री.पंधे नितीन अरुण | दि.२३.०२.१९६९ | दि.१६.०६.१९९८ | एम.ए.डी.एड. | १७ वर्ष | होय |

तसेच शाळा संहिता नुसार श्रीमती.शिल्पा सुरेश वैद्य यांची वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, अनुभव, समाधानकारक काम, परिविक्षा काळ, विद्यार्थी संख्या, वेतनश्रेणी याबाबतचा तुलनात्मक तपशिल-

| अ.क्र. | तपशिल | शैक्षणिक शाळा संहितानुसार मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असलेली पात्रता | श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य सहा.शिक्षिका यांचे पात्रतेबाबत तपशिल |
|---|---|---|---|
| ०१. | अनुज्ञेय पदे | पदोन्नतीसाठी प्रत्यक्ष मुलाखतीस बोलविले जात नाही. | - |
| ०२. | वयोमर्यादा | मुख्याध्यापकाचे पद पदोन्नतीने भरण्यात येत असेल तर कमाल वयोमर्यादेची अट नाही. | - |
| ०३. | शैक्षणिक पात्रता/ प्रशैक्षणिक पात्रता | एच.एस.सी., डी.एड. किंवा दोन वर्ष कालावधीची पुर्व प्राथमिक पदविका परिक्षा किंवा शासनाने त्या समतुल्य पदविका परिक्षा म्हणून मान्यता दिलेली परिक्षा उत्तीर्ण व्यक्ती | एस.एस.सी., डी.एड., (सन १९९४) (इंग्रजी माध्यम) एम.ए.बी.एड. (य.च.मु.विद्यापीठ शि.शास्त्र) |
| ०५. | अनुभव | शिक्षक म्हणून कमीत कमी ५ वर्षांची सेवा झालेली असावी. | एकुण सेवा कालावधी १९ वर्ष |
| ०६. | समाधानकारक काम | काम समाधानकारक असणे आवश्यक आहे. या प्रयोजनासाठी मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घ्यावा. | काम समाधानकारक आहे. मागील पाच वर्षांचे गोपनीय अहवाल सोबत परिशिष्ठात तपशिलवार नमुद केलेले आहेत. |
| ०७. | परिवीक्षा काळ | मुख्यध्यापकाचे रिकामे पद भरण्यासाठी पदोन्नत व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षाधीन असेल. पदोन्नतीव्दारे किंवा समावेशनाव्दारे कायम रिक्त पद भरण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस शालेय कायदा कलम ५ (२)(३) किंवा (४) मधील कोणतीही बाब लागू होणार नाही. | |
| ०४. | विद्यार्थी संख्या | प्राथमिक विभाग पटावर २०० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असावी. | प्राथमिक विभाग इ.१ली ते ५ वी पर्यंत एकुण विद्यार्थी पटसंख्या १२९५ इतकी आहे. |
| ०५. | वेतनश्रेणी | पाचव्या वेतन श्रेणीनुसार मुळ वेतनश्रेणी ५५००-१७५-९००० सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन निश्चिती नुसार वेतनश्रेणी 9300-34800+ ग्रेड पे 4300 | सध्याची वेतनश्रेणी 5200-20200+ ग्रेड पे 2800 म्हणजचे सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन निश्चिती नुसार वेतनश्रेणी 9300-34800+ ग्रेड पे 4200 अशी आहे. |

तसेच त्यांचे मागील पाच वर्षांचे गोपनिय अहवालाची प्रतवारी पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | सन | श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची गोपनीय अहवाल प्रतवारी | सरासरी प्रतवारी |
|---|---|---|---|
| ०१. | २००९-१० | B+ | |
| ०२. | २०१०-११ | A | |
| ०३. | २०११-१२ | A | A |
| ०४. | २०१२-१३ | A | |
| ०५. | २०१३-१४ | A | |

श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची सध्याची वेतनश्रेणी 5200-20200+ ग्रेड पे 2800 म्हणजचे सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना वेतन निश्चिती नुसार वेतनश्रेणी 9300-34800+ ग्रेड पे 4200 अशी आहे. शाळा संहितानुसार या पदाची वेतनश्रेणी 9300- 34800+ ग्रेड वेतन 4300 अशी आहे.

त्यामुळे श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांना प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदी नेमणूक करतांना त्यांना शाळा संहितानुसार त्या पदाची असलेली वेतनश्रेणी 9300- 34800+ ग्रेड वेतन 4300 द्यावी लागेल.

**मागणी**– प्राथमिक विभागाकरीता स्वतंत्र मुख्याध्यापक नेमणेकामी आवश्यकतेनुसार मा.व्य.समितीची, शासनाची तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेतलेली आहे. तसेच सदर पदासाठी शैक्षणिक शाळा संहितानुसार आवश्यक असलेल्या सर्व अर्हता श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांनी प्राप्त केलेल्या आहेत.

तरी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे प्राथमिक विभागाकडील इयत्ता १ ली ते ५ वी एकूण २४ वर्ग तुकडी अंदाजे १२९५ विद्यार्थी पट संख्या सांभाळणेकामी श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांना शाळा संहितानुसार वेतन बॅन्ड 9300 – 34800 + ग्रेड वेतन 4300 ही वेतनश्रेणी देऊन प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी सेवाजेष्ठता व गोपनीय अहवालाची प्रतवारी पहाता, श्रीमती शिल्पा सुरेश वैद्य यांची प्राथमिक विभागाकडील मुख्याध्यापक पदी नेमणूक करणेत येऊन, त्या पदाची वेतश्रेणी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.०९ **सहा.शिक्षिका यांचे प्रसुती (बाळंतपणाचे) रजेचे कालावधीमध्ये प्रशिक्षीत कुशल कंत्राटी शिक्षक मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु.के.जी. ते १० वी पर्यंतचे वर्ग चालविले जातात. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ज्यु.के.जी ते इ.१० वी पर्यंत एकुण ४८ वर्ग तुकड्या कार्यरत आहेत. प्रत्येक वर्गामध्ये सरासरी ५० ते ५५ विद्यार्थी संख्या आहे.

श्रीमती भांगरे रेश्मा दशरथ व श्रीमती खरमाळे शुभांगी सुदाम सहा.शिक्षिका यांनी त्यांचेकडील दि.२९.०६.२०१५ रोजीचे अर्जानुसार अनुक्रमे दि.२५.०९.२०१५ व दि.०५.११.२०१५ पासून १८० दिवसांची प्रसृती (बाळंतपणाची) रजेची मागणी केलेली आहे.

तसेच श्रीमती पठाडे उर्मीला ज्ञानेश्वर कंत्राटी महिला शिक्षिका यांनी त्यांचेकडील दि.२५.०९.२०१५ रोजीचे अर्जान्वये दि.१४.१०.२०१५ ते १०.०१.२०१६ पर्यंत एकुण ९० दिवसांची प्रसृती रजेची मागणी केलेली आहे.

श्री साईबाबा इंग्लिश मिडीमय स्कुल कडील दि.२०.०८.२०१५ रोजचे टिपणीन्वये श्रीमती भांगरे व श्रीमती खरमाळे यांची १८० दिवसांची पगारी रजा मंजुर करण्यात आलेली आहे. तसेच श्रीमती पठाडे या कंत्राटी महिला कर्मचारी असल्याने त्यांना पगारी रजा मंजुर करता येणार नाही. त्यामुळे त्यांना बिनपगारी रजा घ्यावी लागेल.

उपरोक्त तीन्ही शिक्षिका यांचे रजेचे कालावधीमध्ये त्या शिकवत असलेल्या वर्गावरील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता त्यांचे रजेच्या कालावधीमध्ये कंत्राटी शिक्षक नेमणे गरजेचे आहे. उपरोक्त तीन्ही शिक्षक यांचे रजेचा कालावधी व त्या शिकवत असलेल्या वर्गाचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.क्र. | सहा.शिक्षिकाचे नांव | रजेचा कालावधी | रजा दिवस | शिकवत असलेला वर्ग | कंत्राटी शिक्षकाची आवश्यकता (पासून) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१. | श्रीमती भांगरे रेश्मा दशरथ (सहा.शिक्षिका) | दि.२५.०९.२०१५ ते दि.२२.०३.२०१६ | १८० | इ.३ री (ड) | दि.२४.०९.२०१५ |
| ०२. | श्रीमती खरमाळे शुभांगी (सहा.शिक्षिका) | दि.०५.११.२०१५ ते दि.०२.०५.२०१६ | १८० | इ.१ ली (अ) | दि.०४.११.२०१५ |
| ०३. | श्रीमती पठाडे उर्मीला ज्ञानेश्वर (कंत्राटी शिक्षिका | दि.१४.१०.२०१५ ते दि.१०.०१.२०१६ | ९० | इ.२ री (क) | दि.१३.१०.२०१५ |

शिक्षण विभागातील दीर्घ सुट्टी विभागात काम करणा-या कर्मचा-यांच्या वार्षिक रजा सुट्टयांबाबत मंजूर टिपणीत रजा सुट्टया देतांना पुढील बाबी विचारात घेण्यात आलेल्या आहेत. यामधील क्रमांक ३ नुसार वरील बाबी नुसार एखादा कर्मचारी ३० दिवसांपेक्षा अधिक दिवस रजेवर असल्यास त्या कालावधीकरिता बदली कर्मचारी नेमलयास हरकत नाही. (क्र.आरईएस/१९८२/बजेटकपाट/१५३/ शिक्षण संचालनालय, पुणे दि.०६.१२.१९८३ नुसार) असे नमुद करण्यात आलेले आहे.

तरी नमुद केलेप्रमाणे श्रीमती भांगरे रेश्मा दशरथ, श्रीमती खरमाळे शुभांगी सुदाम व श्रीमती पठाडे शैला ज्ञानेश्वर यांचे प्रसूती रजेचे कालावधीमध्ये उपरोक्त तक्तयात कॉलम क्र.६ मध्ये दर्शविलेले दिवसांपासून प्रसूती रजा कालावधी संपेपर्यंत किमान एचएस.सी.डी.एड. अर्हताधारक ०३ कंत्राटी शिक्षक घेणेस मान्यता मिळणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समिती समोर निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३२८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेल्या ०३ सहा.शिक्षिका यांचे प्रसुती (बाळंतपणाचे) रजेचे कालावधीमध्ये त्या शिकवत असलेल्या वर्गामधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता त्या पदाच्या पात्रतेचे प्रशिक्षीत कुशल कंत्राटी शिक्षक महाराष्ट्र शासनाच्या किमान वेतनावर संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत ०३ सहा.शिक्षीकांचे रजेचे कालावधीसाठी घेण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.१० **साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कंन्सल्टंसी कंपनीकडून अंतिम करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुदः** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक सोयी / सुविधा उपलब्ध करुन देणे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठरावः** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.799. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 25/09/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.837. 3) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.912. 04) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 09/10/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 909.

**प्रास्ताविकः** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/11/2009 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 799 नुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना साईटेक प्रकल्प उभारणीसाठीचे जा. क्रं. एसएसएसटी/आयटी/ 15030/2009 दि. 09/12/2009 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. साईटेक प्रकल्प उभारणीसाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा कार्यकाल संस्थानने पहिली कार्यप्रणाली स्वीकारलेनंतर 69 महिन्यांचा आहे. संस्थानने प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत केलेल्या पहिल्या कार्यप्रणालीस दि. 01/08/2011 रोजी स्वीकृती दिलेली असल्याने सदरचा कार्यकाल दि. 30/04/2017 रोजी संपुष्टात येत आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्प Out Source मार्फत चालविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे मदतीने व मान्यतेने निविदा प्रक्रिया तात्काळ सुरु करुन दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पुर्ण करावी, असे ठरले. त्यानुसार निविदा मसुदा तयार करण्यात येऊन महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागास दि. 25/11/2014 रोजीचे ई-मेलव्दारे पाठविला आहे. परंतु सदर निविदा तपासुन आलेली नसल्याने तीन वेळेस दि. 15/12/2014, दि. 23/02/2015 रोजीचे व दि. 09/05/2015 रोजीचे पत्रान्वये महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान विभागास स्मरणपत्र देखील देण्यात आले आहे.

साईटेक प्रकल्पावर सुरुवातीपासुन श्री. के.व्ही. रमणी हे तांत्रिक सल्लागार म्हणुन तसेच आयटी कमिटी अध्यक्ष म्हणुन काम पाहत असल्याने सदर निविदा, जाहिरात, करारनामा मसुदा श्री. के.व्ही. रमणी यांना तपासणेकामी पाठविली असता, त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आयटी विभाग अतिशय चांगला असुन साईटेक प्रोजेक्टला सपोर्ट व बॅकअप प्लॅन हा महाराष्ट्र शासनाचे आयटी विभागाकडे दिलेला चांगला राहील. तसेच, याबाबतची कार्यवाही शासनाकडुन त्वरीत होणेस मदत होईल. निविदा प्रक्रियेव्दारे कार्यवाही करावयाची झाल्यास त्यास विलंब लागण्याची शक्यता आहे, असे त्यांनी दि. 25/11/2014 रोजीचे ई-मेलव्दारे कळविले असुन त्यामध्ये शासनाचे प्रतिनीधींचा देखील समावेश आहे.

परंतु आपणास श्री के. व्ही. रमणी यांचे अभिप्रायाऐवजी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे सभेत निर्णय क्रं. 912 अन्वये कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासनाकडुन विलंब होत असल्याने साईटेक प्रकल्पाचे पर्यायी व्यवस्थेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ यांचेसमोर सिव्हील अॅप्लीकेशन दाखल करणेबाबत दि. 27/03/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेकामी मान्यतेस्तव ठेवण्यात आला होता. परंतु, साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत उभारणी करुन कार्यान्वीत करण्यात आलेल्या साईटेक प्रकल्पाचे प्रात्यक्षिक दि. 02/04/2015 रोजी श्री विजय एस. मदान सो., DG, UIDAI, श्री डॉ. अजय भुषण पांडे सो., Deputy Director General, UIDAI, Regional Office Mumbai, श्री अनिल कवडे सो., मा. जिल्हाधिकारी सो., अहमदनगर, मा. कार्यकारी अधिकारी सो., प्रांत अधिकारी सो., श्री. बी. व्ही. जिचकर सो., Deputy Director, UIDAI, तहसिलदार सो., श्री. सुमनेश जोशी UIDAI तांत्रिक प्रतिनिधी समवेत दाखविण्यात आले आहे. श्री साईभक्तांच्या सेवेसाठी साईटेक प्रकल्पात वापरण्यात आलेल्या अत्याधुनीक कार्यप्रणाली व तांत्रिक यंत्रणेबाबत उपस्थित सर्वांनी समाधान व्यक्त केले. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार साईटेक प्रकल्पाची Out Source निविदा महाराष्ट्र शासनाकडे तपासणेकामी तसेच मान्यतेसाठी पाठविणेत आलेली असुन सदर प्रस्तावास शासनाकडुन विलंब होत असल्याचे उपस्थितांच्या निदर्शनास आणुन दिलेनंतर त्यावर सविस्तर चर्चा होऊन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत उभारणेत आलेला "साईटेक प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता प्रकल्पाचे 37 विभागांचे कार्यप्रणालीतील Application Source Code घेणे हे पासवर्ड घेणे इतके सोपे नाही. तसेच सदर प्रकल्प

एका कंपनीकडुन दुसऱ्या कंपनीस Handover करणेकामी कमीत-कमी पाच ते सहा महिन्यांचा कालावधी लागु शकतो. महाराष्ट्र शासनाचे आयटी विभागाने यापुर्वी आपणास ई-मेलव्दारे नमुद केलेला अभिप्राय योग्य असल्याचे श्री. सुमनेश जोशी UIDAI तांत्रिक प्रतिनिधी यांनी व्यक्त केले आहे." तसेच विषयांकीत प्रस्तावाबाबत श्री डॉ. अजय भुषण पांडे सो., Deputy Director General, UIDAI, Regional Office Mumbai यांनी आपण याबाबत मा. प्रधान सचिव सो., माहिती तंत्रसंचलनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेशी चर्चा करुन संस्थानला याकामी तातडीने सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे चर्चेअंती सांगीतले.

तसेच उपरोक्त प्रस्ताव UIDAI मिटींगचे वेळेस मुंबई येथे चर्चेसाठी सोबत घेऊन यावा, असेही त्यांनी चर्चेअंती सुचविले होते. दि. 27/03/2015 रोजीचे प्रस्तावातील प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे दि. 08/04/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचेशी समक्ष चर्चा केली असता, "दरकामी दि. 09/10/2014 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार तयार करण्यात आलेल्या Out Source निविदेस महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेबाबत मुंबई येथे जाऊन शासनाचे संबधीत प्रतिनिधींशी पाठपुरावा करुन कार्यवाही करण्यात यावी, असे सुचविले आहे."

त्यानुसार दि. 15/04/2015 रोजी Hon.Additional Chief Secretory and Director of DIT Govt.,of MH-IT महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई येथे मिटींग आयोजीत करुन साईटेक प्रकल्पात कार्यरत असलेल्या सर्व सेवा सुविधावर सविस्तर चर्चा झाली. सदर चर्चेअंती Hon. Additional Chief Secretory and Director of DIT Govt., of MH-IT महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी साईटेक प्रकल्प Out Source मार्फत चालविणे कामीची निविदा मसुदा संस्थानला लवकरात लवकर तपासुन पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी चर्चेअंती सांगितले आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा करारनामा दि. 30/04/2017 रोजी संपुष्टात येत आहे. तोपर्यंत साईटेक प्रकल्पाचे कामकाजाची जबाबदारी ही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांची आहे. तसेच करारनाम्यानुसार कंपनीचे पेमेंट वेळेवर अदा करणे गरजेचे आहे. कंपनीस पेमेंट वेळेवर अदा केल्यास कंपनी विहित वेळेत कामकाज पुर्ण करण्यास बांधील अथवा तत्पर असते जर कंपनीस करारनाम्यानुसार पेमेंट वेळेवर अदा न केल्यास भविष्यात साईटेक प्रकल्पामार्फत श्री साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व तांत्रिक सेवा-सुविधा विस्कळीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा करारनामा कालावधी संपणेचे अगोदर साधारणत: सहा ते सात महिने संस्थानचे विहित पध्दतीने साईटेक प्रकल्पाचे कामकाज दुसऱ्या कंपनीकडे सुपुर्त करण्याची कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. साईटेक प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार पुढील निविदा प्रक्रिया संबधीची कार्यवाही विभागामार्फत यापुर्वीच सुरु करण्यात आली आहे.

परंतु, महाराष्ट्र शासनाकडुन सदरकामी पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने दि. 25/06/2015 रोजीचे टिपणी अन्वये साईटेक प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीकडुन out Source एजन्सी मार्फत तंत्रज्ञ नेमण्यात यावे, असे सुचविले आहे किंवा संस्थानचे सामान्य प्रशासन विभागामार्फत विहित पध्दतीने मानधन तत्वावर वेतन निश्चित करुन घेता येईल, जेणेकरुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन Application Source code तसेच DC, DR, Online Services, Info Center, Internet Services, Hardware, Infrastructure Etc., संबधीचे कामकाज लवकरात लवकर संस्थानकडे हस्तांतरीत (Take Over) करणे सोईचे होईल, याबाबत सविस्तर प्रस्ताव मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आला होता. परंतु, सदर प्रकरणी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांनी चर्चेअंती दिलेल्या निर्देशानुसार समक्ष चर्चा केली असता, सदरकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. 09/10/2014 रोजीचे निर्णयानुसार महाराष्ट्र शासनाचे संबधीत प्रतीनिधींशी पाठपुरावा करुन अथवा महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे GAD-मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT(MH) Mantralaya,Mumbai-400032 Date:01/07/2014 रोजीचे अध्यादेशाव्दारे नेमलेल्या अधिकृत कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् एजन्सी/कंपनीशी याकामी संपर्क साधुन कार्यवाही अंतीम करणेबाबत प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश दिले आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाचे दि. 01/07/2014 रोजीचे अध्यादेशाव्दारे नेमलेल्या सर्व अधिकृत कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् एजन्सी/कंपनीशी ई-मेलव्दारे कळविण्यात आले असुन तसेच दुरध्वनीव्दारे देखील संपर्क साधुन चर्चा करण्यात आली आहे. त्यानुसार फक्त Accenture या कंपनीने याकामी सकारात्मक प्रतीसाद दिला असुन याकामी एक वरिष्ठ सल्लागार सदरकामी नेमण्यात येऊन त्यांनी सदर कामाचा कालावधी व सदरचे काम पुर्ण झाल्यावर अदा करावयाच्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे कळविला आहे.

| Sr.No. | Activites | Activity period | Breakup in INR |
|---|---|---|---|
| 01. | Current As Is-assessment | 02 Month | 1,85,000/- |
| 02. | Bid formulation | 01 Month | 1,85,000/- |
| 03. | Attending Pre Bid and preparing response to pre bid queries | 15 Days | 92,500/- |
| 04. | Technical Bid Evalution Report | 30 Days | 2,77,500/- |
| 05. | Contracting Process until the SI is on boarded | 15 Days | 92,500/- |
| 06. | Holding the New and Old SI (System Integrator) in transitioning all the source code, documentation and Handshake process | 30 Days | 92,500/- |
| | **Total Amount (Inclusive of all Taxes)** | | **9,25,000/-** |

महाराष्ट्र शासनाचे दि. 01/07/2014 रोजीचे अध्यादेशातील RC दराप्रमाणे कंपनी सदर कामासाठी एक वरिष्ठ सल्लागाराची नेमणुक करणार असुन उपरोक्त कामी नमुद कालावधीचा विचार करता एकुण 06 महिन्याकरीता रक्कम रुपये 13,20,000/- इतका खर्च येत आहे. परंतु, श्री साईबाबा संस्थानकरीता Accenture या कंपनीने उपरोक्त नमुद केलेले कामे करणेकामी त्यांनी दि. 22/07/2015 रोजीचे ई-मेलमध्ये रक्कम रुपये 9,25,000/- मात्र (सर्व करांसहित) खर्च कळविला आहे. तसेच उपरोक्त तक्त्यात कंपनीने नमुद केलेप्रमाणे कामाचे तपशिलानुसार कामाची कार्यवाही झालेनंतर कंपनीस ठरावीक रक्कम अदा करावयाची आहे.

तसेच सदरचे कामकाज महाराष्ट्र शासनाने अधिकृत केलेल्या Accenture या कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् कंपनीकडुन केल्यास खालील मद्दे संस्थानचे हितावह असुन निविदा प्रक्रियेपासुन अंतिम पुरवठाधारकाची निवड प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे होणेस मदत होईल.

1. Accenture is the empanelled consultancy firm appointed by the State Govt. of Maharashtra-DIT and hence appointing to them would help us get the desired outcome for SHRI SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI.

2. By appointing such professional, highly qualified and experience consultant will certainly benefit to SHRI SAI BABA SANSTHAN TRUST SHIRDI, since these firms have tremendous experience in areas such IT strategy, Consulting & Technology.

3. Consultant is well reputed organization and if we are hiring them as consultant for documentation and Proposal of IT Strategy& Planning, they will ensure complete legal protection for SHRI SAI BABA SANSTHAN TRUST SHIRDI, which is quite important for the SHRI SAI BABA SANSTHAN TRUST,SHIRDI.

4. Consultant is uniquely positioned to deliver the program goals and benefits by leveraging in-depth understanding of Trust's business context, bringing aBest-in-class business and IT domain team, and leveraging our global experience, assets and accelerators in delivering such programs.

5. Consultant has considered IT needs of SHRI SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI,we believe that the solution which they will provide will be flexible enough to manage the key changes or dependencies for IT Strategy& Planning.

6. Accenture having complex program management experience for 500+ projects for over 135+ Clients from the Accenture India Delivery Centre and having over 450 PMI certified professionals in India and project management experience of over 30 years.

7. A dedicated and deeply skilled Program Direction will be provided for SHRI SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI.

8. Consultancy firm having tools and methodology for SI Partner selection to deliver the required outcome for SHRI SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI.

9. We believe that the combination of above unique capabilities of Consultancy firm will help SHRI SAI BABA SANSTHAN TRUST, SHIRDI toachieve its business objectives with more certainty, at greater pace and with more agility.

तरी, मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार साईटेक प्रकल्पाचे दुरुस्ती देखभालीची निविदा तयार करणेपासुन पात्र पुरवठाधारकाची निवड प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे होणेकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाने दि. 01/07/2014 रोजीचे अध्यादेशात नियुक्त केलेल्या Accenture या कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् एजन्सी/कंपनीकडुन प्राप्त झालेल्या त्यांचे दि. 22/07/2015 रोजीचे ई-मेलनुसार व प्रास्तावीकेत नमुद केलेले तक्त्यानुसार कामकाजाची कार्यवाही होणेस तसेच सदरकामी कंपनीने कळविलेल्या एकुण रक्कम रुपये 9,25,000/- मात्रचे (सर्व करांसहित) खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सादर करता येईल.

**मागणी:** साईटेक प्रकल्पाची व्याप्ती व प्रकल्पातील कार्यरत असलेल्या सेवा-सुविधांचा विचार करता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा करारनामा कालावधी संपणेचे अगोदर साधारणत: सहा ते सात महिने संस्थानचे विहित पध्दतीने प्रकल्पाचे कामकाज दुसऱ्या कंपनीकडे सुपुर्त करण्याची कार्यवाही करणे अपेक्षीत आहे. सदर कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने पुर्ण होणेकामी त्वरीत सुरुवात करणे अंत्यत गरजेचे आहे.

तरी, साईटेक प्रकल्पाचे दुरुस्ती देखभालीची निविदा तयार करणेपासुन पात्र पुरवठाधारकाची निवड प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे होणेकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे GAD-मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai-400032 Date: 01/07/2014 रोजीचे अध्यादेशाव्दारे नियुक्त केलेल्या Accenture या कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् एजन्सी/कंपनीकडुन प्राप्त झालेल्या त्यांचे दि. 22/07/2015 रोजीचे ई-मेलनुसार व प्रास्तावीकेत नमुद केलेले तक्त्यानुसार कामकाजाची कार्यवाही होणेस तसेच सदरकामी कंपनीने कळविलेल्या एकुण रक्कम रुपये 9,25,000/- मात्रचे (सर्व करांसहित) खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक, आर्थिक व कार्यदेशीर.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे विवेचनानुसार साईटेक प्रकल्पाचे दुरुस्ती देखभालीची निविदा तयार करणेपासुन पात्र पुरवठाधारकाची निवड प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे नियमाप्रमाणे होणेकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे GAD-मातंस 080/4/2014-O/O DIRECTORATE OF IT-DIT (MH) Mantralaya, Mumbai-400032 Date:01/07/2014 रोजीचे अध्यादेशाव्दारे नियुक्त केलेल्या Accenture या कन्सल्टंन्सी सर्व्हीसेस् एजन्सी/कंपनीकडुन प्राप्त झालेल्या त्यांचे दि. 22/07/2015 रोजीचे ई-मेलनुसार व उपरोक्त प्रास्तावीकेत नमुद केलेले तक्त्यानुसार कामकाजाची कार्यवाही होणेस तसेच सदरकामी कंपनीने कळविलेल्या एकुण रक्कम रुपये 9,25,000/- मात्रचे (सर्व करांसहित) खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. उप-समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.३२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभाल निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे अध्यादेशातील अधिकृत कंन्सलटंसी कंपनीकडून अंतिम करणेस मान्यता देण्यात आली. परंतु सदरहू काम प्रस्तावात नमुद केलेल्या एकाच कंपनीकडून का करावयाचे याबाबत महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रसंचनालयाचा अभिप्राय घेण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.११ **मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्च २०१४ ते डिसेंबर २०१४ पेमेंट अदा करणेबाबत प्राप्त आयटी कमिटी अध्यक्ष, सदस्य व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय तसेच कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधीनां चर्चेकरीता बोलविणेबाबत.**

प्रस्ताव- माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीचे काम हाती घेण्यात आलेले आहे. साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करावयाच्या संगणकीय कार्यप्रणाली (Q-Management – II व Integration with HMS) वगळता कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संबधीत विभागांमध्ये कार्यान्वीत करुन दिलेल्या आहेत.

कॉग्नीझंट टंक्नॉलॉजी, पुणे यांचे करारनाम्यानुसार साईटेक प्रकल्पाचे पहिल्या टप्प्यातील पहिली संगणकीय कार्यप्रणाली संस्थानने स्वीकारलेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना त्यांचे दरमहा पेमेंट संस्थानने अदा करणे गरजेचे आहे. साईटेक प्रकल्पातील पहिली कार्यप्रणाली दि. 01 ऑगष्ट 2011 रोजी स्वीकारण्यात आलेली आहे. सबब, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना करारनाम्यानुसार माहे ऑगष्ट 2011 पासून पेमेंट अदा करण्यात येत आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे फेब्रुवारी २०१४ पर्यंतचे बीले त्यांना अदा करण्यात आलेली आहेत. कॉग्नीतझंट टेक्नॉलाजी,पुणे यांचे माहे मार्च २०१४ ते डिसेंबर २०१४ चे पेमेंट अदा करणेसंदर्भातील प्रस्ताव मा.व्यंवस्थापन समितीचे दि. १३/०३/२०१५ चे सभेसमोर सादर करण्यात आला होता. सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्रं. ९५ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहे-

"कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च-२०१४ ते डिसेंबर-२०१४ अखेरचे पेमेंट अदा करण्यापुर्वी आयटी कमिटी व तांत्रिक सल्लांगार यांचा अभिप्राय घेण्यात यावा. तसेच त्यांचे अभिप्राय आल्यानंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, असे ठरले."

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आयटी कमिटी अध्यक्ष सदस्य व तांत्रिक सल्लागार यांना साईटेक प्रकल्पाची सद्स्थिती अवगत करुन कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत अभिप्राय देणेबाबत दि. २८/०४/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे विनंती करण्यात आलेली होती, त्यानुसार त्यांनी पुढीलप्रमाणे ई-मेलद्वारे आपले अभिप्राय दिलेले आहेत.

**१) आयटी कमिटी अध्यंक्ष श्री.के.व्ही.रमणी :-** श्री.के.व्ही.रमणी यांनी दि.०२/०५/२०१५ चे ई-मेलद्वारे तसेच दि. २४/०६/२०१५ रोजीचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे बरोबर झालेल्या साप्ताहिक कॉन्फरंन्स कॉलमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

- Based on the project progress so far, IT committee chairman has recommended the payment of Cognizant pending bills should be done by Sansthan at the earliest.
- Release payment, as approved by MH-IT dept.

**२) आयटी कमिटी सदस्य, श्री.राम :-** श्रीराम यांनी दि. ०६/०५/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे कॉग्नीझंट टेक्नॉlलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

- I feel you must get the opinion of IT committee.

**३) आयटी कमिटी सदस्य, श्री.राजीव वैष्णव Vice President (NASSCOM):-** श्री.राजीव वैष्णीव Vice President (NASSCOM) यांनी दि. ०६/०५/२०१५ रोजीचे ई-मेलद्वारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

- As I am not a part of weekly review calls and monitoring progress of project implementation on an on-going basis, it becomes difficult to make any observation or comment in such matters. However, based on your email dated April 25, 2015 2.14 PM attached below and the details therein, my comments are as follows:

1. You have mentioned that "After compliance of pending issues, IT Department put up a note before Hon. Board of Management Committee for approval of payment..." and therefore I assume that the key pending issues have been completed by CTS now.
2. According to you the Current status of SaiTech Project is as follows –
   All 37 Applications are on production.
   **Some applications are held up due to some incompliance which is as follows –**
   1. Vehicle – Changes given by user need to be done.
   2. Electrical - Changes given by user need to be done.

The changes given by Sansthan have to be completed and hence cannot be termed as "incompliance" as this could be work in progress.

3. Payroll application –

It is in use from November 2014, but some functionality are not made as per user requirement till date, it is in progress by CTS. Expected date of completion is 30/04/2015. – Please ensure that the requirements are met by now.

4. ERP – Account department had stopped use of Tally from 01/04/2015. All transactions from 01/04/2015 are entered in ERP. User faces some issue while making entries, which are informed to CTS time to time. These issues are needed to be resolved on high priority.
5. Education Complex – Some functions need changes as per user requirement. Some functionalities need to be incorporated.

From the above inputs by you, one could gauge that as all the 37 Applications are now functional and in some applications where the user (Sansthan) has suggested changes where CTS is complying the requirement which might take time and again those are now expected to get completed by end April 2015, In my view, Management Committee should consider releasing the pending payment to CTS at the earliest.

४) महाराष्ट्र, शासनाचे आयटी विभागाचे प्रतिनीधी व आयटी कमिटी सदस्य, श्रीमुकेश सोमकुंवर (Section Officer (Technical) Directorate of Information Technology,Mantralaya,Mumbai) :- श्रीमुकेश सोमकुंवर (Section Officer(Technical)DIT,Mantralaya, Mumbai) यांनी दि. ०६/०५/२०१५ व दि. २५/०५/२०१५ रोजीचे ई-मेलव्दारे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

- As far as individual committee member is concern, I have already stated that payment should not be held against the archived milestones. In case of delay in the services, there is no penalty provision in the contract. Further, payment has be to made after go live of 1st application. There is no provision made in the contract for timeline for rest of the applications. In case, Management wish to hold the payment till all the issues get resolved, 10 to 20 % payment can be hold and rest of the payment can be released against assured timeline commitment from Cognizant.
- Once again, sending my comments given earlier. Committee can hold marginal due payment and rest of the payment can be released as stated in may.

५) श्री विजय नायडु, तांत्रिक सल्लांगार :- श्री विजय नायडु, यांनी दि. २०/०६/२०१५ रोजीचे ई-मेलव्दाबरे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत खालीलप्रमाणे आपला अभिप्राय दिला आहे.

I am unaware of the technical aspects & details of Saitech project as I was not involved in it .I am therefore unable to comment on the CTS payment issues.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संस्थानचे विविध विभागांमध्ये. कार्यान्वीत केलेल्या संगणकीय कार्यप्रणालींची सद्यस्थितीत आपले माहितीसाठी पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | संगणकीय कार्यप्रणाली | संगणकीय कार्यप्रणालीची सद्यस्थिती |
|---|---|---|
| 1 | अकाऊंट विभाग | अकाऊंट विभागात चालणाऱ्या सर्व व्यवहारांची नोंद सध्या ईआरपी कार्यप्रणालीमध्ये घेण्यात येत आहे. दि. ०१/०४/२०१५ पासून अकाऊंट विभागात पुर्वी वापरात असलेली जुनी Tally हि कार्यप्रणाली मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे दि. ०२/०३/२०१५ रोजीचे इतिवृत्त आदेशान्वये बंद करण्यात आलेली आहे.<br>नविन ईआरपी कार्यप्रणालीमध्ये येणा-या तांत्रिक अडी-अडचणी तथा आवश्यक सुधारणाबाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत करण्यात येत आहेत. |
| 2 | प्रसादालय विभाग | चालू आहे. |

| अ.क्रं. | संगणकीय कार्यप्रणाली | संगणकीय कार्यप्रणालीची सद्यस्थिती |
|---|---|---|
| 3 | खरेदी विभाग | चालू आहे. |
| 4 | भांडार विभाग | चालू आहे.<br>परंतु, भांडार विभागामार्फत संगणकीय कार्यप्रणालीचा पुर्ण वापर अद्याप होत नसल्याचे दिसुन येत आहे |
| 5 | रुम रिझर्वेशन विभाग | चालू आहे. |
| 6 | दर्शन पास | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार फिंगरप्रिंटची सुविधा तसेच ऑनलाईन सर्व्हिसेस मार्फत बुक न झालेला आरतीची कोटा संगणकीय कार्यप्रणालीत ट्रांसफर होण्याची सुविधा सदरचे संगणकीय कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत करुन दिलेली आहे. |
| 7 | चेक / डीडी विभाग | चालू आहे.<br>ऑनलाईन बॅंक ट्रान्सफर सॉफटकॉपी अपलोडींग सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन होणे अदयाप बाकी आहे. |
| 8 | देणगी विभाग | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संगणकीय कार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत केलेली आहे. |
| 9 | पगारबील विभाग | माहे नोव्हेंबर 2014 पासून पगारबीलाची कार्यवाही सदरचे संगणकीय कार्यप्रणालीमधून सुरु करण्यात आलेली आहे.<br>वेतन निश्चिती, फरक बीले या संदर्भातील काही सुधारणा करणे अंतिम टप्प्यात असुन त्याबाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन होणे बाकी आहे. |
| 10 | कामगार विभाग | चालू आहे.<br>संगणकीय कार्यप्रणालीमध्ये कायम कर्मचाऱ्यांच्या रजासंबधी माहिती भरण्याचे काम चालू आहे. कायम/कंत्राटी कामगार, गैरशिस्त वर्तनसंबधी नोटीस,कोर्ट मॅटर इ. आवश्यक सुधारणाबाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन होणे बाकी आहे. |
| 11 | लाडू प्रसाद विभाग | चालू आहे. |
| 12 | मनी ऑर्डर विभाग | चालू आहे. |
| 13 | टेलिफोन बिलींग | चालू आहे.पगारबील कार्यप्रणाली ही टेलिफोन बिलींगशी इंटीग्रेट करणे व कर्मचारी ग्रुप मोबाईल वसुलीबाबतची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन होणे बाकी आहे. |
| 14 | कॅंटीन विभाग | चालू आहे. |
| 15 | इन्फॉर्मेशन फॉर सिनीअर ऑफीसर्स | चालू आहे. |
| 16 | इनवर्ड / आऊटवर्ड विभाग | चालू आहे.<br>सदरची संगणकीय कार्यप्रणाली सर्व विभागांमध्ये कार्यान्वीत करणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन बाकी आहे. |
| 17 | भक्तमंडळ सभासद | चालू आहे. |
| 18 | प्रकाशने विभाग | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदरच्या कार्यप्रणालीमध्ये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत बारकोड ची सुविधा समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| 19 | साईलीला | संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली आहे, डेटा व्हेरीफीकेशन करुन, माहे मे-जून 2015 चे प्रिटींग संगणकीय कार्यप्रणालीमधून कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेकडुन काढणे बाकी आहे. |
| 20 | विद्युत विभाग | चालू आहे. |
| 21 | किऑस्क | चालू आहे. |
| 22 | विधी विभाग | चालू आहे. |
| 23 | सभा कामकाज विभाग | चालू आहे. |
| 24 | वाहन विभाग | चालू आहे. |
| 25 | पाणी पुरवठा विभाग | चालू आहे. |
| 26 | कापड कोठी / विक्री | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार श्रींना अर्पण करावयाच्या वस्त्राबाबतची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संगणकीय कार्यप्रणालीमध्ये कार्यान्वीत करुन देण्यात आलेली आहे. |

| अ.क्रं. | संगणकीय कार्यप्रणाली | संगणकीय कार्यप्रणालीची सद्यस्थिती |
|---|---|---|
| 27 | बांधकाम विभाग | चालू आहे. |
| 28 | गेस्ट ईन्फॉर्मेशन | चालू आहे.<br>सदरचे संगणकीय कार्यप्रणालींत पाकिट प्रिंटींग व स्टिकर प्रिंटिंग करुन देणे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे कडुन बाकी आहे. |
| 29 | वैद्यकिय अनुदान | चालू आहे. |
| 30 | एमआयएस | तुर्त कार्यान्वीत झालेल्या काही संगणकीय कार्यप्रणालींचे रिपोर्ट कार्यप्रणालीमध्ये विकसीत करण्यात आलेले आहेत. आवश्यक रिपोर्टस् बाबतची माहिती कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना संस्थानकडुन अद्याप देणे बाकी आहे. |
| 31 | संरक्षण विभाग | चालू आहे. |
| 32 | शैक्षणिक संकुल विभाग | सद्यस्थितीतील संगणकीय कार्यप्रणालीमध्ये अधिक सुविधा तथा सुधारणा होणे अपेक्षित असल्याने त्यावर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे कामकाज करत असुन सदयस्थितीत कामकाज होणे बाकी असुन चालु शैक्षणीक वर्ष -२०१५-१६ पासुन संगणकीय कार्यप्रणाली सर्व शैक्षणिक संकुलात सुरु होणे अपेक्षित आहे. |
| 33 | उत्सव विभाग | चालू आहे. |
| 34 | इंटीग्रेशन वुईथ एचएमएस | एचएमएस हि कार्यप्रणाली संस्थान (रुग्णालये) मार्फत नव्याने कार्यान्वीत केल्यानंतर, सदरची कार्यवाही करणे प्रस्तावीत होते. परंतु रुग्णालये विभागामार्फत नविन संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यास विलंब होत असल्याने, साईबाबा हॉस्पिटल मध्ये सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या कार्यप्रणालीतील उपलब्ध माहिती साईटेक प्रकल्पातील एमआयएस या कार्यप्रणालीत वापरणेची कार्यवाही हाती घेण्यात आलेली असुन त्याबाबतची कार्यवाही कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत सुरु आहे. |
| 35 | ओल्ड डेटा मायग्रेशन | पुर्ण झालेले आहे. |
| 36 | Proxy & Email integration/setup | पुर्ण झालेले आहे. |
| 37 | रेकॉर्ड विभाग | चालू आहे. |
| 38 | दर्शन पास-2 | संगणकीय कार्यप्रणालीचे प्रात्यक्षीक कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे उपस्थितीत सर्व संबधीत विभागांना दाखविलेले आहे.<br>कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यासाठीची आवश्यक तो निर्णय संस्थानमार्फत झालेनंतर कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे हे सदरची कार्यप्रणाली कार्यान्वीत करुन देणार आहे. |
| 39 | ऑनलाईन सर्व्हिसेस | चालू आहे.<br>मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार सदर कार्यप्रणालीमध्ये वेळोवेळी साईभक्तांसाठी वेगवेगळी माहिती प्रकाशीत करण्याची सुविधा कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी कार्यान्वीत केलेली आहे.<br>सदरच्या कार्यप्रणालीचा आजपोवतो ३७,५७,६१७ श्री साईभक्तांनी लाभ घेतलेला असून ८५,१५,३६,७०२/- रु. इतकी रक्कम संस्थानचे खाती ऑनलाईन सुविधेव्दारे जमा झालेली आहे. |
| 40 | माहिती सुविधा केंद्र | साईटेक प्रकल्पाअंतर्गत मुंबई, बैंगलोर, चेन्नई व सिकंदराबाद येथे श्रीसाईभक्तांसाठी देणगी, दर्शन/आरती, रुम रिझर्वेशन, पुस्तक विक्री, साईलीला व भक्त मंडळ सभासद ह्या संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेल्या आहेत. सदर संगणकीय कार्यप्रणालींचा आजपोवतो १,५५,९४० श्रीसाईभक्तांनी लाभ घेतलेला आहे. |
| 41 | वाहन विभाग, देणगी काऊंटर व साईनाथ रुग्णालय येथील UPS Battery बाबत. | माहे जानेवारी २०१५ पासुन या ठिकाणी UPS Battery बंद आहेत. |
| 42 | प्रिंटर्स बाबत | माहे जानेवारी २०१५ पासुन SOW प्रमाणे Printer पुरविलेले नाही. डिसेंबर २०१४ मध्ये १० नग Thermal Printer विना वापर पडून आहेत.या प्रिंटरच्या बदल्यात १० नग लेझर प्रिंटर ची मागणी केली आहे.परंतु CTS ने अदयाप कोणतीही कार्यवाही केली नाही. |

सद्यस्थितीत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे माहे मार्च-२०१४ ते डिसेंबर-२०१४ पर्यंतचे बीले इकडील विभागास प्राप्त झालेले असून त्याचा सविस्तर तपशील पुढीलप्रमाणे आहे --

| Month | Invoice No & In. Date | Description | Net Amount |
|---|---|---|---|
| March 2014 | IN214-0000002871 IN214-0000000861 26/04/2014 | Service rendered for the month of March 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| April 2014 | IN214-0000002900 IN214-0000000861 26/05/2014 | Service rendered for the month of April 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| May 2014 | IN214-0000002980 IN214-0000000861 06/09/2014 | Service rendered for the month of May 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| June 2014 | IN214-0000003078 IN214-0000000861 29/07/2014 | Service rendered for the month of June 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| July 2014 | IN214-0000003141 IN214-0000000861 29/08/2014 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| August 2014 | IN214-0000003203 IN214-0000000861 12/09/2014 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| September 2014 | IN214-0000003232 IN214-0000000861 27/10/2014 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| October 2014 | IN214-0000003290 IN214-0000000861 08/11/2014 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| November 2014 | IN214-0000003324 IN214-0000000861 20/12/2014 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| December 2014 | IN214-0000003464 IN214-0000000861 17/01/2015 | Service rendered for the month of July 2014 | 21,24,702.88 |
| | | Installment advice for Hardware supplied | 6,53,667.16 |
| | | **Total Amount** | **27,78,370.04** |
| | | **Grand Total** | **2,77,83,700.4** |
| | | **20% amount of Grand Total** | **55,56,740.08** |
| | | **Total** | **2,22,26,960.32** |

**मागणी:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ९५ अन्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत प्राप्त झालेले आयटी कमिटी अध्यक्ष, सदस्य व तांत्रिक सल्लागार यांचे प्रास्तावितेत नमुद केलेप्रमाणे अभिप्राय इकडील विभागास ई-मेलव्दारे प्राप्त झालेले आहेत. तसेच साईटेक प्रकल्पाअंतर्गत विविध विभागांमध्ये कार्यान्वीत करण्यात आलेल्या कार्यप्रणालींची सद्यस्थिती प्रास्तावितेत दर्शविलेप्रमाणे आहे.

तरी मा.व्यवस्थापन समितीचे संदर्भीय निर्देशानुसार आयटी कमिटी अध्यक्ष, सदस्य व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेकामी तसेच महाराष्ट्र शासनाचे आयटी विभागाचे प्रतिनिधींचे दि. ०७/०५/२०१५ रोजीचे ई-मेलवरील अभिप्रायाचा विचार करता मार्च-२०१४ ते डिसेंबर-२०१४ पर्यंतचे एकुण बील रक्कम रुपये 2,77,83,700.4 मधुन कार्यप्रणालीतील प्रास्ताविकेतील नमुद केलेल्या त्रुटींचे निरसन होईपर्यंत २०% रक्कम रुपये 55,56,740.08 राखीव ठेवुन उर्वरीत रक्कम रुपये 2,22,26,960/- मात्र अदा करणेकामी प्रस्ताव निर्णयार्थ मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** मा.व्यवस्थापन समितीचे दि. १२/०३/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ९५ अन्वये कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे पेमेंटबाबत प्राप्त झालेले आयटी कमिटी अध्यक्ष, सदस्य व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय व कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनीधींना चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेकामी तसेच महाराष्ट्र शासनाचे आयटी विभागाचे प्रतिनिधींचे दि. ०७/०५/२०१५ रोजीचे ई-मेलवरील अभिप्रायाचा विचार करता मार्च-२०१४ ते डिसेंबर-२०१४ पर्यंतचे एकुण बील रक्कम रुपये 2,77,83,700.4 मधुन कार्यप्रणालीतील प्रास्ताविकेतील नमुद केलेल्या त्रुटींचे निरसन होईपर्यंत २०% रक्कम रुपये 55,56,740.08 राखीव ठेवून उर्वरीत रक्कम रुपये 2,22,26,960/- मात्र अदा करणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.३३० **उपरोक्त प्रस्तावावर व तज्ञांनी दिलेल्या अभिप्रायावर सविस्तर चर्चा होऊन, कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे मार्च २०१४ ते डिसेंबर २०१४ या कालावधीतील बीलातून २०% रक्कम राखीव ठेवणेत येऊन उर्वरित रक्कम त्यांना अदा करणेसाठी संस्थान वकिलामार्फत सविस्तर बाबी नमूद करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी अर्ज सादर करणेत यावा.**

**तसेच प्रास्ताविकेमध्ये नमुद केलेल्या त्रुटींचे निरसण करण्यास किती कालावधी आवश्यक आहे, याबाबत कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना विचारणा करण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.१२ **श्रींचे ऑनलाईन D2H (डिश), टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील दर्शन सुविधेकामी फेर ई-निविदा मागविणेकामी मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 21 (1) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे, यानुसार श्री साईभक्तांना त्यांचे घरी बसून दररोज श्रींचे दर्शनाचा लाभ मिळावा या हेतूने सदर सुविधा सुरु करण्यात आलेली आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:** 1) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 07/02/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.82. 2) मा.व्यवस्थापन समितीचे दि. 27/07/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.584. 3) मा.व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 710 व 711. 4) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 13/02/2011 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 57, 5) मा. व्यवस्थापन समितीचे दि. 05/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं. 399.

प्रस्ताविक: "अ"- Setup Box (डीश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांचे सुविधेबाबत:- मा.व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णयानुसार डी टी एच टि व्ही व्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांचे तिन वर्षासाठीचे दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच त्यांच्या या सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा, यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार त्यांना दिनांक 01/01/2014 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला असुन सदर कंपनीची सेवा व त्याकामी मिळणारी रॉयल्टी/ देणगी रक्कम संस्थानला कंपनीमार्फत मिळत आहे. सदर कंपनीबाबत करावयाच्या करारनाम्याची कार्यवाही विधी विभागामार्फत सुरु आहे. परंतु दि. 12/05/2015 रोजी संबधीत विषयी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दिलेल्या सुचनेनुसार ऑनलाईन प्रसाद विक्री बाबतचा स्कोप वगळता याकामी संस्थानचे विहित पध्दतीने पुनश्च निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन निविदा प्रक्रियेत फक्त Exclusive दर हे All Over India करीता मागविण्यात यावे, असे चर्चेअंती सुचविले आहे. तसेच सदर निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा.

**"ब"- TV चॅनेलव्दारे लाईव्ह आरती सुविधेबाबत:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.08/10/2013 रोजीचे सभेतील निर्णयानुसार TV चॅनेलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधा पुरविणेकामी Associated broadcasting Co. Pvt. Ltd. (TV-9) यांचे तिन वर्षासाठीचे दर स्विकारण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. तसेच त्यांच्या या सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा, यासाठी येणाऱ्या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार त्यांना दिनांक 01/01/2014 अन्वये कार्यादेश देण्यात आलेला असुन सदर कंपनीची सेवा व त्याकामी मिळणारी रॉयल्टी/ देणगी रक्कम संस्थानला कंपनीमार्फत मिळत आहे.

मा.मुख्यलेखाधिकारी सो., यांनी सुचविलेनुसार व मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार TV चॅनेलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधा व आरती दाखविणेबाबत नविन फेर निविदा तयार करुन याबाबत दर निश्चित करता येतील. सदर कालावधीत श्री साईभक्तांची गैरसोय होणार नाही या उद्देशाने पुर्वीच्या कार्यादेशानुसार Associated broadcasting Co. Pvt. Ltd. (TV-9) यांचेकडुन सेवा सुरु ठेवता येईल. तसेच Associated broadcasting Co. Pvt. Ltd. (TV-9) यांचेशी अद्याप करारनामा करण्यात आलेला नसुन त्यांना देण्यात आलेला कार्यादेश रद्द करुन याकामी नविन निविदा काढण्यात यावी किंवा कसे? याबाबत विधी विभागाचा तसेच ॲड. प्रशांत माळी Cyber Expert / Consultant यांचा कायदेशीर सल्ला घेणे अपेक्षित राहील. त्यानुसार दि.12/03/2015 रोजीचे पत्राने ॲड. प्रशांत माळी Cyber Expert / Consultant यांचा कायदेशीर सल्ला घेणेबाबत त्यांना पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. परंतु दि. 12/05/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दिलेल्या सुचनेनुसार याकामी संस्थानचे विहित पध्दतीने पुनश्च निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन निविदा प्रक्रियेत फक्त Exclusive दर हे All Over India करीता मागविण्यात यावे, असे चर्चेअंती सुचविले आहे. तसेच सदर निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा.

**"क"- मोबाईलवरील ऑनलाईन दर्शन:-** मोबाईलवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु दि. 12/05/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दिलेल्या सुचनेनुसार याकामी संस्थानचे विहित पध्दतीने पुनश्च निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन निविदा प्रक्रियेत फक्त Exclusive दर हे All Over India करीता मागविण्यात यावे, असे चर्चेअंती सुचविले आहे. तसेच सदर निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदा तज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा.

**"ड"- वेबसाईटवरील ऑनलाईन दर्शन:-** वेबसाईटवरील लाईव्ह दर्शन सुविधेकामी दि. 05/02/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये संस्थानचे विहित पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु दि. 12/05/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांनी दिलेल्या सुचनेनुसार याकामी संस्थानचे विहित पध्दतीने पुनश्च निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येऊन निविदा प्रक्रियेत फक्त Exclusive दर हे All Over India करीता मागविण्यात यावे, असे चर्चेअंती सुचविले आहे. तसेच सदर निविदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचे मार्गदर्शनानुसार तयार करण्यात यावी व सदरची निविदेतील कायदेशीर बाबी विधी विभाग तसेच आर्थिक बाबी लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात येऊन सदर सेवेबाबतचा करारनाम्याचा मसुदातज्ञ कायदेशीर सल्लागाराकडुन तयार करुन घेण्यात यावा.

उपरोक्त प्रास्ताविकेतील "अ", "ब", "क" व "ड" मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेपुर्वी सदरकामी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी प्रस्ताव दि. 14/05/2015 रोजी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे मान्यता घेणेकामी सादर करण्यात आला होता तसेच सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या Setup Box (डीश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांची मुदत दि. 13/11/2016 रोजी व TV चॅनेलव्दारे लाईव्ह आरती सुविधेबाबत Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV-9) यांची मुदत दि. 31/08/2016 रोजी संपुष्टात येत असल्याने सदर प्रस्तावावर संस्थान नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु होणे नितांत गरजेचे आहे अन्यथा विहित वेळेत प्रक्रिया पुर्ण न झाल्यास श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा तसेच TV चॅनेलव्दारे लाईव्ह आरती सुविधा विस्कळीत होण्याची शक्यता असल्याने सदरहु विषयाची नोंद घेणेकामी प्रस्ताव अवलोकनार्थ दि. 20/07/2015 रोजी सादर करण्यात आला होता.

परंतु दि. 14/05/2015 रोजीचे प्रस्तावावर मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचेशी दि. 29/07/2015 समक्ष झालेल्या चर्चानुसार व त्यांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे:- "चर्चा झाल्याप्रमाणे "अ" व "ब" प्रकरणी राबविण्यात आलेल्या निविदा पध्दतीतील त्रुटीबाबतच्या उल्लेखासह टिपणी तयार करुन करारनाम्याच्या सल्लागाराकडुन तयार करण्यात आलेला मसुदा मान्यतेच्या निमीत्ताने एकत्रित प्रस्ताव व्यवस्थापन समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा."

त्यानुसार "अ" व "ब" ( Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी) प्राप्त झालेल्या निविंदा व त्याबाबतचे झालेल्या कार्यवाहीबाबत मुद्दे खालील प्रमाणे.

1. सदर प्रस्तावास मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात आली होती काय ?

==> दि.08/10/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं. 710 व 711 नुसार कार्यवाही करण्यात आलेली असुन याकामी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात आली नसल्याचे दिसुन येत आहे.

2. विषयांकीत प्रकरणी ई-निविदा प्रक्रिया करणेत आली होती का ?

==> सदरकामी Tata Communications Ltd., Mumbai याचेशी दि. 11/08/2015 रोजीचे दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता त्यांनी दि. 17/06/2013 ते दि. 24/06/2013 या कालावधीतील निविदा प्रत ई-मेलव्दारे पाठविली आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि. 07/02/2013 व दि. 26/07/2013 रोजी ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु होऊन दि. 27/11/2013 रोजीचे परिपत्रकान्वये ई-निविदा कार्यवाहीबाबत सर्व संबधीत विभागांना कळविण्यात आले

आहे. परंतु सदर परिपत्रकाच्या पुर्वीच Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी निविदा प्रक्रियेव्दारे कार्यवाही झाल्याने याबाबत ई-निविदा प्रक्रिया करणेत आलेली नसल्याचे दिसुन येत आहे.

3. दि. 08/10/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समिती समोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील टिपणीवर लेखापरिक्षक श्री बोरावके यांनी पुढीलप्रमाणे दिलेला अभिप्राय हा आपण व्यवस्थापन समितीचे निदर्शनास आणुन दिला आहे काय ? (लेखापरिक्षक श्री बोरावके यांचा अभिप्राय-आयटी विभागाने केलेल्या नियमानुसार तीन निवादा प्राप्त होणे आवश्यक होते असे नमुद केले आहे. प्रत्यक्षात एकच निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामुळे या नियमामुळे सदर निविदा नाकारणे हा संपुर्ण अधिकार व्यवस्थापनास आहे असे वाटते, त्यामुळे या बाबतीत व्यवस्थापनाचे निर्णय घेणे उचित होईल.)

==> दि.08/10/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं. 710 व 711 नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

4. Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामीचा निविदा मसुदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचेकडुन तपासुन घेण्यात आला होता काय?

==> Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामीचा निविदा मसुदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार यांचेकडुन तपासुन घेण्यात आला नसल्याचे दिसुन येत आहे.

5. Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी एकच निविदा अंतिम करणेबाबत तत्कालीन व्यवस्थापन समितीने आपणास सुचविले अथवा निर्देश दिले होते काय ?

==> दि.08/10/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं. 710 व 711 नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

6. Tata DTH व (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी ज्या वर्तमानपत्रात (DND Classification, Mumbai व THE FREE PRESS JOURNAL,MUMBAI) जाहिरात देण्यात आली होती असे मा. व्यवस्थापन समितीचे दि. 08/10/2013 रोजीचे प्रस्तावात नमुद करण्यात आले आहे.

==> Tata DTH वा (TV-9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता न घेता दि.08/10/2013 रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय क्रं. 710 व 711 नुसार कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे दिसुन येत आहे.

"अ" व "ब" बाबत (Tata DTH व (TV9) चॅनलव्दारे लाईव्ह दर्शन सुविधेकामी) करावयाचा करारनाम्याचा निविदा मसुदा संस्थानचे तांत्रिक सल्लागार श्री विजय नायडु यांचेकडुन तसेच संस्थानचे विधी विभाग व लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात आले असुन सदर मसुद्यासह सर्व संबधीत फाईल्स मुळ कागदपत्रांसह मा. मुख्यलेखाधीकारी सो., लेखाशाखा विभाग यांचेकडे संदर्भ क्रं. 05 चे पत्रान्वये त्यांनी मागणी केलेनुसार त्यांचेकडे पाठविण्यात आल्या आहे.

**मागणी:** सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेल्या Setup Box (डीश) वरील श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधेकामी Tata Communications Ltd., Mumbai यांची मुदत दि. 13/11/2016 रोजी व TV चॅनेलव्दारे लाईव्ह आरती सुविधेबाबत Associated broadcasting Co. Pvt. Ltd., (TV9) यांची मुदत दि. 31/08/2016 रोजी संपुष्टात येत आहे. तरी सदर प्रस्तावावर संस्थान नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु होणे नितांत गरजेचे आहे अन्यथा विहित वेळेत प्रक्रिया पुर्ण न झाल्यास श्रींचे ऑनलाईन दर्शन-तथा-आरती सुविधा तसेच TV चॅनेलव्दारे लाईव्ह आरती सुविधा विस्कळीत होण्याची शक्यता आहे.

तरी, उपरोक्त प्रास्ताविकेतील "अ", "ब", "क" व "ड" मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने करणेपुर्वी सदरकामी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** आर्थिक, तांत्रिक व कायदेशीर.

**विभागाचा अभिप्राय:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे "अ", "ब", "क" व "ड" चे प्रस्तावावर कार्यवाही संस्थानचे विहित पध्दतीने करणेपुर्वी सदरकामी प्रथम मुंबई हायकोर्टाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्रं.३३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन D2H (डिश), टिव्ही चॅनेल, वेबसाईट व मोबाईल वरील दर्शन सुविधा पुरविणेकामी फेर ई-निविदा मागविणेसाठी संस्थान वकिलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये अर्ज सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१३ **मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना CAMC कॉन्ट्रॅक्ट देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समिती सभा दि.18/10/2008 चे सभेतील विषय नं.36, निर्णय क्र.793 समाधी मंदिर व परीसरात सुरक्षिततेच्या दृष्टिने करावयाच्या विविध उपाय योजना व आत्याधुनिक सुरक्षा साहीत्यांचे खरेदीस व त्याकामी येणारे रुपये- 4.5 कोटीचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.03/06/2010 रोजीचे सभेतील निर्णय क्र.283 नुसार मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांची सुरक्षा साहीत्य पुरविणेबाबत निवड झालेली आहे. मा.व्यवस्थापन समितीचे

दि.04/07/2010 चे सभेतील निर्णय क्र.584 नुसार सदरील सुरक्षा साहीत्यांचा दर्जा, गुणवत्ता, पुरवठा आदेशानुसार तपासुन, साहीत्यांची देखरेख व सुपरव्हीजन करण्यासाठी पुढील 5 वर्षांसाठी मे.ट्रायकलर कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. जा.क्र.एसएसएस/वशी-संरक्षण/5958/2010 दि.14/04/2010 ने मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांना सुरक्षा साहीत्य पुरविणे व इन्स्टॉलेशन करुन देणेकामी वर्कऑर्डर दिलेली आहे. तसेच मे.व्हेंन्टेज कंपनी, नॉईडा यांनी दि.04/09/2013 चे पत्रान्वये पुढील कालावधीकरीता सर्व्हीस कॉन्ट्रक्ट मिळणेकामी पत्र दिलेले होते.

वर्कऑर्डरमधिल मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांनी पुरवठा करुन कार्यान्वीत केलेल्या सुरक्षा साहीत्यांपैकी Annexure-A तपशीलाप्रमाणे साहीत्यांची Comprehensive AMC देणे आवश्यक आहे. First Work Order मधिल रक्कम रुपये- 3,27,33,082/- मात्र व Second work Order मधिल रक्कम रुपये- 25,10,495/- असे एकुण- 3,52,43,577/- मात्र इतकी होती.

तसेच Annexure-B सुरक्षा साहीत्य कार्यान्वीत करणेकामी केलेले फर्निचर, इन्स्टॉलेशन व कमिशनिंग, मॅनेजमेंट खर्च, सिक्युरीटी इक्वीपमेंन्टस गायडन्स खर्च, ट्रेनिंग व हॅन्डओव्हर, इंजिनिअर पगार, सर्व्हीस टॅक्स, व्हीडीओ लायसन्स, सॉफटवेअर इत्यादी करीता झालेला खर्च Comprehensive AMC मध्ये येत नाही. Annexure-A च्या तपशीलाप्रमाणे First Work Order मधिल रक्कम रुपये- 56,91,600/- मात्र व Second work Order मधिल रक्कम रुपये- 22,66,000/- असे एकुण रुपये- 79,57,600/- मात्र इतकी होती.

मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांना वर्कऑर्डर देतांना वर्कऑर्डरमधिल मुद्दा क्र.56 नुसार प्रोजेक्ट पुर्ण झाल्यानंतर व्हेंन्टेज यांचेकडुन 1 क्वॉलीफाईड इंजिनिअर व त्यांचे सोबतीला 4 टेक्नीकल व्यक्ती 2 वर्षांकरीता साईडवर मेन्टेनंन्सचे काम करण्याकरीता पुरविणेबाबत ठरलेले होते. त्याकामी मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांना दोन वर्षांकरीता रक्कम रुपये- 28,25,976/- सर्व करांसह देण्याचे ठरलेले होते.

तसेच मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी,नॉईडा व संस्थानमध्ये झालेल्या कराराचे मुद्दा क्र.12 नुसार प्रोजेक्ट पुर्ण झालेचे तारखेपासुन दोन वर्षांकरीता सुरक्षा साहीत्यांची गॅरंटी/वॉरंटी देण्यात आलेली आहे. व्हेंन्टेज यांनी प्रोजेक्ट पुर्ण व कार्यान्वीत करुन दि.10/10/2011 रोजी संस्थानकडे हस्तांतरीत केलेला आहे. दि.10/10/2011 पासुन दोन वर्षांकरीता मे.व्हेंन्टेज यांना दोन वर्षांचा गॅरंटी/वॉरंटीचा कार्यकाल हा दि.09/10/2013 रोजी संपुष्टात आला होता.त्यास अनुसरुन मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स,नॉईडा यांनी संदर्भ क्र.1 चे पत्रान्वये पुढील वर्षांसाठी Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मिळणेबाबत विनंती केलेली आहे. सुरक्षा साहीत्य उभारणी व दोन वर्षांचे दुरुस्ती/देखभालीचे काम मे.व्हेंन्टेज यांनी केलेले असल्यामुळे पुढील 1 वर्षांचे कालावधीसाठी त्यांना मेंन्टेनंन्सचे काम देणे योग्य राहील असे नम्र मत आहे. त्यासाठी मे.व्हेंन्टेज यांनी संदर्भ क्र. 01 नुसार पुढील एक वर्षांचे कालावधीसाठी दुरुस्ती/ देखभाल तसेच एका इंजिनिअरसाठी वार्षिक वेतन खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

**(अ)** Comprehensive Annual Maintenance Contract (AMC) मिळणेबाबत व्हेंन्टेज यांचे मागणीप्रमाणे AMC कॉन्ट्रक्ट देणे झाल्यास पुढील तीन वर्षासाठी खालील तपशीलाप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| **अ.नं.** | **तपशील** | **रक्कम** |
|---|---|---|
| 01. | एकुण प्रोजेक्ट किंमत | 4,50,01,177.00 |
| 02. | AMC न देण्याच्या सुरक्षा साहीत्यांची किंमत | 79,57,600.00 |
| 03. | AMC देण्याच्या सुरक्षा साहीत्यांची किंमत | 3,70,43,577.00 |
| 04. | **प्रोजेक्ट किंमतीच्या १३.५० % (दुसरे वर्ष)** | **5000882.895** |
| 05. | प्रोजेक्ट किंमतीच्या १४.५० % (तिसरे वर्ष) | 5371318.665 |
| 06. | प्रोजेक्ट किंमतीच्या १५.५० % (चौथे वर्ष) | 5741754.435 |
| | **एकुण देय रक्कम (४+५+६)** | **1,61,13,955.995** |
| | **एकुण पुर्णांकीत देय रक्कम** | **1,61,13,956.00** |

**(ब)** एक इंजिनिअरकरीता एका वर्षासाठी रुपये- 3,50,000/- + टॅक्स असे एकुण रुपये- 3,96,260/-+ टॅक्स खर्च येणार आहे. मेन्टेनंन्सचे कामाकरीता असे दोन इंजिनिअर घेणे झाल्यास एक वर्षाकरीता रुपये- 7,86,520/- + टॅक्स मात्र खर्च येणार आहे.

त्यास अनुसरुन दि.04/04/2015 रोजी मे.ऑप्टीमिस्टीक, कन्सल्टंन्ट, अहमदनगर यांचा अहवाल मागविणेत आलेला असुन, त्यात त्यांनी **(अ)** मे.व्हेंन्टेज यांना देण्यात आलेल्या पहील्या व दुस-या टप्प्यातील वर्कऑर्डरमधिल साहीत्यांचा AMC बाबत अहवाल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Proposal Considered After Assorted Components For AMC | | | | | | | |
| | | | 10 Oct 2013 to 9 Oct 2014 | **10 Oct 2014 to 9 Oct 2015** | 10 Oct 2015 to 9 Oct 2016 | 10 Oct 2016 To 9 Oct 2017 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S N | Description Of PO | Amount | First Year | **Second Year** | Third Year | Fourth Year | Total |
| | | | 12.50 % | **13.50 %** | 14.50 % | 15.50 % | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | First Work Order | 3,27,33,082/- | 40,91,635.25/- | **44,18,966.07/-** | 47,46,296.89/- | 50,73,627.71/- | 1,83,30,525.9/- |
| 2 | Second Work Order | 25,10,495/- | 3,13,811.875/- | **3,38,916.825/-** | 3,64,021.775/- | 3,89,126.725/- | 14,05,877.2/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | **1,97,36,403.1/** |

**ब)** त्याचप्रमाणे कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टिने कॅमेरे बसविण्यात आलेले होते. सदर कॅमेरे हे उपरोक्त First Work Order व Second Work Order मधील नसुन त्याबाबतची स्वतंत्र मंजुरी घेण्यात येऊन कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. तथापी, सदर कॅमे-यांची मुदत 4 एप्रिल 2015 मध्ये संपुष्टात येत आहे. त्यामुळे मे.व्हेंन्टेज यांना एक वर्षासाठी (दि.04 एप्रिल 2015 ते 3 एप्रिल 2016 अखेर) सदर कॅमे-यांची Comprehensive AMC देण्याची झाल्यास त्याकरीता खर्च रक्कम रुपये- 1,41,393/- (अक्षरी- एक लाख एक्केचाळीस हजार तिनशे त्र्यान्नव रुपये मात्र ) खर्च येणार आहे.त्याबाबतचा Comprehensive AMC अहवाल पुढील प्रमाणे:-

| Proposal Considered After Assorted Components For AMC | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 4 April 2014 to 3 April 2015 | **4 April 2015 to 3 April 2016** | 4 April 2016 to 3 April 2017 | 4 April 2017 to 3 April 2018 | |
| AMC Percentage | | | | | | | |
| S.N | Description Of PO | Amount | First Year | **Second Year** | Third Year | Fourth Year | Total |
| | | | 12.50% | **13.50%** | 14.50% | 15.50% | |
| 1 | Kapad Koti | 1,03,475/- | 12,934.375/- | **13,969.125/-** | 15,003.875/- | 16,038.625/- | 57,946/- |
| 2 | Account Departments | 9,43,883/- | 1,17,985.375/- | **1,27,424.205/-** | 1,36,863.035/- | 1,46,301.865/- | 5,28,574.48/- |
| | | | | **Total Comprehensive AMC Cost** | | | **5,86,520.48/-** |

**(क)** मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी,नॉईडा यांनी Comprehensive AMC ची मंजुरी मिळालेनंतरचे कालावधीसाठी मेन्टेनंन्स कामाकरीता एक इंजिनिअर करीता एका वर्षासाठी रुपये- 3,50,000/- + टॅक्स खर्च येणार आहे. अशाप्रकारे मेन्टेनंन्सचे कामाकरीता असे दोन इंजिनिअर घेणे झाल्यास, एक वर्षाकरीता रुपये- 7,00,000/- + टॅक्स मात्र खर्च येणार आहे.

यावर ऑप्टीमिस्टीक,अहमदनगर यांनी असे सुचित केले आहे की, पहील्या टप्प्यातील वर्कऑर्डरचे अ.नं.56 नुसार एक इंजिनिअर व 4 तांत्रिक कर्मचारी आवश्यक होते. परंतु आता Comprehensive AMC 4 वर्षांचे कालावधीत मेन्टेनंन्स कामाकरीता फक्त 2 इंजिनिअरची आवश्यकता असलेबाबत व त्यांचे मासिक वेतनाबाबत संस्थानचे मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन योग्य ते 2 इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय घेण्यात यावा. असे नमुद केलेले आहे. मे.ऑप्टीमिस्टीक,अहमदनगर यांनी सादर केलेले आहवालानुसार-

उपरोक्त **अ** तक्त्यात पहील्या व दुस-या वर्कऑर्डरमधिल सुरक्षा साहीत्यांची वॉरंटी कालावधी दि.09/10/2013 रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार एक वर्षाकरीता सदर सुरक्षा साहीत्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी,नॉईडा यांना देणे झाल्यास एका वर्षाकरीता (दि.10/10/2014 ते दि.09/10/2015 अखेर) रक्कम रुपये- 50,00,882/- (अक्षरी- पन्नास लाख आठशे ब्याऐंशी रुपये मात्र) खर्च येणार आहे.

उपरोक्त **ब** तक्त्यात कापडकोठी, लेखाशाखेमध्ये सदर कॅमेरे व त्यास लागणारे अनुषंगिक साहीत्यांची वॉरंटी कालावधी 3 एप्रिल 2014 मध्ये संपुष्टात येणार आहे. सदरील कॅमेरे व तदअनुषंगिक साहीत्यांची Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांना देणे झाल्यास तीन वर्षाकरीता (दि.04/04/2015 ते दि.03/04/2016 अखेर) रक्कम रुपये- 1,41,393/- (अक्षरी- एक लाख एक्केचाळीस हजार तिनशे त्र्यान्नव रुपये मात्र ) खर्च येणार आहे.

उपरोक्त **क** तक्त्यात नमुद केलेप्रमाणे साहीत्यांची 3 वर्षाचे Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट कालावधीत मेन्टेनंन्स कामाकरीता फक्त 2 इंजिनिअरचे मासिक वेतनाबाबत संस्थानने मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी,नॉईडा यांचे समवेत चर्चा व वेतनाबाबतची वाटाघाटी करुन Comprehensive AMC चे कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखेपासुन ते पुढील एक वर्षाकरीता 2 इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेस विनंती.

**अ** आणि **ब** प्रमाणे मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन कंपनी, नॉईडा यांना 1 वर्षाकरीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट देणे झाल्यास-

(अ) प्रमाणे रुपये- **50,00,882/-** (अक्षरी- पन्नास लाख आठशे ब्याऐंशी रुपये मात्र)

(ब) प्रमाणे रुपये- **1,41,393/-** (अक्षरी- एक लाख एक्केचाळीस हजार तिनशे त्र्यान्नव रुपये मात्र) असे **अ** व **ब** करीता Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्टकरीता एकुण खर्च रक्कम रुपये- 51,42,275/- (अक्षरी- एक्कावन्न लाख

बेचाळीस हजार दोनशे पच्याहत्तर रुपये मात्र) खर्च येणार आहे. तसेच क प्रमाणे Comprehensive AMC कॉन्ट्रॅक्ट मंजुर तारखेपासुन ते पुढील 1 वर्षांकरीता 2 इंजिनिअरचे मासिक वेतन निश्चित करुन निर्णय होणेकामी मे.व्हेंन्टेज यांचे प्रतिनिधी समवेत चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय होणेस विनंती. त्याचप्रमाणे सदरचा विषय मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर करणेस व येणा-या खर्चास मान्यता मिळणेच्या आदेशास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.६३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर व परिसरातील सुरक्षा साहित्यांचे CAMC कॉन्ट्रॅक्ट मे.व्हेन्टेज इंटीग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन, नोएडा यांना देणेऐवजी याकामी नवीन ई-निविदांची मागणी करणेत यावी. त्यासाठी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

विषय नं.१४ **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं.१ व २) निवासस्थानात साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत.**

प्रस्ताव- साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं.१ व २) निवासस्थानांत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे मार्फत साईभक्तांना गरमपाणी रुमपर्यंत पुरविण्यात येत आहे. श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना साईप्रसाद नं.१ व २ या इमारतीमध्ये दि.०९/१२/२०१४ ते दि.०८/१२/२०१५ या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/शर्तीवर गरम पाणी पुरवठा करणेकामी खालीलप्रमाणे दरानुसार मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

| अ.नं. | इमारतीचे नाव | भक्तांकडून आकारावयाचे प्रती बादली दर रुपये | संस्थानला प्राप्त होणारी पाणी पट्टी प्रती बादली रुपये | सोसायटीस प्राप्त होणारी प्रती बादली रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद नं. १ व २ | रुपये ३/- | रुपये १/- | रुपये २/- |

मा.त्रिसदस्य समितीचे दि.०९/१२/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. १०२८ अन्वये वरीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना दि.०९/१२/२०१४ ते दि.०८/१२/२०१५ अखेर १२ महिने कालावधीसाठी इकडील जा.क्र. एसएसएस/ मालमत्ता/६०५५/२०१५ दि.१०/०३/२०१५ अन्वये पुर्वीचेच अटी/शर्तीवर गरम पाणी पुरवठा करणेकामी प्रस्तावित दरानुसार मुदतवाढीचा आदेश देण्यात आलेला असून त्यांचेकडून करारनामा करुन घेण्यात आलेला आहे. त्याची मुदत दि.०८/१२/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांनी जा.नं. श्रीसासंएक्रेसो/११०/२०१५ दि.१८/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी आपले संस्थानचे साईप्रसाद नं.१ व २ येथे चालवत असलेल्या गरम पाणी पुरवठा करणेची मुदत दि.०८/१२/२०१५ रोजी पुर्ण होत असल्याने साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर व्यवसायास संस्थेस पुढील पाच वर्षाकरीता चालविण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केलेली आहे.

**संस्थानचा अधिनियम २००४ मधील कलम १७(३) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.**

"विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही."

तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२०५६/२०१२ पी.आय.एल.नं. १८/२०११ मध्ये दि.१६ आक्टोबर,२०१२ रोजी समितीला पुढील प्रमाणे आदेश दिले आहे.

(6) We direct that, without prior permission of this court, the Committee-

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust:

असा असून त्यात मा. कोर्टाच्या परवानगीशिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदर्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलू नये असा आदेश झालेला आहे.

तसेच सिव्हील ॲप्लीकेशन नं.३६८६/२०१४ अन्वये मा. उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे खालील प्रमाणे आदेशान्वये लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर व्यवसाय चालविणेस देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

By application (No.3686/2014), the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Sai Baba on leave and licence upon execution of leave and licence agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.

वरील बाबी विचारात घेता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.१८/०७/ रोजीचे पत्रास अनुसरुन सोसायटीस साईप्रसाद नं.१ व २ या इमारतीमध्ये दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर खालीलप्रमाणे गरमपाणी पुरवठा करणेकामी आकारावयाचे दरानुसार मुदतवाढ देता येईल.

| अ.नं. | इमारतीचे नाव | भक्तांकडून आकारावयाचे प्रती बादली दर रुपये | संस्थानला प्राप्त होणारी पाणी पट्टी प्रती बादली रुपये | सोसायटीस प्राप्त होणारी प्रती बादली रु. |
|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद नं. १ व २ | रुपये ३/- | रुपये १/- | रुपये २/- |

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना साईप्रसाद नं.१ व २ या इमारतीमध्ये दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर उपरोक्तप्रमाणे आकारावयाचे दरानुसार गरमपाणी पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांना साईप्रसाद निवासस्थान विभाग (नं.१ व २) इमारतीमध्ये दि.०९/१२/२०१५ ते दि.०८/१२/२०१६ या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचेच अटी/ शर्तीवर प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आकारावयाचे दरानुसार गरमपाणी पुरवठा करणेकामी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच याकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१५ **युनियन बॅंक ऑफ इंडिया,शाखा शिर्डी या बॅंकेच्या ATM कक्षासाठी दिलेल्या जागेच्या करारनाम्याचे सन २०१५-१६ या वर्षासाठी नुतनीकरण करणेबाबत.**

प्रस्ताव- युनियन बॅंक ऑफ इंडीया,शाखा शिर्डी यांना संस्थान मालकीच्या साईनाथ छाया या इमारतीतील तळमजल्यावरील ३३.८७ स्क्वेअर फुट जागा ATM चे वापरासाठी मागील मासिक भाडे आकारामध्ये १०% वाढ करुन मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मुदतवाढ देण्यात येते.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४७ अन्वये मासिक भाडे रु.२३,३००/- आकारुन दि.०१/०४/२०१४ ते दि.३१/०३/२०१५ या कालावधीकरीता करारानुसार मासिक भाडे तत्वावर वापरास देण्यात आलेली आहे. त्याची मुदत दिनांक ३१/०३/२०१५ रोजी संपलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी विधी विभागाकडून युनियन बॅंकेस संस्थान मालकीच्या साईनाथ छाया या इमारतीतील जागा भाडे तत्वावर देणेबाबत मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन नं.३६८६/२०१४ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.०२/०५/२०१४ रोजीचे आदेशान्वये जागा वापरास देणेबाबत परवानगी दिलेली आहे.

युनियन बॅंक ऑफ इंडीया, शाखा शिर्डी यांनी दि.०१/०६/२०१५ रोजी मुदतवाढीबाबत पत्र दिलेले असून त्यामध्ये नमुद केले आहे की, मासिक भाडे रु.२३,३००/- या भाडे आकारावर पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात यावी. बाजारात दर पाच वर्षांनी १० ते १५ टक्के भाडे वाढ होत असते. बॅंकेला ATM वापरासाठी भाडे तत्वावर घेण्यात आलेल्या जागेसाठी रु.२४,०००/- पर्यंत मासिक भाडे देण्याचे अधिकार आहेत. तरी पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देणेकामी रु.२३,३००/- मासिक भाडे हे दर मान्य करण्यात यावे, अशी विनंती केलेली आहे.

तसेच दि.२५/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये बॅंकेस रु.२५,०००/- पर्यंत ATM चे भाडे अदा करणेचे अधिकार आहेत, त्यामुळे सन २०१५-१६ या वर्षाकरीता रु.२५,०००/- इतके भाडे आकारुन मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. तसेच साईनाथ छाया इमारतीऐवजी सदरहू ATM करीता संस्थानचे हॉस्पिटल, भक्तनिवास किंवा साईआश्रम या ठिकाणी जागा दिली तर साईभक्तांसाठी उपयुक्त ठरेल, असे उपरोक्त पत्राने कळविलेले आहे.

तरी युनियन बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांना दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देणेकामी खालील बाबींवर मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय होणेस विनंती आहे.

(१) मागील भाडे रु.२३,३००/- मध्ये १०% वाढ करुन रु.२५,६३०/- मासिक भाडेऐवजी रु.२५,०००/- मासिक भाडे व मिटर रिडींगप्रमाणे विदयुत आकार वेगळा आकारुन दि.०१/०४/२०१५ ते दि.३१/०३/२०१६ या कालावधीकरीता मुदतवाढ देणे.

(२) सदरहू ATM करीता संस्थानचे हॉस्पिटल, भक्तनिवास किंवा साईआश्रम यापैकी एका ठिकाणी जागा देणे.

निर्णय क्र.३३४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, युनियन बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी या बॅंकेच्या ATM कक्षासाठी दिलेल्या जागेस मागील भाडयामध्ये १०% वाढ करुन व मिटर रिडींगप्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारणेत येऊन, पुर्वीच्याच अटी/ शर्तीवर पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दि.०१.०४.२०१५ ते दि.३१.०३.२०१६ अखेर) मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच युनियन बॅंक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी यांनी सदरहू ATM साठी संस्थानच्या इतरत्र इमारतीमध्ये जागेची मागणी केलेली आहे. त्यांच्या मागणीचा विचार करता, साईआश्रम भक्तनिवास येथे जास्तीत जास्त साईभक्तांचा वावर असल्यामुळे सदरहू ठिकाणी त्यांना ATM साठी द्यावयाची जागा निश्चित करावी व ती जागा ATM च्या वापरासाठी देणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१६ **श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅंडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रक्ट सन २०१५-२०१६ साठी देणेबाबत हायकोर्टाची मान्यता घेणे व ई-टेडरची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सध्याचे सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टर मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना मागील दराप्रमाणे मुदतवाढ देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१).मंदिर परीसर,०२).साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३).श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर,०४). धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय,०५).श्री साई प्रसादालय,०६). साईआश्रम ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून वीजपुरवठा घेण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा पुरवठा काही कारणास्तव वेळोवेळी खंडीत होतो. मोठे दुरुस्तीचे कामे चालू असल्यास २४ तास देखील वीजपुरवठा खंडीत केला जातो. अशा काळात संस्थानचे कामकाज सुरळीत चालावे. गर्दीत अंधारात काही अनुचीत घटना घडू नये म्हणून पर्यायी वीजपुरवठयासाठी ठिकठिकाणी जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहे. हे सर्व जनरेटर सुस्थितीत कार्यान्वित असणे गरजेचे आहे. त्याकरीता यासर्व जनरेटरची काही ठरावीक कालावधीत इंजिन आईल, डिझेल फिल्टर, ऑईल फिल्टर, बायपास फिल्टर, कुलंट फिल्टर बदली करुन बी चेक सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. तसेच काही फॉल्ट झाल्यास तातडीने दुरुस्त करुन जनरेटर कार्यान्वित करणे गरजेचे असते. ऑईल फिल्टर व इतर मटेरीअल हे जनरेटर उत्पादक कंपनीचे वापरणे फायदेशिर असते. हे सर्व मटेरीअल आपल्याकडे उपलब्ध नसते. म्हणून जनरेटर इंजिनची सर्व्हिसिंग हे जनरेटर इंजिन उत्पादक कंपनीचे अधिकृत सर्व्हिस सेंटर यांचेकडून करुन घेणे गरजेचे असते.

त्यानुसार मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना दि.१-१०-२०१४ ते दि.३०-०९-२०१५ या कालावधीकरीता श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा संस्थान जा.नं.एसएसएस / विद्युत / ३१५८/ २०१४ दि.३०-०९-२०१४ अन्वये रक्कम रु.३३,००,०००/- मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता.मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस, नाशिक हे मे.कमिन्स यांचे अहमदनगर, नाशिक, जळगांव व औरंगाबाद जिल्ह्याकरीता

एकमेव कंपनी मान्यताप्राप्त अधिकृत सर्व्हीस सर्व्हिस डिलर आहेत. या सर्व्हिस-कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी उत्तमरित्या सर्व्हिस दिली असून सर्व जनसेट सुरळीत कार्यान्वित आहेत. आता या सर्व्हिस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दि.३०-०९-२०१५ रोजी संपत आहे. सदरील सर्व जनसेट नेहमी कार्यान्वित राहावे म्हणून वेळोवेळी सर्व्हिसिंग करणे गरजेचे असते. त्यामुळे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनरेटरसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणे गरजेचे आहे.

आता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीच्या ०१). मंदिर परीसर, ०२). साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम), ०३). श्री साईबाबा हॉस्पीटल + साईनगर, ०४). धर्मशाळा + श्री साईनाथ रुग्णालय, ०५). श्री साई प्रसादालय, ०६). साईआश्रम भाग, ०७). साई धर्मशाळा, ०८). पाणीपुरवठा साठवण तलाव, ०९). रथपालखी जनरेटर या वेगवेगळया परीसरातील जनरेटरसेटच्या इंजिनचे सन २०१५-२०१६या वर्षाकरीता या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर तो प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी सादर करावा लागणार आहे. हायकोर्टाची मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणे या प्रक्रियास व टेंडर आल्यानंतर ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे याकामी साधारणत: तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत सदरचे जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणे अत्यावश्यक आहे. जनरेटरसेट व प्रतिमाह येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | जनरेटसेट ठिकाण | केव्हीए | ईएसएन क्र. | मॉडेल क्र. | एका महिन्याची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१) | श्री साई मंदिर परीसर (नविन) | ५०० केव्हीए | २५२६०००३ | व्हीटीए-२८-जी. | रु. २०,५७६.०० |
| ०२) | श्री साई मंदिर परीसर (जुना) | ५०० केव्हीए | २५१६७८०९ | व्हीटीए-१७१०-जी. | रु. २०,५७६.०० |
| ०३) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | ५०० केव्हीए | २५२४२३१७ | व्हीटीए-२८-जी. | रु. २०,५७६.०० |
| ०४) | साईबाबा भक्तनिवासस्थान(५०० रुम) | १०० केव्हीए | २५१८७२९६ | एनटी-४९५-जी. | रु. ०७,९०४.०० |
| ०५) | श्री साईबाबा हॉस्पीटल | १०१० केव्हीए | २५३६५८०५ | केटीए-३८-जी-५ | रु. २९,८१२.०० |
| ०६) | श्री साईबाबा हॉस्पीटल | ५०० केव्हीए | २५३५०२८१ | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |
| ०७) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९०८५ | एनटीए-८५५-जी. | रु. १०,३९३.०० |
| ०८) | धर्मशाळा | २५० केव्हीए | २५२४९२८५ | एनटीए-८५५-जी. | रु. १०,३९३.०० |
| ०९) | श्री साई प्रसादालय | ५०० केव्हीए | २५३२०२७१ | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |
| १०) | श्री साई प्रसादालय | २५० केव्हीए | २५२४९०८७ | एनटीए-८५५-जी. | रु. १०,३९३.०० |
| ११) | साईआश्रम | ५०० केव्हीए | २५३६९१६६ | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२) | साईआश्रम | ५०० केव्हीए | २५३६७६०४ | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |
| १३) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३५०९७० | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |
| १४) | साई धर्मशाळा | ५०० केव्हीए | २५३०९०२८ | केटीए-१९-जी-९ | रु. १३,५४३.०० |
| १५) | पाणीपुरवठा साठवण तलाव | २५० केव्हीए | २५७६९५२९ | ६ सीटीएए.३-६४ | रु. ०७,५८०.०० |
| १६) | पाणीपुरवठा साठवण तलाव | १०० केव्हीए | २५१५४५१४ | एनटीए-४९५-जी | रु. ०७,९०४.०० |
| १७) | रथपालखी (सिंगल फेज) | १५ केव्हीए | ३०९७४ | F1-7G1 | रु. ०३,६८२.०० |
| १८) | साईआश्रम ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५७ | एनटीए-८५५-जी-२-I | रु. १८,३७४.०० |
| १९) | साईआश्रम ए.सी. | ३२० केव्हीए | २५३८१०५८ | एनटीए-८५५-जी-२-I | रु. १८,३७४.०० |
| २०) | एकुण रक्कम रुपये :- | | | | रु. २,६७,७९५.०० |
| २१) | डिस्काऊंट ऑफर = ०.०५८१७८% | | | | - रु. १५६.०० |
| | **सीएमसी एकुण किंमत (२०-२१)** | | | | **रु. २,६७,६३९.००** |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टॅण्डबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट सन २०१५-२०१६ ची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत दिनांक ०१-१०-२०१५ पासून पुढे मागील टेंडरच्या मंजुर दराने प्रतिमाह वार्षिक कॉन्ट्रॅक्ट देणेकामी रक्कम रुपये २,६७,६३९/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख सदुसष्ट हजार सहाशे एकोणचाळीस) मात्र खर्च येणार आहे.

श्री साईबाबा संस्थानचे सर्व पॉवरींग स्टँडबाय जनसेटच्या डिझेल इंजिनचे वार्षिक कॉन्ट्रॅक्ट सन २०१५-२०१६ या कालावधीसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट देणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर तो प्रस्ताव मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेसाठी सादर करावा लागणार आहे. हायकोर्टाची मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई-निविदा बोलविणे या प्रक्रियास व टेंडर आल्यानंतर ते मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणे याकामी साधारणत: तीन ते चार महिन्याचा कालावधी लागणार आहे. तोपर्यंत उपरोक्त जनरेटरसेट कार्यान्वित ठेवणेसाठी दि.०१-१०-२०१५ पासून पुढे मागील टेंडरच्या मंजुर दराने मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांनी सादर केलेल्या प्रतिमाह येणा-या रक्कम रुपये २,६७,६३९/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख सदुसष्ट हजार सहाशे एकोणचाळीस) मात्र याप्रमाणे पुढील वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट मंजुर होऊन त्यांना कार्यादेश देईपर्यंतच्या दिवसापर्यंत येणा-या खर्चास मान्यता मिळणेस व मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स अॅण्ड सर्व्हिसेस, औरंगाबाद यांना कार्यादेश देणेकामी सदर प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३३५ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, प्रस्तावितकामी ई-निविदांची मागणी करणेत यावी. त्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये संस्थान वकिलामार्फत अर्ज दाखल करावा. तसेच ई-निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मागील टेंडरच्या मंजूर दराने येणा-या प्रतिमाह रु.२,६७,६३९/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**यापुढे कार्यकारी अधिकारी यांनी आपले प्रशासकीय अधिका-यांमार्फत कुठलाही करार संपण्यापूर्वी ३ ते ४ महिने अगोदर पुढील प्रक्रिया सुरु करावी, की जेणेकरुन पूर्वीच्या कंत्राटदारास मुदतवाढ देण्याचा प्रश्न उद्भवणार नाही. त्यासाठी पूर्व नियोजन करण्याची व्यवस्था कार्यान्वीत करावी.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

विषय नं.१७ **साईलिला व्दैमासिके नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक सभासदांना पाठविणेकामी पाकीटे छपाईबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्दारा श्री साईलीला मराठी व श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) ही व्दैमासिक नियतकालिके श्री साईंचे जीवन, अनुभव व त्याची शिकवण यांच्या प्रचार-प्रसारार्थ प्रकाशित केली जातात या व्दैमासिकांचे अंक व्दैमासिकांच्या सभासदांना सर्वसाधारण टपालव्दारे वितरीत केले जातात. या पाकीटांचा मागील साठा संपला असल्यामुळे श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) च्या जुलै-ऑगस्ट २०१५ या प्रकाशित व आगामी अंकांच्या टपालकामी पाकिटे तयार करुन घेणे आवश्यक आहे. तरी साईलीला (मराठी) व्दैमासिकांसाठी १,००,००० व श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) व्दैमासिकासाठी १,५०, ००० पाकिटे उपलब्ध करुन मिळण्याबाबत मुंबई कार्यालय अधीक्षक यांनी दि. २६.०८.२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे.

जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/ दि. १५.१०.२०१५ नुसार सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि.मुंबई यांना साईलीला व्दैमासिक नियतकालिक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक सभासदांना पाठविणेकामी पाकिटे छपाई कामाचा खालील प्रमाणे कार्यादेश देण्यात आला होता.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व्दारा साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी व्दैमासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी पाकिटे छपाई कामाचे परिशिष्ट.

| अ.नं. | तपशिल | भाषा | पाकीटांचा आकार | वापरावयाचा कागद एका रंगात छपाई/ कागदाची कंपनी | छपाई संख्या | सर्व करांसह मुंबई कार्यालय पोहोच छपाई दर रुपये पैसे | एकुण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला | मराठी | ११.५ x ८.५ + १.७ प्लॅप. | ८० जी.एस.एम. क्राप्ट ब्राऊन पेपर | १००००० | ००.५५ | ५५,०००.०० |
| ०२ | श्री साईलीला | हिंदी-इंग्रजी | ११.५ x ८.५ + १.७ प्लॅप. | ८० जी.एस.एम. क्राप्ट ब्राऊन पेपर | ११०००० | ००.५० | ५५,०००.०० |
| | | | | | | एकूण रक्कम रुपये. | १,१०,०००.०० |

खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी व्दैमासिक वर्गणीदारांना पाठविणेकामी पाकीटे छपाई करुन घेणेकामी गरजेचे आहे.

| अं. नं. | तपशिल | भाषा | पाकीटांचा आकार | वापरावयाचा कागद एका रंगात छपाई/ कागदाची कंपनी | छपाई संख्या | सर्व करांसह मुंबई कार्यालय पोहोच छपाई दर रुपये पैसे | एकुण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलीला | मराठी | ११.५ x ८.५ + १.७ प्लॅप. | ८० जी.एस.एम. क्राप्ट ब्राऊन पेपर. | १००००० | १.०० | १,००,०००.०० |
| ०२ | श्री साईलीला | हिंदी-इंग्रजी | ११.५ x ८.५ + १.७ प्लॅप. | ८० जी.एस.एम. क्राप्ट ब्राऊन पेपर. | १५०००० | १.०० | १,५०,०००.०० |
| | | | | | एकूण रक्कम रुपये. | | २,५०,०००.०० |

सबब प्रस्तावित केलेप्रमाणे श्री साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी व्दैमासिके वर्गणीदारांना पाठविणेकामी पाकीटे छपाई करुन घेणेकामी प्रेसधारकांकडून विहित पध्दतीने दरपत्रके मागविणेकामी वर्तमानपत्रात शासकीय दराने जनसंपर्क कार्यालयामार्फत जाहिरात प्रसिध्द करणेस व जाहिरातीकामी येणा-या योग्य त्या खर्चास तसेच छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.३३६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईलिला व्दैमासिके नियतकालीक मराठी व हिंदी-इंग्रजी अंक सभासदांना पाठविणेसाठी वापरण्यात येणा-या पाकिटांची छपाई करुन घेणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.१८ **श्री.रमेश रणछोडदास जोशी,अध्यक्ष साईधाम चॅरिटेबल ट्रस्ट, कांदीवली, मुंबई यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सीए नं.१२८२/२०१५ दाखल केलेल्या याचिकेबाबत.**

प्रस्ताव- श्री. रमेश जोशी, यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय येथे सीए नं. १२८२/२०१५ दाखल केले आहे. त्यावरील (दाखल करुन घेण्याबाबत) सुनावणीची पहिली तारीख (For Admission) दि. २६.१०.२०१५ रोजी आहे. संस्थानकडे सदर 'सीए' ची आगाऊ प्रत प्राप्त झालेली आहे. त्यातील मुद्यांवर विधी व प्रकाशने या विभागांनी परिच्छेदवार मराठीतून स्पष्टीकरणाचा मसुदा तयार केला आहे.

सदर सिव्हिल अर्जात अर्जदाराने श्री साईबाबांच्या जीवनाविषयी, तसेच साईसमाधी व साईचरित्र या ग्रंथावर आक्षेप घेतले आहेत. अर्जदाराने सदर अर्जात उपस्थितीत केलेले मुद्दे खालीलप्रमाणे :-

१) साईबाबांचे नाव, त्यांच्या आई-वडिलांचे, गुरुचे नाव, त्यांचे गोत्र, त्यांचे जन्मस्थान, वास्तव्याचे ठिकाण इत्यादी प्रश्न विचारले आहेत.

२) शिर्डी येथील साईमंदिरात जी मूर्ती आहे ती कोणाची आहे, तेथे समाधी आहे की कबर, इत्यादी प्रश्न विचारले आहेत.

३) तसेच, अर्जदाराने साईचरित्र ग्रंथाविषयी आक्षेप घेतले असून, त्यात नमूद केलेली माहिती चुकीची व बोगस असल्याने त्यावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी केली आहे.

अर्जदाराने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हिल अर्ज दाखल करुन, मा. न्यायालयाने संबंधितांना सदर प्रकरणी तपास करण्याचा आदेश द्यावा म्हणून विनंती केली आहे.

सदर प्रकरणी मुंबई येथील मा.उच्च न्यायालयात वकिली करणारे संस्थान पॅनलवरील ॲडव्होकेट श्री. कुलदीप एस. पाटील यांचेमार्फत संस्थानचे म्हणणे मा. उच्च न्यायालयात मांडता येईल. तरी, ॲडव्होकेट श्री. कुलदिप पाटील यांची सदर प्रकरणी संस्थानचे म्हणणे मा. उच्च न्यायालयात मांडण्यासाठी नेमणूक होणेस मान्यता असावी.

उल्लेखित सीए, त्याबाबत वकीलांमार्फत द्यावयाचे स्पष्टीकरणाचा मसुदा अवलोकनार्थ, व मान्यतेसाठी मा. त्रिदस्यीय समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३३७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.रमेश रणछोडदास जोशी,अध्यक्ष साईधाम चॅरिटेबल ट्रस्ट, कांदीवली, मुंबई यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सीए नं.१२८२/२०१५ या दाखल केलेल्या याचिकेबाबतचे काम पहाण्यासाठी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवरील ॲडव्होकेट श्री.कुलदिप पाटील यांची नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**तसेच प्रादेशिक कार्यक्षेत्राचा विचार करता औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल. दाखल असल्यामुळे हे प्रकरणही औरंगाबाद खंडपीठामध्ये वर्ग करणेबाबत वकिलास कळविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१९ **सन २०१६ ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेबाबत.**

प्रस्ताव- मा. व्यवस्थापन समितीचे दि.१६.०४.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२४ नुसार श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका २०१६ छपाईकामी येणा-या रक्कम रु. १,२२,९५,०००/- व निर्णय क्र. १२५ नुसार श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी येणा-या रक्कम रु.३,३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

परंतू सदरहू छपाईकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेस येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्याता घेणेकामी सिव्हील ॲप्लीकेशन विधी विभागामार्फत दि. ०२.०७.२०१५ रोजी ॲड. संदीप एकनाथ गोंदकर यांनी दाखल केलेले असून, परंतू आजआखेर सदर अर्जावर काही निर्णय झालेला नाही. साई दैनंदिनी/ दिनदर्शिका छपाईकामी दरपत्रक मागविणे, उघडणे छपाई आदेश देणे, प्रेसधारकाने कागद खरेदी करणे, छपाई करणे, याकामी कमीत कमी ४ ते ५ माहिने कालावधी लागतो. छपाईची कार्यवाही करणेस कालावधी फारच कमी राहिलेला असल्याने साईभक्तांना लवकरात लवकर वेळेत साई दैनंदिनी/ दिनदर्शिका मिळावी या हेतुने मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्याता येईपर्यंत साई दैनंदिनी व दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस व जनसंपर्क कार्यालयव्दारा शासकीय दराने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस, ई निविदा प्राप्त झाल्यानंतर सदरच्या ई- निविदा मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता आल्यानंतर उघडणेत येईल.

निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३३८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेचे अधिन राहून साई दैनंदिनी व दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी विहीत पध्दतीने ई- निविदा मागविणेस व जनसंपर्क कार्यालयाव्दारे शासकीय दराने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात आली व ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर सदरच्या ई-निविदा मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळाल्यानंतर उघडणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.२० **श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई- निविदांबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः -**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"*या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णयः**

*दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.१४४ (३०) खालील प्रमाणे संमत झाला आहे.*

*"गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,७१,३५२ -/मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावनाः**- विषयांकीत कामाबाबत ई– निविदा मागविणेकरीता इकडील दि.०७/०५/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार संस्थानचे संकेत स्थळावर व वतर्मानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.०८/०६/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मुदतीत अपलोड झालेल्या ई– निविदांचा लिफाफा क्र. १ (Technical Bid) दि.१२/०६/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येवुन पात्रताधारक ठेकेदारांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याच दिवशी उघण्यात आले होते. त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Nirmal Mandap, Solapur | 7,50,463.00 | L - 1 |
| 2 | Kailash Mandap & Light Decorators, Ahmednagar | 9,23,452.65 | L - 2 |
| 3 | New Roshani Mandap & Light Decorators, Sankarapur, Tal. Rahuri | 9,76,089.00 | L - 3 |
| 4 | Jawahar Speakers and Mandap Contractor, Tuljapur | 10,85,832.00 | L - 4 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी निर्मल मंडप, सोलापूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे होते. त्यानुसार निविदा रक्कम (देकार) रु.७,५०,४६३.०० मात्र इतकी होती. सदरची निविदा रक्कम (देकार) मंजूर रक्कम रु.३,७१,३५२/- पेक्षा रु.३,७९,१११/- मात्र ने जास्त असल्याने या कामासाठी प्राप्त झालेल्या वरीलप्रमाणेची निविदाप्रकीया रद्द करण्यात येवून याकामी कमी कालावधीचे निविदा सुचनेव्दारे फेर निवदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणेकामी इकडील दि.१७/०६/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली.

त्यानुसार संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून फेर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. फेर निविदा सुचनानुसार दि.०३/०७/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मुदतीत अपलोड झालेल्या ई-निविदाचा लिफाफा क्रं. ०१ (Technical Bid) दि.०७/०७/२०१५ रोजी मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आल्या असता याकामी खालील ठेकेदार यांनी ई-निविदा अपलोड केलेल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | काळे ॲण्ड सन्स, पुणे |
| ०२ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापुर |
| ०३ | महेंद्र शांतीलाल चोरडीया (बालाजी मंडप ॲण्ड डेकोरेटर्स) मनमाड |
| ०४ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०५ | राजेश टेन्ट हाऊस, जळगांव |
| ०६ | निर्मल मंडप, सोलापूर |

वरीलप्रमाणे अ.नं. १ ते ६ पात्रताधारक ठेकेदारांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याचदिवशी उघडणेत आले असून त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Nirmal Mandap, Solapur | 6,22,860.00 | L - 1 |
| 2 | New Roshani Madap & Light Decorators | 6,50,793.00 | L - 2 |
| 3 | Rajesh Tent House, Jalgaon | 10,50,240.00 | L - 3 |
| 4 | Mr. Mahaendra Shantilal Chordiya Mandap | 10,69,707.50 | L - 4 |
| 5 | Kailash Mandap & Light Decorators | 10,84,738.60 | L - 5 |
| 6 | Kale & Son's, Pune | 27,36,600.00 | L - 6 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी निर्मल मंडप, सोलापूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असून निविदा रक्कम (देकार) रु.६,२२,८६०/- मात्र इतकी आहे. सदरची निविदा रक्कम (देकार) मंजूर रक्कमे रु.३,७१,३५२/- मात्र पेक्षा रु.२,५१,५०८/- मात्र ने जास्त आहे.

तरी गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी निर्मल मंडप, सोलापूर यांची वरीलप्रमाणे निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना जा.नं.२२१७/२०१५, दि.२१/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. तरी याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस तसेच सदर कामासाठी येणारे वाढीव रक्कम रु.२,५१,५०८/- चे खर्चासह एकूण रक्कम रु.६,२२,८६०/- मात्रचे खर्चास तसेच गुरुपौर्णिमा उत्सव कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३३९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०१५ निमित्त साईभक्तांचे सुविधेकरिता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेच्या प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली व याकामी आलेल्या एकूण रु.६,२२,८६०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२१ **सन २०१५ मधील उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई- निविदानुसार केलेल्या कार्यवाहीबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-**

अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट- कलम (१) च्या खंड (ख) अन्वये *"रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन त्रिसदस्य समितीचा निर्णयः** दि.३०/०१/२०१५ रोजीचे मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र.०७ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

*"सन २०१५ मधील श्रीरामनवमी उत्सव व उन्हाळयाच्या कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता देणेत आली.*

*सामान्य प्रशासन, उत्सव विभाग यांनी श्री रामनवमी उत्सवानिमित्त मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी येणा-या खर्चाचा समावेश श्रीरामनवमी उत्सवाचे अंदाजपत्रकामध्ये केलेला असल्यामुळे सदरहू खर्च वगळता प्रस्तावातील ब मध्ये नमूद केलेप्रमाणे उन्हाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी येणा-या अंदाजे रु.२१,६७,०७१/- मात्रचे खर्चास संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येऊन,मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले".*

**प्रस्तावना-** याबाबत ई- निविदा मागविणेकरीता इकडील विभागाचे दि.१८/०३/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार संस्थानचे संकेतस्थळावर व वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई – निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार विषयांकीत कामासाठी ई- निविदा प्रक्रियेद्वारे अपलोड झालेल्या निविदांचे लिफाफा क्र.१ (Technical Bid) व तदनंतर ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी झालेनंतर पात्र ठेकेदारांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेस इकडील दि.१६/०४/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आली. दि.१५/०४/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मूदतीत अपलोड झालेल्या ई – निविदांचा लिफाफा क्र.१ (Technical Bid) दि.२०/०४/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आल्या असता याकामी खालील ठेकेदार यांनी ई - निविदा अपलोड केलेल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी |
| ०२ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०३ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव, ता. श्रीरामपूर |
| ०४ | श्री. चंद्रकांत मेहेत्रे, अहमदनगर. |

उपरोक्त पैकी अ.नं.४ चे ठेकेदार यांनी निविदा चंद्रकांत मेहेत्रे या नावाने भरलेली आहे व सर्व कागदपत्रे मेहेत्रे डेकोरेटर्स या फर्मच्या नावाने दिलेले आहेत. सदरहू ठेकेदार यांचे नावाने कागदपत्रे नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे.

वरीलप्रमाणे अ. १ ते ३ या पात्रताधारक ठेकेदारांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याच दिवशी उघडण्यात आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 01 | Sai Krupa Tent House, | 12,05,875.00 | L1 |
| 02 | New Roshani Mandap & Light Decorators | 25,37,425.00 | L2 |
| 03 | Kailas Mandap & Light Decorators | 37,03,700.00 | L3 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव, ता. श्रीरामपूर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. त्यांचेकडून मंडप व्यवस्था करणेकामी रु.१२,०५,८७५/- मात्र खर्च येईल. याकामी मा. उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपीठ यांचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज दाखल करावा लागेल. तथापी मा. न्यायालयाचे परवानगीसाठी बराच कालावधी लागेल. तरी उन्हाळयाचे दिवस असल्याने सावलीसाठी उन्हाळी मंडप लवकरात लवकर उभारणी करणे आवश्यक आहे. निविदेमध्ये मंडप उभारणीसाठी ५५ दिवसाचा कालावधी विहीत करणेत आलेला आहे. दरम्यान साईभक्तांची गैरसोय होऊ नये याकरीता सुरुवातीचे ४५ दिवसाचे कालावधीसाठी कार्यादेश देता येईल. याकामी ४५ दिवसांचे कालावधीसाठी रक्कम रु.९,८६,६२५/- मात्र खर्च येईल. सदरहू रक्कम रु.१० लक्ष पेक्षा कमी असल्याने याकामी मा. उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेची आवश्यकता नाही असे मत आहे.

तसेच समाधी मंदिर परिसरात मोकळया जागेत एम.एस. स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रीकचे छत असलेले शेडस् उभारणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे दाखल करणेत आलेल्या Civil Application No.1776/2014 वरील मा. उच्च न्यायालयाचे दि.१४/०१/२०१५ चे आदेशान्वये समाधी मंदिर भोवतालचे परिसरात Permanent M.S. Structure वापरुन शेड उभारणी करणेत येऊ नये, उत्सव काळात यापुर्वी तात्पुरते स्वरुपात मंडप उभारणेत येत असून सदर पध्दती योग्य आहे, असे आदेश दिलेले आहेत.

वर नमूद ई- निविदांपैकी निम्नतम दराचे ठेकेदार मे. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूर, ता. श्रीरामपूर यांना ४५ दिवसांचे कालावधीसाठी कार्यादेश देणेस व त्यासाठी सदरहू ठेकेदार यांचे वरीलप्रमाणे निम्नतम ई- निविदा दरानुसार येणारे अपेक्षित रु.९,८६,६२५/- मात्रचे खर्चास तसेच याप्रमाणे करणेत आलेल्या कार्यवाहीस मा. उपसमिती सभेपुढे कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस इकडील दि.२३/०४/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यानुसार ठेकेदार साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव ता. श्रीरामपूर यांना जा.नं.७१३/२०१५ दि.०७/०५/२०१५ अन्वये रु.९,८६,४२५/- मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आला होता. ठेकेदार यांनी कार्यादेशान्वये संस्थान परिसरात मंडपाची उभारणी केली होती. सदर कामासाठी खालीलप्रमाणे खर्च आलेला आहे.

## बिलाची तपशिलवार माहिती.

| अ.नं. | तपशिल | साईज | परिमाण/चौ.फुट | कालावधी | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | समाधी मंदिर दक्षिण बाजू मुख्य गेट ते द्वारकामाई. | १७-३x१६२<br>१८-६x२४७ | २७९४.५०<br>४५६९.५० | १/५ ते १०/०६<br>४१ दिवस | रु.०.२० प्र.चौ.फुट प्र. दिवस | २२९१४.९०<br>३७४६९.९० |
| २ | गुरुस्थान मंदिर पश्चिम बाजू (दक्षिण उत्तर) | ३६x४५ | १६२०.०० | २७/०४ ते १०/६<br>४५ दिवस | | १४५८०.०० |
| ३ | श्रींचे चावडी समोर | ६१.६x३०.४ | १८६५.२९ | १/५ ते १०/०६<br>४१ दिवस | | १५२९५.४१ |
| ४ | दर्शनद्वार ते शनिमंदिर गेट | १८.३x१०८ | १९७१.०० | ३०/४ ते १०/०६<br>४२ दिवस | | १६५५६.४० |
| ५ | शनी, महादेव व गणेश मंदिर समोर | ३५x६०.६ | २११७.५० | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | १६०९३.०० |
| ६ | समाधी मंदिर उत्तर बाजू ते कॅलेंडर विक्री केंद्र स्टॉलपर्यंत म्युझियम हॉल. | १०.६x९० | ९४५.०० | २७/४ ते १०/०६<br>४५ दिवस | | ८५०५.०० |
| ७ | मारुती मंदिर ते श्यामसुंदर हॉलसमोर. | २८.४ x५६.९ | १६०७.७३ | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | १२२१८.७५ |
| ८ | गेट नं.३ ते श्री मारुती मंदिर. | १९ x५० | ९५०.०० | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | ७२२०.०० |
| ९ | गेट नं.३ समोर | १९.३ x४० | ७७०.०० | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | ५८५२.०० |
| १० | गेट नं.४ चे बाहेरील बाजूने | २४.६ x४५.६ | १११४.७५ | १/५ ते १०/०६<br>४१ दिवस | | ९१४०.९५ |
| ११ | श्री गुरुस्थान मंदिर दक्षिण बाजूस पुर्व पश्चिम असा. | ८.३x१४८.६ | १२२५.१२ | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | ९३१०.९५ |
| १२ | गुरुस्थान समोरील बेसमेंट दक्षिण बाजूस (पुर्व पश्चिम असा). | १८ x२७.९ | ४९९.५० | ०४/०५ ते १०/०६<br>३८ दिवस | | ३७९६.२० |
| १३ | मंदिर परिसरामध्ये उदी काऊंटर समोर | ४५.४x१८ | ८१५.९४ | ३०/०४ ते १०/०६<br>४१ दिवस | | ६६९०.७१ |
| १४ | जुने प्रसादालय प्रवेशद्वार (नगर मनमाड फुटपाथ व आतिल बाजूने मोबाईल लॉकर्स पर्यंत.) | २६ x४६.३ | १२०२.५० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | रु.०.२० प्र.चौ.फुट प्र. दिवस | १०८२२.५० |
| १५ | दिनदर्शिका विक्री केंद्रासमोर | १५.७ x१८.६ | २८८.२३ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | | २३०५.८४ |
| १६ | दर्शन रांग प्रवेशद्वार व पुर्व बाजूस दक्षिण उत्तर. | ३० x७६.४ | २२८९.९० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | | २०६०९.१० |
| १७ | दर्शन रांग प्रवेशद्वार पश्चिम बाजूस दक्षिण उत्तर. | ४६.६ x१५.६ | ७२०.७५ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | | ५७६६.०० |
| १८ | श्री साई कॉम्प्लेक्स मधील देणगी काऊंटर बुकस्टॉल समोर. | ११.७ x४४.७ | ५१६.२४ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | | ४१२९.९२ |
| १९ | श्री साई प्रसाद निवासस्थान कार्यालयासमोर | १५.३ x५१-३ | ७८१.५६ | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | ७०३४.०४ | |
| २० | जनसंपर्क कार्यालया समोर | १४ x३९.२ | ५४८.२४ | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | ४९३४.१६ | |
| २१ | दिक्षितवाडा प्रथमोपचार केद्रासमोर | १०.६ x३०.४ | ३१८.४६ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | २५४७.६८ | |
| २२ | दत्त मंदिर समोर | ३१ x१०२ | ३१६२.०० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | २८४५८.०० | |
| २३ | ५०० रुम कॅन्टीन समोर तिकीट रिलींग | १४.६ x५९<br>१५ x३९<br>१५x३४<br>१४ x३४ | ८५५.५०<br>५८५.००<br>५१०.००<br>४७६.०० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | ७६९९.५०<br>५२६५.००<br>४५९०.००<br>४२८४.०० | |
| २४ | श्री साई प्रसादालय येथे श्री साईबाबांचे शिल्पासमोर. | १९x९०<br>१९x७५ | १७१०.००<br>१४२५.०० | ०१/०५ ते १०/०६<br>४१ दिवस | १४०२२.००<br>११६८५.०० | |
| २५ | श्री साई प्रसादालय गेटपासून बुकींग काऊंटर पर्यंत. | १९x७५ | १४२५.०० | ०१/०५ ते १०/०६<br>४१ दिवस | ११६८५.०० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २६ | पिंपळवाडी रस्ता उत्तर बाजूस फुटपाथवर | ७x१५४<br>७x२०८ | १०७८.००<br>१४५६.०० | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | ८६२४.००<br>११६४८.०० | |
| २७ | नगर – मनमाड रस्ता पुर्व बाजूकडील फुटपाथ | ८.६x३८७.७ | ३२९४.४३ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | २६३५५.४४ | |
| २८ | जुने प्रसादालय लाडू काऊंटर समोर | ६१-६x३१<br>-१५x१५ | १९०६.५०<br>-२२५<br>१६८१.५० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | १५१३३.५० | |
| २९ | पिंपळवाडी रोडवर साईकॉम्प्लेक्स समोर | १८.३x२७३.५ | ४९८९.९१ | ०२/०५ ते १०/०६<br>४० दिवस | ३९९१९.२८ | |
| ३० | जुने प्रसादालय समोर शामियाना मंडप. | ४३x१०४-६ | ४४९३.५० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | रु.०.१९<br>प्र.चौ.फुट प्र.<br>दिवस | ३८४१९.४२ |
| ३१ | सुलभ शौचालयासमोर शामियाना | ५९x६१.३ | ३६१३.७५ | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | | ३०८९७.५६ |
| ३२ | १६ आर मधील मंडप | ७८x१९९-६ | १५५६१.०० | ०१/०५ ते १०/०६<br>४१ दिवस | रु.०.३५<br>प्र.चौ.फुट प्र.<br>दिवस | २२३३००.३५ |
| ३३ | सभाकुंड मध्ये मंडप | ६०x६१ | ३६६०.०० | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | | ५७६४५.०० |
| ३४ | समाधी मंदिरासमोर उत्तर बाजू मंडप. | १८-४x२६७-१० | ४९०९.३२ | २७/०४ ते १०/०६<br>४५ दिवस | | ७७३२१.७९ |
| | | | | | **एकूण रक्कम रु.** | ८,६०,७४६.२५ |
| | | | | | **पुर्णांकीत रक्कम रु.** | ८,६०,७४६.०० |

तरी सन २०१५ मध्ये उन्हाळयाचे कालावधीत साई भक्तांचे सुविधेकरीता संस्थान परिसरात मंडप व्यवस्था करणेकामी झालेल्या रक्कम रु.८,६०,७४६/- मात्रचे खर्चास व याकामी वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३४० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५ मधील उन्हाळ्याचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता मंदिर परिसरात व इतर ठिकाणी मंडप व्यवस्था करणेकामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली व याकामी आलेल्या एकूण रु.८,६०,७४६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२२ **सन २०१५ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता संस्थान परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूद:-** अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट- कलम (१) अन्वये "...भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे..." अशी तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये *"भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे"* या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णयः-** *".... दि.०५/०५/२०१५ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्णय क्र. १४४(३१) खालील प्रमाणे संमत झाला आहे.*

*"सन २०१५ मधील पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांचे सुविधेकरीता प्रस्तावात नमूद केले प्रमाणे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.५,२०,४६१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

**प्रस्तावनाः-** विषयांकीत कामाबाबत ई– निविदा मागविणेकरीता इकडील दि.०७/०५/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार संस्थानचे संकेत स्थळावर व वतर्मानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.१२/०६/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मुदतीत अपलोड झालेल्या ई– निविदांचा लिफाफा क्र. १ (Technical Bid) दि.१६/०६/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत येऊन पात्रताधारक ठेकेदारांचे लिफाफा क्र.२ (Commercial Bid) मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याच दिवशी उघण्यात आले होते. त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Kailash Mandap & Light Decorators, Ahmednagar | 8,38,870.00 | L - 1 |
| 2 | Saikrupa Tent House, Belapurgaon, Shrirampur | 12,14,676.00 | L - 2 |
| 3 | New Roshani Mandap & Light Decorators, Sankarapur, Tal. Rahuri | 15,27,591.00 | L - 3 |
| 4 | Nirmal Mandap, Solapur | 16,55,693.00 | L - 4 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर यांचे दर निम्नतम स्वरुपाचे होते. त्यानुसार निविदा रक्कम (देकार) रु.८,३८,८७०.०० मात्र इतकी होती. सदरची निविदा रक्कम (देकार) मंजूर रक्कम रु.५,२०,४६१/- पेक्षा रु.३,१८,४०९/- मात्र ने जास्त असल्याने या कामासाठी प्राप्त झालेल्या वरील प्रमाणेची निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन याकामी कमी कालावधीचे निविदा सुचनेद्वारे फेर निविदा सुचना प्रसिध्द करुन फेर ई - निविदा मागविण्यास इकडील दि.१७/०६/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ७६ दिवसाचे कालावधीसाठी फेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.०३/०७/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मुदतीत अपलोड झालेल्या ई – निविदांचा लिफाफा क्र.१ (Technical Bid) दि.०७/०७/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आल्या असता याकामी खालील ठेकेदार यांनी ई – निविदा अपलोड केलेल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव, ता. श्रीरामपूर |
| ०२ | श्री. महेंद्र शांतीलाल चोरडीया (बालाजी मंडप अॅण्ड डेकोरेटर्स) मनमाड |
| ०३ | न्यु रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर ता. राहूरी |
| ०४ | कैलास मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०५ | राजेश टेन्ट हाऊस, जळगांव |
| ०६ | निर्मल मंडप, सोलापूर |

वरील पात्रताधारक ठेकेदारांचे लिफाफा क्र. २ (Commercial Bid) मा.प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याच दिवशी दु.३ वाजता उघडणेत आले. असून त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमांणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Mahendra Shantilal Chordiya, Manmad | 6,27,622.00 | L -1 |
| 2 | Nirmal Mandap, Solapur | 7,05,040.00 | L -2 |
| 3 | New Roshani Mandap & Light Decorators | 9,86,113.00 | L - 3 |
| 4 | Kailash Mandap & Light Decorators, A.Nagar | 10,15,824.35 | L - 4 |
| 5 | Sai Krupa Tent House, Shrirampur | 10,38,925.00 | L - 5 |
| 6 | Rajesh Tent House, Jalgaon | 18,48,420.00 | L - 6 |

उपरोक्त तपशिलानुसार विषयांकीत कामासाठी ठेकेदार महेंद्र शांतीलाल चोरडीया (बालाजी मंडप अॅण्ड डेकोरेटर्स) मनमाड यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असून निविदा रक्कम (देकार) रु.६,२७,६२२/- मात्र इतकी आहे. सदरची निविदा रक्कम (देकार) मंजूर रक्कम रु.५,२०,४६१/- पेक्षा रु.१,०७,१६१/- मात्र ने जास्त आहे.

तरी सन २०१५ मधिल पावसाळयाचे कालावधीत साईभक्तांच्या सोयीकरीता मंडप व्यवस्था करणेसाठी श्री. महेंद्र शांतीलाल चोरडीया (बालाजी मंडप अॅण्ड डेकोरेटर्स) मनमाड यांची वरीलप्रमाणे निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना जा.नं.२२१६/२०१५, दि.२१/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे. तरी याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस तसेच सदर कामासाठी येणारे रक्कम रु.६,२७,६२२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१५ मधील पावसाळयाच्या कालावधीत साईभक्ताचे सुविधेकरीता संस्थान परिसरात मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी करणेकामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली व याकामी आलेल्या एकूण रु.६,२७,६२२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२३ **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप –२०१५ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदाबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूदः**– अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट– कलम (२) च्या खंड (ठ) अन्वये श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः** श्रावण महिन्यातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा– २०१५ कार्यक्रमासाठी मंडप व इतर व्यवस्था करणेकामी अंदाजे रु.३,४५,०००/- मात्र खर्चास तसेच याकामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविणेस दि.१६/०६/२०१५ रोजीच्या मा.उपसमिती सभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर मा. उपसमिती सभेमध्ये सदरच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा– २०१५ मध्ये पारायणार्थींच्या सोयीसाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन ई– निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,४५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी उपसमिती सभेमध्ये शिफारस केलेली आहे.

त्यानुसार विषयांकीत कामाबाबत ई– निविदा मागविणेकरीता इकडील दि.१८/०६/२०१५ रोजीचे टिपणीवरील मान्यतेनुसार संस्थानचे संकेत स्थळावर व वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई– निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.२०/०७/२०१५ अखेर देण्यात आलेल्या विहीत मुदतीत अपलोड झालेल्या ई– निविदांचा लिफाफा क्र. १ (Technical Bid) दि.२४/०७/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले असता, याकामी खालील ठेकेदार यांनी ई – निविदा अपलोड केलेल्या होत्या.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | विजय मंडप साऊंड सर्व्हिसेस, औरंगाबाद |
| ०२ | राजेश टेन्ट हाऊस, जळगांव |
| ०३ | गणेश मंडप कॉन्ट्रक्टर, सोलापूर |
| ०४ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर |
| ०५ | न्यु रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर, ता. राहूरी |
| ०६ | श्री स्वामी समर्थ कॅटरर्स ॲण्ड डेकोरेटर्स, दादर, मुंबई |

वरील प्रमाणे अ.नं. १ ते ६ या पात्रता धारक ठेकेदारांचे लिफाफा क्र. २ (Commercial Bid) मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष त्याच दिवशी उघणेत आले असून, त्यांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| Sr.No. | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Vijay Mandap Sound Service, Aurangabad | 3,14,150.00 | L - 1 |
| 2 | Rajesh Tent House, Jalgaon | 5,38,633.80 | L - 2 |
| 3 | Kailas Madap & Light Decorators, A.Nagar | 5,39,100.00 | L - 3 |
| 4 | New Roshani Mandap & Light Decorators, Sankarapur, Tal. Rahuri | 5,95,670.00 | L - 4 |
| 5 | Ganesh Mandap Contractor, Solapur | 7,88,311.00 | L - 5 |
| 6 | Shri Swami Samarth Caterers & Decorators, Dadar, Mumbai. | 10,99,600.00 | L – 6 |

उपरोक्त तपशिलानूसार विषयांकीत कामासाठी ठेकेदार विजय मंडप साऊंड सर्व्हिस, औरंगाबाद यांचे दर निम्नतम स्वरुपाचे असून निविदा रक्कम (देकार) रु.३,१४,१५०/- मात्र इतकी आहे.

तरी श्री साई सच्चरित पारायण सोहळा २०१५ चे कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी विजय साऊंड सर्व्हिस, औरंगाबाद यांची वरील प्रमाणे निम्नतम दराची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस व याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस तसेच सदर कामासाठी येणारे रक्कम रु.३,१४,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच श्री साई सच्चरित पारायण सोहळा २०१५ चे कालावधीत ऐनवेळी आवश्यकतेनुसार वाढीव मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करावयाची झाल्यास ती याच मंजूर दराने करुन घेणेस व त्यासाठी येणारे सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरीत पारायण सोहळा मंडप– २०१५ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी करणेकामीच्या प्रस्तावाचे अवलोकन करणेत येऊन, त्यांची नोंद घेण्यात आली व याकामी आलेल्या एकूण रु.३,१४,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२४ **संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते विकसन कामाचे ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचे उर्वरीत कामासाठी मुदतवाढ व उर्वरीत डाबरीकरण कामासाठी दरवाढ मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद:** अधिनियम कलम 21 (2) अन्वये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

*"...पोटकलम (1) आणी (1क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नच्या तीस टक्कयापेक्षा अधिक नसेल एवढा भाग समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा काणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल :-*

*(दोन) स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस सहाय्य करण्यासाठी."*

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

01. नि. क्र. 263 दि. 24/04/2006
02. नि. क्र. 16(ब) दि. 10/01/2010
03. नि. क्र.534 दि.04/07/2010
04. नि. क्र. 173 (07) दि. 19/02/2012
05. नि. क्र. 746 (फ) दि. 15/09/2012
06. नि. क्र. 543 दि. 26/07/2013
07. नि. क्र. 184 दि. 15/03/2014
08. नि. क्र. 480 दि. 12/06/2014

**मा. शासन निर्णय :** क्र. सासंवि-2006/876/का.सोळा दि.04/09/2014

**प्रस्तावना :** शिर्डी नगरपंचायतीचे विनंतीवरून विषयांकित कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णयानुसार शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजनेतील प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते संस्थान निधीतुन विकसित करणेचे काम ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचेमार्फत चालू आहे. सदरहु प्रकल्पास येणारे रु.88कोटी मात्रचे खर्चास दि.04/09/2014 रोजीचे शासन निर्णयन्वये मान्यता देणेत आलेली असून, सदर प्रकल्पासाठी आजपावेतो रक्कम रु.70,04,07,850/- मात्र खर्च झालेला आहे. सदरहु प्रकल्पासाठी झालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| Name of work: - | Construction Of Flexible And Rigid Pavement For DP And Ring Roads In Shirdi Town. |
| Name of Contractor: - | M/s. Roman Tarmat Ltd. New Mumbai |
| Resolution no. & date: - | Res.No.534 Date 04/07/2010 Rs.33,83,26,199/-<br>Res.No.640 Date 07/08/2010 Rs.60 Lacs |
| Work order-LOA No. & date: | 8498/2010 dated 19/07/2010 |
| Notice to proceed with the work No. & date: | 8837/2010 dated 06/08/2010 |
| Contract Value: - | Rs.33,83,26,199/-(10% below of Rs.37,59,17,999/-) |
| Date of commencement | 06/08/2010 |
| Time for completion: - | Fifteen Months |
| Scheduled date of completion | 06/11/2011 |
| Extended date of completion | (01) March 2012 (02) 31/05/2013 (03) December 2013 (04) April 2014 (05) June 2014 |
| Mobilization advance given @ 8% P.A. interest | i) Rs.84,58,155/- date - Oct.2010<br>ii) Rs.84,58,155/- date -Dec.2010 Rs.1,69,16,310/- (Mobilisation advance recovered and B.G.No. 5020IBGIS100169 dated24/08/2010 released.) |
| Performance security Bank guarantee details:- (Up to completion of defect liability period of 36 months) | BG No.5020IBGIS100145 dated 28/07/2010 Valid up to 27/04/2015 Rs.1,69,16,310/-(Ref- Sanctioned Note dated 18/03/2015 regarding replace the BG by RTL Retention money.) |
| Value of work for interim certificate:- | Rs. 2,50,00,000/- |
| Amount of bill paid- | 1. R. A. Bill No. 8 (C) Rs. 19,68,34,306/-<br>2. Price Escalation Bill No.09 (A+B) Rs. 4,32,04,758/-<br>**Total Rs. 24,00,39,064/-** |

सदरहु कामासाठी ठेकेदार यांना शिर्डी नगरपंचायतीकडून काही रस्ते वेळेत उपलब्ध न झाल्याने तसेच उपलब्ध रस्त्यांचे सुरु असलेल्या कामास लगतच्या मालमत्ताधारकांनी घेतलेल्या हरकतींचे निवारण न झाल्याने विहीत 15 महिने (दि.05/11/2011) मुदतीत तसेच वाढीव मुदतीतही सदर ठेकेदार यांना काम पुर्ण करता आले नाही.

तसेच रस्ता नं.9 चा लक्ष्मीनगर भाग(165मी.) व रस्ता नं. 09अ (1.50कि.मी.) च्या कामासाठी सदर रस्त्यांचे अद्यापही हस्तांतरीत झालेले नसल्याने ठेकेदार यांना काम सुरु करता आलेले नाही. सदर कामातील अडचणी विचारात मा. व्यवस्थापन समितीचे खालील निर्णयांनुसार ठेकेदार यांना जुन 2014 अखेर मुदतवाढ देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र./ दिनांक | मंजुर मुदतवाढ |
|---|---|---|
| 1 | नि. क्र. 173 (07) दि. 19/02/2012 | मार्च 2012 अखेर |
| 2 | नि. क्र. 746 (फ) दि. 15/09/2012 | मे 2013 अखेर |
| 3 | नि. क्र. 543 दि. 26/07/2013 | दि. 31/12/2013 अखेर |
| 4 | नि. क्र. 184 दि. 15/03/2014 | एप्रिल 2014 अखेर |
| 5 | नि. क्र. 480 दि. 12/06/2014 | जुन 2014 अखेर |

सदर मुदत वाढीत ठेकेदार यांना देणेत आलेल्या एकूण सहा रस्त्यांपैकी चार रस्त्यांचे काम मार्च 2014 अखेर पुर्णत्वास आलेले होते. परंतु सदर रस्त्यांचा काही भाग काम करणेसाठी ताब्यात न आलेने अद्यापही सदर रस्त्यांचे काम सुरु आहे. तसेच यातील दोन रस्त्यांचे कामात लगतचे मालमत्ताधारकांचे हरकतींमुळे तसेच नगरपंचायतीच्या भुसंपादनाच्या अपूर्ण कार्यवाहीमुळे ठेकेदार यांना मार्च 2014 पासून आजअखेर काही भागातील काम पुर्ण करता आले नाही.

सदर रस्ते उपलब्ध करून देणेबाबत शिर्डी नगरपंचायतीस इकडील कार्यालयाचे दि.27/12/2010, दि.14/01/2011, दि.05/02/2011, दि.07/03/2011, दि.03/08/2011, दि.01/02/2012, दि.28/07/2012, दि.29/09/2012, दि.16/04/2013, दि.23/04/2013, दि.22/05/2013, दि.05/09/2013, दि.25/09/2013, दि.30/10/2013, दि.21/02/2014, दि.22/03/2014, दि.07/03/2014, दि.09/05/2014, दि.09/07/2014, दि.22/11/2014 व दि.26/11/2014 चे पत्रान्वये लेखी कळविण्यात आलेले होते. त्यानुसार नगरपंचायतीकडून रस्ते उपलब्ध होतील म्हणून ठेकेदार यांना वेळोवेळी मशीनरी व लेबर उपलब्ध ठेवणेबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. मात्र सदर कामासाठी नगरपंचायतीकडून रस्ते उपलब्ध झाले नाहीत.

दिनांक ३१/१२/२०१४ रोजीचे पत्रान्वये शिर्डी नगरपंचायत यांना उपरोक्त भागातील अडचणींचे निराकरण करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करुन रस्त्यांचा उर्वरीत भाग ठेकेदार यांना कामासाठी एका आठवड्यात उपलब्ध करुन देण्यात यावा. रस्ते उपलब्ध न झाल्यास नाइलाजाने ठेकेदार यांचे काम आहे त्या परिस्थितीत अंतिम करावे लागेल असे कळविण्यात आलेले होते. तरीही नगरपंचायतीने याबाबत पूर्णपणे कार्यवाही न केल्याने परत इकडील कार्यालयाचे दि.24/03/2015, दि.31/03/2015, दि.14/05/2015 व दि.04/06/2015 रोजीचे पत्रान्वये याबाबत पाठपुरावा करणेत आला. करणेत आलेल्या पाठपुराव्यानंतरही उपरोक्त भागातील रस्त्यांच्या काही भागातील काम सुरु करता आले नाही. सदरहु प्रकल्पातील रस्त्यांचे कामांबाबत सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

१) **रस्ता क्र. 05 - नगर मनमाड रस्ता (पश्चिम बाजू –कब्रस्तान) ते रस्ता क्र. 06 –**

**a)** चेनेज 0 ते 310 – कब्रस्तान जवळ - ठेकेदार यांनी खडीकरण व रिटेनिंग वॉलचे काम पुर्ण केले आहे. उर्वरीत रस्ता डांबरीकरणातील बीबीएमचे काम पूर्ण असुन डांबरीकरणाचे काम बाकी आहे.

**b)** चेनेज 310 ते 660 – नाला रस्ता ते कनकुरी रस्ता - (लांबी-310मी.) ठेकेदार यांनी खडीकरणाचे काम पुर्ण केले आहे. रस्ता डांबरीकरणातील 180 मी. बीबीएमचे काम पूर्ण असुन उर्वरीत डांबरीकरणाचे काम बाकी आहे. नगरपंचायतीने दि.01/07/2015 रोजी दिलेल्या सिमांकनानुसार ठेकेदार यांनी रिटेनिंग वॉलचे काम पूर्ण केले आहे.

**c)** चेनेज 1620 ते 1840 - नगर मनमाड रस्ता ते रस्ता क्र. 06 - (लांबी-220 मी.) ठेकेदार यांनी खडीकरणाचे काम पुर्ण केले आहे. नगरपंचायतीने दि.30/06/2015 रोजी दिलेल्या सिमांकनानुसार रिटेनिंग वॉलचे 80% काम पूर्ण केले असून डांबरीकरणाचे काम बाकी आहे.

२) **रस्ता क्र. 09 (लक्ष्मीनगरमधून पुर्व-पश्चिम रस्ता) –**

लक्ष्मीनगर वसाहत 165 मी. व त्यालगत 30 मी. तसेच चनेज 840 लगत 25 मी. भाग कामासाठी हस्तांतरीत झालेले नसल्याने काम प्रलंबित आहे.

३) **रस्ता क्र. 9 अ - रस्ता क्र. 09 ते रस्ता क्र. 06-**

(लांबी -1.50 कि.मी.) ची भूसंपादन कार्यवाही पुर्ण झालेने सदर रस्त्याचे काम सुरु करता आले नाही.

उपरोक्त रस्त्यांचे कामांची भूसंपादन कार्यवाही अपूर्ण असल्याने ठेकेदार यांना सदर रस्त्यांचे काम दिलेल्या वाढीव मुदतीतही पूर्ण करता आले नाही.

ठेकेदार यांचे निविदेतील दर सन 2008-2009 चे दरसुचीवर आधारीत आहेत. यापुर्वी ठेकेदार यांनी दि. 07/01/2012 रोजीचे पत्राने 15% भाववाढ मिळणेबाबत विनंती केली होती. याबाबत सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे यांनी दि.18/02/2014 रोजीचे पत्राने ठेकेदार रोमन टारमॅट लि. यांचेकडून खालील बाबींवर स्पष्टीकरण मागविले होते.

1. Justification of quoting 10% below estimated cost.
2. 15% hike with respect to quoted & estimated
3. Assessment of escalation(Some working handed over to us by M/s. RTL on 28/01/2012) accordingly escalation amounts to 8.50% and may further increase & finally will be in the range of 10%+

तसेच ठेकेदार यांचे मागणीबाबत सल्लागार यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिला होता.

"... It is surprising that the agency did have working details in support of 10% below quote with respect to estimated cost and sounds surprising.

Further if demand for 15% hike is on basis of 10% below quote, the net hike amounts to 5% only. But if this 15% demand is on estimated cost there appears some drastic error since overall impact would be 25%.

It may kindly be noted that as worked out by agency escalation impact is on date works out to 8.5% and may go up to 10%+ and hence gap of 5% only remains and too small to spend all energy on this stage. Rather it is advisable to concentrate on quality and work progress first.

The demand for hike need to be considered inter-alia above points, on clarity of above points. It could be decided realistically hike on account of delay in handing over ROW by SSST vis-a-vis commitments in contract subject to

1. Work diligently and adhere to minimum quality standards
2. Expedite on various fronts available

3. Confirm intention to extend of scope the agency would like to complete with time schedule.

Trust this clarifies the issues and the same was broadly discussed in board meeting on 21.1.2012."

मा. व्यवस्थापन समितीचे दि.19/02/2012 रोजीचे सभेतील नि.क्र.173(7)अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

*" .. उर्वरीत रस्ता क्र. 5 9 व 9अ या रस्त्यांचे कामासाठी भाववाढीबाबत सल्लागार यांचे अभिप्रायानंतर निर्णय घेण्यात यावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."*

याबाबत सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि. पुणे यांनी दि.12/02/2012 रोजीचे पत्राने खालीलप्रमाणे कळविले होते.

*"..As regard to RTL's demand for increase in rates by 17% are not substantiated along with the basis of quoting -10% as requested by PMC earlier (refer- letter no.CS13PM1008/01/02/1/43 dated 16.01.2012). The submission of detailed rate analysis is still awaited from RTL which is needful for consideration."*

ठेकेदार यांनी उपरोक्त प्रमाणे दरपृथ्थ:करण सादर न केल्याने सल्लगार यांनी अभिप्राय न दिल्याने अद्याप ठेकेदार यांचे दरवाढीबाबत निर्णय झालेला नाही. यानंतर दि.22/04/2015 रोजी नगरपंचायतीने उपलब्ध करून दिलेल्या भागात काम सुरु करणेबाबत दि.23/04/2015 रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीचे वेळी ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांनी खालील बाबींचे दरावर 20% वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

1. Bituminous Macadam,
2. Dense Bituminous Macadam
3. Bituminous Concrete

उपरोक्त कामांचे अनुषंगाने ठेकेदार यांनी त्यांचे दि.25/05/2015 व दि.30/05/2015 रोजीचे पत्रान्वये रस्ता क्र.05 चे उर्वरीत डांबरीकरण काम करणेस दि.31/12/2015 अखेर मुदतवाढ मिळणेस विनंती केली आहे तसेच उपरोक्त बाबींचे दरावर 20% वाढ मिळणेबाबत विनंती केली आहे.

01. We are hereby once again submitting the zerox copies of rate analysis in respect of BM, DBM and BC for balance scope of work on road no.5. Please refer Annexure-I

02. We are enclosing the quantities for balance scope of work and its cost for your reference at Annexure-II.

03. We are enclosing the working & its cost of price variation for balance scope of bituminous items please refer Annexure-III.

04. We state that,net increment in rate is 40% as per working based on prevailing market rates but we are restricting upto 20% keeping in mind to do the service to Shri Saibaba and public at large. We are enclosing we working at Annexure-IV.

Hope the above explanation is in line with your requirement. We request your good self kindly approve the increment in our rate by 20% plus price variation."

दिनांक 24/06/2015 रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे बैठकीमध्ये सिंहस्थ कुंभमेळा काळासाठी करण्यात येत असलेल्या व्यवस्थेची सुरक्षा तसेच अन्य आढावा घेण्यात आला. या बैठकीमध्ये व्यवस्थापन समिती पदाधिका-यांसोबत पोलीस अधिक्षक तसेच अन्य पोलीस अधिकारी यांच्यासोबत झालेल्या चर्चेमध्ये शिर्डी कब्रस्तान रस्त्याचे काम अन्य प्रलंबित कामे नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांचेसोबत पोलिस बंदोबस्तात तात्काळ सुरु करावे असे ठरले. तसेच संस्थानमार्फत विकसित करणेत येत असलेल्या वाहनतळांची व प्रथम प्राधान्य गटातील रस्त्यांची मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, कार्यकारी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचे समवेत दि.23/07/2015 रोजी पहाणी केली. त्यावेळी रस्ता क्र. 05 चे चेनेज 0 ते 310, चेनेज क्र. 310 ते 475 व चेनेज क्र. 1620 ते 1840 या भागातील काम तातडीने पूर्ण करणेबाबत सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने शिर्डी नगरपंचायतीने दि.23/07/2015 रोजीचे पत्राने रस्ता क्र.05 चे लगतचे मालमत्ता धारक श्रीमती द्रौपदाबाई रामभाऊ गोंदकर यांनी राहाता कनिष्ठ न्यायालयामध्ये दाखल केलेले दाव्याचे क्षेत्र वगळता उर्वरीत भागातील अडचणींचे निवारण झाले असून, सदर रस्त्याचे चेनेज क्र. 1620 ते 1840 या भागातील पाडण्यात आलेल्या बांधकामाचे रॅबीट साहीत्य नगरपंचायतीने उचलले असल्याचे कळविले आहे. नगरपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या भागातील कामे ठेकेदार मे. रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांनी सुरु केली आहेत.

**प्रस्ताव:-**

1. सध्या नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा सुरु असून पर्वणीचे कालावधीत वाहतुकीचे नियोजनासाठी उपरोक्त रस्त्यांची कामे करणे आवश्यक असल्याने तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी या कालावधीत करावयाचे कामांचे आपत्ती व्यवस्थापन कायदा-2005 अंतर्गत नियोजन केले असुन सदरहु रस्ता मोटेरबल करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत. करिता शिर्डी नगरपंचायतीकडून काम करणेसाठी उपलब्ध झालेल्या भागात ठेकेदार रोमन टारमॅट लि. नवी मुंबई यांनी काम सुरु केले आहे. मात्र पावसाळयाचे दिवस असल्याने डांबरीकरणा व्यतिरिक्त इतर कामे करुन रस्ते

वाहतूकीसाठी वापरता येतील. पावसाळयानंतर डांबरीकरण काम करणेसाठी ठेकेदार यांना डिसेंबर 201[illegible] पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नाही.

2. ठेकेदार यांचे निविदेतील दर सन 2008-2009 चे दरसुचीवर आधारीत आहेत. यापुर्वी ठेकेदार यांनी दि. 07/01/2012 रोजीचे पत्राने 15% भाववाढ मिळणेबाबत केलेल्या विनंतीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.19/02/2012 रोजीचे सभेतील नि.क्र.173(7)अन्वये उर्वरीत रस्ता क्र.5, 9 व 9अ या रस्त्यांचे कामासाठी भाववाढीबाबत सल्लागार यांचे अभिप्रायानंतर निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय घेणेत आला.ठेकेदार यांनी भाववाढ मिळणेबाबत केलेल्या विनंतीबाबत सल्लागार यांनी ठेकेदार यांचेकडून दि.18/02/2012 रोजीचे पत्राने कळविलेनुसार माहिती व रेट ॲनेलेसिस मागविले होते. ठेकेदार यांनी सदरहू माहिती दिलेली नाही. फेब्रुवारी 2015 पासून सल्लागार युनिसन प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रा.लि.पुणे यांची सेवा संपुष्टात आली आहे.

आता, ठेकेदार यांनी उर्वरीत काम पूर्ण करणेसाठी निविदेतील सर्व बाबींवर भाववाढ न मागता फक्त डांबरीकरणाचे बाबींवर 20% वाढ व Price variation मागितलेली आहे. निविदेत अट क्र.70.3 पृष्ठ क्र. (Volume-I 59/115)– नुसार Price variation clause आहे. ठेकेदार यांनी डांबरीकरणांचे बाबींचे रेट ॲनेलेसिस सादर केले असुन रेट ॲनेलेसिसची इकडील विभागामार्फत सदर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांनी मागणी केलेले दर, निविदा दर व प्रचलित दरसुची सन 2014-15 चे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Tender Item No. | Description of Items | As per BOQ (Tender) | | | | Claimed by RTL | | As per DSR rates 2014-2015 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Unit | Approx. Quantity of remaining work of road no.5 | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 3.04 | **Bituminous Macadam** | $M^3$ | 861 | 4,348 | 3,743,628/- | 7,116 | 6,126,876/- | 7,442 | 6,407,562/- |
| 3.05 | **Dense Bituminous macadam** | $M^3$ | 574 | 5,229 | 3,001,446/- | 9,364 | 5,374,936/- | 8,447 | 4,848,578/- |
| 3.06 | **Bituminous concrete** | $M^3$ | 459.20 | 7,038 | 3,231,850/- | 9,632 | 4,423,014/- | 9,694 | 4,451,485/- |
| | | | | Amount Rs. | 9,976,924/- | | | | |
| | | | | Less 10% as per WO | 997,692/- | | | | |
| | | | | total Rs. | 8,979,231/- | | | | |
| | | | | Add Price variation Payable | 2,402,823/- | | | | |
| | | | | Grand total Rs. | 11,382,054/- | | 15,924,826/- | | 15,707,6245/- |
| | | | | Percentage (%) increase | | | 40% | | 38% |

उपरोक्त तक्त्यावरून असे दिसुन येते की, ठेकेदार यांचे मागणीनुसार त्यांना रस्ता क्र.05 या रस्त्यांचे उर्वरीत डांबरीकरण कामातील Bituminous Macadam, Dense Bituminous Macadam व Bituminous concrete या बाबींचे दरावर 20% वाढ व Price variation अपेक्षित आहे. ठेकेदार यांचे निविदा दराची तुलना प्रचलित दरसुची सन 2014-15 चे दरांशी केली असता त्यामध्ये 38% वाढ असल्याचे दिसुन येते. तरी ठेकेदार यांना निविदादरावर 20% वाढ, भावफरक (Price variation) रकमेसह देणेबाबत निर्णय होणेस विनती.

3. रस्ता क्र. 9 अ ची भूसंपादन कार्यवाही पूर्ण झालेली नाही. तसेच रस्ता क्र. 9 मधील लक्ष्मीनगर वसाहतीमुळे या भागात काम करणेस वेळ लागणार असल्याने भूसंपादन कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर या रस्त्यांचे कामाबाबत निर्णय घेता येईल असे मत आहे.

तरी उपरोक्त 1 ते 3 चे बाबींवर निर्णय होणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.३४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान निधीतून शिर्डी शहरातील प्रथम प्राधान्य गटातील ०६ रस्ते विकसन कामाचे ठेकेदार रोमन टारमॅट लि., नवी मुंबई यांचे उर्वरीत कामासाठी मुदतवाढ व उर्वरीत डाबरीकरण कामासाठी दरवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर भावफरक विचारात घेण्यायोग्य आहे काय, याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा अभिप्राय घेण्यात येऊन, प्रस्ताव फेरसादर करण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२५ **कॅन्टीन विभागाचे शेडला बंदीस्त करणेकरीता परफोरेटेड शीट खरेदी करणेकामी आलेल्या खर्चास कार्यात्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- जुने प्रसादालयातील मुख्य कॅन्टीन साई प्रसादालयात स्थलांतरीत करणेबाबत मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिनांक 28/04/2015 रोजीचे श्री साई प्रसादालयातील राऊंडध्ये निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देशानुसार साई प्रसादालय परिसरात मेकॅनिकल विभाग व बांधकाम विभाग यांचेमार्फत कॅन्टीन विभागाकरीता शेड तयार करुन देण्यात

आलेले आहे. सुरक्षिततेच्यादृष्टीने सदरील शेड बंदीस्त करणेसाठी शेड चारही बाजूने खालीलप्रमाणे पत्र्याची आवश्यकता होती:

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| 1. | एम.एस. परफोरेटेड शीट साईज – 8' x 4', 12 Swg | 10 नग | 4,800/- | 48,000/- |
| | | | **एकूण रुपये:** | **48,000/-** |

उपरोक्तप्रमाणे कॅन्टीन विभागाचे शेडला बंदीस्त करणेकरीता परफोरेटेड शीट खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 48,000/- (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस हजार) मात्र खर्चास व आवश्यक मटेरिअल खरेदीकामी तातडीने कोटेशन मागविण्यास दिनांक 03/06/2015 रोजीचे मंजूर टिपणीन्वये मान्यता मिळालेली होती. त्यानुसार जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/ 1379/2015 दिनांक 8 जून, 2015 नुसार दराचे कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार खालील 3 कोटेशनधारकांकडून दरपत्रक प्राप्त झाले आहे :

(1) मे. माहेश्वरी स्ट्रील ट्रेडर्स, नगर-मनमाड रोड, बाभळेश्वर, ता. राहाता. जि. अहमदनगर

(2) मे. सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी

(3) मे. भनसाळी मोटर्स, नगर मनमाड रोड साकुरी (राहाता), ता. राहाता. जि. अहमदनगर

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन दिनांक 10 जून, 2015 रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले, त्यातील दरांचा तपशील पुढीलप्रमाणे होता:

| अ.नं. | मटेरिअल तपशील | भनसाळी मोटर्स, साकुरी<br>प्रती नग दर | माहेश्वरी स्टील ट्रेडर्स, बाभळेश्वर<br>प्रती नग दर | सुपर फॅब्रिकेशन & फर्निचर, साकुरी<br>प्रती नग दर |
|---|---|---|---|---|
| 1. | एम.एस. परफोरेटेड शीट साईज – 8' x 4', 12 Swg, 6 mm Hole Size | 14 Swg<br>रुपये - 3,250/-<br>+ 5% VAT | **12 Swg**<br>**रुपये - 4,400/-**<br>**+ 5% VAT** | 12 Swg<br>रुपये - 4,250/-<br>+ 12.5% VAT |
| | **प्रती नग दिलेले दर रुपये:** | 3,413/- | **4,620/-** | 4,781/- |
| | **शेरा:** | मागणीप्रमाणे मटेरिअल नाही | -- | -- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यानुसार मे. भनसाळी मोटर्स, साकुरी यांचे दर कमी होते, मात्र त्यांनी मागणीप्रमाणे मटेरिअलचे दर दिलेले नव्हते. उर्वरित दोन्ही कोटेशनधारकांनी मागणीप्रमाणे दर दिलेले असून, त्यातील मे. माहेश्वरी स्टील ट्रेडर्स, बाभळेश्वर यांचे एका परफोरेटड शीटासाठी व्हॅटसह दर रुपये 4,620/- हे न्युनतम होते. त्यामुळे त्यांना जा.नं. एसएसएसटी/ मेकॅनिकल/1752/2015 दिनांक 27 जून, 2015 अन्वये 10 परफोरेटेड शीट खरेदी करणेकामी कार्यादेश देऊन, त्यांचेकडून मटेरिअल खरेदी करण्यात आले. याकामी त्यांना रुपये 46,200/- (अक्षरी रुपये शेहचाळीस हजार, दोनशे) मात्रचे खर्चाचे बील मे. माहेश्वरी स्टील ट्रेडर्स, बाभळेश्वर यांना अदा करणे बाकी आहे.

तरी कॅन्टीन विभागाचे शेडला बंदीस्त करणेकरीता परफोरेटेड शीट खरेदी करणेकामी केलेल्या कार्यवाहीस कार्यात्तर मान्यता मिळणेस व परफोरेटेड शीट खरेदीकामी आलेला खर्च रुपये 46,200/- मे.माहेश्वरी स्टील ट्रेडर्स, बाभळेश्वर यांना अदा करावयाचा प्रस्ताव मा. उप-समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागाचे शेडला बंदीस्त करणेकरीता परफोरेटेड शीट खरेदी करणेकामी आलेल्या रु.४६,२००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

विषय नं.२६ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे पर्वणी कालावधीत सहाय्यक सेक्टर ऑफीसर यांना निवासासाठी व्दारावती भक्तनिवासमध्ये ६ नॉन ए.सी.रुम विनामुल्य देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद-**

(१) –२१ चा (१) चा (ग) मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा साईभक्तांना कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी/ सुविधा पुरविणे.

(२) – (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे...

**प्रस्तावीक:-** सिंहस्थ् कुंभमेळा-२०१५ चे पार्श्वभूमीवर शिडी येथे साईभक्तांच्या होणाऱ्या संभाव्य गर्दीचे नियंत्रण व्यवस्थापन करणेकरीता जुने प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य् नियंत्रण कक्ष, विविध ठिकाणी १० वाहनतळे/ माहिती केंद्रे तसेच ०२ उदघोष्णा कक्ष (Announcement Centre) तात्पुरती वॅाटर प्रुफ निवासी मंडपासाठी निश्चित करणेत आलेले आहेत.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी टंचाई/ कार्या/ आपत्ती व्यवस्थापन /१९/६३२/२०१५ अहमदनगर दि.१७/०८/२०१५ रोजीचे आदेशानुसार शासकीय अधिकाऱ्यांचे खालील तारखांना एकत्रित कामाचे नियोजन करण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे:-

| अ.नं. | शाही स्नान | मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे आदेशान्वये निश्चित डयुटी कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|
| ०१ | प्रथम शाहीस्नान – नाशिक | दिनांक २८/०८/२०१५ ते दिनांक ३१/०८/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०२ | व्दितीय शाहीस्नान – नाशिक | दिनांक १२/०९/२०१५ ते दिनांक १५/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०३ | तृतीय शाहीस्नान – नाशिक | दिनांक १७/०९/२०१५ ते दिनांक २०/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०४ | तृतीय शाहीस्नान (त्रिंबकेश्वर) | दिनांक २४/०९/२०१५ ते दिनांक २७/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| | | **एकुण दिवसांचा कालावधी** | **१६ दिवस** |

**व्दारावती विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये १ नॉन ए.सी. रुमकरीता ३ व्यक्तीसाठी रुपये- ५००/- इतका सेवा आकार आहे. शासकीय सहाय्यक सेक्टर अधिकारी यांना प्रती दिन ६ नॉन ए.सी. रुम दिल्यास रुपये- ३,०००/- इतका खर्च प्रति दिन येईल. तसेच प्रत्येक शाहीस्नानसाठी ४ दिवसाकरीता रुपये- १२,०००/- इतका खर्च येत असून चार शाही स्नानासाठी १६ दिवसाकरीता रुपये- ४८,०००/- (अक्षरी रुपये- अठ्ठेचाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खोल्या विनामुल्य दिल्यास सेवा आकार संस्थानला जमा होणार नाही.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे आदेशानुसार उपरोक्त निश्चित केलेल्या तारखांना सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे चार पर्वणी कालावधीत सोबतचे आदेशातील सहाय्यक सेक्टर अधिकारी यांचे निवासासाठी व्दारावती भक्तनिवासमध्ये ६ नॉन ए.सी. रुम विनामुल्य देणेस व होणारा खोल्यांचा सेवा आकार रुपये- ४८,०००/- एवढया खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३४५ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे पर्वणी कालावधीत व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये सहाय्यक सेक्टर ऑफीसर यांचेसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या नॉन ए.सी. खोल्यांचा त्यांनी वापर केलेला नाही, अशी माहिती सभेस देण्यात आली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीमधील नॉन ए.सी.०६ खोल्यांचा सहाय्यक सेक्टर ऑफीसर यांनी वापर केलेला नसल्यामुळे सदरहू प्रस्ताव रद्द करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

विषय नं.२७ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे पर्वणी कालावधीत सेक्टर ऑफीसर यांना निवासासाठी व्दारावती भक्तनिवासमध्ये ६ ए.सी.रुम विनामुल्य देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद-**

(१) –२१ चा (१) चा (ग) मंदिरात श्रींच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा साईभक्तांना कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी/ सुविधा पुरविणे.

(२) – (ख) साईभक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे...

**प्रस्तावीक:-** सिंहस्थ् कुंभमेळा-२०१५ चे पार्श्वभूमीवर शिर्डी येथे साईभक्तांच्या होणाऱ्या संभाव्य् गर्दीचे नियंत्रण व्यवस्थापन करणेकरीता जुने प्रसादालय इमारतीमध्ये मुख्य् नियंत्रण कक्ष, विविध ठिकाणी १० वाहनतळे/ माहिती केंद्रे तसेच ०२ उदघोष्णा कक्ष (Announcement Centre) तात्पुरती वॉटर प्रुफ निवासी मंडपासाठी निश्चित करणेत आलेले आहेत.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी टंचाई/कार्या/आपत्ती व्यवस्थापन /१९/६३३/२०१५ अहमदनगर दि.१७/०८/२०१५ रोजीचे आदेशानुसार शासकीय अधिकाऱ्यांचे खालील तारखांना एकत्रित कामाचे नियोजन करण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| अ.नं. | शाही स्नान | मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचे आदेशान्वये निश्चित डयुटी कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|
| ०१ | प्रथम शाहीस्नान – नाशिक | दिनांक २८/०८/२०१५ ते दिनांक ३१/०८/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०२ | व्दितीय शाहीस्नान – नाशिक | दिनांक १२/०९/२०१५ ते दिनांक १५/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०३ | तृतीय शाहीस्नान – नाशिक | दिनांक १७/०९/२०१५ ते दिनांक २०/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| ०४ | तृतीय शाहीस्नान (त्रिंबकेश्वर) | दिनांक २४/०९/२०१५ ते दिनांक २७/०९/२०१५ अखेर | ०४ दिवस |
| | | **एकुण दिवसांचा कालावधी** | **१६ दिवस** |

**व्दारावती विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये १ ए.सी. रुमकरीता ३ व्यक्तीसाठी रुपये- ९००/- इतका सेवा आकार आहे. शासकीय सेक्कटर अधिका-यांना प्रती दिन ६ ए.सी. रुम दिल्यास रुपये- ५,४००/- इतका खर्च प्रति दिन येईल. तसेच प्रत्येक शाहीस्नानसाठी ४ दिवसाकरीता रुपये-२१,६००/- इतका खर्च येत असून चार शाही स्नानासाठी १६ दिवसाकरीता रुपये-८६,४००/- ( अक्षरी रुपये- श्याऐंशी हजार, चारशे ) इतका खर्च अपेक्षित आहे. सदरच्या खोल्या विनामुल्य् दिल्यास सेवा आकार संस्थानला जमा होणार नाही.

मा.जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचे आदेशानुसार उपरोक्त् निश्चित केलेल्या तारखांना सिंहस्थ् कुंभमेळा-२०१५ चे चार पर्वणी कालावधीत सोबतचे आदेशातील १३ शासकीय सेक्कटर अधिका-यांना निवासासाठी व्दारावती भक्तनिवासमध्ये ६ ए.सी. रुम विनामुल्य् देणेस व होणारा खोल्याचा सेवा आकार रुपये- ८६,४००/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३४६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ मधील पर्वणी कालावधीत सेक्टर ऑफीसर यांना व्दारावती भक्तनिवासमध्ये निवासासाठी ६ ए.सी.रुम विनामुल्य देण्यात आलेल्या होत्या. याकामी रु.८६,४००/- मात्र खर्च झालेला असून त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, द्वारावती भक्तनिवास)

---

विषय नं.२८ **सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेंटनन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी येणा-या वार्षीक खर्चास व दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना देणेकामी मा.न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) " भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

**प्रस्तावना**:- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे तरतुदीनुसार साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी एकूण १५३६ खोल्या कार्यरत असून, या ठिकाणी साईभक्तांना चांगल्या दर्जाची निवासव्यवस्था मिळावी यासाठी मा.त्रीसदस्य व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयानुसार येथील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लंबिग, इ. मेंटनन्स/स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेतली जात आहे. या चांगल्या निर्णयामुळे या विभागात येणा-या साईभक्तांना चांगल्या प्रकारची सुविधा पुरविण्यात येत आहे/दिली जात आहे.

मा.त्रीसदस्य व्यवस्थापन समिती दि.२५/०९/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१३ तसेच मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेने व जा.नं.एसएसएस/वशी-साईआश्रम भक्तनिवास/ ५९६१/ २०१५ दि.०४/०३/२०१५ चे कार्यादेशानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मे.बी.व्ही.जी इंडिया लि.पुणे यांना खालील कोष्टकात दर्शविलेप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेला आहे.

| मनुष्यबळ संख्या | स्वच्छता कामी मशिनरी संख्या | इतर साहीत्य | विभाग | उपकरणे | दरमहा सर्व करांसह रक्कम रु. | वर्षाला रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ५३६ | ७८ | १६१ | विद्युत | २१ | ६४,७५,५९९/- | ७,७७,०७,१८८/- |
| | | | बांधकाम (गवंडी/सुतारी) | १५४ | | |
| | | | पाणी पुरवठा (प्लंबिंग) | ५४ | | |

**प्रस्ताव**:- या कामी नव्याने ई-निविदा सूचना जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया करावी लागेल. यासाठी, मागील वर्षाच्या रु.७,७७,०७,१८८/- या रकमेमध्ये अंदाजे १०% ची वाढ गृहित धरुन रु.८,५४,७७,९०७/- रक्कम होते, या रकमे ऐवजी रु.८,५५,००,०००/- एवढ्या पुर्णांकित रकमेच्या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगबाद खंडपीठ यांचेकडे, संस्थानचे विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन सादर करुन, मान्यता आल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबवावी लागेल.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय**:- यासाठी

१) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठीच्या हाऊसकिपींग ई-निविदा प्रक्रियेव्दारे, नविन ठेकेदाराची नेमणुक होईपर्यंत, आहे त्याच अटी/शर्तीवर संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला मुदतवाढ देणेस व दरम्यानच्या कालावधीत दरमहा रु.६४,७५,५९९/- या येणा-या खर्चास,

२) सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग कामासाठी रु.८,५५,००,०००/- या रकमेच्या खर्चास,

३) त्याकामी दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना देण्यास,

याप्रमाणे उपरोक्त ३ बाबींवर संस्थानचे वकीलामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे, औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घ्यावी लागेल. यासाठी सदरचा विषय मा.त्रीसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर

निर्णय क्र.३४७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग, विद्युत, प्लबींग इ. मेंटनन्स/ स्वच्छता कामे आऊटसोर्सिंग पध्दतीने करुन घेणेकामी येणा-या वार्षीक खर्चास व दैनिक वर्तमानपत्रात ई-निविदा सूचना देणेकामी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच मा.उच्च न्यायालयाचे मंजूरीनंतर ई-निविदाप्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम भक्तनिवास/ विधी अधिकारी)

---

विषय नं.२९ **मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संस्थानची सफाई व्यवस्था व सफाई कर्मचा-यासंबंधी दि.१६/०९/२०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.**

प्रस्ताव- राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे दि. ११/०९/२०१५ चे पत्रानुसार मा. श्री. विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग यांचे दौरा कार्यक्रमानुसार दि.१६/०९/२०१५ रोजी दुपारी १२-०० वाजता साईनिवास (लेंडीबागे जवळील) येथे शिर्डी संस्थान सफाई व्यवस्था व

सफाई कर्मचा-यांसंबंधी सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेस मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, खाते प्रमुख, अधिक्षक व सफाई कर्मचारी आदि उपस्थित होते.

सभेचे प्रारंभी मा. जनसंपर्क अधिकारी, श्री. मोहन सादव साहेब यांनी मा. श्री. विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचा परिचय करुन दिला त्यानंतर मा. कार्यकारी अधिकारी श्री. बाजीराव शिंदे साहेब व उपकार्यकारी अधिकारी, श्री. आप्पासाहेब शिंदे साहेब यांनी मा. श्री. विजय कुमार यांना आपला परिचय करुन दिला तसेच उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी आपापला परिचय मान्यवरांना करुन दिला. परिचयाचा कार्यक्रम झालेनंतर मा. श्री.विजय कुमार यांनी सफाई कर्मचारी आयोगाचे उद्देश उपस्थितांना सांगितले व प्रधानमंत्री भारत स्वच्छ अभियानबाबत माहिती दिली. प्रत्येक ३ महिन्याला एकदा सभा घेवून सफाई कामगारांच्या समस्या समजावून घेणेबाबत सांगितले. त्यानंतर दिनांक १८/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्ताबाबत विचारणा केली व सभेमध्ये पुढील प्रमाणे आदेश/सुचना करण्यात आल्या.

- सफाई कर्मचा-यांची वैद्यकीय तपासणी दर तिन महिन्याला करण्यात यावी. सदरची कार्यवाही १५ दिवसाचे आत करण्यात यावी व त्याचा अहवाल आयोगास पाठवण्यात यावा.
- सफाई कर्मचा-यांना साफसफाईचे काम करताना आरोग्य रक्षणासाठी हॅण्ड ग्लोज, मास्क, गमबुट, रेनकोट देणेबाबतची कार्यवाही १० दिवसाचे आत करण्यात यावी. तसेच हॅण्डग्लोज घालून काम करता येते किंवा नाही यासाठी दोन अधिका-यांची कमेटी नेमून अहवाल घ्यावा व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
- सर्व सफाई कर्मचा-यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर योजनेअंतर्गत मालकी हक्काचे निवासस्थान बांधून देणेबाबत त्वरीत कार्यवाही करणे. व कार्यवाहीची प्रत आयोगास पाठवावी.
- संस्थानने सफाई कर्मचा-यांसाठी ड्रेस चेंजिंग रुम तयार करावी त्याठिकाणी लॉकर सुविधा तसेच बाथरुम, वॉशबेशीनसह तेल, साबण आदी साहित्य पुरविण्यात यावे. चहा-बिस्कीटाची व्यवस्था करण्यात यावी सदरची कार्यवाही एक महिण्याचे आत करुन वाटल्यास चेजिंग रुमचे उदघाटनास आयोगास निमंत्रित करावे.
- आज दि. १६/०९/२०१५ रोजीचे सभेपासून २० दिवसात झालेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास कळविणे.
- कायम कर्मचा-यांना देण्यात येत असलेला शैक्षणिक फी परतावा कंत्राटी सफाई कामगारांना देणेबाबतची आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.
- सफाई कर्मचा-यांच्या मुलांसाठी सार्वजनिक संगोपन केंद्र सुविधा करण्यात यावी.
- मयत सफाई कर्मचा-यांचे वारसास अनुकंपा तत्वावर संस्थान सेवेत घेणेबाबत जी प्रकरणे प्रलंबित आहेत अशी प्रकरणे १५ दिवसाचे आत निकाली काढण्यात यावीत.
- सफाई कर्मचा-यांना शैक्षणिक पात्रता व सेवा जेष्ठतेनूसार पदोन्नती देणे तसेच ज्या सफाई कर्मचा-यांची १० वर्षापेक्षा जास्त सेवा आरोग्य विभागात झाली त्यांना हलक्या स्वरुपाचे काम देण्यात यावे.
- प्रत्येक सफाई कर्मचा-यास साफसफाईसाठी किमान क्षेत्रफळ द्यावे. याबाबत नियमाप्रमाणे क्षेत्रफळ निश्चिती करुन कर्मचा-यास काम द्यावे. क्षेत्रफळाप्रमाणे कर्मचारी संख्या कमी पडत असल्यास कर्मचारी संख्या वाढवावी तसेच गर्दीचे कालावधीत जास्तीची कर्मचारी संख्या वाढवणेबाबत कार्यवाही करावी.
- कंत्राटी कर्मचा-यांना मिळणारे वेतन, वेतनातील वजावटीबाबत पे-स्लीप देण्यात यावी.
- एका वर्षात २४० दिवस सेवा झालेल्या कंत्राटी सफाई कर्मचा-यास संस्थान सेवेत कायम करण्यात यावे.
- सफाई कर्मचा-यांना त्यांचे मुलामुलींचे विवाहास आर्थिक मदतीसाठी कमी व्याजदरात कर्ज सुविधा उपलब्ध करुन त्याचे पगारातून कमीतकमी हप्त्याने रककम वसुल करण्यात यावी.
- ड्रेनेज व सेप्टीक टॅक साफसफाईचे कामासाठी संस्थानकडे प्रत्येकी एकच मशीन आहे तरी मशीनची वाढवण्यात यावी.

यानंतर मा. श्री. विजय कुमारजी यांनी सफाई कामगारांना आपल्यापैकी ज्यांचे कांही प्रश्न असतील त्यांनी विचारावेत असे आवाहन केले. त्यास अनुसरुन सफाई कर्मचा-यांनी प्रश्न विचारले असता सदस्य मा. श्री. विजय कुमारजी यांनी त्याबाबत सुचना खालीलप्रमाणे केल्या.

प्रश्न– ड्युटीवर असताना कामगारास अपघात झाल्यास नुकसान भरपाई देणेबाबत

ड्युटीवर असताना कामगारास अपघात झाल्यास वैद्यकीय खर्च संस्थानने करावा १ लाखापर्यंत आर्थिक मदत द्यावी. जास्त गंभीर असल्यास जास्त मदत करण्यात यावी.

प्रश्न- समान काम समान वेतन देणेबाबत कंत्राटी कर्मचा-यांनी मागणी केली

प्रश्न- सफाई कर्मचा-यांना शुभ्र रेशन कार्ड देण्यात आलेले आहेत. सर्व सफाई कर्मचा-यांना पिवळे रेशन कार्ड (BPL) देण्यात यावे.

प्रश्न- सफाई कर्मचा-यांना सफाई कामगार असा हुद्दा न देता मदतनिस असा हुद्दा देण्यात आलेला आहे.

प्रश्न- कंत्राटी कर्मचा-यांचा प्रॉव्हीडंट फंडा ठेकेदारामार्फत भरला जातो. तो संस्थानने भरावा.

कंत्राटी कर्मचा-यांना मिळणारे वेतन, वेतनातील वजावटीबाबत पे-स्लीप देण्यात यावी.

शेवटी मा. श्री. विजय कुमार यांनी उपस्थितांचे आभार मानले व सभा समाप्त करण्यात आली.

मा. श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संस्थानची सफाई व्यवस्था व सफाई कर्मचा-यांसंबंधी दि. १६/०९/२०१५ रोजी लेंडीबागेतील सभागृहात झालेल्या सभेचे इतिवृत्त अवलोकनार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.३४८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या संस्थानची सफाई व्यवस्था व सफाई कर्मचा-यासंबधी दि.१६/०९/२०१५ रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्ताचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.**

**तसेच मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी केलेल्या सुचनांसंदर्भात कार्यवाही चालू करणेत येऊन, तसे त्यांच्या कार्यालयास अवगत करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.३० **मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग,भारत सरकार,नवी दिल्ली यांचे सुचनांप्रमाणे सफाई कर्मचा-यांना युनीफार्म चेजिंग रुम तयार करुन त्याठिकाणी लॉकर, वॉशबेसीनसह बाथरुम सुविधा करणेबाबत.**

प्रस्ताव- दि. १८/०३/२०१५ रोजी दुपारी ०२-०० वाजता साईनिवास (लेंडीबागे जवळील) येथे मा. श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची सफाई कर्मचा-यांचे नियुक्ती व पदोन्नतीबाबत मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, खाते प्रमुख, अधिक्षक व सफाई कर्मचा-यांचे उपस्थितीत सभा संपन्न झाली. सभेमध्ये मा. श्री. विजय कुमार, यांनी निर्देश दिले की, सफाई कर्मचारी हे सामान्य नसून स्वास्थ्य सैनिक आहेत. त्यांची वैद्यकिय तपासणी प्रत्येक तीन महिन्यात करण्यात यावी, सफाई काम करतांना मास्क, गमबुट, हॅंडग्लोज वापरणे सक्तीचे करावे, सफाई कर्मचा-यांना सरकारी जमीन घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर निवास योजनेअंतर्गत घरे देण्यात यावीत, कर्मचा-यासाठी युनीफॉर्म चेंजिंग रुम तयार करण्यात यावा, त्याठिकाणी लॉकर सुविधा तसेच बाथरुम, वॉशबेशीनसह तेल, साबण आदी साहित्य पुरविण्यात यावे असे सुचविले आहे. याबाबत इकडील दि. २४/०३/२०१५ ने सभेचे इतिवृत्त सादर करण्यात आले त्यावर बैठकीतील सुचनांचा सविस्तर प्रस्ताव सादर करावा असे निर्देशित केले आहे.

सध्या आरोग्य विभागाकडे एकुण १६० कायम कर्मचारी + २१६ कंत्राटी अकुशल कर्मचारी आहेत. त्यांची वैद्यकिय तपासणी प्रत्येक तीन महिन्यास करता येईल. त्यासाठी वैद्यकिय संचालक यांना पत्राने कळविता येईल. तसेच या विभागाकडील ३७६ कायम+ कंत्राटी कर्मचा-यासाठी युनीफॉर्म चेंजिंग रुम तयार करुन त्याठिकाणी लॉकर, वॉशबेशीनसह बाथरुम, सुविधा करावयाच्या झाल्यास त्यासाठी अंदाजे किती खर्च येईल याबाबत बांधकाम विभागास माहिती मागविली असता बांधकाम विभागाने दि. १६/०६/२०१५ रोजी कळविले की, आरोग्य विभागाचे कर्मचा-यांस युनीफॉर्म चेंजिंग रुमसाठी साईउद्यान इमारतीचा वापर करता येईल. त्याठिकाणी इमारतीचे पुर्वीचे वॉशबेशीनसह बाथरुम आहेतच त्याचाही वापर कर्मचा-यांना करता येईल. कर्मचा-यांना लॉकर सुविधेकामी 3 फूट रुंदीचे 1'-6'' खोली असलेले 6' उंची या साईजचे कपाट बसवता येईल. सदर कपाटात रुंदी 1'-6'' खोली 1'-6'' व उंची 1' या साईजचे 12 लॉकर असलेले कपाट खेरदी करता येतील ३७६ कर्मचा-यांसाठी ३१ लॉकर कपाटे खेरदी करावे लागतील त्यासाठी १४०००/- प्रती लॉकर खेरदी कामी ३१ x १४००० = ४,३४,००/- मात्र इतका खर्च अपेक्षित असल्याचे बांधकाम विभागाने कळविलेले आहे.

तसेच ३७६ कर्मचा-यांना तेल व साबण पुरविणेकामी प्रति माह प्रति कर्मचारी रु. ५० प्रमाणे ३७६x५० = १८८०० प्रमाणे १ वर्षासाठी २,२५,६००/- इतका खर्च येईल.

या विभागाकडील ३७६ कर्मचा-यांना बांधकाम विभागाचे पत्राप्रमाणे साईउद्यान इमारतीमध्ये लॉकर, तेल व साबण सुविधेकामी अंदाजे रु. ४,३४,००० + २,२५,६०० = ६,५९,६००/- (अक्षरी रुपये सहा लाख एकोणसाठ हजार सहाशे मात्र) इतका खर्च येईल.

त्यासाठी बजेट तरतूद करावी लागेल तसेच सदरची खेरदी खरेदी विभागामार्फत विहित पध्दतीने करावी लागेल.

तरी या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णय क्र.३४९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.श्री.विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे सुचनांप्रमाणे सफाई कर्मचा-यांना युनीफार्म चेजिंग रुम तयार करुन त्याठिकाणी लॉकर, वॉशबेसीनसह बाथरुम सुविधा करणेस व याकामी येणा-या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याठिकाणी साबणाचा वापर करणेऐवजी लिक्वीड सोपचा वापर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.३१ **सफाई कर्मचा-यांची मोफत वैद्यकीय तपासणी करणेबाबत.**

प्रस्ताव- दि. १६/०९/२०१५ रोजी दुपारी १२-०० वाजता साईनिवास (लेंडीबागे जवळील) येथे मा. श्री. विजय कुमार, सदस्य, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची सफाई कर्मचा-यांबाबत मा.कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, खाते प्रमुख, अधिक्षक व सफाई कर्मचा-यांचे उपस्थितीत सभा संपन्न झाली.

सभेमध्ये मा.श्री.विजय कुमार, यांनी निर्देश दिले की, सफाई कर्मचारी हे सामान्य नसून स्वास्थ्य सैनिक आहेत. त्यांची वैद्यकिय तपासणी प्रत्येक तीन महिन्यात करण्यात यावी. सदरची कार्यवाही १५ दिवसाचे आत करण्यात यावी असेही सांगितले आहे.

सध्या आरोग्य विभागाकडे कायम कर्मचारी १५५ + कंत्राटी अकुशल कर्मचारी २१५ + कंत्राटी कुशल कर्मचारी ०५ असे एकुण ३७५ कर्मचारी आहेत. संस्थान कायम कर्मचा-यांना विनाशुल्क वैद्यकीय सुविधा देण्यात येत आहे. तसेच कंत्राटी कर्मचा-यांना ठराविक मर्यादेपर्यंत विनाशुल्क वैद्यकीय सुविधा देण्यात येत आहे. आयोगाचे सुचनेनुसार त्यांची वैद्यकिय तपासणी संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पीटल येथे प्रत्येक तीन महिन्याला करावयाची असल्यास त्यासाठी खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

| अ.नं. | रुग्णालयाचे नाव | प्रति कर्मचारी तिमाही खर्च | कायम/कंत्राटी कर्मचारी संख्या | एकुण कर्मचारी तिमाही खर्च | एकुण कर्मचारी वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री साईनाथ रुग्णालय | ३४२ | ३७५ | १२८२५०/- | ५१३०००/- |
| २. | श्रीसाईबाबा हॉस्पीटल | ८९५ | ३७५ | ३३५६२५/- | १३४२५००/- |

आरोग्य विभागाकडे कायम, कंत्राटी एकुण ३७५ कर्मचारी आहेत. त्यांची वैद्यकिय तपासणी प्रत्येक तीन महिन्याला करावयाची असल्यास संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय येथे अंदाजे रु.५१३०००/- इतका वार्षिक खर्च येईल व श्रीसाईबाबा हॉस्पीटल येथे केल्यास अंदाजे रु.१३४२५००/- इतका वार्षिक खर्च येईल. श्री साईबाबा हॉस्पीटल पेक्षा श्री साईनाथ रुग्णालय येथे खर्च कमी येईल.

आरोग्य विभागाकडील कायम, कंत्राटी एकुण ३७५ कर्मचा-यांची वैद्यकिय तपासणी प्रत्येक तीन महिन्याला करावयाची असल्यास संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय येथे अंदाजे रु.५१३०००/- इतका वार्षिक खर्च येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३५० **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थानमधील आरोग्य विभागाकडे कार्यरत असणा-या कायम व कंत्राटी सफाई कर्मचा-यांची प्रत्येक तीन महिन्याला श्री साईनाथ रुग्णालयामध्ये मोफत वैद्यकिय तपासणी करणेत यावी. याबाबत सर्व सफाई कर्मचा-यांना परिपत्रकाद्वारे सूचित करणेत यावे.**

**तसेच याकामी येणा-या अंदाजे रु.५,१३,०००/- मात्र वार्षिक खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, आरोग्य विभाग)

---

विषय नं.३२ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील कलम नं १७ (१) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे. राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थाच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदीरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्नकामी लावणे. ही समितीची कर्तव्य असतील.

२१(१)(ख) रुढी व प्रथानुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा-अर्चा, समारंभ व उत्सव अयोजित करणे व पार पाडणे अशी तरतूद आहे.

| अ.न | तपशिल | उत्सवासाठी करावयाची तयारी व कामे |
|---|---|---|
| १. | उत्सव निमंत्रण पत्रिका व प्रसाद | संस्थान व्यवस्थापना मार्फत पूर्वापार चालत आलेल्या प्रथेप्रमाणे भक्तमंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका व उदीप्रसाद पाठवावा लागतो.यंदाचे श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १,८१,५०० निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतील.<br>तसेच नेहमीप्रमाणे निमंत्रण पत्रिका व उत्सवासंबधीत माहिती प्रेस नोट म्हणून वर्तमान पत्रामून जनसंपर्क कार्यालया मार्फत प्रसिध्दी देण्यात येईल. |
| २. | उत्सव व्यवस्था | **अ) कलाकर कार्यक्रम** |
| | बुधवार,दि.२१/१०/२०१५ ( प्रारंभ दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | गुरुवार,दि.२२/१०/२०१५ (मुख्य दिवस) | १. सायं. ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर<br>२. रात्रौ. ११.०० ते सकाळी ५.०० पर्यत कलाकारांची सेवा, हजेरी कार्यक्रम.<br>या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे राहिल. |
| | शुक्रवार,दि.२३/१०/२०१५ (सांगता दिवस) | सायंकाळी ७.३० ते रात्रौ.१०.३० पर्यत निमंत्रित कलाकारांचा कार्यक्रम साईनगर मैदान स्टेजवर |
| | | **ब) कीर्तन कार्यक्रम** |
| | बुधवार,दि.२१/१०/२०१५ते शनिवार,दि.२३/१०/२०१५ या कालावधीत नेहमीच्या वेळेप्रमाणे कीर्तन कार्यक्रम होतील. | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवासाठी तीन दिवस कार्यक्रम ठेवावयाचा आहे.<br>निमंत्रीत कीर्तनकारांची व कलाकारांची निवासव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात येईल. निमंत्रीत कीर्तनकारांचे व कलाकारांचे मानधन मंदीर विभागामार्फत अदा करण्यात येईल. कीर्तनकार निश्चिती करावयाची आहे. |

| | | |
|---|---|---|
| | **क) विविध पुजा व आराधना विधी** | |
| | बुधवार,दि.२१/१०/२०१५ ते शनिवार,दि.२३/१०/२०१५ | भिक्षा झोळी मिरवणूक, त्यात सहभाग, पालख्या व रथ मिरवणूक आराधना विधी, विणा व पोथी त्यातील सदस्यांचा सहभाग, सिमोल्लंधन इ. कार्यक्रम नेहमीचे प्रथेप्रमाणे करण्यात येतील. |
| ३. | अखंड पारायण व्यवस्था | उत्सव काळात बुधवार,दि.२१/१०/२०१५ रोजी सकाळी ५.१५ वा श्री व्दारकामाई मंदीरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल.<br>दि.२२/१०/२०१५ रोजी सकाळी ५.०० वा पारायण समाप्ती होईल. मा. त्रिसदस्य समितीचे सदस्य पहिले ०३ अध्याय वाचतील व राहिलेले ५० अध्याय प्रत्येकी ऐक असे ५० साईभक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.२०/१०/२०१५ रोजी अनाऊंसमेंट सेंटर मधील मंदीरविभगातील कर्मचारी यांचे कडे नोंदवीले जातील. त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तांस प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.<br>या उत्सवात पोथी, वीणा,प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपुजा या कार्यक्रमा करीता मा.त्रिसदस्य समितीचे सदस्य उपस्थित राहातील. |
| ४. | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक.२१/१०/२०१५ रोजी श्रींचे पालखीचे गावांतून रात्रौ. ९.१५ वा मिरवणूक होईल. दि.२२/१०/२०१५ रोजी रात्रौ. ९.१५ वा रथाची गावातून मिरवणूक होईल. |
| ५. | कार्यक्रम सांगता | काल्यांचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रीत कीर्तनकार करतील. |
| ६. | श्री साईसत्यव्रत पुजा व अभिषेक पुजा | उत्सव काळात बुधवार,दि.२१/१०/२०१५ ते शनिवार,दि.२३/१०/२०१५ अखेर श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण पुजा) व अभिषेक पुजा बंद राहतील. |
| ७. | विद्युत रोषणाई | समाधी मंदीर, व्दारकामाई, चावडी, गुरुस्थान व मंदीर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री पुण्यतिथी उत्सवात व्दारकामाई मंडळ,मुंबई ,विनामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात.त्यांची शिर्डी येथे निवास, भोजन,चहा<br>व नाष्टयाची व्यवस्था संस्थान मार्फत विनामुल्य करण्यात येते.मात्र ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्याची प्रथा आहे. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ८. | गाव जेवण | उत्सवाच्या सांगतादिनी नेहमीप्रमाणे गावजेवण देण्यात येईल. |
| ९ | प्रसाद- भोजन व्यवस्था | उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नसह रु.१०/- या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.त्रिसदस्य समितीचे सदस्यांचे कुटंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्ती, निमंत्रीत कलाकार,पोलिस कर्मचारी, उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणारे व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र केली जाईल.साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकीटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इ. कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवशी मिष्टान्न प्रथा नेहमीचे दराने देण्यात येईल. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पालखीधारकांना आलेल्या दिवशी एकवेळचे जेवण संस्थान मार्फत कुपन्स वाटुन दिले होते. त्यानुसार श्री पुण्यतिथी उत्सवांत येणा-या पालखी धारकांना एकवेळचे जेवण संस्थान मार्फत कुपन्स वाटुन द्यावयाचे आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात सन -२०१५ तीनही दिवसांवे मिष्टांन्न पदार्थ बुंदी ठेवण्यात आली होती. या उत्सवात तीनही दिवसात मिष्टान्न म्हणून बुंदी देता येईल. |
| १०. | संरक्षण विभाग | उत्सव काळात समाधी मंदीर व मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना तसेच कार्यक्रमासाठी ध्वनीक्षेपन परवानगीबाबत मा.पोलिस निरिक्षक, शिर्डी यांना विनंती करण्यात येईल. |
| ११. | लेखाशाखा | उत्सवाचे मुख्य दिवशी मंदीर रात्रभर उघडे असल्याने देणगीकाऊंटर तीन शिप्टमध्ये ठेवण्यात येतील.<br>श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूची प्रसाद रुपाने विहीत पध्दतीने विक्री करण्यात येईल. |
| १२. | बांधकाम | उत्सव कालावधीत समाधी मंदीर परिसरात व इतर ठिकाणी तसेच आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व कलाकारांसाठी स्टेज इ.व्यवस्था करावयाची आहे. |
| १३. | जादा कंत्राटी कर्मचारी | उत्सवाचे पुर्वतयारी करणेकामी व उत्सव पार पाडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकते नुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी कामगार अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छानणी करुन योग्य ते आदेश पारीत करतील. |

| | | |
|---|---|---|
| १४. | भक्तांची प्रासंगिक निवास व्यवस्था | संस्थानचे साईआश्रम भक्तनिवासस्थान, साई धर्मशाळा,व्दारावती, साईबाबा भक्त निवासस्थान इ. इमारतीमधून पालखी पदययात्री व भक्तांची निवास व्यवस्था करण्यात येईल |
| १५. | रुग्णालय व्यवस्था | संस्थान मार्फत मंदीर परिसर,पिंपळवाडी रोड दर्शन रांग व श्री साई प्रसादालय याठिकणी प्रथमोपचार केंद्र सुरु करण्यात येतील. तसेच सुसज्य अशी रुग्णवाहिका मंदीर परिसरासत ठेवण्यात येईल. |
| १६. | पालखी व्यवस्था | श्री पुण्यतिथी उत्सवात ब-याच ठिकाणाहून पालख्या येत असतात,उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था साईधर्मशाळा मध्ये करण्यात येईल. येणा-या पालख्यांचा तक्ता अलहिदा सादर केला जाईल. पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर ०१ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येते.त्यानुसार यावर्षीही १ वेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येईल. |
| १७ | पाणी पुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहील याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १८ | खर्चाचे अंदाजपत्रक | श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१४ मध्ये अंदाजपत्रकीय रक्कम रु. ५३,८२,०००.०० इतक्या रक्कमेस मंजुरी देण्यात आली होती. प्रत्यक्षात रु. ३३,९४,९१९.०० इतका खर्च झालेला आहे.<br>श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१५ करीता विविध विभागांची एकुण अंदाजपत्रकीय रक्कम रु.५२,४६,२००.०० मंजुरीसाठी सादर केले आहे. |

**आराधना विधी बाबत टिपणी- मा. त्रिसदस्यीय समितीचे दि.०५/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३९४**

"आराधना विधी समाधी मंदिराच्या पहिल्या माळयावर आहे. त्याचठिकाणी करण्यात यावा.सदरहू आराधना विधीचे थेट (Live telecast) टिव्हीवर व इतर माध्यामांना करणेस यावे.यामुळे मंदीर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल. समाधी मंदीर परिसरातील दूरचित्रवाणीच्या संचावर व संपुर्ण जगात देखील भक्तांना हा सोहळा बघता येईल समाधीमंदिर ( बुटी वाडयास १०० वर्ष झाल्याने जुनी वास्तू झाली आहे. त्यामुळे गावकरी व इतर यांची वर्दळ वरती बंद करुन लाईव्ह दर्शन देणेत यावे. आराधना विधीकरीता जे यजमान (पतिपत्नी) यांची प्रसाद भोजनाची व्यवस्था मंदिराचे पहिल्या माळयावर हॉल येथे करणेत यावी त्यांचे शिवाय इतरांना समाधी मंदीर हॉलवर प्रवेश नसावा. जे भोजन यजमान, ब्राम्हण सुवासिनीना दिले जाते.तेच शाहीभोजन गावकरी व मान्यवर यांना श्रीसाई प्रसादालयच्या व्ही.आय.पी हॉलच्या बाजूला असलेल्या दोन हॉलमध्ये ठरावीक वेळेत देणेत यावे-व्यवस्था करण्यात यावी. या दिवशी साईभक्त व गावक-यांसाठी श्री साई प्रसादालयामध्ये उत्सवाचे नेहमीचे प्रसादं भोजन संस्थान तर्फे मोफत देण्यात यावे. "

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१४ करीता झालेला खर्च व श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ अपेक्षितखर्च तपशिलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.न | तपशिल | विभाग | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१४ | | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अंदाजे खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | **अंदाजे खर्च** |
| १. | मंडप, कमानी, स्टेज उभारणे खर्च | बांधकाम | ७,३५,०००.०० | ५,२८,५८१.०० | ७,९७,५१५.०० |
| २. | कलाकार , कीर्तनकार बिदागी खर्च | मंदीर | २,५८,०५३.०० | १४,४५६.०० | २,२०,०००.०० |
| ३. | मिष्टान्न खर्च-मजूरीसह, फनिचर भाडेसह खर्च | प्रसादालय | १४,३९,००२.०० | ५,३०,३०१.०० | ९,५७,५८७.०० |
| ४. | विद्युत रोषणाई, जनसेट भाडे, इंधन इ. खर्च | विद्युत | १००००००.०० | ८८२८४२.०० | ९,९५,०००.०० |
| ५. | निमंत्रण पत्रिका, छपाई, स्टिकर, उदीप्रसाद भरणे मजूरी खर्च | वशी-५,८ | १५२५०००.०० | १३१०८५८.०० | ५,००,०००.०० |
| ६. | निमंत्रण पत्रिका पोस्टेज खर्च , | वशी-११ | | | ९,९६,०००.०० |
| ७. | इतर खर्च– (बोर्डे बनविणे, पूजा-अर्चा, इ.) | जनसंर्पक, मंदीर, साईप्रसाद | ५०९४५.०० | ३०००.०० | ४८,४४२.०० |
| ८. | जादा कंत्राटी कर्मचारी, स्वयंसेवक (विदयार्थी ) मानधन खर्च | संरक्षण, कॅन्टीन, साईप्रसाद, सा.भक्तनिवास, मंदीर, प्रसादालय, | ३५००००.०० | १०५१०६.०० | ३,०७,६५६.०० |
| ९. | पालख्यांचे पिण्याचे पाणी व्यवस्था खर्च | पाणीपुरवठा | २४०००.०० | १९७७५.०० | २,२४,०००.०० |
| १० | मंदीर व मंदीर परिसर फुलांची सजावट खर्च | बगीचा | -- | -- | २,००,०००.०० |
| | | **एकुण खर्च** | **५३,८२,०००.००** | **३३,९४,९१९.००** | **५२,४६,२००.००** |

उपरोक्त खर्च तपशिलामध्ये सर्व विभागांचे खर्च वेग-वेगळया हेड खाली दाखविण्यात आलेले आहेत. या मध्ये कोणत्याही विभागाचा/ कार्यासनाचा खर्च रु.१०,००,०००/- (रु.दहा लाख) पेक्षा जास्त नाही. प्रत्येक खर्च तपशिल रु.१०,००,०००/- (रु. दहा लाख) पेक्षा कमी आहे.

श्री गुरुपौर्णिमा उत्सव- २०१५ अंदाजपत्रकांत मध्ये विविध विभागांचा खर्च वेग-वेगळया शिषर्कांखाली येत असल्याने दि.२३/०७/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.३८ अन्वये श्री गुरुपौर्णिमा व श्री साईसच्चरित पारायण सोहळा- २०१५ साजरा करणेस प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे प्रत्येक विभागावार खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ चे अंदाजपत्रकातील खर्चास व इतर कार्यवाहीस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३५१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सालाबादप्रमाणे याही वर्षी श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ साजरा करणेस तसेच उत्सवानिमित्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५२,४६,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ निमित्त येणा-या अंदाजे खर्चास संस्थान वकिलामार्फत तातडीने अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५/ विधी अधिकारी)

---

विषय नं.३३ **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१५ निमित्त कलाकार, किर्तनकार व त्यांची बिदागी निश्चित करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी तर्फे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ बुधवार, दि.२१/१०/२०१५ ते शनिवार,दि.२३/१०/२०१५ असा ०३ दिवस साजरा होणार आहे.

**अ) कीर्तन कार्यक्रम:-** उत्सवात नारदीय पध्दतीने कीर्तनकार्यक्रम होत असतात. मागील श्री गुरुपौर्णिमा उत्सवात ०३ दिवसाचे कीर्तनासाठी रु.९००१/- बिदागी देण्यात आलेली होती. त्याच प्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव-२०१५ या उत्सवासाठी ही कीर्तनकार रु.९००१ /-मानधन देता येईल.

दि.११/९/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र-७५५ "श्रींच्या वर्षातील तीनही उत्सवांकरिता किर्तनकारांचे पॅनल तयार करणेत यावे, त्यामध्ये श्री रामनवमी उत्सवाकरिता सालाबाद प्रमाणे श्रीमद् सदगुरु श्री.दासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे, ता.उमरी, जि.नांदेडयांचे प्रतिनिधी यांना, श्री गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर यांना तसेच ह.भ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा अथवा ह.भ.प. मंदार गंगाधर व्यास यांना श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता कायमस्वरुपी पॅनलवर ठेवण्यात यावे. श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) करिता जर दोन्हीही किर्तनकार उपलब्ध नसतील तर ज्या किर्तनकारांचे अर्ज येतील त्यामधील किर्तनकाराची निवड करणेत यावी.

तसेच यापुढे कलाकारांचे बाबतीत, उत्सवाचे अगोदर अशा प्रकारच्या सेवेची जाहीरात विविध माध्यमाव्दारे प्रसिध्द करणेत येऊन, विनामुल्य कार्यक्रम सेवा सादर करण्यास तयार आहात काय अशा विचारणेसह आपणास किती वेळ उपलब्ध करुन पाहिजे याविषयी अर्जाव्दारे माहिती कलाकारां कडून घेण्यात यावी, असे ठरले." त्यानुसार श्री रामनवमी उत्सव-१५ व श्री गुरुपौर्णिमा उत्सव -१५ साठी खालील कीर्तनकारांना कीर्तनसेवेसाठी निमंत्रित करण्यात आलेले आहे.

| अ.न. | कीर्तनकाराचे नाव | उत्सवाचे नाव |
|---|---|---|
| १. | श्रीमद् सदगुरु श्री.दासगणु महाराज प्रतिष्ठान, गोरटे, ता.उमरी,जि.नांदेड यांचे प्रतिनिधी | श्री रामनवमी उत्सव-२०१५ |
| २. | ह.भ.प.माधवराव तुकारामपंत आजेगांवकर | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ |

श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ साठी ह.भ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा व ह.भ.प मंदार गंगाधर व्यास यांचेशी दुरध्वनीवरुन संर्पक केला असता त्यांनी नवरात्री उत्सवासाठी कार्यक्रम घेतलेले असल्याने ते पुण्यतिथी उत्सवासाठी येवू शकणार नाही असे कळविलेले आहे.

खालील कीर्तनकारांनी श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ मध्ये कीर्तन कार्यक्रम मिळावा म्हणुन संस्थानकडे अर्ज केलेले आहेत. त्यांच्या अर्जाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | कीर्तनकाराचे नाव | शेरा |
|---|---|---|
| १. | ह.भ. प. महेशबुवा काणे,<br>२ / अनिकेत अपार्टमेन्ट, रेल्वेस्टेशन जवळ वालोपे, चिपळून, जि रत्नागिरी | दि. २१/ १०/२०१५ रोजी येवु शकत नाही.<br>दि. २२/१०/२०१५ ते दि २३/१०/२०१५ या कालावधीत कीर्तन करण्यास तयार आहे |
| २. | समीहन चन्द्रशेखर आठवले,<br>दामोदराश्रम , घ न ८७५, खिस्ते गल्ली, गोविंदपुरा, श्री क्षेत्र पंढरपूर, जि सोलापूर<br>०२१८६ – २२३०७५ , ९४२२०६९१५७ | दि. २१/१०/२०१५ ते दि. २३/१०/२०१५ या कालावधीत कीर्तन करणेस तयार आहे. |

अ.क्र ०२ कीर्तनकार समीहन चन्द्रशेखर आठवले, पंढरपूर हे उत्सवासाठी कीर्तन करणेस तयार आहे. या बाबतचा निर्णय मा.त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय घेता येईल.

**ब) कलाकार कार्यक्रम-** पुण्यतिथी उत्सव ०३ दिवसाचा असल्याने किमान ०३ कार्यक्रम आयोजित करावे लागतात. पुण्यतिथी उत्सव-२०१५ चे उत्सवात कार्यक्रम मिळणेकामी खालीलप्रमाणे अर्ज आलेले आहे.

त्यापैकी अ.नं.१ ते ५ यांनी विनामुल्य कार्यक्रम करण्याची मागणी केलेली आहे. अ.नं. ६ यांनी मानधनाची मागणी केलेली आहे.

| अ.नं. | कलाकाराचे नाव | कार्यक्रमाचा तपशिल | कलाकार संख्या | बिदागी |
|---|---|---|---|---|
| १ | एन, रेखा,निलायम अॅकेडमी ऑफ इंडियन डान्स & सेंटर, हैद्राबाद ०९८८५०४५४२९ | कुचीपुडी नुत्य | ८ ते १० | विनामुल्य |
| २ | गुरुदत्त शिरली, गोवा ९६१९५६८३१५ | साई भजन | ६ ते ७ | विनामुल्य |
| ३ | पं. देवरावजी कुळमेथे महाराज, भोरमळा, संभाजीनगर टॅक्शन गेट समोर,एकलहरा रोड, नाशिक ९२२५७३८६५० | साई महिमा गुनगान | ४ ते ५ | विनामुल्य |
| ४ | पं. डॉ. पराग चौधरी, योगीराज संगीत अकादमी, औरगाबाद ८२७५०१२६९१ | भक्तीगीते | ८ ते ९ | विनामुल्य |
| ५ | श्री साई नाटय भारती अॅकेडमी, अन्नाकापल्ले, विशाखापट्टम ९९८९५०८२९७ | भारत नाटयम कार्यक्रम | १५ ते २० | विनामुल्य |
| ६ | महेशप्रसाद रामकृष्ण लिमये, मुंबई (शुभम क्रिएशनस्, मुंबई) ९८२११४३८८४, ९९२०२१४५९५ | स्वरांजली | ९ ते १० | विनामुल्य |
| ७ | डॉ. व्यकेंट नित्य दर्पन, मुसारमबाग, दिलसुखनगर,हैद्राबाद ८१४३६३३३६३ | कुचीपुडी नुत्य | ५ ते ६ | रु.२५,०००/- |

श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१४ मध्ये अ.नं.३ पं. देवरावजी कुळमेथे महाराज यांचा कार्यक्रम सादर झालेला आहे.

श्री पुण्यतिथी उत्सवातील कीर्तन कार्यक्रम हा समाधी मंदीराचे उत्तर बाजूला व निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम हे साईनगर येथील मैदानावर सायं ७.३० ते रात्रौ.१०.३० वाजे पर्यत आयोजित करण्यात येतात. मागील श्रीपुण्यतिथी-२०१४ उत्सव कालावधीत तीन दिवसासाठी प्रत्येकी ०१ या प्रमाणे ०३ कार्यक्रम निश्चित करण्यात आलेले होते.

उपरोक्तप्रमाणे श्री पुण्यतिथी उत्सव -२०१५ करिता संस्थान कडे प्राप्त झालेल्या अर्जामधून कीर्तनकार, कलाकार, यांची निश्चिती करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३५२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.११/९/२०१४ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र-७५५ अन्वये श्री पुण्यतिथी उत्सव (दसरा) मध्ये किर्तनसेवा करणेसाठी ह.भ.प.गंगाधर नरहर व्यासबुवा अथवा ह.भ.प. मंदार गंगाधर व्यास यांना आमंत्रित करणेबाबत ठरलेले आहे. परंतु या पुण्यतिथी उत्सवामध्ये हे दोन्हीही किर्तनकार व्यस्त असल्यामुळे येऊ शकणार नाहीत, असे त्यांनी कळविले आहे. तसेच ह.भ.प. महेशबुवा काणे व समीहन चन्द्रशेखर आठवले यांनी किर्तनसेवा करणेस परवानगी मिळणेबाबत अर्ज केलेले असून ह.भ.प. काणे हे पुर्ण तीन दिवस उपलब्ध रहाणार नाहीत व उत्सवाच्या तीनही दिवस एकाच किर्तनकाराने किर्तनसेवा करावी, अशी पुर्वापार चालत आलेली परंपरा असल्यामुळे या वर्षीच्या किर्तन सेवेसाठी समीहन चन्द्रशेखर आठवले यांना आमंत्रित करणेत यावे व त्यांना तीन दिवसाच्या किर्तन सेवेसाठी रु.९००१/- मात्र बिदागी देण्यात यावी, असे ठरले.**

**तसेच मागील उत्सवाप्रमाणेच याही वर्षी विनामुल्य कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे, त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेल्या अ.नं.०१ ते ०६ विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना सेवा करण्याची संधी देण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

विषय नं.३४ **संस्थानचे विविध विभागांना आवश्यक साहित्य खरेदीकामी केलेल्या कार्यवाहीस व झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अ)** कॅन्टीन विभागाकरीता प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्री करणेकामी संगणकीय कुपन छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.३,५०,०००/- (अक्षरी रु. तीन लाख पन्नास हजार) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०३.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६४९ नुसार मान्यता मिळालेली आहे.

**ब)** पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लम्बींग मेन्टेनन्स मटेरियल खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.७,५१,७७४/- (अक्षरी रुपये सात लाख एक्कावन्न हजार सातशे चौऱ्याहत्तर) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०७.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६७१ नुसार मान्यता मिळालेली आहे.

क) आरोग्य विभागास स्वच्छता साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.९,७८,७५०/- (अक्षरी रु. नऊ लाख, अठ्ठयाहत्तर हजार, सातशे पन्नास) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२८.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८९ नुसार मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त अ, ब, क, या सर्व खर्चास ढोबळ मानाने (अंदाजे) मान्यता मिळालेली आहे. तथापि, प्रत्यक्षात खर्च कमी रकमेचा झालेला आहे.

तथापि, तातडीची व निविदा प्रक्रियेत (दुस-यांदा, तिस-यांदा) उशिर झाल्याने सदरचे खरेदीकामी जनसंपर्क विभागामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेल्या होत्या.

सदरच्या निविदा मा.प्रशासकीय अधिकारी व मा.मुख्यलेखाधिकारी साहेब यांचे समक्ष उघडून तातडीची गरज म्हणून दि. २५.०६.२०१५ रोजीचे मंजूर टिपणीअन्वये पुरवठा आदेश देणेत आलेले होते. सध्या सदरचे पुरवठा आदेशातील साहित्याचा पुरवठा पुर्ण झालेला असून सदरचे खरेदीकामी खालीलप्रमाणे प्रत्यक्षात खर्च झालेला आहे.

| अ.नं. | प्रस्तावांचा तपशिल | मंजूर रक्कम रुपये | प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा विभागाचे साईआश्रम व साई धर्मशाळा येथील प्लम्बींग साहित्य खरेदी | मा.त्रिसदस्य समिती सभा दि. ०७.०८.२०१४ निर्णय क्रमांक ६७१ मंजूर रक्कम रु. ७,५१,७७४/- | ४,३४,१९४/- |
| २ | आरोग्य विभागाकरीता स्वच्छता साहित्य खरेदी | मा.त्रिसदस्य समिती सभा दि. २८.०८.२०१४ निर्णय क्रमांक ६८९ मंजूर रक्कम रु. ९,७८,७५०/- | ६,५५,९७०/- |
| ३ | कॅन्टीन विभागाकरीता प्रसाद लाडू व नाष्टा पाकिटे विक्री करणेकामी संगणकीय कुपन छपाई | मा.त्रिसदस्य समिती सभा दि. ०३.०८.२०१४ निर्णय क्रमांक ६४९ मंजूर रक्कम रु. ३,५०,०००/- | २,२९,५००/- |

संदर्भ क्र. १, २, ३, अन्वये सदरचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जनसंपर्क विभागामार्फत जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली आहे. उपरोक्त अ, ब, क, चे प्रस्तावातील साहित्याची सिंहस्थ कुंभमेळा पर्वणीचे काळात विभागांना तातडीची गरज असल्याने सदरचे खरेदीकामी न्युनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेत आलेले आहेत. व साहित्याचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. उपरोक्त सर्व प्रक्रियेस व पुरवठादारांची बीले (प्रत्यक्षात खर्च झालेल्या रकमेप्रमाणे) लेखाशाखेमार्फत अदा करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता मिळणेस्तव सादर.

निर्णय क्र.३५३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे संस्थानचे विविध विभागांना आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी केलेल्या कार्यवाहीस व त्यासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

विषय नं.३५ **अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११ कलम ३४ अन्वये प्रतिबंधीत केलेला तांदूळ सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी मुक्त केल्यामुळे प्रसादालयाकडे वापरासाठी देणेबाबत.**

प्रस्ताव- अधिक्षक, प्रसादालय, यांनी दि.९/४/२०१५ रोजीचे टिपणीनुसार प्रसादालयात सध्या वापरात असणा-या तांदूळामध्ये अळया, जाळे व बादड आढळून आलेबाबत टिपणी सादर केली होती. सदर टिपणीवर दि.१०/४/२०१५ रोजी तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी "सध्या उक्त तांदूळ वापरुन त्यामध्ये भक्तांना अळया आढळलयास त्यामध्ये तक्रारी होऊन FDA कडून कारवाई होऊ शकते. तसेच प्रसादालयाचा दर्जा, पत याबाबत भक्तांमध्ये संभ्रम/गैरसमज निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या तांदळाचा वापर आज संबंधितासमवेत प्रत्यक्ष चर्चा झाल्याप्रमाणे त्वरित थांबविण्यात यावा व नव्याने करावयाच्या पर्यायी व्यवस्थेबाबत त्वरित कार्यवाही करावी, असे निर्देश दिले होते."

सदर तांदूळ हा दि.६/८/२०१४ ते ३०/९/२०१४ या कालावधीत ३०५० क्विंटल खरेदी केलेल्या सोना मसुरी तांदूळापैकी असून उर्वरित तांदूळ प्रसादालयाकडे वापरण्यात आलेला होता. हा तांदूळ नांदेड येथील भराडीया या व्यापा-याकडून खरेदी करण्यात आलेला होता.

वरील दि.१०/४/२०१५ चे निर्देशाप्रमाणे, सदर तांदूळ वापर थांबविण्यात होता व पर्यायी व्यवस्था खरेदी विभागामार्फत करण्यात आली होती. त्यानंतर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार सदर तांदूळ दि.१५/४/२०१५ व दि.१६/४/२०१५ रोजी सील करण्यात आला होता. दि.१७/४/२०१५ रोजी सहाय्यक आयुक्त, अन्न, अ.नगर यांनी समक्ष शिर्डी येथे भेट देऊन तांदळाच्या साठयाची पाहणी करुन त्यामध्ये जाळी जळमटे व कीड झाल्याचे आढळून आल्याने १७८३ क्विंटल तांदळाचा साठा वापर करण्यास प्रतिबंध केला होता.

अन्न औषध प्रशासन विभागाला इकडील दि.२१/४/२०१५ चे पत्रान्वये सदरच्या तांदूळाच्या साठयावरील कॅप काढणे व राख झटकणे तसेच जाळे जळमटे काढणेबाबत व साठयाबाबत पुढील मार्गदर्शन मिळणेची विनंती केली होती.

सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी दि.२७/४/२०१५ चे पत्रान्वये या कार्यालयाने लावलेले प्रतिबंधाचे आदेश कायम ठेवून संस्थानच्या विनंतीप्रमाणे कारवाई करण्यास मान्यता दिली होती, तथापि, याबाबत संस्थानने हाती घेतलेली कार्यवाही व केलेल्या उपाययोजना इ.बाबत माहिती त्यांना कळविणेबाबतही सूचित केले होते.

त्यानुसार दि.१/५/२०१५ रोजी तांदूळाला धुरीकरणाचे लावलेले अंतर्गत सील काढून कॅप हटविण्यात आल्या होत्या. तसेच दि.२/५/२०१५ रोजी राख व धूळ इ.काढून टाकण्यात आली, दि.३-४/५/२०१५ रोजी गोडाऊन स्वच्छ करण्यात आले ही माहिती श्री.भोसले साहेब, सहाय्यक आयुक्त, अन्न, अ.नगर यांना दूरध्वनीद्वारे देण्यात आली.

सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी दि.८/५/२०१५ चे पत्रान्वये सदर प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ कलम ३४(२) अन्वये मा.अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य यांचे सदर संपूर्ण साठा जनस्वास्थहितार्थ खाण्याकरीता वापरण्यात येऊ नये असे प्रतिबंधात्मक आदेश प्राप्त झालेले आहेत व त्यास अनुसरुन सदर संपूर्ण तांदूळाचा साठा हयावर योग्य प्रक्रिया करुन व उपाययोजना करुन संपूर्ण साठा जाळे जळमटे व कीडे, आळया हयापासून मुक्त झाल्याचे व तो खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण अहवालासह या कार्यालयास सादर करावे असे कळविण्यात येऊन त्यासोबत मा.अन्न सुरक्षा आयुक्त यांचे आदेशाचीही प्रत पाठविण्यात आलेली होती.

त्यानंतर सदर तांदूळाबाबत दि.१३/५/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे दि.१६/५/२०१५ रोजी पुढील कार्यवाहीबाबत कृपया त्वरित चर्चा असे निर्देश होते. त्यानुसार तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.१८/५/२०१५ रोजी सदर तांदूळाची पाहणी करुन पुढील उचित कार्यवाही करणेबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यास अनुसरुन व दि.२१/५/२०१५ रोजी श्री.ए.एस.गुंजाळ, जीटी पेस्ट कंट्रोल, नाशिक यांनी दि.२१/५/२०१५ रोजी केलेले समक्ष पाहणीनुसार व केलेले मार्गदर्शनानुसार प्रायोगिक तत्वावर प्रथम सदर तांदूळ उपनेर मशिनद्वारे स्वच्छ करण्यास सुरुवात केली होती व यामध्ये एकूण ११७६ गोण्या तांदूळ स्वच्छ करण्यात आल्या होता, परंतु त्यामुळे पूर्ण स्वच्छता न झाल्याचे आढळल्याने सदर काम पुढे थांबविण्यात आले.

सदर स्वच्छ केलेल्या तांदूळाबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी प्रथम अन्न व औषध प्रशासन,अहमदनगर, यांचे मार्गदर्शन घेणेबाबत समक्ष निर्देश दिले होते. त्यानुसार इकडील जा.क्रं.एसएसएस/भांडार/१६६३/२०१५ दि.२५/६/२०१५ चे पत्रानुसार मा.सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर, यांचे याबाबत मार्गदर्शनासाठी विनंती केली होती. यावर त्यांनी तांदूळावर केलेल्या प्रक्रिया, उपाय योजनांची तपशीलवार माहिती आणि सदर तांदळाचा साठा हा मानवी खाण्यायोग्य असल्याचे मान्यताप्राप्त NABL विश्लेषण् अहवाल लवकरात लवकर देणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानंतर याबाबत तारांकित प्रश्नही उपस्थित झाला होता, त्यालाही उचित उत्तर देण्यात आले होते. याबाबत संस्थानचे मा.अध्यक्षमहोदय यांनी नं.३४३ दि.१०/७/२०१५ चे पत्रान्वये सदर तारांकीत प्रश्नाचे उत्तर तयार करुन त्याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांशी चर्चा करुन देणेबाबत कळविले होते तथापि मा.अध्यक्षांचे पत्र येण्यापूर्वीच याबाबत सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांना खरेदी विभागाकडून दि.९/७/२०१५ चे पत्रान्वये माहिती कळविण्यात आली होती. त्याचवेळी याकामी सदर तांदूळ स्वच्छ करणेकामी २५-३० दिवसांचा कालावधी वाढवून मिळणेबाबत इकडील पत्र क्रं.१९८८/२०१५ दि.९/७/२०१५ अन्वये विनंती केली होती.

यानंतर बचत गटाकडून तांदूळ स्वच्छ करणेबाबत मा.उप समितीचे दि.२३/७/२०१५ चे सभेतील निर्णय क्रं.२०४ अन्वये रु.४९,९२४/- मात्रचे खर्चास मान्यता घेण्यात येऊन याबाबत बचत गटाकडून कोटेशन्स मागविण्यात येऊन इकडील जा.क्रं.२२८७/१५ दि.२४/७/२०१५ ने याकामी मे.साई केटरर्स महिला स्वयं बचतगट, श्रीरामपूर यांना कार्य आदेश देण्यात आला होता.

सदर बचत गटाने हे काम दि. २७/०७/२०१५ रोजी सुरु करुन दि.१४/८/२०१५ या कालावधीत पूर्ण केले आहे. यानंतर या स्वच्छ केलेल्या तांदूळामधून वेगवेगळे ५ तांदूळाचे नमुने तपासणीकामी फुड हायजीन अॅन्ड हेल्थ लॅबोरेटरी, पुणे या NABL लॅबकडून तपासून घेण्यात आले होते. त्यांनी सदर samples conforms to FSSAI Norms असा अहवाल दि.२२/८/२०१५ रोजी दिला आहे.

सदर अहवाल सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांचेकडे जा.कं.३०८७/२०१५ दि.२९/८/२०१५ अन्वये सादर करण्यात आला होता.

यावर त्यांनी जा.क्रं.असुमाका/२६५४/१५/३ दि.८/९/२०१५ अन्वये काही माहिती मागविली होती. ती त्यांना इकडील जा.नं.३३०७/२०१५ दि.१०/९/२०१५ अन्वये पाठविण्यात आली होती.

याबाबत आज दि.१४/९/२०१५ रोजी मा.सर्वश्री. आर.डी.पवारसाहेब, भोसले साहेब व पवारसाहेब, सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर, यांनी शिर्डी येथे भेट देऊन सदरचे तांदूळाचे १७८३ क्विंटल साठयाची संस्थानच्या पानमळा गोडाऊनमध्ये समक्ष् पाहणी केली, त्यावेळी त्यांनी तांदूळाच्या खरेदी, साठा, खर्च व प्रयोगशाळा तपासणी विषयी माहितीची समक्ष मागणी केली होती.

सदर माहिती त्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भांडार/३३७१/२०१५ दि.१४/९/२०१५ अन्वये समक्ष देण्यात आली.

सदर माहिती प्राप्त झालेनंतर सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर, यांनी त्यांचे पत्र क्रं.असुमाका/२६६७/१५/३ दि.१४/९/२०१५ अन्वये सदर प्रतिबंधित तांदळाच्या साठयाची पाहणी केली असता सदर तांदूळ खाण्यासाठी वापर करण्यास योग्य असल्याचे दिसून आले आहे व त्यानुसार अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व विनियम २०११ कलम ३४(४) अन्वये दि.१७/४/२०१५ रोजीच्या आदेशान्वये प्रतिबंधित केलेला तांदळाचा साठा कायदयाचे कलम ३४(५) अन्वये मुक्त करण्यात येत आहे असे निर्देश दिलेले आहेत व यापुढील वरील बाबींची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, असेही निर्देशित केलेले आहे.

तरी वरील वस्तुस्थिती व नमूद आदेशानुसार सहाय्यक आयुक्त, अन्न औषध प्रशासन, अहमदनगर यांनी प्रतिबंधित केलेला तांदूळाचा साठा मुक्त केल्यामुळे व खाण्यास योग्य असलेमुळे १७८३ क्विंटल तांदूळ प्रसादालयाकडे वापरणेस देणेबाबत मान्यता मिळणेबाबत टिप्पणी सादर केली असता मा. उप कार्यकारी अधिकारी महोदय यांनी खालीलप्रमाणे निर्देश् दिले आहेत.

१. दिनांक १५ व १६.४.२०१५ रोजी केलेला पंचनामा सदोष असून सदर पंचनामा करतेवेळी इतर सरकारी अधिकारी यांचेसमक्ष करणे गरजेचे होते तसेच भांडार प्रमुख यांनाही बोलविणे गरजेचे होते.

२. सदर तांदूळ प्रकरणंबाबत माहिती मा. व्यवस्थपन समितीपुढे वेळोवेळी सादर करणे गरजेचे होते.परंतह तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी हेतु पुरस्सरपणे मा व्यवस्थापन समितीस अंधारात ठेवल्याचे दिसून येते.

३. लेखाधिकारी व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी खरेदी केलेल्या तांदुळाची सर्व बीले अदा केलेली आहेत. म्हणून त्यांची चौकशी होउन पुढील शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी, असे मत आहे.

४. सदर तांदूळ खाण्यायोग्य असलेबाबत अन्न् औषध प्रशासन, अहमदनगर, यांनी दिनांक १४.९.२०१५ रोजी समक्ष पाहणी करुन तो खाण्यासाठी योग्य असल्याचे दिसून आले. तसेच अे नुसार कार्यवाही तात्काळ करता येईल त्यास मान्यता असावी.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.३५४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, नियम व नियमन २०११ कलम ३४ अन्वये प्रतिबंधीत केलेला तांदूळ सहाय्यक आयुक्त, अन्न, अहमदनगर यांनी मुक्त केल्यामुळे प्रसादालयाकडे वापरासाठी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर प्रकरणाबाबत मा.जिल्हाधिकारी सो. तथा समिती सदस्य यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना दि.१८.०९.२०१५ रोजी गोपनीय अहवाल सादर केलेला होता. या अहवालावरुन संबंधीतांनी समितीची पूर्व मंजूरी न घेता चुकीची कार्यवाही, दिरंगाई व हलगर्जीपणा केल्याचे दिसून येते, याकरीता संस्थानचे मुख्यलेखाधिकारी यांचेसह तत्कालीन कार्यकारी अधिकारी व तत्कालीन अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांचेकडून लेखी खुलासे मागविणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, भांडार विभाग/ कामगार अधिकारी)

---

विषय नं.३६ **एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम २०१५-१६ नुतनीकरणाबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक 418 दि.22-23/09/2001 अन्वये दिनांक 01 ऑक्टोबर, 2001 पासून संस्थान कर्मचाऱ्यासाठी एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी योजना लागु करण्यात आलेली आहे. सदर योजनेचे नुतनीकरण दरवर्षी दि. 1 ऑक्टोबर पासून ते 30 सप्टेंबर या एक वर्षाच्या कालावधीकरीता करण्यात येते. मागिल वर्षी मा.व्य.स.निर्णय क्र.772/ दि.11.09.2014 अन्वये रु.5.30 कोटी रक्कम Premium म्हणून भरण्यास मान्यता मिळाली होती. त्यानुसार 30 सप्टेंबर, 2015 अखेर नुतनीकरण करण्यात आले असुन पुढील एक वर्ष कालावधीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. एलआयसी, पुणे यांचेडून दि.08.09.2015 चे ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे रु.2.76 कोटी Premium कळविला आहे. थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे:-

| Sr. | Premium Details | Amount |
|---|---|---|
| 1 | Current Year Contribution | 12,08,48,401.00 |
| 2 | Life Cover Premium | 2,19,51,727.00 |
| 3 | Service Tax | 2,73,242.00 |
| 4 | Additional Contribution to Gratuity Fund | 45,52,021.00 |
| | **Total Amount Payable** | **2,76,25,391.00** |

सदर Premium रक्कम संस्थानचा खर्च नसुन एलआयसी ग्रुप ग्रॅच्युटी योजनेत गुंतवणुक म्हणुन होते व त्यावर वार्षिक 8.85% दराने व्याज जमा होते. अशाप्रकारे 31/03/2015 अखेर ग्रॅच्युटी फंडात रु.39,73,01,549/- इतकी रक्कम जमा असून मागिल वर्षी त्यावर रक्कम रु.3,13,03,307/-इतके व्याज जमा झाले होते. यामधून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यास ग्रॅच्युटी देण्यात येते व मयत झालेल्या कर्मचाऱ्यास त्याच्या उर्वरीत सेवेच्या प्रमाणात क्लेम रक्कम ग्रॅच्युटीफंडाव्यतीरिक्त क्लेम म्हणून प्राप्त होते. तरी सालाबादप्रमाणे एलआयसी, पुणे यांचेकडून कळविलेली Premium रक्कम रु.2,76,25,391/-मात्र एवढी होते. पुर्णांकीत रक्कम रु.2,80,00,000/- (दोन कोटी, ऐंशी लाख) मात्र एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी फंडात RTGS द्वारे वर्ग करण्यास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.३५५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम २०१५- २०१६ नुतनीकरणाबाबतचे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३७ **अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) मूदतवाढ/ नेमणुकीबाबत.**

प्रस्ताव- संस्थानमध्ये दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच आर्थिक व्यवहार व बाबींसंबंधीत केंद्र व राज्य शासनाकडून विविध अर्थविषयक कायदे पारित करणेत येत असून, या अर्थविषयक कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असल्याने वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक्

व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्याच्या दृष्टीने पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या नेमणुका करण्यात येतात.

अशा प्रकारे संस्थान, माहिती व सुविधा केंद्रे आणि रुग्णालये विभागाकरीता अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या नेमणुका करण्यात आल्या होत्या. त्यांचा मागील कालावधीत पुर्ण झाल्याने त्यांना पुढील कालावधी करीता मुदतवाढ आदेश देण्यात आला होता. त्याची सध्यस्थिती व थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | संस्थेचे नांव | लेखापरिक्षण कालावधी | मानधन / फी रु. | सध्यस्थिती | सुधारीत फी मागणी रु. |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. एसएसएएम ॲण्ड कंपनी, पुणे (चार्टर्ड अकौन्टंटस्) (पुर्वीचे नांवः– मे. सुरेश डौले ॲण्ड कंपनी, राहुरी) | दि.०१/०८/२०१४ ते पुढील आदेश होईपर्यन्त | २,४०,०००/- + सेवाकर | फी वाढीअभावी दि.०१/०४/२०१५ पासून काम स्थगित. | ५,००,०००/- +सेवाकर |
| २ | श्री. एन. पी. रेडीज, मुंबई (चार्टर्ड अकौन्टंटस्) | दि.०१/०८/२०१४ ते दि.३१/०७/२०१४ अखेर (मुंबई कार्यालय परकीय चलन) | २५,०००/- /प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती यापैकी जे कमी असेल ते | कामकाज समाधानकारक चालु आहे. | मागील वर्षाप्रमाणे मान्य |
| ३ | मे. अमोल. सी. दातार ॲण्ड असोसिएटस्, पुणे (चार्टर्ड अकौन्टंटस्) | दि.०१/०८/२०१४ ते दि.३१/०७/२०१५ अखेर (चेन्नई सिकंदराबाद व बंगलोर येथील संस्थानची माहिती व सुविधा केंद्रे) | ५०,०००/- + सेवाकर | कामकाज समाधानकारक चालु आहे. | मागील वर्षाप्रमाणे मान्य |
| ४ | श्री. एस. एल. कुलकर्णी, कोपरगांव (चार्टर्ड अकौन्टंटस्) | दि.०१/०८/२०१४ ते दि.३१/०७/२०१४ अखेर (रुग्णालये विभाग) | २,१०,०००/-+ सेवाकर | तथापि काम करण्यास असमर्थत – काम स्थगित | असमर्थ |

मा.व्य.स.निर्णय क्र.५५१/२६.०६.२०१४ अन्वये पुढील आदेश होई पर्यंत अंतर्गत लेखापरिक्षकांना पुढील नेमणुक आदेश देण्यात आला होता. तथापी संस्थान व रुग्णालय विभागाच्या अंतर्गत लेखापरिक्षण संस्थानी फी वाढी अभावी कामकाज स्थिगत केले आहे. मा.व्य.स निर्णय क्र.१०००/२०.११.२०१४ अन्वये पुर्व लेखापरिक्षक नियुक्तीचे वेळी विहीत पध्दतीने वर्तमानपत्रात सक्षम लेखापरिक्षण संस्थांकडून निविदा/दरपत्रके मागवुन एका लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करण्यात येवुन उर्वरीत, पाच लेखापरिक्षण संस्थांचे पॅनल तयार करण्यात आले आहे. अंतर्गत लेखापरिक्षाणाकरीत त्यातील अ.क्र.१ व २ यांना त्यांनी दिलेल्या मानधनावर अंतर्गत लेखापरिक्षण करण्याकरीता तयार असलेबाबत विचारणा केली होती. या दोन्हीलेखापरिक्षाण संस्थाचा प्रतिनिधी समक्ष भेटले पैकी अ.क्र.१ मे.ए.डी. अंजीकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट खारघर, मुंबई यांनी लेखापरिक्षण कालावधीत लेखपरिक्षकाची राहण्याची व प्रसाद भोजनाची सोय संस्थान मार्फत होणार नसल्यास एकुण रु.२,९६,०००/- इतकी मागणी केली, तर मे.के.के.चाणाणी ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट मुंबई यांनी रु.२,९७,५४०/- (सेवाकरासह) या पुर्वी दिलेल्या लेखापरिक्षण फीची मागणी कायम ठेवली. यावेळी पुर्वीचे अंतर्गत लेखापरिक्षक मे. एसएसएएम ॲण्ड कंपनी, पुणे यांनीही पुर्वीचीच रु.५,४७,२००/- इतकी फीची मागणी केली यासर्वांचा सारासार विचार करता मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट खारघर, मुंबई यांना रुग्णालये विभाग रु.१,४८,०००/- व मे.के.के.चाणाणी ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट मुंबई यांना संस्थानकरीता रु. १,४८,०००/- इतक्या वार्षिक फी वर अंतर्गत् लेखापरिक्षक म्हणुन नेमणुक आदेश देता येईल. तसेच याच दराने मागील कालावधीतील अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेता येईल. थोडक्यात अंतर्गत लेखापरिक्षण संस्था व त्यांचे वार्षिक मानधन खालीलप्रमाणे :-

| अ.नं. | संस्थेचे नांव | लेखापरिक्षण कालावधी | मानधन / फी रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.के.के.चाणाणी ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट मुंबई | दि.०१/०४/२०१५ पासुन पुढील आदेश होईपर्यंत | १,३०,०००/- + सेवाकर |
| २ | श्री. एन. पी. रेडीज, मुंबई (चार्टर्ड अकौन्टंटस्) | दि.०१/०८/२०१४ ते दि.३१/०७/२०१४ अखेर (मुंबई कार्यालय परकीय चलन) | २५,०००/- / प्रत्यक्ष झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती यापैकी जे कमी असेल ते |
| ३ | मे. अमोल. सी. दातार ॲण्ड असोसिएटस्, पुणे (चार्टर्ड अकौन्टंटस्) | दि.०१/०८/२०१४ ते दि.३१/०७/२०१५ अखेर (चेन्नई सिकंदराबाद व बंगलोर येथील संस्थानची माहिती व सुविधा केंद्रे) | ५०,०००/- + सेवाकर |
| ४ | मे.ए.डी.अंजीकर ॲन्ड असो.चार्टर्ड अकौटंट खारघर, मुंबई | दि.०१/०४/२०१५ पासुन पुढील आदेश होईपर्यंत (रुग्णालये विभाग) | १,३०,०००/-+ सेवाकर |

तरी उपरोक्त प्रमाणे संस्थान, माहिती व सुविधा केंद्रे व रुग्णालये विभागाकरीता अंतर्गत लेखापरिक्षण संस्थांची नमुद लेलेल्या मानधनावर नेमणुक करण्यास व याच दराने मागील कालावधीचे अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेण्यास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.उप समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.३५६ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, अंतर्गत लेखापरिक्षक (Internal Auditor) ची निवड कशाच्या आधारे करण्यात आलेली आहे, लेखापरिक्षकांचे मागील वर्षीचे मानधन किती होते व सध्याचे दर किती आहेत. तसेच त्यांच्या कामाचे ठिकाण यासह चार्टर्ड अकौटंट असोशिएशनकडून मानधनाची माहिती घेण्यात येऊन सविस्तर सर्वसमावेशक तुलनात्मक असा प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३८ **संस्थान कर सल्लागार नेमणुक तथा मुदतवाढीबाबत.**

प्रस्ताव- संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे, त्या अनुषंगाने आर्थिक व्यवहारात व कामकाजातही मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. आर्थिक व्यवहार व केंद्र व राज्य शासनाकडून विविध अर्थविषयक कायदे लागु करणेत येत असून, या अर्थविषयक कायद्यातील नव-नवीन तरतुदींचा प्रभाव दैनंदिन आर्थिक कामकाजात पडत असल्याने वैधानिक लेखापरिक्षणामध्ये आक्षेपांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने व आर्थिक् व्यवहारांत पारदर्शकता येऊन वेळीच त्याच्यात सुधारणा करुन तात्काळ कार्यवाही करण्यासाठी व अंतर्गत नियंत्रण सक्षम राहण्याच्या दृष्टीने कर सल्लागार, वार्षिक आयकर विवरण व छाणणी सल्लागार यांच्या नेमणुका करण्यात येतात. या नेमणुकांची मुदत संपुष्टात येत असल्याने पुढील कालावधी करीता त्यांना मुदतवाढ तथा नेमणुक आदेश देणे आवश्यक आहे.

मा.व्य.स.निर्णय क्र. ५५१/२६.६.२०१४ अन्वये ३१ जुलै,२०१५ पर्यंत मे.शंकर अंदाणी, चार्टर्ड अकौटंटस व मे. राहुल केळकर, चार्टर्ड अकौटंटस, मुंबई यांची खालीलप्रमाणे नियुक्ती करण्यात आली होती.

| अ.नं. | संस्थेचे नांव | देणेत आलेल्या कामाचा तपशील | मानधन (प्रती वर्ष) रु. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. (चार्टर्ड अकौन्टंटस्) अहमदनगर | कर सल्लागार (Tax Consultant) | २,००,०००/- + सेवाकर |
| ०२ | श्री.राहूल केळकर असो. मुंबई (चार्टर्ड अकौन्टंटस्) | वार्षिक आयकर विवरणपत्र व आयकर कर निर्धारण व छाननी | योग्य त्या मानधनावर *(प्रत्यक्ष बिल रु.६८,७०८/-)* |

तसेच संस्थानला सेवाकर लागु करण्यासंबधीत सेवाकर विभागाची नोटीस प्राप्त झाली आहे. त्या संबधीत मे.श्रेणिक गांधी अन्ड कं. चार्टर्ड अकौटंट, पुणे यांचा सल्ला घेण्यात येत असुन, औरंगाबाद व वित्त मंत्रालय नवी दिल्ली कार्यालयात त्यांचे सल्ल्याने पत्रव्यवहार चालु आहे. त्यासाठी त्यांनी कोणतेही मानधन घेतलेले नाही. तसेच श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव हे संस्थानला सुरुवातीपासुन विक्रीकर, व्हॅट, लक्झरीअस टॅक्स इ.बाबत विनामोबदल्यावर सल्ला देण्याचे काम करीत आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे श्री. एस.जी.अंदाणी ॲन्ड कं. अहमदनगर यांची कर सल्लागार म्हणुन २,००,०००/- + सेवाकर, मे.राहूल केळकर असो. मूंबई यांची वार्षिक आयकर विवरणपत्र, कर निर्धारण व छाननी करीता रु.७०,०००/-+ सेवाकर, मे.श्रेणिक गांधी अन्ड कं. चार्टर्ड अकौटंट पुणे, यांची मानधन घेत नसल्याने प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपुर्तीवर व श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांची विक्रीकर, व्हॅट, लक्झरीअस टॅक्स इ. करिता यांची मानधन घेत नसल्याने प्रत्यक्ष खर्चाच्या प्रतिपुर्तीवर नेमणुक करण्यास तथा मुदतवाढ देण्यास व सेवाकर प्रकरण अत्यंत संवेदनशील असल्याने आवश्यकते प्रमाणे तज्ञ सेवाकर सल्लागारांचे योग्य त्या मानधनावर वेळोवेळी सल्ला घेण्यास, पुढील आदेश होईपर्यंत मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३५७ **उपरोक्त निर्णय क्र.३५६ अन्वये सदरहू प्रस्ताव सर्वसमावेशक माहितीसह फेरसादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

विषय नं.३९ **जादा वैद्यकीय बिलाचा परतावा अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- <u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.</u> – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९.

२) मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८/०२/२००९ निर्णय क्र. ७५ अन्वये रु. १०,०००/- पर्यंत मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

<u>प्रास्ताविक</u>– खालील संस्थान कर्मचा-यांची रु.१०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु.१०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | <u>अ. संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात उपचार घेतलेले</u> | | | | | | | |
| १ | सुर्वे वैशाली वसंतराव विभाग – साईबाबा हॉस्पिटल हुद्दा – परिचारीका | आई | Diabetes | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 15939.00 | 7896.00 | |
| २ | श्री. साबळे गोरख दादा विभाग – प्रसादालय हुद्दा – मदतनीस | स्वतः | Cardiac Treatment | डॉ. शिंदे | श्री साईबाबा हॉस्पिटल | 34342.00 | 34169.00 | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | बकरे सतिष गंगाधर<br>विभाग – बांधकाम<br>हुद्दा – वरीष्ठ लिपिक | पत्नी | Hypertention | डॉ. भागवत | श्री साईबाबा हॉस्पिटल | **7639.00** | **7194.00** | |
| 4 | वर्पे सविता चांगदेव<br>विभाग – साईबाबा हॉस्पिटल,<br>हुद्दा – परिचारिका | आई | Diabeties | डॉ. इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल, | **4196.00** | **4196.00** | |
| | | | | | **एकूण** | **62116.००** | **53455.००** | |
| | **ब – संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते** | | | | | | | |
| 5 | श्री. नवनाथ बन्सी जाधव<br>विभाग- प्रसादालय<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Eye operation | डॉ. सोनटक्के | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 46877.00 | 38430.00 | सदर रुग्ण रुबी हॉल येथे पाठविले असता तेथील डॉक्टर अचानक सुट्टीवर गेले रुग्णाची परिस्थिती पाहता त्यांनी लगेच बाहेरील हॉस्पिटलमध्ये जाण्यास सांगितले. तसेच रुग्णास अंधत्व आले. |
| 6 | डॉ. रविंद्र गणपत अंत्रे<br>विभाग – साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – सी.एम.ओ. | पत्नी | Irritable bowel syndrome | डॉ. शुभा मेहरोत्रा | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 24325.00 | 24325.00 | |
| 7 | चौधरी सचिन लक्ष्मण<br>विभाग – लेखाशाखा<br>हुद्दा – मदतनीस | वडील | Asthama with Cushing syndrome | डॉ. इंगळे | जहांगीर हॉस्पिटल, पुणे | 92851.00 | 87611.00 | |
| 8 | शकीला सलीम शेख<br>विभाग – साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – आया | पती | Carcinoma / Ca | डॉ राम नाईक | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | 356175.00 | 352655.00 | |
| 9 | श्री. डांगे विलास सोपान<br>विभाग- संरक्षण<br>हुद्दा – वाचमन | स्वतः | Ca | डॉ. राम नाईक | टाटा मेमोरीयल सेंटर, मुंबई | 54542.00 | 48748.00 | |
| १० | सुभाष गंगाधर कुलकर्णी<br>विभाग – भक्तनिवासस्थान<br>हुद्दा – मदतनीस | पत्नी | Renal failure | डॉ. शुभा मेहेरोत्रा | सहयाद्री हॉस्पिटल, नाशिक | 176952.00 | 176952.00 | |
| ११ | योगेश त्र्यंबक साळवी<br>विभाग – लेखाशाखा<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Ca | डॉ. किरण खांदे | नामको हॉस्पिटल, नाशिक | 129313.00 | 127053.00 | |
| | | | | | **एकूण** | **881035.00** | **855774.00** | |
| | **क. संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतु रेफर केलेले हॉस्पिटल** | | | | | | | |
| १२ | श्री. डांगे विजय बबन<br>विभाग- संरक्षण<br>हुद्दा – मदतनीस | वडील | Eye operation | डॉ. सोनटक्के | आनंद ऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर व दृष्टी आय हॉस्पिटल | 26252.00 | 20874.00 | सदर रुग्ण आनंदऋषी हॉस्पिटल येथे पाठविले असता तेथे उपचार होऊ न शकल्यामुळे त्यांनी खाजगी रुणालय येथे जाऊन तात्काळ उपचार केले. |
| १३ | श्री. ज्ञानेश्वर बबन पुंड<br>विभाग- बगीचा<br>हुद्दा – मदतनीस | स्वतः | Psychiatric treatment | डॉ. राम नाईक | डॉ. सुनिल उंडे हॉस्पिटल, श्रीरामपूर | 19047.00 | 11894.00 | |
| १४ | कमल थॉमस कदम<br>विभाग – साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीका | स्वतः | Lab Test | डॉ. राम नाईक | लोटस डायग्नोस्टिक, नाशिक | 15800.00 | 13200.00 | |
| १५ | सुरेखा राजू गायकवाड<br>विभाग – साईनाथ हॉस्पिटल<br>हुद्दा – परिचारीका | पती | Ca | डॉ. राम नाईक | श्री के.व्ही.ओ जैन मानव सेवा केंद्र, दहिसर | 89962.00 | 67809.00 | सदर रुग्णास टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथे पाठविले असता तेथे ऑपरेशनची तारिख उशिराची दिलेली असल्यामुळे त्यांनी रुग्णाचे परिस्थितीअंती खाजगी रुणालयात जाऊन उपचार केले. |
| | | | | | **एकूण** | **151061.00** | **113777.00** | |

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क. संस्थानचे मान्य यादीत नसलेले परंतु रेफर न केलेले हॉस्पिटल | | | | | | | |
| १६ | श्री. दिपक पुंडलीक गाढे विभाग- संरक्षण हुद्दा – वाचमन | स्वतः | Accident | डॉ कोठारी / डॉ. खांदे | कोठारी हॉस्पिटल, कोपरगाव | 6571.00 | - 5033.00 | डयुटीवर येतांना बाहेरगावी अपघात झाला. |
| १७ | डॉ. शुभा मेहरोत्रा विभाग – साईबाबा हॉस्पिटल हुद्दा – फिजिशियन | आई | Breast cancer | | | 17530.00 | 12920.00 | सदर रुग्णाचे वास्तव्य बाहेर गावी असल्यामुळे उपचार हे तेथेच केले. |
| १८ | रामचंद्र बाबु दर्गे विभाग – मुंबई कार्यालय हुद्दा – कार्यालय अधिक्षक | पत्नी | Arthos copy | डॉ. नागराज शेट्टी | श्री के.व्ही.ओ जैन मानव सेवा, दहिसर | 20912.०० | 16154.00 | |
| १९ | शिंदे आप्पासाहेब छगनराव विभाग – प्रशासकीय कार्यालय हुद्दा – उप कार्यकारी अधिकारी | स्वतः | Eye operation | डॉ. शबीर इंदौरवाला | इंदौरवाला ई.एन.टी हॉस्पिटल, नाशिक | 40000.०० | 32000.०० | |
| | | | | | एकूण | 85013.00 | 66107.00 | |
| | | | | | अ + ब + क एकूण | **1179225.00** | **1089113.00** | |

**संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –**

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु. १०८९११३ /- इतकी आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–**

नियमावली प्रमाणे छाननी केली असुन देय होणारी रक्कम अदा करणेस हरकत नाही, असे मत आहे.

निर्णय क्र.३५८ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, बरेचसे कर्मचारी संस्थान हॉस्पिटल सोडून बाहेरील हॉस्पिटलमध्ये उपचार का घेतात, याच्या तपशीलासह सदरहू प्रस्ताव फेर-सादर करणेत यावा.**

**तसेच संस्थान कर्मचा-यांच्या वैद्यकिय खर्चाची मर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४० **एम.आर.आय. मशिनचे वार्षिक सर्व्हिस कॉन्टॅक्ट करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलचे रेडीओलॉजी विभागाकरीता पुरवठा आदेश क्र. 15895/2006 दि. 13/11/2006 अन्वये मे. सिमेन्स लि. मुंबई, यांचेकडुन Magentom Avanto मशिन एकुण रू. 5,05,00,000/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन दि 01/06/2007 रोजी कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. कंपनीने मशिन करीता दिलेला दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दि. 31/05/2009 रोजी संपला आहे. सदर मशिनची 31/03/2015 ची घसारा वजा किंमत 37,91,776.65/- इतकी आहे. सदर मशिन खरेदी करतेवेळी झालेला ठराव, कंपनी सोबत करण्यात आलेले अॅग्रीमेंट आणि कंपनीस दिलेल्या पुरवठा आदेशातील अटी नुसार पुढील कालावधीत दुरूस्ती व देखभाली करता वार्षीक CMC (Comprehensive Maintenance contract) करणेबाबत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मशिनचा वॉरंटी कालावधी दोन वर्षाचा असुन तो संपुष्टात आल्यानंतर कंपनीकडे CMC कॉम्प्रेहेन्सीव मेंटेनन्स सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात यावे. तसेच याकामी कंपनीस पहिल्या वर्षी 20 लाख रू. व त्यानंतर पुढील प्रत्येक वर्षास 20 लाख अधिक 5% याप्रमाणे दरवर्षी 5 % वाढ करून सदर CMC साठी आगाउ रक्कम देण्यात यावी आणि सर्व्हीस टॅक्स वेगळा देण्यात यावा असे ठरले आहे.

वरील अटी नुसार आजपावेतो मे. सिमेन्स लि. मुंबई यांचेकडे दरवर्षी सदर मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता करणेत आलेला खर्च, मशिन दुरूस्ती करीता कंपनीने वापरलेल्या स्पेअर पार्टस् ची अंदाजे किंमत आणि सदर मशिनवर आजपावेतो तपासणी करणेत आलेल्या पेशंटची संख्या इ.वर्षनिहाय माहीती खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Period | CAMC Amount Incl. of all Taxes in Rs. | Approx. Cost of Spare Parts in Rs.(replaced by Company in CAMC) | Total No. of Patients Done |
|---|---|---|---|---|
| 1 | 01/06/2009 to 31/05/2010 | 22,06,000/- | 31,00,000/- | 5,530 |
| 2 | 01/06/2010 to 31/05/2011 | 23,16,300/- | 10,00,000/- | 10,673 |
| 3 | 01/06/2011 to 31/05/2012 | 24,32,115/- | 13,00,000/- | 11,694 |
| 4 | 01/06/2012 to 31/05/2013 | 26,04,008/- | 43,11,222/- | 13,050 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | 01/06/2013 to 31/05/2014 | 27,31,486/- | 23,62,500/- | 13,449 |
| 6 | 01/06/2014 to 31/05/2015 | 28,68,060/- | 4,75,605.31/- | 13,244 |
| **Total Amount in Rs.** | | **1,51,57,969/-** | **1,28,47,099.67/-** | **67,640** |

सदर एक वर्षाच्या कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा नियमीत भेटी देत असुन जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येउन दुरूस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर / हार्डवेअर सेफ्टी अपडेट करत आहेत. वरील कॉन्ट्रॅक्टमध्ये मशिनचे हेलियम गॅस रिफिलींग व कोल्ड हेड यासारख्या महागडया पार्टस सर्व स्पेअर पार्टचा तसेच मशिन सोबत पुरवणेत आलेल्या यु.पी.एस., चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करत आहेत. त्यासाठी कंपनीने पत्र क्र. West/HIM/MRI/1006291578_Rev002, Dtd. 24/04/2015 (रूग्णालये प्राप्त दि. 07/05/2015) अन्वये दि. 01/06/2015 ते दि. 31/05/2016 या कालावधीसाठी MRI मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता सर्व करांसहीत एकुण रू. 30,11,464/- (अक्षरी रू. तीस लाख अकरा हजार चारशे चौसष्ट मात्र) इतक्या रकमेचा करारनामा पाठविला आहे आणि एकुण रकमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सदर एक वर्षाच्या कालावधीमध्ये कंपनी इंजिनीअर एकुण 4 वेळा नियमीत भेटी देणार असुन जेव्हा जेव्हा मशिन नादुरूस्त होईल तेव्हा तेव्हा येउन दुरूस्ती व देखभाल आणि आवश्यकतेनुसार सॉफ्टवेअर / हार्डवेअर सेफ्टी अपडेट करणार आहेत. वरील कॉन्ट्रॅक्टमध्ये मशिनचे हेलियम गॅस रिफिलींग व कोल्ड हेड यासारख्या महागडया पार्टसह सर्व स्पेअर पार्टचा तसेच मशिन सोबत पुरवणेत आलेल्या यु.पी.एस., चिलर प्लांट यांची देखील सर्व स्पेअर पार्टसह दुरूस्ती व देखभाल करणार आहे. परंतु यु.पी.एस. बॅटरीज या कंझ्युमेबल्स असल्यामुळे समाविष्ट नाहीत.
मशिन खरेदी करतेवेळी कंपनीसोबत करण्यात आलेले ॲग्रीमेंट नुसार कंपनीने 98% अपटाईम दिला असुन मशिन दुरूस्ती करीता जर कंपनीमुळे एका वेळेस एकुण 5 दिवसापेक्षा अधिक काळ लागला तर प्रतिदिवस रू. 7500/- इतका दंड संस्थान कंपनीस आकारते.

कंपनीने मागील वर्षी 4 नियमीत भेटी व तातडीच्या दुरूस्ती व देखभाली करीता एकुण 39 वेळा भेटी देउन संपुर्ण एक वर्षात अंदाजे रू. 4,75,605.31/- इतक्या रकमेचे स्पेअर पार्ट बदलले आहेत. (संदर्भ: परिशिष्ट "अ") सदर स्पेअर पार्टची साठा रजिष्टरवर नोंद घेणेत आलेली आहे. वापरलेले जुने स्पेअर पार्ट कंपनीस गेट पास अन्वये परत करणेत आले आहेत.

एम. आर. आय. मशिन नियमीत वापरात असून दररोज अंदाजे 36 रूग्णांची तापसणी करणेत येते. यानुसार सदर मशिनवर दरवर्षी अंदाजे 13244 पेशंटचे एम. आर.आय. स्कॅन होत आहेत. (संदर्भ: परिशिष्ट "ब") त्याकरीता सदरचे मशिन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

दि. 12/01/2014 रोजी मानवीय चुकीमूळे ऑक्सीजन सिलेंडर एम. आर. आय. मशिनवर आदळुन चिकटले होते. ते मे. सिमेंन्स लि मुंबई यांनी मे. ए.जी. लॉजिस्टीक्स मुंबई यांचे मार्फत काढून दिले आहे. त्यासाठी मे. ए.जी. लॉजिस्टीक्स मुंबई यांनी बील पाठवुन एकुण रू. 25,000/- इतक्या रकमेची मागणी केली होती. परंतु मे. सिमेंन्स लि मुंबई यांचे सर्व्हीस मॅनेजर सोबत चर्चा करून सदर काम मोफत करणेत आले आहे.

सदर अपघातामूळे मशिनचे काही स्पेअर पार्ट (Funnel, Funnel lower, Rubber seal & Avanto Set of design ring) तुटलेले आहेत. सदर पार्टस हे मानवीय चुकीमूळे खराब झालेले असल्यामूळे कंपनी CMC मध्ये बदलुन देणार नाही असे कंपनीने कळविले आहे. नवीन स्पेअर पार्ट करीता कंपनीने पत्र क्र. HIM-EST-012014-014, Dtd. 14/01/2014 अन्वये सर्व करांसहीत एकुण रू. 23,34,173/- इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. परंतु मा. वैद्यकिय संचालक, रेडीओलॉजीस्ट, कंपनी सर्व्हीस मॅनेजर श्री. पटेल यांचे सोबत दि. 03/02/2014 रोजी झालेल्या प्रत्यक्ष चर्चेअंती, 'सदर स्पेअर पार्ट तुटलेले आहेत, परंतु त्यामुळे मशिन बंद पडलेले नाही. त्यामुळे सदर स्पेअर पार्ट बदलणेत आलेले नाहीत.' असा निर्णय घेणेत आला. तसेच सदर स्पेअर पार्ट कंपनीकडुन मोफत बदलुन मिळणेकरीता इकडिल पत्र क्र. 1164, दि.27/02/2014 अन्वये विनंती करणेत आली आहे.
सदर CMC करीता रू. 25,000/- अधिक खर्च येणार असुन मशिन खरेदी करते वेळेस झालेल्या ॲग्रीमेंट नुसार कंपनीने सदर रकमेची आगाउ मागणी केलेली आहे.

सद्यस्थितीत मशिन व्यवस्थीत काम देत आहे. सदर मशिनची 31/03/2015 ची घसारा वजा किंमत रू.37,51,776.65/- इतकी आहे. पुढील काळात ते व्यवस्थीत कार्यान्वीत राहणे कामी तसेच मागील सहा वर्षात कंपनीस अदा केलेली रक्कम व त्यांनी केलेला अंदाजे खर्च या बाबींचा विचार करता संस्थानला सद्यस्थितीत मशिनचे कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणे फायदेशीर राहील. कारण जसे जसे मशिन जुने होत जाते तस तसे दुरूस्तीचा खर्च देखील वाढत जातो.

सदर वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट बाबत खालील बाबींचा विचार होणे आवश्यक आहे असे नम्र मत आहे.

1) मा. व्यवस्थापन समिती दि. 07/08/2014 च्या सभेतील निर्णय क्र. 676 अन्वये-

" पुर्वीच्या व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेल्या व मा. खंडपिठाची मान्यता मिळालेल्या खर्चा व्यतिरिक्त साई भक्तांना, रूग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी सुविधा करीता आवश्यक असणाऱ्या सर्व सेवासाठी लागणारी सर्व मशिनरी/ उपकरणे व तत्सम यांत्रीक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरूस्ती यासाठी येणाऱ्या खर्च तसेच

मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदरीने भरावयाच्या रक्कमा यांसारखे रक्कम रू. 1 कोटी पर्यंतचे खर्च मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधुन वगळणेत यावेत."

2) MRI मशिन सात वर्षापासुन नियमीत वापरात असल्यामुळे त्याची नेहमी नियमीत व तातडीची दुरूस्ती व देखभाल करणे अत्यावश्यक असते. यापुढील काळात मशिन वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टमध्ये नसल्यास व एम. आर. आय. मशिनची जर दुरूस्ती व देखभाल वेळेत न झाल्यामूळे मशिन नादुरूस्त होउन काही महागडे स्पेअर पार्टस (हेलियम गॅस रिफिलींग , कोल्ड हेड, यु.पी.एस., चिलर प्लांट) बदलणे आवश्यक असतील अशा वेळी सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टचे खर्चास मान्यता घेणेकरीता विविध पार्टस करीता वेगवेगळे स्वतंत्र प्रस्ताव आवश्यकतेनुसार वेळोवेळी सादर करणे प्रस्तावित पध्दतीनुसार आवश्यक राहील.तसेच मा. उच्च न्यायालयापुढे मान्यतेसाठी सदर प्रस्ताव सादर करून प्रत्यक्षात मान्यता मिळुन तदनंतर पुरवठाधारकास कार्यदेश देणेस व प्रत्यक्षात दुरूस्तीस अंदाजे सहा महिन्यांचा किंवा अनिश्चित कालावधी लागु शकतो. दरम्याच्या मशिन नादुरूस्त असण्याच्या कालावधीमध्ये अत्यवस्थ रूग्णांना अत्यावश्यक सेवा देणे शक्य होणार नाही.

3) तसेच सदर प्रकारे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट केलेले नसताना मशिन्सची दुरूस्ती करणेस संस्थानला वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टच्या रकमेपेक्षा (सर्व्हीस चार्जेस व स्पेअर पार्टसचा) अधिक खर्च येउ शकतो.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करून एम. आर.आय. मशिनचे वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा खर्च देखील नियमीत खर्च असल्यामूळे मा. त्रीसदस्यीय व्यवस्थापन समितीने मा. उच्च न्यायालयापुढे पुनर्मान्यतेसाठी सादर न करता मागील तीन वर्षापासुन दरवर्षी सदर नियमीत खर्चास मान्यता दिली आहे.

तरी MRI मशिनचे मे. सिमेंन्स लि मुंबई यांचेकडे दि. 01/06/2015 ते 31/05/2016 या कालावधी साठी कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करीता कंपनी प्रतिनिधीशी प्रत्यक्ष चर्चा करून पुढील एका वर्षासाठी दर निश्चित करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण खर्चास मान्यता घेणेस तसेच कॉम्प्रेहेन्सीव वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करणेसाठी CMC चे एकुण रकमेपैकी 50 % रक्कम सहा महिन्यांनंतर व उर्वरीत 50 % रक्कम वार्षीक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधी पुर्ण झालेनंतर अदा करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३५९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील एम.आर.आय. मशिनचा जास्त प्रमाणात वापर होत असून सदरहू मशिन जुने झालेले आहे. तरी नवीन अद्ययावत एम.आर.आय. मशिन खरेदीसाठीचा प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा. तोपर्यंत सध्याच्या एम.आर.आय. मशिनचे मे. सिमेंन्स लि मुंबई यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या सापेक्ष दराने सर्व्हिस कॉन्टॅक्ट करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

**तसेच याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

विषय नं.४१ **कार्डीयाक ओ.टी.०२ मधील विविध मशिन्सकरीता स्पेअर पार्ट/ॲक्सेसरिज खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक ओ.टी. 02 विभागाकरीता संदर्भ क्र. 1 अन्वये विविध कंपन्याकडुन विविध मेडीकल इक्वीपमेंट व मशिन्स खरेदी करणेत आले आहे. सदर मशिन्स करीता कंपानीने दिलेला एक वर्षाचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. सदर मशिन्सचे नियिमीत दुरुस्ती व देखभाल करणेसाठी संबधित कंपनीकडे दि. 01/04/2015 ते 31/03/2016 या कालावधीकरीता कॉम्प्रेहेसीव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CMC) करणेसाठी मा. त्रिसदस्यीय समिती समोर प्रस्ताव सादर करणेत आला आहे. त्यास अद्याप मायता मिळालेली नाही

सध्या दि. 10/04/2015 रोजी कार्डीयाक ओ.टी विभागात अचानक शॉर्टसर्किट मुळे आग लागली होती. त्यामध्ये फिलिप्स मॉनिटर, एल. अँड टी. मॉनिटर (सध्याची मे.स्कॅनरे हेल्थकेअर प्रा.लि.मैसूर), ड्रॅगर बॉईल्स मशिन या इक्वीमेंटस्च्या काही ॲक्सेसरिज व स्पेअर पार्ट जळुन खराब झालेले आहे. त्यानंतर सदर मशिनची तपासणी करणे करीता संबधित कंपनी इंजिनीअर आले असता त्यांनी सदर मशिनची तपासणी करून त्यांचे सर्व्हीस रिपोर्ट अन्वये काही स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज खराब झाले असुन बदलणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. त्यासाठी सदर कंपन्यांनी त्यांचे पत्रान्वये सर्व करांसहीत एकुण रु. 49,013/- (अक्षरी रु. एकोणपन्नास हजार तेरा मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. सदर रक्कम कंपनीस उपरोक्त स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज बदललेनंतर अदा करावयाची आहे. सदर स्पेअर पार्ट व ॲक्सेसरिज हया विशिष्ट रचना व स्पेसीफिकेशन असलेले असतात त्यामुळे इतर पुरवठाधारक कंपानीकडे उपलब्ध होत नाही. तसेच सदरच्या कंपन्या ह्या एकमेव पुरवठाधारक आहेत.

तसेच आगीत जळालेल्या सर्व मशिन्स व इक्वीपमेंटस यांचा विमा कंपनीने पंचनामा केलेला असुन सदर विमा कंपनीकडुन जळालेल्या मशिन्स व इक्वीपमेंटसची रक्कम मिळणेस अंदाजे सहा ते बारा महिन्यांचा कालावधी लागु शकतो.

तरी विविध मशिन्सच्या ॲक्सेसरिज व स्पेअर पार्ट सबंधित कंपनीकडुन खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या एकुण रू. 49,013/- च्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलच्या कार्डीयाक ओ.टी.०२ मधील विविध मशिन्सकरीता स्पेअर पार्ट/ॲक्सेसरिज संबंधीत कंपन्यांकडून विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४९,०१३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.**

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीन खरेदीबाबत.**

प्रस्ताव- खालीलप्रमाणे अर्जदार यांनी त्यांच्या मालकीच्या जमीनी संस्थानला विकत देणेबाबत प्रस्ताव दिलेले आहेत.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | गाव | सर्व्हे नं. गट नं. | ७/१२ नुसार क्षेत्र हे-आर-चौमी | विक्री करावयाचे क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | शिर्डी | २१२/२ | ००-९७-००<br>००-४०-०० पोख<br>------------<br>०१-०१-०० | |
| | | | २१२/३ | ००-९८-०० | ०१-४०-०० |
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | शिर्डी | २०३/२ | ०२-६२-०० | ००-६०-०० |
| | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री.मिलींद संपतराव शेळके<br>श्री.राहुल संपतराव शेळके | शिर्डी | २०३/१ | ०२-५३-०० | ००-६०-०० |
| ०३ | श्री.साहेबराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | ००-७९-०० | ००-४०-०० |
| | श्री.बाजीराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | ००-६७-०० | ००-४०-०० |
| ०४ | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर | कनकुरी | १४३/५ | ०१-५१-५० | ०१-५१-५० |

वरीलपैकी अ.नं.१ ते २ श्री.शेळके यांच्या जमीनी शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार संस्थानकरीता आरक्षीत क्षेत्रामध्ये आहेत.

शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार खालीलप्रमाणे क्षेत्र संस्थानकरीता आरक्षीत आहे.

| आरक्षण क्रमांक | आरक्षणाचा हेतु | आरक्षीत क्षेत्र हे.आर. | सर्व्हे नंबर | विकसन यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| ०१ | पार्किंग | २.५९ | २०७पै.,२०८पै.,२१५पै ते २१९ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०२ | उद्यान | २.९७ | २०५ पै.,२०६ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०४ | वृध्दाश्रम | १.०० | २२१ पै. ते २२३ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| ०७ | संस्थान हेतु | २.०० | २०२ पै.,२०३ पै. | श्री साईबाबा संस्थान |
| २२ | शैक्षणिक हेतु करीता | ६.५५ | १९५पै.,१९६पै.,२१२ पै.,२१३ पै. | श्री साईबाबा संस्थान |

सदरचे प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे अनुक्रमे दि.३/८/२०१४ व २८/८/२०१४ रोजीचे सभेत सादर करण्यात आले होते. त्यावर खालीलप्रमाणे निर्णय झालेले आहेत.

'यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीं च्या महासमाधी शताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमिनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्या जमिनीची अंतिम किंमत बाजारभावाप्रमाणे दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे अर्ज करावा व त्यातील आदेश / परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी, असे ठरले.'

दुय्यम निंबधक,राहाता (श्रेणी १) यांचेकडून सन २०१४ मधील प्रस्तुत जमीनीचे शासकीय बाजारमुल्य दर घेण्यात आलेले आहेत.सदर शासकीय दराबाबत वरील सर्व अर्जदार यांनी लेखी कळविले आहे की, दुय्यम निंबधक, राहाता यांनी दिलेले शासकीय बाजारमुल्य दर आम्हाला मान्य आहेत परंतु जर खरेदी व्यवहार सन २०१५ मध्ये झाल्यास त्या वर्षीचे शासकीय बाजारमुल्य दराने जमीन खरेदी करावी.

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सदर जमीनी खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.१२३१५/२०१४ सादर करण्यात आले होते. त्यावर मा.न्यायालयाने दि.१३/३/२०१५ रोजीचे आदेशान्वये सिव्हील ॲप्लीकेशन मधील परिच्छेद 'ब' मध्ये नमुद केलेल्या शर्तीनुसार या क्षेत्राचे मा.दुय्यम निबंधक यांनी प्रमाणीत केलेल्या प्रचलित बाजारभावाचे दरानुसार खरेदी करणेस अनुमती दिलेली आहे.

संस्थानचे वकील ॲड.जे.के.गोंदकर यांचेकडून प्रस्तुत जमीनीचे सर्च रिपोर्ट घेण्यात आलेले असून सदर जमीनी खरेदीबाबत त्यांचा अभिप्राय घेण्यात आलेला आहे.

शिर्डी वाढीव क्षेत्र विकास आराखडयानुसार अर्जदार यांचे आरक्षीत क्षेत्राची माहिती शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडून घेण्यात आलेली असून त्यानुसार खालीलप्रमाणे क्षेत्र संस्थानकरीता आरक्षीत आहे.

| अ.नं. | खातेदाराचे नाव | सर्व्हे नं./ गट नं. | आरक्षीत क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | २१२/२ | ००-५८-११-६० |
| | | २१२/३ | ००-९९-१८-४० |
| | एकूण क्षेत्र | | ०१-५७-३०-०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | २०३/२ | ०१-०५-००-०० |
| | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री. मिलींद संपतराव शेळके<br>श्री. राहुल संपतराव शेळके | २०३/१ | ००-८९-००-०० |
| ०३ | श्री. साहेबराव नामदेव शेळके | २१३/१ | अद्याप माहिती उपलब्ध झालेली नाही. |
| | श्री. बाजीराव नामदेव शेळके | २१३/१ | |

श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांचे संस्थानकरीता आरक्षीत असलेले क्षेत्र दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडील सन २०१४ की सन २०१५ चे शासकीय दराप्रमाणे खरेदी करावयाचे याबाबत सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात आला होता. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/४/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.१२० अन्वये-

'यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके, शिर्डी यांचे प्रस्तावित क्षेत्र सुधारित विकास आराखडयानुसार संस्थानकरीता शैक्षणिक कामासाठी आरक्षीत असल्याचे दिसून येते. सबब सदरहु क्षेत्र भू-संपादनामार्फत संस्थानला घेणेसाठी त्वरीत भू-संपादनाची कार्यवाही सुरु करणेत यावी, असे ठरले.'

तथापि श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके यांनी दि.१५/६/२०१५ रोजीचे अर्जान्वये, सदर जमीन भूसंपादनाची प्रकीया राबवुन संस्थानने घेतली तर नवीन शासनाच्या निर्णयाप्रमाणे संस्थानला प्रचलित रेडीरेकनर दराच्या अडीचपट रक्कम मोबदला म्हणून द्यावी लागेल. त्यामध्ये संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल व त्याचप्रमाणे भूसंपादन कार्यवाहीस वेळ लागेल त्यामुळे माझेही नुकसान होईल.

सदरची जमीन नवीन विकास आराखडयामध्ये शैक्षणिक कारणासाठी आरक्षित असून त्याची विकसन यंत्रणा श्री साईबाबा संस्थान आहे. सदरची जमीन श्री साईबाबांचे कामासाठी उपयोगात येणार असल्यामुळे मी ती प्रचलित दरानुसार संस्थानला खरेदी खताने देण्यास तयार आहे.

तरी माझ्या अर्जाचा फेरविचार करुन सदर जमीनीचे संस्थानने भूसंपादन करण्याऐवजी खरेदी खताने लवकरात लवकर विकत घ्यावी, अशी विनंती केलेली आहे.

सदर अर्जास अनुसरुन इकडील दि.१८/६/२०१५ रोजीची कार्यालयीन टिपणी सादर केली असता त्यावर तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी 'याबाबत अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये चर्चा झाली. चर्चेमध्ये सदरच्या जागांच्या खरेदीपुर्वी वृत्तपत्रात जाहिर नोटीस देऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे ठरले. वृत्तपत्रात नोटीस देण्याची कार्यवाही त्वरीत करावी.' असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार संस्थानचे वकील ॲड. जे. के. गोंदकर यांचेकडून जाहिर नोटीस तयार करुन घेण्यात आलेली आहे. सदरची जाहिर नोटीस वृत्तपत्रात प्रसिध्द करणेस मान्यता घेणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समिती समोर सादर करणेत आलेला होता.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २१५ खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, जमीन खरेदीबाबत महाराष्ट्र शासनाचा नवीन निर्णय (G.R.) झालेला असून, त्या निर्णयाचा तसेच मा.उच्च न्यायालयाचे कागदपत्रांचा अभ्यास करुन सदरहू प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, तोपर्यंत मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीन खरेदी करणेबाबतचा उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले."

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२ मे २०१५ च्या नवीन निर्णयामध्ये (G.R.) खालील बाबी नमुद केलेल्या आहेत.

सर्वसाधारणपणे विविध प्रकल्पासाठी आवश्यक असणारी खाजगी जमीन संबंधित भूसंपादन संस्था अस्तित्वात असणा-या भूसंपादन कायदयानुसार संपादन करते तथापि जर अशा भूसंपादन संस्थेला आवश्यक असणारी जमीन भूसंपादन कायदयानुसार संपादीत न करता थेट खरेदी पध्दतीने विकत घेण्यास कायदयाने कोणतेही नसल्यामुळे खालील मार्गदर्शक तत्वे विचारात घेऊन विकत घेण्याची मुभा राहील. (सोबत शासन निर्णय प्रत सादर केलेली आहे)

शिर्डी सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानकरीता आरक्षित असणारे क्षेत्र खालीलप्रमाणे-

| अ.नं. | खातेदाराचे नाव | गाव | सर्व्हे नं./ गट नं. | आरक्षीत क्षेत्र हे-आर-चौमी | खरेदी करावयाचे क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री.पतिंगराव रंगनाथ शेळके | शिर्डी | २१२/२ | ००-५८-११-६० | ०१-४०-०० |
| | | | २१२/३ | ००-९९-१८-४० | |
| | | | एकूण क्षेत्र | ०१-५७-३०-०० | |
| ०२ | श्री.पंडीतराव नानासाहेब शेळके | शिर्डी | २०३/२ | ०१-०५-००-०० | ००-६०-०० |
| | श्रीमती नलिनी संपतराव शेळके<br>श्री. मिलींद संपतराव शेळके<br>श्री. राहुल संपतराव शेळके | शिर्डी | २०३/१ | ००-८९-००-०० | ००-६०-०० |
| ०३ | श्री. साहेबराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | | ००-४०-०० |
| | श्री. बाजीराव नामदेव शेळके | शिर्डी | २१३/१ | | ००-४०-०० |

तसेच-

| अ.नं. | खातेदाराचे नाव | गाव | सर्व्हे नं. गट नं. | खरेदी करावयाचे क्षेत्र हे-आर-चौमी |
|---|---|---|---|---|
| ०४ | श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर | कनकुरी | १४३/५ | ०१-५१-५० |

तरी शिर्डी सुधारीत विकास आराखडयानुसार संस्थानकरीता आरक्षित असणारे वरीलप्रमाणे मौजे शिर्डी व कनकुरी येथील क्षेत्र खरेदीकामी व त्याकामी येणा-या खर्चाचे प्रस्तावास मान्यता घेणेकामी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीन खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावावर मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता राज्य परिवहन महामंडळाकडून भाडोत्री घेण्यात आलेल्या बसेसचे बिल आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ दि.२७/०८/२०१५ ते दि.२७/०९/२०१५ या कालावधीत नाशिक येथे होणार असल्याने नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळयासाठी एक ते दिड कोटी भक्तगण येतील असा अंदाज असल्याने त्यातील १५ ते २० लाख भक्तगण शिर्डी येथे येण्याची शक्यता आहे. सदर कालावधीमध्ये अखील भारतीय आखाडा परिषदेने व पुरोहीत संघाने पर्वणीच्या शाही ताराखा खालील प्रमाणे जाहीर केलेल्या होत्या.

| अ.नं. | पर्वणी काळ | गर्दीचा कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|
| ०१ | पाहिले शाहीस्नान-२९ ऑगस्ट-२०१५ | २८/०८/२०१५ ते ३१/०८/२०१५ | ०४ |
| ०२ | दुसरे शाहीस्नान-१३ सप्टेंबर-२०१५ | १२/०९/२०१५ ते १५/०९/२०१५ | ०४ |
| ०३ | तिसरे शाहीस्नान-१८ सप्टेंबर-२०१५ | १७/०९/२०१५ ते २०/०९/२०१५ | ०४ |
| ०४ | त्र्यंबकेश्वर शाहीस्नान- २५ सप्टेंबर-२०१५ | २४/०९/२०१५ ते २७/०९/२०१५ | ०४ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मार्फत उपरोक्त कालावधीत गर्दीचे नियोजन करणेकामी मुंबई- नाशिक- कोपरगांव या दिशेने येणा-या वाहनांसाठी सावळीविहीर येथे व अहमदनगर-राहाता या दिशेने येणा-या वाहनांसाठी साकुरी येथे वाहनतळ तयार करण्यात आलेले होते. सदर कालावधीमध्ये सावळीविहीर वाहनतळ ते दर्शनरांग व साकुरी वाहनतळ ते दर्शनरांग अशी साईभक्तांची वाहतुक करणे कामी ५० खाजगी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन मिळणे बाबत मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचेकडे विनंती करण्यात आली होती.

त्यानुसार, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर (गृह शाखा) अप्पर जिल्हाधिकारी यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांना पाठविलेले पत्र क्र.डी.सी./ कार्या-९क/२०७४/२०१५ दि.०६/०८/२०१५ रोजीचे व पत्र क्र.डी.सी./ कार्या-९क/२४२२/२०१५ दि.०९/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये, प्रथम-२५ खाजगी बसेस/ वाहने व नंतर २० खाजगी बसेस / वाहने उपप्रादेशिक परिहवन अधिकारी यांचेमार्फत अधिग्रहीत करुन मिळालेली होती.

दरम्यानचे कालावधीमध्ये दुस-या पर्वणीचे वेळी दि.१२/०९/२०१५ ते दि.१५/०९/२०१५ या कालावधीमध्ये साईभक्तांची गर्दी वाढल्याने दि.१३/०९/२०१५ रोजी मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर तथा सदस्य, त्रीसदस्य समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी तोंडी आदेशाने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कोपरगांव आगार यांचेकडील १५ प्रवासी बसेस दि.१३/०९/२०१५ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपासुन ते दि.१४/०९/२०१५ रोजी १७.०० वाजेपर्यंत प्रासंगिक कराराने देणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार, आगार व्यवस्थापक, कोपरगांव, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांनी १५ बसेस दि.१३/०९/२०१५ रोजी सायंकाळी १७.०० वाजे पासुन ते दि.१४/०९/२०१५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत साकुरी वाहनतळ ते लक्ष्मीनगर पुलापर्यंत (दर्शनरागेपर्यंत) व लक्ष्मीनगर पुलापासुन (दर्शनरांग) ते वाहनतळ क्र.०१ वाहनतळ क्र.०२ व वाहनतळ क्र.०४ पर्यंत साईभक्तांची ने-आण केलेली आहे. याकामी आलेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | बिल नं./ दिनांक | वापराचा कालावधी | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|
| ०१ | कोपरगांव आगार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, | १७०४५६/ १८/०९/२०१५ | दि.१३/०९/२०१५ रोजी सायंकाळी १७.०० वाजे पासुन ते दि.१४/०९/२०१५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत (२४ तास) प्रति बस ३०० कि.मी. प्रमाणे १५ बसेस एकुण कि.मी.४५०० प्रति कि.मी रु.४२/- प्रमाणे. | १,८९,०००.०० |
| | | | सेवाआकार | १०,५८४.०० |
| | | | एकुण रक्कम(रु.) | **१,९९,५८४.००** |

तरी उपरोक्त प्रमाणे राज्य परिवहन महामंडळ, कोपरगांव आगार यांना बिलातील रक्कम रु.१,९९,५८४/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख नव्यान्नव हजार पाचशे चौ-याऐंशी) मात्र आदा करणेस तसेच सदरचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३६२ यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ कालावधीमध्ये दुस-या पर्वणीचे वेळी साईभक्तांची अचानक गर्दी वाढल्याने त्यांच्या सोयीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, कोपरगांव आगार यांचेकडून प्रासंगिक कराराने भाडोत्री घेण्यात आलेल्या १५ प्रवासी बसेसचे प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे रु.१,९९,५८४/- मात्र बील नियमाप्रमाणे अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा विषय नं०.३ सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ करीता अधिग्रहीत करण्यात आलेल्या खाजगी बसेस/ वाहनांचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ निमित्त होणा-या गर्दीचे पार्श्वभुमीवर करण्यात आलेल्या कामाच्या सद्य स्थितीचा आढावा घेणे बाबत झालेल्या दि.०२/०८/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये निर्णय क्र.२४० (३) नुसार, "गर्दीचे कालावधीत वाहनतळा पासुन मंदीराचे आंतर कमी असल्यामुळे श्रींच्या दर्शनासाठी जास्तीत जास्त भक्त चालतच येतील, त्याकरीता रस्त्याचे दोन्ही बाजुने दर्शनरांगेकरीता बॅरीकेटींग करणेत यावे. तसेच ज्या भक्तांना पायी येणे शक्य नाही. (उदा.लहान मुले, वृध्द, अपंग) यांचेसाठी २५ बसेस शाही स्नानाच्या तारखेच्या वेळेस पाच-पाच दिवसांसाठी विना इंधन (इंधन संस्थानमार्फत पुरविणेत येईल) अधिग्रहीत करणेत याव्यात. याकामी संस्थानच्या २२ बसेसही वापरणेत याव्यात व त्यामधील २-४ बसेस इमर्जन्सीसाठी राखीव ठेवणेत याव्यात" असे ठरले.

त्यानुसार, इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/ २४७९/ २०१५ दि.०१/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये, मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांना साकुरी व सावळीविहीर वाहतळ ते दर्शनरांगेपर्यंत भक्तांना ने-आण करणे कामी खालील कालावधीसाठी ५० खाजगी प्रवासी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन मिळणेबाबत विनंती करण्यात आली होती.

| अ.नं. | पर्वणी काळ | गर्दीचा कालावधी | एकुण दिवस |
|---|---|---|---|
| ०१ | पाहिले शाहीस्नान-२९ ऑगस्ट-२०१५ | २७/०८/२०१५ ते ३१/०८/२०१५ | ०५ |
| ०२ | दुसरे शाहीस्नान-१३ सप्टेंबर-२०१५ | ११/०९/२०१५ ते १५/०९/२०१५ | ०५ |
| ०३ | तिसरे शाहीस्नान-१८ सप्टेंबर-२०१५ | १६/०९/२०१५ ते २०/०९/२०१५ | ०५ |
| ०४ | त्र्यंबकेश्वर शाहीस्नान- २५ सप्टेंबर-२०१५ | २३/०९/२०१५ ते २७/०९/२०१५ | ०५ |

त्यानुसार, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर (गृह शाखा) अप्पर जिल्हाधिकारी यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांना पाठविलेले पत्र क्र.डी.सी./ कार्या-९क/२०७४/२०१५, दि.०६/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांचेमार्फत श्री साईबाबा संस्थानकरीता उपरोक्त कालावधीसाठी २५ खाजगी प्रवासी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन देण्यात आली होती.

सदर आदेशातच वाहनांचे अधिग्रहन करुन त्यांना द्यावयाच्या भत्ते व वाहनभाडे याबाबत मोटार वाहन अधिनियमामध्ये तरतुदीनुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेले आहेत.

तदनंतर, प्रथम पर्वणीच्या वेळी उपरोक्त अधिग्रहीत केलेल्या खाजगी २५ बसेस/ वाहने कमी पडत आहेत असे लक्षात आल्याने मा.मुख्य समन्वय अधिकारी, तसेच मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे तोंडी आदेशाने इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/३२८१/२०१५ दि.०८/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये, पुन्हा मा.जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर यांना पत्र देवुन आणखी २० खाजगी प्रवासी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन मिळणे बाबत विनंती केली होती. त्यानुसार, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय, अहमदनगर (गृह शाखा) अप्पर जिल्हाधिकारी यांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांना पाठविलेले पत्र डी.सी./ कार्या-९क/२४२२/२०१५, दि.०९/०९/२०१५ रोजीचे पत्रान्वये, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांनी श्री साईबाबा संस्थानकरीता आणखी २० खाजगी प्रवासी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन देण्यात आली.

त्यानुसार, तिन पर्वणी करीता प्रथम पर्वणी-०३ दिवसाकरीता २५ वाहने, दुसरी पर्वणी-०३ दिवसकरीता ४३ वाहने, व तिसरी पर्वणी-०२ दिवसाकरीता- ४३ वाहनांचा प्रत्यक्षात वापर झालेला आहे. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी मा.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपुर यांना दिलेले वाहनांचा वरील अधिग्रहन आदेशानुसार, मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, श्रीरामपुर येथील सहाय्यक RTO, श्री कोल्हे सो. यांनी दि.१८/०९/२०१५ रोजी प्र.अधीक्षक यांना दुरध्वनी वरुन वाहने अधिग्रहीत केल्याचे पुर्ण दिवसाचे प्रत्येक पर्वणीचे शेवटचे तारखे पर्यंतचे पुर्ण भाडे संबंधीत वाहनधारकांना देणेस कळविले आहे.

त्यामुळे वरील वाहनभाडे देण्यासाठी मा.जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, अहमदनगर यांचेकडील नं.निव/कार्या/१२(२) /१९१/२०१४, दि.१७/०९/२०१४ आदेशान्वये, अधिग्रहीत करण्यात आलेल्या खाजगी वाहनांचे दरपत्रकानुसार, सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता अधिग्रहीत करण्यात आलेल्या वाहनांचे भाडेपोटी अंदाजे रु.२३,५०,०००/- पर्यंत (संस्थानमार्फत पुरविण्यात आलेल्या इंधन खर्चासह) खर्च अपेक्षीत आहे. सोबत खर्चाचा तक्ता जोडला आहे.

तरी सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे पर्वणीचे कालावधीत अधिग्रहीत करण्यात आलेल्या एकुण ४५ वाहनांचे भाडेपोटी येणा-या अंदाजे रु.२३,५०,०००/- पर्यंतचे (संस्थानमार्फत पुरविण्यात आलेल्या इंधन खर्चासह) खर्चास तसेच संबंधीत खाजगी बसेस/ वाहनधारकांची बिले आदा करणेस मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.३६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ करीता अधिग्रहीत करण्यात आलेल्या एकुण ४५ वाहनांचे भाडयापोटी आलेल्या रु.२३,५०,०००/- (संस्थानमार्फत पुरविण्यात आलेल्या इंधन खर्चासह) मात्रचे खर्चास व संबंधीत वाहनधारकांची बिले नियमानुसार आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०४ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता खरेदी करण्यात आलेल्या मोबाईल टॉयलेट व्हॅन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे वर्ग करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२६७ नुसार सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे कालावधीत भक्तांचे सुविधेकरिता विविध ठिकाणी उभे करण्यासाठी फिरते शौचालय खरेदी करणे बाबत झाला होता.

उपरोक्त निर्णयानुसार, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत श्रींचे दर्शनार्थ होणा-या गर्दीत शिर्डी शहरात साईभक्तांचे सोयीसाठी जा.नं.एसएसएस/बांधकाम/२९४३/२०१५ दि.२२/०८/२०१५ अन्वये बांधकाम विभागामार्फत न्यु साई फायबर्स, मिरज, जि. सांगली यांचेकडून प्रती मोबाईल टॉयलेट व्हॅन रु.३,९०,०००/- याप्रमाणे एकुण १० सिक्स सिटर मोबाईल टॉयलेट व्हॅन खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्याकामी एकुण रु.३९,००,०००/- इतक्या खर्च आलेला आहे.

जा.नं.एसएसएस/वशी-आरोग्य/२११०/२०१५ दि.०२/०९/२०१५ चे आदेशानुसार, मोबाईल टॉयलेट व्हॅनची वाहन विभागाचे डेडस्टॉकला नोंद घेण्यात यावी. सदरच्या टॉयलेट व्हॅनचा मेन्टनन्स इतर वाहनाप्रमाणे करण्यात येवून त्याबाबत नोंदी ठेवण्यात याव्यात, तसेच कुंभमेळा-२०१५ चे प्रत्येक पर्वणीचे कालावधीत अथवा गर्दीचे कालावधीत वेळोवेळी वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे वाहन विभागामार्फत आवश्यक त्याठिकाणी मोबाईल टॉयलेट व्हॅन ठेवण्यात याव्यात. मोबाईल टॉयलेट व्हॅनचे स्वच्छता बाबतची कामे आरोग्य विभागामार्फत करण्यात यावीत.

बांधकाम विभागाकडील जा.नं.२६०/२०१५ दि.२८/०९/२०१५ चे पत्राने, न्यु साई फायबर्स, मिरज, जि.सांगली यांना पुरविलेली १० नग सिक्स सिटर मोबाईल टॉयलेट व्हॅनचे बिल आदा करणे कामी सदर वाहनाची आपले विभागाकडे डेडस्टॉकला नोंद घेणे बाबत कळविले होते. त्यानुसार सदर १० वाहने वाहन विभागाचे डेडस्टॉक रजिस्टरमध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. सदरच्या मोबाईल टॉयलेट व्हॅन पर्वणीच्या कालावधीमध्ये वरिष्ठाचे सुचनेनुसार गर्दीचे ठिकाणी भक्तांच्या वापरासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. व भक्तांनी त्याचा वापर केलेला आहे. आता सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ गर्दीचा कालावधी संपुष्टात आल्याने सर्व एकुण १० मोबाईल टॉयलेट व्हॅन वाहन विभागाचे मोकळया जागेमध्ये आणुन ठेवलेल्या आहेत. पैकी एक मोबाईल टॉयलेट व्हॅन भक्तनिवास परिसरामधून वाहन विभागाकडे घेऊन येत असताना,वाहन विभागाचे वाहन चालकाकडून मोबाईल टॉयलेट व्हॅन झाडाचे फांदीला लागून काही प्रमाणात तुटलेली आहेत. सदरचे टॉयलेट व्हॅन तुटली असले बाबत बांधकाम विभागाचे संबंधीत अभियंता यांना दूरध्वनीवर कळविले आहे.

दि.०२/१०/२०१५ रोजी आरोग्य विभाग व इतर विभागाचे माहिती सादरीकरणाबाबत चालु असलेल्या सभेत मा.कार्यकारी अधिकारी साहेब व उपकार्यकारी अधिकारी साहेब यांचे निर्देशानुसार,सिंहस्थ कंभमेळा -२०१५ च्या गर्दीचे कालावधीमध्ये भक्ताच्या सोईसाठी खरेदी करण्यात आलेल्या १० नग सिक्स सिटर मोबाईल टॉयलेट व्हॅन पैकी ०१ मोबाईल टॉयलेट व्हॅन श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात व ०१ मोबाईल टॉयलेट व्हॅन श्री साई धर्मशाळा व ज्युनिअर कॉलेजचे परिसरात ठेवण्यात यावी तसेच उर्वरित ०८ मोबाईल टॉयलेट व्हॅन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे वापराकरीता तसेच सदर टॉयलेट व्हॅनचे दैनंदिन दुरुस्ती वा देखभाल तसेच इतर येणारा संबंधीत सर्व खर्च शिर्डी नगरपंचाय, शिर्डी मार्फत करावयावचे अटी वर वर्ग करण्यात याव्यात, असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार ०८ मोबाईल टॉयलेट व्हॅन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडे वापराकरीता तसेच सदर टॉयलेट व्हॅनचे दैनंदिन दुरुस्ती व देखभाल तसेच इतर येणारा संबंधीत सर्व खर्च शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेमार्फत करावयाच्या अटीवर त्यांचेकडे वर्ग करता येतील.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३६४ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, सध्या शिर्डी शहरामध्ये स्वच्छतागृहांची कमतरता असल्यामुळे महिला, मुले, वृध्द व इतरही साईभक्तांना त्याचा त्रास जाणवतो व तशा प्रकारच्या तक्रारीही येत आहेत, याकरीता सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ साठी खरेदी करण्यात आलेल्या मोबाईल टॉयलेट व्हॅन शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे, सदरहू टॉयलेट व्हॅन उत्सव व गर्दीचे कालावधीमध्ये संस्थानच्या वापरासाठी घेणेच्या तसेच त्यांची दैनंदिन दुरुस्ती, देखभाल व इतर येणारा सर्व संबंधीत खर्च शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी करावा, या अटींवर शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे वर्ग करणेत याव्यात.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ **संस्थान स्कुल बसेस करीता 09:00:20 या साईजचे अपोलो अमर गोल्ड टायर्स ऐवजी अपोलो अमर डिलक्स १० टायर्स खरेदीस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- संस्थानचे १५ वाहनांकरीता वेगवेगळया साईजचे ५१ टायर्स खरेदी करणे कामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०२/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३० व दि.२८/०५/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१५१ (२५) नुसार

मान्यता मिळालेली होती. त्यानुसार खरेदीची विहीत प्रक्रिया राबवून निम्नतम पुरवठादार मे. सतिष टायर्स, श्रीरामपूर यांना इकडील जा.क्र.एसएसएस/वाहन/१३६३/२०१५ दि.०६/०६/२०१५ रोजीचे अन्वये कार्यादेश देणेत आलेला होता. त्यानुसार, मे. सतिष टायर्स, श्रीरामपुर यांनी पुरवठा आदेशातील अ.नं. ०१ ते ०६ व ०८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ४१ वेगवेगळया साईजचे टायर्सचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

मे.सतिष टायर्स, श्रीरामुपर यांना पुरवठा आदेशात नमुद केलेल्या ०१ ते ०८ क्रमांकाच्या टायर्स मधील अ.नं.०७ चे टायर्स बाबत इकडील कार्यालयाने वेळोवेळी 9:00:20 अमर गोल्ड टायर्स पुरवठ्या बाबत दुरध्वनीद्वारे विचारले असता त्यांनी अपोलो उत्पादक कंपनी जर जास्त संख्येमध्ये टायर्सची ऑडर असेल तरच अमरगोल्ड टायर्सचे उत्पादन करते. त्यामुळे तुमच्या फक्त १० नग टायर्स करीता कंपनी अमर गोल्ड टायर्स उत्पादन करु शकत नाही तथापि, तुम्ही अमर गोल्ड ऐवजी अमर डिलक्स टायर्स घ्या त्यांचीही गुणवत्ता चांगली असून दर ही अमर गोल्ड पेक्षा कमी असल्याचे दुरध्वनीद्वारे सांगितले तसेच दरांबाबत दि.२२/०९/२०१५ रोजीचे ई-मेल दरपत्रक दिलेले आहे.

आता, वाहन विभागाचे स्कुलबसेस करीता 9:00:20 टायर्स १० नगची अत्यंत आवश्यकता आहे. सततच्या वापराने जुनी टायर्सची झिज झालेली असुन शालेय मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सदरचे टायर्स बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी अमर गोल्ड ऐवजी अमर डिलक्स अपोलो टायर्स १० नग मे.सतिष टायर्स, श्रीरामपर यांचेकडून त्यांचे संदर्भिय अ.नं.०५ चे ई-मेल दरपत्राकानुसार (प्रति नग रु.१३,०००/-) निम्नतम दराने खरेदीस मान्यता मिळणेस विनंती. तसेच तसा पुरवठा आदेश मे.सतिष टायर्स, श्रीरामुपर यांना देणे विनंती आहे.

तसेच दि.२८/०५/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१५१ (२५) मध्ये त्याबाबतचा योग्यतो बदल होणेस विनंती.

निर्णय क्र.३६५ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, संस्थान स्कुल बसेस करीता 09:00:20 या साईजचे अपोलो अमर डिलक्स १० टायर्स खरेदीकामी फेर-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०६ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ वाहनतळांचे विद्युत पुरवठा बीलांबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता शिर्डी मध्ये येणा-या साईभक्तांना अतिरिक्त सोयीसुविधा पुरविणेकरीता उभारण्यात आलेल्या वाहनतळांवर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून १० वाहनतळां पैकी ०७ ठिकाणचे वाहनतळांवर विद्युतपुरवठा जोडुन घेण्यात आलेला होता. वीज जोडणीकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे एकुण ०८ ठिकाणांचे डिपॉझिट भरण्यात आले होते. परंतु वाहनतळ क्र.०३ निमगांव को-हाळे नगर-मनमाड रोडचे पुर्व बाजुचे ठिकाण रद्द होऊन ते साईधर्मशाळा या संस्थान परीसरामध्ये शिफट झाले होते. त्यामुळे त्याठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा विद्युतपुरवठा जोडुन घ्यावा लागला नाही. वाहनतळ क्र.०४ व १० याठिकाणी संस्थानचा विद्युतपुरवठा उपलब्ध होता. राहिलेल्या ०७ ठिकाणांचे वाहनतळांवर जोडुन घेण्यात आलेल्या विद्युतपुरवठयाचे एकुण बील डिपॉझिट रक्कम वजा जाता रक्कम रुपये ९२,१००/- इतके आहे. डिपॉझिट रकमेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | ग्राहक क्रमांक | सर्व्हे नंबर | सिंगल/ थ्री फेज | भरलेली डिपॉझिटची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | सावळीविहीर बु॥ सावळीविहीर फाटा | १६४५४०००३७९६ | ५/४/अ | ३ फेज | रु. २०,०००/- |
| २) | (सावळीविहीर) सोमय्या शाळेच्या पाठीमागे लक्ष्मीवाडी | १६४७२००१५७५० | २३१/२ | ३ फेज | रु. २०,०००/- |
| ३) | निमगांव-को-हाळे, नगर-मनमाड रोडचे पूर्व बाजूस | १६४६६००५६९१५ | २३/१, २३/२, २२/१ , २२/२ | १ फेज | रु. १५,०००/- |
| ४) | साकुरी, नगर-मनमाड रोड (साई उपासनी फॅब्रिकेशन शेजारी हॉटेल प्रभात समोर, गोदावरी वसाहत) | १६४७१०११६५७४ | २८० / ३ | १ फेज | रु. १५,०००/- |
| ५) | साकुरी, मा.ना.राधाकृष्ण विखे पा.पेट्रोलपंपाजवळ | १६४७१०११६५८२ | गट नं.३५६/३ | १ फेज | रु. १५,०००/- |
| ६) | शिर्डी, बिरेगाव रोड, कालीकानगर | १६४५५८०७६२१९ | ५९/१ | ३ फेज | रु. २०,०००/- |
| ७) | रुई, पिंपळवाडी रोड | १६४५५८०७६२२७ | ३४८ | १ फेज | रु. १५,०००/- |
| ८) | नांदुर्खी बु॥, नांदुर्खी रोड, | १६४५५८०७६२३५ | १७५ | १ फेज | रु. १५,९००/- |
| | | एकुण भरलेली सिक्युरिटी डिपॉटिची रक्कम:- | | | रु. १,३५,९००/- |

उपरोक्त डिपॉझिट रकमेपैकी वाहनतळ क्र.०३ ची रक्कम रुपये १५,०००/- इतके डिपॉझिट संस्थानलो परत मिळणार असुन उर्वरीत रुपये १,२०,९००/- ही डिपॉझिटची रक्कम येणा-या बीलातून वजा (मूळ बील रुपये २,२८,०००/- या रकमेतून) होऊन रुपये १,२०,०५०/- इतकी वीज बीलाची रक्कम भरावी लागणार आहे. या झालेल्या एकुण रक्कम रुपये २,२८,०००/- इतक्या एकत्रित खर्चास मान्यता मिळणेस विनंती

निर्णय क्र.३६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी झालेल्या रु.२,२८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता विद्युत पुरवठयाचे जनरेटरकरीता खरेदी करण्यात आलेल्या डिझेल बीलाबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता साईभक्तांना अतिरिक्त सोयीसुविधा पुरविणेकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून प्रत्येक वाहनतळांवर विद्युतपुरवठा जोडुन घेण्यात आलेला होता. या विद्युत पुरवठयाचे पर्यायी व्यवस्थेकरीता २० केव्हीएचे ६ व ३० केव्हीएचे ३ असे एकुण ९ जनरेटरसेट ९ वाहनतळांवर भाडे तत्वावर लावण्यात आले होते. सदरील जनरेटर करीता टेंडरमधील अटीनुसार डिझेल संस्थानमार्फत पुरविण्यात आले आहे. सदरील जनरेटर करीता खरेदी करण्यात आलेला डिझेलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ). मा.आ.श्री.राधाकृष्ण विखे पा.सह.ट्रक्स वहातुक संस्था लि.प्रवरानगर, साकुरी पेट्रोल पंप यांचेकडुन खरेदी करण्यात आलेले डिझेल :-**

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | बील क्र व दिनांक | मागणी (लि.) | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | मा.आ.श्री.राधाकृष्ण विखे पा.सह. ट्रक्स वहातुक संस्था लि. प्रवरानगर, साकुरी पेट्रोल पंप | ४३७१ / २४-०८-२०१५ | २०० लि. | रु. ४९.०६ | रु. ०९,८१२/- |
| | | ४८२१ / २९-०८-२०१५ | २०० लि. | रु. ४९.०६ | रु. ०९,८१२/- |
| | एकुण :- | | ४०० लि. | | रु. १९,६२४/- |
| | वजा ०.३० पैसे डिस्काऊंट प्रती लिटर | | ४०० लि. | | रु. ००,१२०/- |
| | निव्वळ देय रक्कम :- | | | | **रु. १९,५०४/-** |

**ब). श्री साई सर्व्हीस सेंटर सावळविहीर फाटा यांचेकडुन खरेदी करण्यात आलेले डिझेल:-**

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | बील क्र व दिनांक | मागणी (लि.) | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री साई सर्व्हीस सेंटर सावळविहीर फाटा | १००८५३ / १९-०९-२०१५ | २०० लि. | रु. ४८.१९ (०.३० पैसे डिस्काऊटसह) | **रु. ९,६३८/-** |

भाडे तत्वार लावण्यात आलेल्या वाहनतळांवरील एकुण ०९ जनरेटरसेट करीता एकुण ६०० लिटर डिझेल खरेदी करण्यात आले होते.

उपरोक्तप्रमाणे **अ).** नुसार मा.आ.श्री.राधाकृष्ण विखे पा.सह.ट्रक्स वहातुक संस्था लि.प्रवरानगर, साकुरी पेट्रोल पंप यांचेकडुन खरेदी करण्यात आलेल्या डिझेल खर्चाची रक्कम रुपये १९,५०४/- + **ब).** नुसार श्री साई सर्व्हीस सेंटर सावळविहीर फाटा यांचेकडुन खरेदी करण्यात आलेल्या डिझेल खर्चाची रक्कम रुपये ९,६३८/- मिळून एकुण रक्कम रुपये २९,१४२/- मात्र इतका खर्च आला असून पुरवठादारांना बीले आदा करण्यात आलेली आहेत. सदरील झालेल्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.३६७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता विद्युत पुरवठयाचे जनरेटरकरीता खरेदी करण्यात आलेल्या डिझेल बीलाबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी आलेल्या रु.२९,१४२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ **संस्थान कायम कर्मचारी एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम योजनेसंबंधीत Signing Authority बदलाबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान कर्मचाऱ्यांसाठी सन 2001 मध्ये ग्रुप ग्रॅच्युटी स्कीम एल.आय.सी., पुणे यांचेमार्फत घेण्यात आलेली आहे. संस्थान कायम कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यास, राजीनामा दिल्यास, सेवामुक्त केल्यास त्या कर्मचाऱ्याला एल.आय.सी. ग्रुप ग्रॅच्युटी फंडातुन उपदानाची रक्कम दिली जाते. संस्थानकडून या फंडात कर्मचाऱ्याच्या वार्षिक पगाराच्या साधारणत: वार्षिक 3.59% इतकी रक्कम वर्ग करण्यात येते व ही रक्कम LIC Group Gratuity Insurance Scheme खाती इतर गुंतवणुक लेखाशिर्षाखाली Balance Sheet मध्ये दर्शविली जाते. यातुन निवृत्ती झालेल्या कर्मचाऱ्याच्या नांवे एल.आय.सी. कडुन ग्रॅच्युटी व मयत झालेल्या कर्मचाऱ्याला या योजनेअंतर्गत क्लेमची रक्कम ग्रॅच्युटीव्यतीरिक्त मिळते.

अशाप्रकारे या फंडात दि.31 मार्च, 2015 अखेर ग्रॅच्युटी फंडात रु.39,73,01,549/- इतकी रक्कम जमा आहे. वेळोवेळी एलआयसी कडून प्राप्त होणारी ग्रॅच्युटी व क्लेमची रक्कम सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी शाखेत बचत खाते क्र.1588706501 मध्ये जमा होते व ती संबंधीत कर्मचाऱ्याला आदा करावी लागते. स्कीमनुसार सदर खाते सदर स्कीमचे अध्यक्ष मा.कार्यकारी अधिकारी व उपाध्यक्ष (मा.प्रशासकीय अधिकारी, लेखाशाखा) अथवा सेक्रेटरी (लेखाधिकारी ) यापैकी एक अशा स्वाक्षऱ्यांनी व्यवहार करण्याची तरतुद आहे. त्यास अनुसरुन वेळोवेळी बदल झालेप्रमाणे स्वाक्षरीचे नमुणे बँकेला सादर केले जातात. यापुर्वी मा.व्य.सभा निर्णय क्र.953/दि06.11.2014 अन्वये अध्यक्ष म्हणुन श्री राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सेक्रेटरी म्हणुन श्री एस.पी.लंके, लेखाधिकारी यांचा निर्णय संमत झाला आहे.

सध्या कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र जाधव यांची बदली होऊन त्यांचेजागी श्री बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी म्हणून दि.01.09.2015 पासून रुजू झालेले आहेत. त्यामुळे अध्यक्ष म्हणून मा.कार्यकारी अधिकारी श्री बाजीराव शिंदे असा बदल करण्यास मान्यता असावी व यापुढे अशाप्रकारे मा.कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी व लेखाधिकारी या पदानुसार वेळोवेळी झालेल्या बदलास अनुसरुन या पदावर येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरींचे नमुणे मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने बँकेस व एलआयसी, पुणे यांना वेळोवेळी कळवुन त्याप्रमाणे खात्यांवरील व्यवहार करण्यास मान्यता मिळणेकामी सादर.

निर्णय क्र.३६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान कायम कर्मचारी एल.आय.सी.ग्रुप ग्रॅच्युटी इन्शुरन्स स्कीम योजनेसंबंधीत Signing Authority बदलाबाबतचे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

आयत्या वेळेचा विषय नं.०१ **कोजागिरी पौर्णिमा उत्सवाबाबत.**

प्रस्ताव- अध्यक्ष,डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, मुंबई यांनी उपरोक्त दि.०१/१०/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, गेली ८५ वर्ष डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर साई सेवा ट्रस्टच्या वतीने कोजागीरी पौर्णिमे निमित्ताने साई मंदीरात आणि मंदीराच्या आवारात साईभक्तांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात येतात. सायंकाळी ७ ते ११ वा पर्यत साई मंदीरात तसेच शेजारती संपन्न झाल्यानंतर साई मंदिराच्या परिसरात पहाटेपर्यंत विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येते. आजमितीपर्यंत ही परंपरा अखंडितपणे सुरु आहे. ती शिर्डी संस्थानने दिलेल्या सहकार्या मुळेच हे नमुद करण्यास आनंद आणि अभिमान वाटतो.

यंदाही कोजागिरी पौर्णिमे निमित्ताने सोमवार २६ ऑक्टोबर,२०१५ रोजी अशाच स्वरुपाचे कार्यक्रम सादर करण्याची संधी मिळावी. यासाठी हे विनंतीवजा पत्र विचार विनिमयासाठी आपल्याला देत आहोत. कोजागिरी पौर्णिमेच्या उत्सवासाठी शिर्डी संस्थानच्या वतीने पुढील गोष्टीचे आम्हांला सदैव सहकार्य लाभले आहे.या पत्राव्दारे यंदाही उत्सवासाठी पुढील सोयीची उपलब्धतेची अपेक्षा करत आहोत.

| अ.न | तपशिल | संस्थानला करावा लागणारा खर्च |
|---|---|---|
| १. | कोजागिरी पौर्णिमेनिमित्ताने सोमवार ,२६ ऑक्टोबर, २०१५ रोजी सायं ७ ते ११ पर्यत प्रथेप्रमाणे साई मंदीरात सायं.७ ते रात्रौ.११ पर्यत भजन, प्रवचन भक्तीगीते पारंपारीक लोकगीते सादर करण्यासाठी परवानगी देणे. तेथे ध्वनीक्षेपक व इतर सुविधा उपलब्ध करणे.<br>साई मंदीराच्या आवारात सुप्रसिध्द नुत्य दिग्दर्शक श्री.विद्यासागर देडे हे मराठी रंगभूमी, दुरचित्रवाणी व चित्रपट क्षेत्रातील नामवंत कलाकारांच्या सोबतीने लावण्यात रंगली लावणी असा बहुढंगी कार्यक्रम सादर करणार आहेत.<br>सदर कार्यक्रमासाठी त्यांनी रंगमंच,प्रकाश,ध्वनी योजना इ. सुविधा मिळणेस विनंती केलेली आहे. | |
| | १) निवास व्यवस्थेसाठी सुमारे २० खोल्या व ०२ हॉल उपलब्ध करणे त्यांच्यासाठी गाद्या व चादरी त्याचप्रमाणे पांघरुण इ. उपलब्ध करणे. | सशुल्क निवास व्यवस्था |
| | २) गतसाली २०१४ साली कोजागिरी पौर्णिमे निमित्त भंडा-या साठी मंगल कार्यालयाची जागा (तळमजला) देण्यात आली होती. यंदाही हीच जागा आमच्या सेवा मंडळाला उपलब्ध करुन देण्यात यावी. | सशुल्क व्यवस्था |
| | ३) साईमंदीरात सायं. ७ ते रात्रौ.११ पर्यत भजन, प्रवचन भक्तीगीते पारंपारीक लोकगीते सादर करण्यासाठी परवागी देणे. तेथे ध्वनीक्षेपक व इतर सुविधा उपलब्ध करणे. | |
| | ४) ४०x५० फुट या मापाचा रंगमंच कार्यक्रमाच्या ठिकाणी कलाकारांना वेशभूषा व रंगभूषा करण्यासाठी स्त्री व पुरुष कलाकारांसाठी वेगवेगळया बंदिस्त जागा उपलब्ध करुन द्यावे. या दोन्ही दालनात ६ ते ८ प्लास्टीक खुर्च्या, आरसा, प्रखर दिव्यांची सुविधा आणि फॅनची सोय करण्यात यावी.<br>कार्यक्रमाच्या ठिकाणी रंगमंचाजवळ ८ ते १० प्लास्टिक खुर्च्या त्याच बरोबर ४ टेबल्स उपलब्ध करावे. | रु.३५,०००/-मात्र स्टेज, मेकअप रुम व बैठकव्यवस्थे साठी खर्च (नियमा नुसार विद्युत आकार भरुन घेऊन) संस्थान मार्फत मोफत |
| | ५) सर्व कलाकार व साईभक्तांसाडी कोजागिरी निमित्ताने संस्थानाच्यावतीने पुरविण्यात येणा-या मसाले दूध व बसण्याची व्यवस्था उपलब्ध करणे . | |

सुरुवातीपासून दरवर्षी स्टेज, मेकअपरुम,बैठकव्यवस्था, ध्वनीक्षेपनव्यवस्था, कलाकारांना चहा इ. संस्थानमार्फत करण्यात येते. तसेच त्यांची नेहमीप्रमाणे सशुल्क भोजन व निवास व्यवस्था व वीज वापर ५ केव्ही पेक्षा जास्त असेल तर वीज पुरवठयाची व्यवस्था संबधीत आयोजकांनी स्वतः करावयाची आहे. जर वीज वापर ५ केव्ही पेक्षा कमी असेल तर आयोजकाकडून डिपॉझीट म्हणून रक्कम रु.३०००/- भरुन घेणे (महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या चालू आकारा नुसार) वापरलेले वीजेचे बील देऊन डिपॉझीट मधून या बीलाची रक्कम वजा करुन घेऊन राहिलेली रक्कम त्यांना परत करता येईल.

मागील वर्षी सदरचा कार्यक्रम १६ गुंठे जागेत घेण्यात आला होता.कोजागिरी पौर्णिमेस रात्रौ. शेजारती नंतर समाधी मंदिर बंद होते व सदरचा कार्यक्रम हा रात्रभर असतो. त्यामुळे या वर्षी देखील सदर कार्यक्रम १६ गुंठे जागेत करता येईल.

सालाबाद प्रमाणे अध्यक्ष, डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट, मुंबई यांना उपरोक्त प्रमाणे कार्यक्रम करणेस परवानगी देणेबाबत स्टेज, मेकअपरुम, बैठकव्यवस्था, इ. साठी अंदाजे रु.३५,०००/- खर्चास मान्यता असावी.

सदर कार्यक्रम श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी चा नसुन अध्यक्ष डॉ.अण्णासाहेब गव्हाणकर साईसेवा ट्रस्ट इंदिरा निवास,लाल बहादुर शास्त्री मार्ग,कुर्ला (प) मुंबई- ७० मुंबई या ट्रस्ट मार्फत साजरा केला जातो. तरी स्टेज,मेकअपरुम, बैठक व्यवस्था, इ.साठी खर्चास असावी.

तरी सदरच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याअनुशंगाने येणा-या रु.३५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

आयत्या वेळेचा विषय नं.१० **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांना, सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबत.**

प्रस्ताव- मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांनी संदर्भांकीत पत्राने सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक अनुदान मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"भारतीय सरहद्दीवर तसेच देशांतर्गत मोहिमेमध्ये दरवर्षी सैनिक वीरगती प्राप्त होतात, तसेच असंख्य जखमी व अपंगही होतात. त्यांचे ऋण आपणा सर्वांवर आहे. त्याच बरोबर त्यांच्या कुटूंबियांची जबाबदारी ही आपणावरच आहे. आपण देशात सुरक्षित आहोत याचे श्रेय सीमेवर हुतात्म स्विकारलेल्या हजारो शहिदांना व आजही प्राणपणाने लढणा-या वीर सैनिकांना द्यावे लागेल.

या सैनिकांनी केलेल्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ७, डिसेंबर सर्वत्र ध्वजदिन म्हणून साजरा करण्यात येऊन ध्वजनिधी संकलीत करण्यात येतो. सदर निधीचा विनियोग युध्दात शहीद होणा-या वीरांच्या व अपंगत्व आलेल्या सैनिकांच्या कुटूंबांकरीता कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि पुनर्वसनासाठी केला जातो. महाराष्ट्र शासनाकडून अहमदनगर जिल्हयास या वर्षीचे उद्दीष्ट रू.१,४३,००,०००/- ठरवून देण्यात आलेले आहे. सदरचे उद्दीष्ट पुर्ततेसाठी श्री साईबाबा संस्थानकडून रू.२१,००,०००/- (अक्षरी रूपये एकवीस लाख) आर्थिक मदत मिळणेबाबत उद्दीष्ट दिलेले असून शिर्डी या पवित्र भूमितून जिल्हयातील शहीद जवानांच्या अवलंबीतांचे कल्यानार्थ सढळ हाताने मदत करणेबाबत मागणी केली आहे.

**अधिनियमातील तरतूदः-** सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७(६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतुद आहे.

**मागील वर्षीची कार्यवाहीः-** मागील सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.११.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९३३ ने अधिनियमातील तरतूदीनुसार मागील वर्षाप्रमाणे कर्मचा-यांकडून रक्कम कपात करून जमा होणारी रक्कम व उर्वरीत संस्थानची रक्कम असे रूपये ११ लाख जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अहमदनगर यांना देण्यात मान्यता दिलेली होती.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार अधिकारी व कर्मचारी यांचेकडून खालीलप्रमाणे रक्कम त्यांचे वेतनातून कपात करण्यात आलेली होती.

| अ.नं. | वेतन बॅन्ड | वसूल करावयाची रक्कम रूपये |
|---|---|---|
| ०१ | प्रतिनियुक्तीवर शासकीय अधिकारी | ३०० |
| ०२ | १५६००-३९१०० | ३०० |
| ०३ | ९३००-३४८०० | २४० |
| ०४ | ५२००-२०२०० | १२५ |
| ०५ | ४६५०-१७४०० | १०० |
| ०६ | ४४४०-७४४० | ७५ |
| ०७ | ३६,०००/- ते त्यापुढील रक्कम (फिक्स पे) | ३०० |

| | | |
|---|---|---|
| ०८ | ३१,००० ते ३५,००० (फिक्स पे) | ३०० |
| ०९ | २६,००० ते ३०,००० (फिक्स पे) | २५० |
| १० | २१,००० ते २५,००० (फिक्स पे) | २०० |
| ११ | १०,००० ते २०,००० (फिक्स पे) | १०० |
| १२ | ७५०० (फिक्स पे) | ७० |
| १३ | २००० ते ५५०० (फिक्स पे) | २५ |

पान नं.१ वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे मागील वर्षी श्री साईबाबा संस्थान कर्मचा-याकडून रक्कम कपात करून रू.२,८९,३६०/- एवढी रक्कम जमा झालेली होती व उर्वरीत संस्थानची रक्कम रू.८,१०,६४०/- असे एकूण रू.११ लाख रक्कमेचा स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा शिर्डी चेक नं.१) ५३७६७२, ने रू.४ लाख, २) चेक नं.५३७६७३ ने रू.४ लाख, ३) चेक नं.५३७६७४ ने रू ३ लाख दि.०४.१२.२०१४ ने तीन धनाकर्षाद्वारे एकूण ११ लाख रूपये जिल्हा कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देण्यात आलेले आहे.

यावर्षी संदर्भीय पत्रान्वये रक्कम रू.२१ लाखाची मागणी करण्यात आलेली असून संस्थान कर्मचारी यांचे पगारातून कपात करून जमा होणारी रक्कम रू.२,८८,७७०/- खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे आहे.

| अ.नं. | वेतन बॅन्ड | एकूण अधिकारी / कर्मचारी | प्रति अधिकारी/ कर्मचारी वसूली | वसूली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी १५६००-३९१०० | ०३ | ३०० | ९००.०० |
| ०२ | १५६००-३९१०० | ९४ | ३०० | २८,२००.०० |
| ०३ | प्रति नियुक्तीवरील शासकीय अधिकारी ९३००-३४८०० | ०१ | २४० | २४०.०० |
| ०४ | ९३००-३४८०० | ४०२ | २४० | ९६,४८०.०० |
| ०५ | ५२००-२०२०० | ७५० | १२५ | ९३,७५०.०० |
| ०६ | ४६५०-१७४०० | ०५ | १०० | ५००.०० |
| ०७ | ४४४०-७४४० | ८८९ | ७५ | ६६,६७५.०० |
| ०८ | ४५००/- (फिक्स पे) | ०१ | २५ | २५.०० |
| ०९ | ५००० (फिक्स पे) | ०२ | २५ | ५०.०० |
| १० | ६००० (फिक्स पे) | ०५ | ७० | ३५०.०० |
| ११ | ११,००० (फिक्स पे) | १३ | १०० | १,३००.०० |
| १२ | १२,००० (फिक्स पे) | ०१ | १०० | १००.०० |
| १३ | २१,००० (फिक्स पे) | ०१ | २०० | २००.०० |
| | **एकूण कर्मचारी संख्या- २१६७** | | **कर्मचारी वसूली रक्कम रू. २,८८,७७०.००** | |

उपरोक्त तक्त्यातील शेवटच्या रकान्यातील कर्मचारी वसूली रक्कम रू.२,८८,७७०.०० रूपये व संस्थानकडून देय होणारी उर्वरीत रक्कम रू.१८,११,२३०.०० अशी एकूण २१,००,०००/- मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी देता येईल.

अ) सन २००४ चा अधिनियम क्र.१७ (२) (ण) मानव जातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. तसेच अधिनियम क्र.१७(६) चे तरतूदीस अधिन राहून, समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील, अशी तरतूद आहे. करीता शासनाचे न्याय व विधी विभागाची मान्यता घेणेची आवश्यकता असणार नाही.

ब) मा.त्रिसस्यीय समितीचे दि.०८.११.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.८६२ नुसार अन्य सर्व कारणांसाठीचे रू.१०,००,०००/- (अक्षरी रू.दहा लाख) मात्र किंवा त्यापुढील खर्चाचे सर्व बीलांना मा.व्यवस्थापन समिती सभेचे पुर्व मान्यतेने मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असा ठराव झालेला आहे.

**विभागाचा अभिप्राय:-**

उपरोक्त "अ" व "ब" स अधिन राहून संस्थान कर्मचारी पगारातून वसूली केलेली रक्कम रू.२,८८,७७०.०० व संस्थानकडून देय होणारी उर्वरीत रक्कम रू.१८,११,२३०.०० अशी एकूण रु.२१,००,०००/- मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे जिल्हा सैनिक कल्याण निधीसाठी देता येईल व मा.त्रिसस्य समितीचे सभेत प्रस्ताव मंजूरीनंतर मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेवून रक्कम रू.२१ लाख मात्र अध्यक्ष जिल्हा सैनिक कल्याण, अहमदनगर यांना देता येईल.

प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास आर्थिक मदत देणेबाबतचे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

तसेच सदरहू रक्कम जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहमदनगर यांना देणेपूर्वी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

आयत्या वेळेचा विषय नं.११ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन2015- 2016) यावर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part-A) तसेच On Consignment Basis (Part-B) वरील Item खरेदीकामी प्रायोगिक तत्वावर वापरलेल्या साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

प्रस्ताव- श्रीसाईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी सन 2015-2016 यावर्षाकरीता लागणाऱ्या औषधे,सर्जिकल साहित्यखरेदीकामी (PartA) करिता एकुण 1238 आयटमकरिता एकुण रक्कम रु.16,75,72,947.44 च्या व (PartB) On Consignment Basis करिता प्राप्त दरानुसार अंदाजे रु. 4,05,14,287/-इतका खर्च अपेक्षित धरून दि.28/07/2015 रोजी एकुण रु. 20,20,84,234.44 इतक्या रक्कमेचा पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे . मागील वर्षाच्या या खरेदीवरील बचतीची रक्कम प्राथमिकदृष्ट्या रु.7,65,41,636.64 इतकी आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशातील मटेरिअल देखील प्राप्त होत आहेत. सदर खरेदीमध्ये काही औषध व सर्जिकल साहित्यासाठी Demo मागविण्यात येऊन त्याचे प्रात्याक्षिक घेण्यात Demo Satisfy वाटल्यावरच सदर मटेरियलची निवड करण्यात आली तसेच काही ठिकाणी Demo प्राप्त न झाल्याने मागील वर्षाचा अनुभव पाहता तेथे त्या औषधांची निवड करण्यात आली तर काही ठिकाणी प्राप्त निम्नतम दर व त्याची गुणवत्ता (Quality) पाहून खरेदी करण्याची शिफारस केलेली आहे.

तसेच रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणेकामी वापरण्यात येणा-या ग्लुकोमीटरसाठी 50 Strips व100 Strips साठी दर आलेले होते परंतु सदरकामी 100 Strips ऐवजी फक्त 50 Strips ची मागणी वाढवून आपल्या Demo शिफारशीअन्वये Nipro व Accucheck कंपनीस 50% विभागणी करुन पुरवठा आदेश देण्यात देणेबाबत शिफारस केलेली आहे.

कार्डीयाक ओ.टी.मध्ये दैनंदिन होणा-या सर्जरीसाठी लागणा-या Oxygenator व TubingPack खरेदीकामी तसेच सदर मटेरियलची भविष्यात पुरवठा आदेश दिल्यानंतर होणा-या तुटवडा भासू नये म्हणून तीनही प्रकारच्या Oxygenator व दोन प्रकारच्या Tubingpack साठी शिफारशीअन्वये दोन पुरवठाधारकांना पुरवठा आदेश विभागुन दिलेला आहे. तसेच Cauterypad व Cauterypencil साठी ValleyLab कंपनीचे दर प्राप्त न झाल्याने सदरखरेदी फेरनिविदा काढण्यात येऊन सध्या त्याचा तुटवडा भासू नये म्हणून कमीत कमी 2 महिने पुरु शकेल इतका साठा मागील वर्षाच्या कंपनीचा तात्पुरत्या स्वरुपात पुरवठा आदेश देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

दि. 28/07/2015 रोजीचे पुरवठा आदेशामध्ये Octopus व Tissuestabilizer हया कार्डीयाक साहित्याचा पुरवठा आदेश देण्यात आला होता परंतु त्यानंतर प्राप्त Terumo कंपनीच्या Octopus चा Demo Report चांगला आल्यामुळे निम्नतम दर असलेले Terumo कंपनीचे Octopus ला पुरवठा आदेश देण्यास देण्याचा तसेच त्यामध्ये शिफारस आलेल्या तिनही प्रकारच्या Octopus चा पुरवठा विभागून देण्याची शिफारस केलेली आहे.

ऑपरेशन थिएटरमध्ये लागणा-या सर्जिकल Item मध्ये Demo रिपोर्टनुसार अथवा काही ठिकाणी Demo न प्राप्त झाल्याने मागील वर्षाचा अनुभव पाहता तेथे त्या साहित्याचा तसेच काही ठिकाणी L1 चा पुरवठा आदेश देण्यात आलेला असून तसेच

1) Liq. Benzalkonium Chloride Solution 4.5% V/V 5Ltr कामी प्राप्त दरामध्ये M/s. Kanchan Drugs, Pune यांनी 1 लिटरचे दर रु.119/-इतके दिलेले होते परंतु सदरकामी चर्चा करतांनी M/s. Kanchan Drugs, Pune यांनी 5 लिटरसाठी प्रती नग दर रु. 300/-या दराने देण्याचे मान्य केले. तेथे M/s . Kanchan Drugs, Pune यांचे 1 लिटर ऐवजी 5 लिटरचे त्यांनी देऊ केलेल्या रु.300/-या दराने पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.
2) निविदेमधील अ .नं. 244 (हातधुण्याचेलिक्वीड) करिता मागणी केलेल्या10,000 नगासाठी प्राप्त झालेल्या दरामध्ये मागील वर्षाचा अनुभव पाहता सर्व वॉर्ड/विभागातील दैनंदिन वापरासाठी लागणारे हात धुण्याच्या लिक्वीडसाठी Liq. Sterimil चा 80% पुरवठा आदेश व कार्डीयाक ओटीसाठी त्यांचे शिफारशीन्वये Microshieldhandrub 20% पुरवठा आदेश विभागून देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.
3) I.V.Set साठी Demo दिल्यानंतर देखील कोणाचीही शिफारस प्राप्त न झाल्याने सध्या दैनंदिन वापरासाठी JMS कंपनीचे मागील वर्षात वापरत असलेल्या मटेरियलची 20,000 नगांचा पुरवठा आदेश देण्यात येऊन उर्वरित 60,000 नगासाठी फेरनिविदा करण्यात येत आहे.
4) Clip Applicator हे आपण ज्या कंपनीला SLS Clip चा पुरवठा आदेश देणार आहोत त्याच कंपनीकडून मोफत वापरण्यास देण्यास तयार आहे.

ब्लड बँकेचे लागणारे 11 प्रकारच्या केमिकल्ससाठी फक्त एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झाले असून प्राप्त दरामध्ये 09 प्रकारच्या केमीकल्स चे दर मागील वर्षापेक्षा कमी असून त्यामध्ये दोन प्रकारच्या केमीकल्सचे दर हे कंपनीचे दर वाढविल्याने त्याकामी जास्तीचा खर्च लागणार आहे परंतु सदर केमीकल्स नसल्यामुळे ब्लड बँकेत रक्त तपासणी ब-याच अडचणी येत आहे त्यामुळे सदर केमीकल्सची गरज पाहता व प्राप्त दराने पुरवठा आदेश देण्याची

शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच ब्लड बँकेच्या शिफारशीन्वये रक्त साठवून ठेवण्यासाठी लागणा-या पिशव्यासाठी Terumo Penpol कंपनीचा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

रेडीओलॉजी विभागाकरिता लागणारे मटेरियलकामी त्यांची शिफारस घेऊन त्या प्रमाणे ते पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

कार्डीयाक ओटी साठी लागणारे Micro Vessel Clip (Yellow) Bulldog साठी वार्षीक मागणी केलेल्या 150 नगांपैकी सदर मटेरियलची गरज पाहता 30 नगांचा प्राप्त निविदाधारकांचे दरानुसार स्विकारण्यात येऊन उर्वरित 120 नगांसाठी फेरनिविदा मागविण्यात येत आहे.

तसेच काही ठिकाणी प्राप्त दर एकाच निविदाधारकांचे असल्याने तेथे Monopoly Item म्हणून त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे.

प्रयोगशाळा विभागात लागणारे केमिकल्स व कीट कामी-

1) श्री साईनाथ रुग्णालयासाठी प्रयोगशाळा विभागासाठी लागणारे केमीकल्स / किट कामी प्राप्त शिफारशी अन्वये पुरवठा आदेश देण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

2) श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी लागणारे केमीकल्स / किट कामी त्यांनी Demo अन्वये शिफारस केलेल्या मटेरियलची 2 महिन्यासाठी प्रायोगिक तत्वावर पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे. तसेच Micrbiology विभागासाठी लागणारे Agar,Culture Bottle आणि Swabsticks इतर मटेरियलकामी निविदा प्राप्त न झाल्याने सदर मटेरियल नसल्यामुळे सदर विभागात दैनंदिन तपासणीत बऱ्याच अडचणी येत आहे. त्यामुळे सदर मटेरियलकामी फेरनिविदा करण्यात येत असून मटेरियल उपलब्ध होण्यास अजून 3 ते 4 महिने लागणार आहे. तेव्हा उपरोक्त मटेरियलची तातडी पाहता सदर मटेरियल स्थानिक पुरवठाधारकांकडे उपलब्ध नसते व ते बनविण्यास कमीत कमी 15 दिवस लागतात त्यामुळे सदर मटेरियल तातडीने बाजारभावाने खरेदी करण्यास शिफारस केलेली आहे.

3) वार्षीक औषधे खरेदीमध्ये साबण, निरमा, बॅटरी सेल व Saving Blade साठी कुणाचेही दर प्राप्त न तसेच खरेदीकामी सदर स्थानिक पुरवठा धारकांकडुन कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात यावे असे अशी शिफारस केलेली आहे.

4) श्री साईबाबा रुग्णालयात राजीवगांधी जीवनदायी योजना दि.16/11/2013 रोजी कार्यान्वित झालेली आहे. सदर योजना नवीनच असल्याने त्या योजनेमध्ये कोणते आजार समाविष्ट केलेले आहे यांची पुर्ण माहिती नसल्यामुळे वार्षीक मागणी मध्ये खरेदी ब-याच औषधांची मागणी केलेली नसल्यामुळे तसेच नवीन डॉक्टर रुजु झाल्यानंतर ते नवीन औषधे लिहीतात सदर नवीन दिलेल्या औषधांची सुध्दा वार्षीक मागणीमध्ये मागणी नसल्यामुळे त्या औषधांचा सुध्दा आपणास राजीवगांधी जीवनदायी योजनेसाठी तसेच दैनंदिन वापरासाठी देण्यास तुटवडा भासतो तेव्हा अशा औषधांसाठी वार्षीक मागणी नसल्यास नवीन औषधांची स्थानिक बाजारातुन तात्पुरत्या स्वरुपात तातडीने घेण्यास शिफारस केलेली आहे. तसेच ब-याच औषधांचा पुरवठा आदेश गेल्यानंतर देखील आपणास कधी कधी लवकर प्राप्त होत नाही अशा औषधांचा तुटवडा भासू नये म्हणून त्यासाठी स्थानिक बाजारातून तातडीने तात्पुरत्यास्वरुपात खरेदीस शिफारस केलेली आहे.

5) डेंटल मटेरियलसाठी निविदा प्राप्त न झाल्याने सदरचे मटेरियल तातडीने गरजेपुरते खरेदीची शिफारस केलेली आहे.

6) श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणारे सलाईन खरेदीकामी Denis कंपनीच्या सलाईनची शिफारस केल्याने तेथे त्या सलाईनची मागणी केलेली आहे.

दि. 28/07/2015 रोजीचे पुरवठा आदेशामध्ये खालीलप्रमाणे बदल करुन मिळणेबाबत शिफारस केलेली आहे.

अ) साईनाथ रक्तपेढीसाठी लागणा-या Coombs Card व Gel Groop Card साठीच्या मागणीमध्ये किट ऐवजी चुकुन Strip चे दर घेण्यात आलेले आहे तेथे कीट प्रमाणे दर घेण्यास शिफारस केलेली आहे.

ब) न्युरो ओ. टी साठी Dura Patch10x12 साठी M/s. Critical Care, Pune यांना पुरवठा आदेश देण्यात आला होता परंतु सदर कामी M/s. Kanchan Drugs, Pune यांचे दर निवडण्यात आले होते त्यामुळे M/s. Critical Care, Pune यांचा पुरवठा आदेश रद्द करुन M/s. Kanchan Drugs, Pune यांचेकडून Dura Patch10x12 घेणेबाबत शिफारस केलेली आहे.

क) M/s. Critical Care, Pune यांना Tissue Stabilizer SUV चा पुरवठा आदेश देण्यात आला आहे परंतु सदर कामी Tissue Stabilizer AcrobatI ची शिफारस करण्यात आली आहे. तेव्हा तेथे Tissue Stabilizer SUV चापुरवठा आदेश रद्द करुन AcrobatI चा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

ड) सुचर्समध्ये M/s. Critical Care, Pune यांनी Covidion कंपनीच्या सुचर्ससाठी Perfoil दर दिल्यामुळे त्यांना दिलेल्या पुरवठा आदेशात काही ठिकाणी 12 Foil प्रमाणे बॉक्सचे दर घेतलेले आहे परंतु त्यांची पॅकींग 36 Foilys असते तेव्हा ज्याठिकाणी12 Foil/Box प्रमाणे दर घेतलेले असेल त्याप्रमाणे पुरवठा आदेशात12 Foil/Box प्रमाणे पॅकींग टाकण्यासाठी शिफारस केलेली आहे आणि Suture India, Mumbai यांचे पुरवठा आदेशात त्यांचे दर 36 Foilbox प्रमाणे घेण्यात आलेले आहे परंतु प्रत्यक्षात त्यांचे पॅकींग 12 Foil/Box प्रमाणे असते तेव्हा सदर ठिकाणी त्यांचे12 Foil/Box प्रमाणे दर घेण्याची शिफारस केलेली आहे.

ई) आयुर्वेदीक औषधामध्ये मे. श्री. जीएजन्सी, श्रीरामपुर यांना दिलेल्या पुरवठा आदेशात त्यांना नजर चुकीने Vastalya कंपनीचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु त्यांनी निविदेमध्ये Vastal कंपनीचे दर दिलेले होते तेव्हा त्यांचे पुरवठा आदेशात Vastalya ऐवजी Vastal कंपनीचा पुरवठा आदेश देण्याची शिफारस केलेली आहे.

आपण दिलेल्या पुरवठा आदेश हा पुरवठाधारकांनी भरलेल्या निविदेप्रमाणे असतो परंतु सदर निविदा ऑनलाईन भरण्यात येत असल्यामुळे तसेच निविदा कालावधी पुरेसा नसल्यामुळे पुरवठाधारकांकडून निविदा भरतांनी त्या औषधांची कंपनी, पॅकींग, Brand Name यात काही प्रमाणात Spelingmistake झाल्यामुळे सुध्दा प्राप्त मटेरीयल बाजुला ठेवण्यात येत आहे त्याबाबत पुरवठाधारकांशी चर्चा करुन त्यांचे दुरुस्तीबाबतचे लेखी पत्र मागवून ते मटेरियल घेण्याबाबत शिफारस केलेली आहे तसेच मटेरियलबाबत शंका निरसण होत नसेल तर त्याबाबत वापरणारे डॉक्टर/तंत्रज्ञत्यांचा अभिप्राय घेऊन सदर मटेरियल आवक घेता येईल त्याबाबत स्टोअर विभागाने पाठपुरावा करण्याची शिफारस केलेली आहे.

वार्षीक औषधे खरेदीचे वेळेस झालेल्या चर्चेनुसार ब-याच ठिकाणी आपण काढलेल्या निविदेचे औषधे सर्जिकल साहित्यासाठी दिलेले Specification मध्ये त्रुटी आढळून आल्याने तसेच प्राप्त मटेरियलमध्ये पुरवठा आदेशात दिलेले packing, strength मध्ये फरक आढळतो त्यामुळे ते मटेरियल स्विकारले जात नाही तेंव्हा सदरकामी पुढील वर्षीच्या निविदेमध्ये औषधे सर्जिकल साहित्याचे Specification दुरुस्त करुन निविदा काढण्यात येणेबाबत शिफारस केलेली असून व सध्या दिलेल्या औषधे सर्जिकल साहित्याकामी दिलेल्या पुरवठा आदेशाप्रमाणे प्राप्त मटेरियलचे Specification, packing, strength यांची नोंद घेण्यात येऊन नोंद घेतल्याप्रमाणेच मटेरियल सन 2015 - 16 वार्षीक औषधांमध्ये पुरवठा आदेशांची मुदतसंपेपर्यंत घेण्यात यावे त्यामुळे दिलेल्या पुरवठा आदेश व प्राप्त मटेरियलमध्ये त्यावर्षातील वार्षीक पुरवठामध्ये बदल/त्रुटी आढळणार नाही. यांची नोंद घ्यावी. तसेच बरेच आयुर्वेदीक औषधे, सर्जिकल साहित्य व कन्झुमेबल साहित्यांचे बॅच नंबर व मुदत बाह्यता दिलेली नसते परंतु आपले संणकात नोद घेतांनी बॅच नंबर व मुदतबाह्यता आवश्यक असते तेंव्हा सदर औषधे/साहित्याकामी स्टोअर विभागाने विशिष्ट बॅचनंबर व मुदतबाह्यता ठरवून घेऊन संगणकात नोंद घेण्यास अडचण येणार नाही याची शिफारस केलेली आहे.

वार्षीक पुरवठा आदेशात बरेच वेळेस असे आढळून येते की मागणी केलेली औषधे वार्षीक संख्या जास्त असते परंतु वर्ष भरात त्यांची गरज फारच कमी असते त्यामुळे आपले अटीशर्तीनुसार संस्थानचे मागणी केलेल्या औषधांची 5 टक्के सुरक्षा रक्कम आपणाकडे 1 वर्ष भरासाठी ठेवावी लागते त्यामुळे पुरवठा धारक त्याबाबत तक्रार करत असतात तेव्हा अशावेळी वैद्यकीय संचालक यांची सदर बाबत व्यवस्थीतपणे मागणी पुरवठा यांचा वापर आपण ठेवलेली सुरक्षा रक्कम यांची नोंद व सत्य परिस्थितीची दाखवून त्याबाबत त्यांचे आदेशान्वये 5 टक्के सुरक्षा रक्कम वसुल करणे किंवा न करणे यांची वैद्यकीय संचालकयांचे मार्फत मंजुरी घेण्याबाबतचा निर्णय घेण्याची शिफारस केलेली आहे.

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील ओ.टी विभागासाठी लागणारे सुचर्स खरेदीकामी Demo घेण्याची कार्यवाही चालू असल्यामुळे सदरकामी Demo चा रिजल्ट प्राप्त झालेनंतरच पुरवठा आदेश देता येईल त्यानंतर उर्वरित एकुण 379 औषधे सर्जिकल साहित्यासाठी फेरनिविदा काढण्याची शिफारस केलेली आहे.

तसेच Part B मध्ये कॅथलॅब व कार्डीयाकसाठी लागणारे मटेरियल साठी वापरणारे डॉक्टराचे शिफारशी अन्वये पुरवठा आदेश देण्यात येत आहेत.

तेव्हा वरील प्रमाणे एकुण 554 आयटमसाठी Demo घेऊन शिफारशीन्वये प्राप्त निम्नतम दराने तसेच काही ठिकाणीतातडीची गरज पाहता तुटवडा भासू नये म्हणून फेरनिविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत पुरेल इतका साठा खरेदी करण्याचे तसेच Monopoly Item चा विचार करता Part A करिता एकुण रक्कम रु. 9,60,18,401.21 इतका खर्च अपेक्षित आहे तसेच Part B करिता 1 आयटमसाठी मागील वर्षाचा वापर पाहाता व सध्या चे प्राप्त दराने अंदाजे रु. 3, 28, 860/- इतका खर्च अपेक्षित आहे असे दोन्ही मिळून एकुण 555 आयटमसाठी अंदाजे रु.9,63,47,261.21 इतका पुरवठा आदेश देणेत येत आहे.

या औषधांचे मागील वर्षीचे प्राप्त दरावर आधारित औषधांची एकुण किंमत तसेच यावर्षी निविदेद्वारे प्राप्त प्रस्तावित दरानुसार होणारी एकुण किंमत याची माहिती देणारे विभागानिहाय विवरण पत्रसोबत अवलोकनार्थ जोडले आहे. औषधे खरेदी विभागातील नवीन कर्मचारी व प्रत्येक विभागाचे डॉक्टर तसेच अन्य सर्व संबंधीतांच्या सहकार्यामुळे या रक्कमेमध्ये बऱ्याच मोठया प्रमाणात बचत झाली असल्याचे स्पष्ट दिसते. सदरची बचत प्राप्त करतांना रुग्णालयाच्या प्रशासनाने कोणत्याही प्रकारे औषधांच्या गुणवत्तेशी तड जोड केलेली नाही. संबंधीत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यानंतरचही औषधे खरेदीसाठी प्रस्तावित करण्यात आली आहेत. मागील वर्षाच्या या खरेदीवरील बचतीची रक्कम प्राथमिकदृष्ट्या रु.1,04,44,359.06 इतकी आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे पुरवठाधारकांना वार्षीक पुरवठा आदेश देण्याचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

(प्रस्तवित वैद्यकीय साहित्याचे निविदेद्वारे प्राप्त दर व त्यापैकी निवडलेले दर कारणमीमांसेसह दर्शविणारे विभागनिहाय तक्ते सोबत ठेवण्यात आले आहेत.)

तरी उपरोक्त प्रमाणे पुरवठाधारकांना वार्षीक पुरवठा आदेश देणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३७१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वार्षीक (सन2015- 2016) यावर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part-A) तसेच On Consignment Basis (Part-B) वरील Item खरेदीसाठी सोबतच्या यादीतील औषधे/ सर्जिकल साहित्यांची कार्यकारी अधिकारी यांनी तपासणी करुन त्याचा अहवाल समितीसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ **सन** 2013-14 **मधील** (Annual Rate Contract) **वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

प्रस्ताव- **व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.26/07/2013 निर्णय क्रमांक 564 Clause No.9 अन्वये मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु.25,000/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी/ माहितीस्तव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.

प्रस्ताविक:- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन 2013-2014 या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण 66 पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु.30,52,88,358/- चे दि.19/03/2014 रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.16/11/2013 रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.26/07/2013 चे निर्णय क्र.564 अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण 58 औषधांसाठी एकुण रक्कम रु.1,38,47,412/- चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.12/04/2014 रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून 1 वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

वार्षीक खरेदीमध्ये औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी रक्कम रु.48,66,64,252/- चे खरेदीस दि.26/07/2013 चे मा. त्रिसदस्य समितीचे सभेत निर्णय क्र.564 अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यास मा.मंुबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि.25/10/2013 रोजी मान्यता मिळालेली आहे. त्यातील काही औषधे ही वार्षीक मागणीपेक्षा कमी लागतात तर काही औषधे जास्त लागतात. जी मुळ मागणी पेक्षा जास्त लागतात ती वार्षीक मंजुर दराने (Annual Rate Contract) खरेदीचा प्रस्ताव आहे. रु.41,81,08,249/- या मंजुर रक्कमेपेक्षा जास्त रक्कम झालेली नसून सन 2014-15 या वर्षाचे मंजुर दराने आता पर्यंत वेगवेगळया औषधांची वेगवेगळया प्रस्तवाअन्वये आता पर्यंत एकुण रक्कम रु.19,69,13,409/- ची अतिरिक्त खरेदी दि.27/08/2015 अखेर केलेली आहे. दि.28/08/2015 अखेर रु.6,84,56,003/- इतकी रक्कम शिल्लक आहे.

**मागणी:-** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2(ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे 02 धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल/ लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि.15/03/2014 निर्णय क्र.254 अन्वये मान्यता देखील आहे. त्याच मंजुर दराने खरेदी करण्यात आलेली असून याकामी पुर्णांकित रक्कम रु.43,14,582/- इतका खर्च आलेला आहे.

तरी सदरचे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.३७२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन 2013-14 मधील (Annual Rate Contract) वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने अतिरिक्त खरेदी करणेत आलेल्या औषधे, सर्जिकल, लॅबोरेटरी साहित्य यांचे सन- २०१३-१४ मधील मंजूर दर व सध्याचे बाजारभावामधील दर यांचा कार्यकारी अधिकारी यांनी तौलानिक अभ्यास करुन अंतीम निर्णय घ्यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ **गुरुपौर्णिमा उत्सवासाठी औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी व खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ निमित्त शिर्डी श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दीचा विचार करता दर्शन रांग, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास व मंदिर परिसरात प्रथमोपचार केंद्र सुरु करणेत आले होते. प्रथमोपचार केंद्रासाठी आवश्यक औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करणेत आलेले आहे. त्याकरीता औषध भांडारात उपलब्ध औषधे/ सर्जिकल साहित्या व्यतिरिक्त् मटेरियलसाठी कुंभमेळा सन-२०१५करिता मागविणेत आलेल्या ई-मेलव्दारे कोटेशनमधील दरानेच तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, त्यामधील निम्नतम दराने खरेदी करणेत आलेले आहे. त्याकरीता रु.१,०६,७७०.८० इतका खर्च आलेला आहे. तसेच ज्या औषधांकरीता कोटेशन प्राप्त झाले नाही ती औषधे स्थानिक पुरवठाधारकांकडून तातडीने खरेदी करणेत आले आहे. त्यासाठी रु.१५०००/- इतका खर्च आलेला आहे,असे दोन्ही मिळून एकुण रु.१,२१,७७०.८० इतका खर्च आलेला आहे.

**<u>मागणी–</u>** प्रथमोपचार केंद्रासाठी आवश्यक असणारे औषधे/ सर्जिकल साहित्याची श्री साईनाथ हॉस्पिटल यांनी दि.१८.०७.२०१५ अन्वये मागणी मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि.१८/०७/२०१५).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u>** गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ करीता मागविणेत आलेले औषधे/ सर्जिकल साहित्याची खरेदीकामी रु.१,२१,७७०.८० इतका खर्च आलेला आहे.

तरी गुरुपौर्णिमा उत्सव-२०१५ करीता औषधे/ सर्जिकल साहित्याची खरेदी करणेत आलेली असून व याकामी आलेल्या एकुण रक्कम रु.१,२१,७७०.८० मात्रचे खर्चाची नोंद घेणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.३७३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, गुरुपौर्णिमा उत्सवामध्ये साईभक्तांचे सोयीसाठी उभारणेत आलेल्या प्रथमोपचार केंद्रांवर खरेदी करणेत आलेल्या आवश्यक औषधे/ सर्जिकल साहित्यास व त्याकामी आलेल्या रु.१,२१,७७०.८० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१४ **डॉ.प्रिती दिपक देसाई, क्लिनिकल असि. (मेडीसीन) श्री साईबाबा हॉस्पिटल यांचे गंभीर गैरशिस्त वर्तनाबाबत.**

प्रस्ताव- श्री. रामदास सहादु निमसे,रा. निमगाव वाघा, ता. जि. अहमदनगर, वय-५५ वर्ष, हा रुग्ण दि.२३/०७/२०१५ रोजी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये डॉ.मुंदडा, व्हिजिटींग युरोलॉजिस्ट, यांचे युनिटमध्ये DJ Stent with Bilateral Renal Calculi with Urosepsis या आजारावरील उपचारार्थ मेल मेडीकल वॉर्ड मध्ये ॲडमिट झालेला होता. सदर रुग्णास डायबेटीक & IHD असल्याने डॉ. मुंदडा यांनी फिजिशियन यांचेकडेही उपचारासाठी रेफर केले होते. त्यामुळे डॉ.प्रिती देसाई, यांनी सदर रुग्णाला उपचार सुरु केले. सदर रुग्णास शुगर असल्याने ते नॉर्मल होईपर्यंत शस्त्रक्रिया करता येत नव्हती. उपचार चालू असताना सदर रुग्णाचे नातेवाईक रुग्णाला दुस-या रुग्णालयात घेऊन जाण्याचा आग्रह करत असताना त्यांना त्यावेळेची कंडीशन व्यवस्थित नसल्याने रुग्णास हलविल्यास त्याचे जीवास धोका निर्माण होईल, याची कल्पना नातेवाईकांना दिली, मात्र सदर रुग्णाचे नातेवाईकांनी त्यांचे जबाबदारीवर लेखी स्वरुपात लिहुन सदर रुग्णास रुग्णालयातून दि.२८/०७/२०१५ रोजी सायं.६ नंतर DAMA डिसचार्ज घेऊन गेले.

त्यानंतर त्याच दिवशी दि.२८/०७/२०१५ रात्री ८.०० वाजेच्या दरम्यान सदर रुग्णाला पुन्हा अपघात विभागात नातेवाईक रुग्णाला घेऊन आले. तेव्हा तेथे ऑनडयूटी सीएमओ डॉ. अनिल घरटे व डॉ. पालखे यांनी डॉ. प्रिती देसाई, फिजिशियन यांना कॉल केला. सदर रुग्णाची तपासणी केल्यानंतर योग्य ते औषधोपचार सुरु केले व रुग्णाची कंडीशन अतिशय खराब असल्याची कल्पना नातेवाईकांना देण्यात आली. याचदरम्यान अपघात विभागात रुग्णाचे नातेवाईकांमधील इसमांनी डॉ. देसाई यांचे जवळ धाऊन येऊन मोठयाने अपशब्द बोलू लागले, शिवीगाळ करून विनयभंग केला असा डॉ. प्रिती देसाई यांनी दि. ३१/०७/२०१५ रोजीचा अर्ज दिलेला आहे.

डॉ.प्रिती दिपक देसाई यांची सुरुवातीस एक वर्ष कालावधीकरीता क्लिनिकल (मेडीसीन) या पदावर परिविक्षाधीन नेमणूक करण्यात आलेली आहे. डॉ. देसाई हया दि.१७/०३/२०१५ रोजी कामावर हजर झालेल्या आहेत. डॉ. देसाई यांनी दि.२८/०७/२०१५ रोजी घडलेल्या घटनेबाबत दि.३१/०७/२०१५ रोजी वैद्यकीय संचालक यांना दिलेली तोंडी माहिती, दि.३१/०७/२०१५ रोजी दिलेल्या लेखी पत्रांमध्ये दिलेली माहिती व पोलीस स्टेशन येथे दिलेली फिर्याद यात तफावत आढळून आली असल्याने व श्री साईबाबा संस्थान विश्वव्यवस्था, शिर्डी सेवा विनीयम २०१३, सेवा (वर्तणुक) कलम १५ (१) नुसार प्रशासनाची परवानगी न घेतल्याने त्यांना गैरशिस्त वर्तनाबाबत जा. क्र. एसएसएस/एसएसबीएच/वै.सं./१८६/२०१५ दि. ०६/०८/२०१५ अन्वये पुढीलप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजवण्यात

आली तुम्ही श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे क्लिनिकल असिस्टंट (मेडीसीन) या पदावर कार्यरत आहात. तुम्ही २८/०७/२०१५ रोजी कामावर असताना अपघात रुग्ण रामदास सहादू निमसे रा. निमगाव वाडा ता.जि.अहमदनगर हे उपचारासाठी आले होते. त्यावेळी त्यांचे मुलाने आरडा ओरडा करुन तुम्हाला शिवीगाळ विनयभंग केला. या घटनेबाबत तुम्ही लेखी तक्रार दि. ३१/०७/२०१५ रोजी म्हणजेच तीन दिवस उशीराने संस्थान रुग्णालयाकडे दिलेली आहे. त्यावेळेस वैद्यकीय संचालक कक्षात प्र. वैद्यकीय संचालक उप. वैद्यकीय संचालक व प्र. वैद्यकीय प्रशासक यांनी तक्रार उशीरा का केली अशी विचारणा केली असता, आजारी असल्याने अपघात विभागात औषधोपचार घेत होते व त्यामुळे तक्रार देण्यास उशीर झाला, असे तुम्ही सांगीतले. रुग्णालय प्रशासनाने याची त्वरीत गंभीर दखल घेवुन त्याच दिवशी जा.क्र.एसएसएस/एसएसबीएच/१८२/२०१५ दि.३१/०७/२०१५ अनुन्वयी पत्र देउन आपले सोबत परीसेवीका सौ.सलगरकर व कानिफनाथ बो-हाडे, मदतनीस यांना सोबत देउन संस्थान वाहनाने रात्री १० च्या दरम्यान आपणास पोलिस स्टेशन, शिर्डी येथे फिर्याद देणेकामी पाठवले होते.

सदरकामी आपण शिर्डी पोलिस स्टेशन, शिर्डी येथे दि. ३१/०७/२०१५ रोजी फिर्याद दिली असून त्यात असे नमूद केले आहे की रुग्ण श्री निमसे यांचे मुलाने आरडा-ओरड करुन तुम्हाला शिवीगाळ व मारहाण केली आहे. त्यानंतर आपण दि.०२/०८/२०१५ रोजी वृत्तपत्रे व वृत्त वाहिनी साठी मुलाखत दिली असून त्या संस्थान व रुग्णालय व प्रशासनावर बेछुट खोटे व निराधार आरोप करून सदरचे घटनेबाबत माहीती दिली आहे, त्यामुळे संस्थानची बदनामी होउन नावलौकीकास बाधा निर्माण झालेली आहे.

तुम्ही संस्थानकडे सदर केलेल्या अर्जात शिवीगाळ व विनयभंग केला असे नमूद केले आहे तर पोलिस स्टेशन मध्ये सादर केलेल्या फिर्यादित शिवीगाळ व मारहान केली असे नमुद केले आहे. यावर सदर प्रकरणात तुम्ही संस्थान प्रशासन व पोलिसांची दिशाभूल करत आहात, असे दिसून आले आहे.

तुम्ही संस्थानकडे सादर केलेला अर्ज पोलिस स्टेशन येथे दिलेली फिर्याद व वृत्तपत्र व वाहिनीवर दिलेली मुलाखत यामध्ये कोठेही साम्यता नसून बरेच ठिकाणी तफावत आढळून येते, तुम्ही घटना घडलेनंतर ०३ दिवस उशिराने संस्थान प्रशासनाकडे अर्ज सादर केला आहे. व प्रशासनाने कार्यवाही केली नाही अशीही चुकीची माहीती दिली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिरडी सेवा विनीमय २०१३, सेवा (वर्तनूक) कलम १५ (१) नुसार – संस्थानचा कोणताही कर्मचारी, समितीच्या पुर्वमंजुरीचा अपवाद वगळता प्रतिकुल टिकेचा विषय असलेल्या किंवा बदनामीकारक प्रखर टिका अशा स्वरुपात असलेल्या कोणत्याही अधिकृत कृत्याचे समर्थन करण्यासाठी न्यायालय व वृत्तपत्राशी संपर्क साधणे या मार्गाचा अवलंब करणार नाही . असे असतांनाही तुम्ही सदरचे कृत्य केले आहे.

तरी याबाबत तुम्हास योग्य ते शासन का करणेत येवु नये ? या कारणांचा लेखी खुलासा ही नोटीस मिळालेपासून दोन दिवसाचे आत इकडील कार्यालयास सादर करणेत यावा अन्यथा एकतर्फा निर्णय घेतला जाईल.

सदर कारणे दाखवा नोटीसास अनुसरून डॉ. प्रिती देसाई यांनी दि .०६/०८/२०१५ व दि.०७/०८/२०१५ रोजीचे दोन खुलासे सादर केलेले आहे.

डॉ. प्रिती देसाई यांनी दिलेल्या खुलाशाबाबत प्रशासनाने अभिप्राय / स्पष्टमत याबाबत सोबत विवरण पत्र परिशिष्ट अ म्हणुन जोडलेले आहे व त्याव्यतिरिक्त डॉ. देसाई यांचे इतर गैरवर्तणुकीबाबतची माहीती ब म्हणून जोडलेले आहे.

तसेच दरम्यानचा काळात मा. निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांचेकडुन मा. राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे दि.१७.०८.२०१५ रोजीचे पत्राबाबत कार्यवाही करण्यास सांगितले आहे. सदर पत्रात पुढील प्रमाणे मजकूर आहे. मौजे निमगाव वाघा, ता. नगर येथील कै. रामदार निमसे यांचेवर श्री साईबाबा संस्थान रुग्णालय येथे उपचार चालू असतांना त्यांचे निधन झालेले आहे. त्यांचे नातेवाईकांनी वैद्यकीय सेवेमधील त्रुटीमुळे त्यांचा मृत्यू झाला अशी तक्रार वैद्यकीय अधिका-यांकडे केली. तथपि डॉ. प्रिती देसाई यांनी मयत निमसे यांचे नातेवाईकांवर केस दाखल केली आहे. सदर केस मागे घेणेबाबत त्यांचेनातेवाईकांनी विनंती केलेली आहे. कृपया, कै. निमसे यांचे नातेवाईकांवर दाखल झालेली केस मागे घेणेबाबत संबंधितांना सुचना व्हाव्यात तसेच डॉ.देसाई यांचे विरुदध तत्काळ कारवाई करावी अशी विनंती केली आहे.

तसेच डॉ. प्रिती देसाई यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांच्यासमोर संस्थानचे विरोधात फिजीशियन पदाचे संदर्भात रिट पिटीशन दाखल केले आहे.

डॉ.प्रिती देसाई यांनी दिलेला खुलासा समाधानकारक नाही, तरी डॉ.प्रिती देसाई यांना सदरचे गैरशिस्त वर्तनाबाबत त्यांचेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिरडी सेवा (शिस्त आणि अपील) विनीमय २०१३ कलम ८ नुसार खतेचौकशीकामी कलम ४ (१) अ, ब नुसार सेवा निलंबित करुन खातेचौकशीचे निष्कर्षाचे अहवालानुसार पुढील कारवाई करता येईल,

**किंवा**

डॉ.देसाई यांचे नेमनूक आदेशातील अट क्र.०७ नुसार– संस्थानला त्यांचे सेवेची गरज नसल्यास एक महीना नोटीस देवून अन्यथा एक महिन्याचा पगार देवून त्यांची सेवा संपुष्टात आणता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस सादर.

निर्णय क्र.३७४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, कार्यकारीअधिकारी यांनी चौकशी करुन अहवाल सादर करावा, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.३७५** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** स्वच्छ शिर्डी अभियान अंतर्गत ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.१०.१०.२०१५ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

शिर्डी शहरातील २० रस्त्यांच्या कडेला वृक्षारोपन व सौंदर्यीकरण करणेकामी श्री साईबाबा संस्थानने सहकार्य करावे. सदर रस्त्यांच्या कडेला ३,७३२ नग शोभेची झाडे यामध्ये निंब, पिंपळ, बोगनवेल व रॉयलपाम, डेडपाम वगैरें लावून सोदर्यीकरण करणेसाठी रु.६२,४७,९२०/- मात्र तसेच या झाडांचा एक वर्षाचा देखभाल व संगोपन खर्च रु.५५,९८,०००/- मात्र असा एकूण रु.१,१८,४५,९२०/- मात्र खर्च येणार आहे. शिर्डी शहरातील वृक्ष व वृक्षोरापन आणि सौंदर्यीकरणासाठी आवश्यक साहित्य संस्थानने पुरवावे, तसेच सर्व रस्त्यांवर वृक्षारोपनासाठी आवश्यक त्या प्रशिक्षीत मजुरांच्या खर्चाची व्यवस्था करावी, संस्थानने सदर वृक्षांच्या पालकत्वाची व संगोपनाची जबाबदारी स्विकारावी, वृक्षारोपन व सौदर्यीकरणाचे काम संस्थानच्या सहकार्याने ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांच्या माध्यमातून व्हावे. वृक्षारोपन करणेसाठी आवश्यक त्या शासकीय, निमशासकीय परवानगी घेण्यासाठी संस्थानने ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डीला सहकार्य करावे. तसेच श्री साईबाबा संस्थान परिसरात, रुग्णालय परिसरात, भक्तनिवास परिसरात वृक्ष लागवड करुन स्वच्छता व सौंदर्यीकरण करणे. या सर्व अपेक्षा संस्थानमार्फत पुर्ण व्हाव्यात.

ग्रीन शिर्डी क्लीन शिर्डी यांच्या उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन असे ठरले की, याकामी येणा-या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ तसेच विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांची मान्यता घेणेसाठी सर्वसमावेशक असा सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा. (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

**(२)** श्री.वसंत ठकार, प्रकल्प संचालक, सावली संस्था, पुणे यांनी दि.२३.०९.२०१५ रोजीचे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी सो यांचेकडे पुढीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

"गेल्या १० वर्षात राष्ट्रीय न्यासाच्या कायद्यात, नियमात, सवलतीत, योजनांमध्ये, पालकत्वांमध्ये बरेच बदल झालेले आहेत. त्या भागातील ब-याच पालकांना राष्ट्रीय न्यासाच्या योजना/ धोरणांबद्दल माहिती नसल्यामुळे या कार्यशाळेद्वारे मतिमंद व बहुविकलांग मुलांच्या पालकांना राष्ट्रीय न्यासाची उद्दिष्टये, सवलती व योजनांची माहिती देता येईल. तरी आपल्याला विनंती की, आपण ही कार्यशाळा दि.३० ऑक्टोबर किंवा दि.०१ नोव्हेंबर रोजी घेण्यास परवानगी द्यावी."

उपरोक्त पत्रावर सविस्तर चर्चा होऊन, सावली संस्था, पुणे यांना संस्थानमार्फत सर्वतोवपरी सहकार्य करणेत यावे, असे समितीचे मत झाले व त्यासाठी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

---

**(३)** कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळाच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत शासन निर्णय मकचौ- २०१३/ प्र.क्र.६३/ मकक दि.१९ जून २०१४ रोजी प्रसिध्द झालेला असून या शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेत येऊन, डॉ.प्रिती देसाई यांचे प्रकरण त्या समितीकडे सोपविणेत यावे.

---

**(४)** श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांची दररोजची संख्या मोजली जाणारी यंत्रणा संस्थानकडे नाही व कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये याची प्रकर्षाने जाणीव झाली. याकरीता दररोज किती भक्त दर्शनासाठी येतात हे समजण्यासाठी येणा-या भक्तांची सख्या दर्शविणारी यंत्रणा देणगी स्वरुपात प्राप्त करुन घेणेसाठी संस्थानचे अधिकृत संकेस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी. (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**(५)** संस्थान रुग्णालयांमध्ये व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची संधी मिळावी, यासाठी बरेचसे तज्ञ डॉक्टर्स संस्थानकडे अर्ज करतात व ते अर्ज सभेसमोर सादर करणेत येऊन, त्यांना परवानगी देण्यामध्ये बराचसा कालावधी जातो. याकरीता यापुढे व्हिजीटींग पध्दतीने सेवा करण्याची इच्छा व्यक्त करणारे अर्ज आल्यास त्यावर निर्णय घेण्याचे अधिकार कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.३२० ते ३७५ सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (श्रीकांत कुलकर्णी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी**